मा
२६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा[illegible]
( जिल्हा वाचनालय )

अ८

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक — सन —

अंक —

( महिने )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सं. मि. ३१७८

मराठी ग्रंथ संग्रहालय

# ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण.

# ड्यानिअल ओकोनेलचें चरित्र.

हें पुस्तक

नारायण कृष्ण आगाशे, बी. ए. एल्एल्. बी. वकील सातारा.

यांनीं

J. A. Hamilton कृत Life of Daniel O'Connell

या व अनेक इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें लिहिलें

तें

विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए.

यांणीं

कोल्हापूर 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिलें.

सन १९०१

किंमत २ रुपये.

# अर्पणपत्रिका.

व्यवस्थित व कायदेशीर उपायांनीं राजकीय हक्क
संपादन करूं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांस हा
ग्रंथ प्रेमपूर्वक अर्पण केला आहे.

ना० कृ० आगाशे.



जो लोककल्याण ॥ साधावया जाण ॥
घेई करीं प्राण ॥ त्या सौख्य कैंचें ? ॥ १ ॥

शारदा नाटक.

सं. मा. ३-१९८

# टिपा.

टीप नंबर १. — आयर्लंडच्या नकाशाच्या अगदीं डाव्या कोपऱ्यांत केरी नांवाची कौंटी ह्मणजे प्रांत अथवा परगणा सांपडेल. काहिर सिवीन हें खेडें अगदीं लहान आहे, तरी तें नकाशांत दाखविलें आहे. केरी हा प्रांत डोंगराळ असून त्यांत झाडी फार आहे.

टीप नंबर २. — ख्रिस्तिधर्माच्या लोकांत प्रॉटेस्टंट व रोमन कॅथोलिक असे दोन मोठे पंथ आहेत. ह्या दोन्ही पंथास अनुसरणाऱ्या लोकांत मतभेद बराच आहे. मुख्य भेद हा आहे कीं, प्रॉटेस्टंट लोक रोमच्या धर्मगुरूस [ पोपास ] आपला धर्मगुरू मानीत नाहींत, रोमन क्याथलिक लोक मानतात.

टीप नंबर ३. — या कायद्यांना इंग्रजी इतिहासांत 'पीनल लाज्' Penal Laws असें नांव दिलेलें आहे. 'पीनल' या शब्दाचा अर्थ 'शिक्षेसंबंधीं,' 'शिक्षा ठरविणारा, असा आहे. आपल्या इकडे चालू असलेल्या 'इंडियन पीनल कोडाला,' 'हिंदुस्थानांतील अपराध्यांस शिक्षा करण्याचा कायदा' असें मराठींत ह्मणतात. त्याच्या अनुरोधानेंच वरील शब्द वापरले आहेत.

टीप नंबर ४. — पोटीं पुत्रसंतान नसलें ह्मणजे दुसऱ्या कोणाला तरी आपला मुलगा ह्मणवून त्याला आपल्या पश्चात आपल्या मालमत्तेचा मालक करणें ही चाल केवळ हिंदु लोकांतच आहे असें नाहीं. प्राचीन काळीं, रोमन लोकांत ही चाल होती. हल्लीं मुसलमान लोकांत व युरोपांतील सुधारलेल्या देशांतही ही चाल आहे. दत्तक घेण्यांत हिंदु लोकांची धर्माची जी बाब आहे ती मात्र या लोकांत आढळत नाहीं. हा काय तो मुख्य भेद आहे.

टीप नंबर ५. — सेंट ओमर हें एक फ्रान्स देशांतील नोर्ड नांवाच्या प्रांतांत फार प्राचीन काळचें शहर आहे. पूर्वी या गांवाला चोहोंकडून फार मजबूत अशी तटबंदी होती. इंग्लंडांतील रोमन कॅथो-

लिक धर्मोपदेशकांच्या शिक्षणाकरितां कारडिनल अलेन यानें येथें एक कॉलेज स्थापन केलें आहे. या शहरांत शास्त्रीय शोध करणाऱ्या अनेक संस्था आहेत.

**टीप नंबर ६.** — हें शहरही फ्रांन्स देशांतच न्याडिक्योल नांवाच्या प्रांतांत आहे. येथें विद्वान् लोकांच्या अनेक सभा आहेत व एक फार मोठें पुस्तकालय आहे.

**टीप नंबर ७.** — McCarthy's History of our Own Times vol. I. 204.

**टीप नंबर ८.** — कायदे शिकविणारी ही संस्था फार प्राचीनकाळापासून अस्तित्वांत आहे. येथें ग्रंथाचा भरणा फार मोठा आहे. ही संस्था प्रथम केव्हां व कोणच्या उद्देशानें स्थापन झाली याची माहिती कोणाला पाहिजे असल्यास त्यांनीं एन सायक्लोपीडिया ब्रिटॅनिकाचा १३ वा भाग ( प्रत १४.) यांतील ८७–९० पानें वाचावीं.

**टीप ८. [ अ, ]** — विग् ह्मणजे लोकपक्ष आणि टोरी ह्मणजे राजपक्ष. लिबरल आणि कॉन्सरव्हेटीव हीं अनुक्रमें याच अर्थाचीं द्योतक नांवें आहेत.

**टीप नंबर ९.** — Bright's History of England. vol. III. 118 of 81.

**टीप नंबर १०.** —१. फ्लड हेनी, जन्म १७३२ आणि मृत्यु १७९१. आयर्लंडांतील हा एक प्रसिद्ध वक्ता होता. आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर तो फारच लोकप्रिय झाला होता. हा अनेक वर्षें पार्लमेंटचा सभासद होता. २. ग्रेटन हेन्री जन्म १७५० मृत्यु १८२०, हा ब्यारिस्टरचा धंदा करीत होता. तो १७७५ सालीं पार्लमेंटचा सभासद झाला आयरिश लोकांच्या कल्याणाकरितां झटणें हें त्याचें अगदीं ब्रीद होतें. त्याच्या खटपटीनें आयरिश लोकांच्या अनेक अडचणी दूर झाल्या होत्या. याची वक्तृत्वशक्ति अगदीं अवर्णनीय होती.

टीप नंबर ११. —— डब्लीन हें आयर्लंडाचें राजधानीचें शहर होय. बेलफास्ट हेंहीं आयर्लंडांतील मोठें शहर असून रेशमी कापडाबद्दल फार प्रसिद्ध आहे.

टीप नंबर १२. ——०रघुवंश महाकाव्य सर्ग १० श्लोक ६.

टीप नंबर १३. —— म्याकार्थीचा "An Cutline of Irish History" नांवांचा इतिहास पानें ७२—७८ पहा.

टीप नंबर १४. (अ)— हॅनोव्हरहा एक युरोपांतील लहानसा प्रांत आहे. हॅनोव्हर घराण्यांतील इंग्लंडचा पहिला राजा पहिला जॉर्ज होय. स० १७१९ १३ (ब) आपलें नष्ट झालेलें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां आपल्या वाडवडिलांनीं हें बंड केलें होतें. याबद्दल आयरिश् लोकांना अजूनपर्यंत फार मोठा अभिमान वाटत आहे. या बंडाला चालू ह्मणजे १८९८ सालीं पुरें एक शतक झालें. सबब त्याचा शतसांवत्सारिक उत्सव होण्याचें त्या देशांत घाटत आहे. अशा प्रकारचा उत्सव करणें किती योग्य आहे, यासंबंधानें जान० ई० रेडमंड, एन्. पी. यानें खालीं लिहिलेले उद्गार काढिले आहेत.

(Nineteenth Century of 1898, p. 13.

'The rising ended in failure but it was the failure of brave men fighting against over-whelming odds for a sacred cause. The men who led the redels live as heroes and martyrs in the hearts of the people and the universal feeling is not merely that no one need 'fear to speak of 98.' but that Irishmen have good reason to be proud of its memories and to celebrate its century.

टीप नंबर १५. (अ)— c. f. McCarthy's History of Our Own Times. vol. 1. p. 204.

[ब] हें बंड पिट्च्या हलगर्जीपणामुळें झालें; फार तर काय बंड करण्याविषयीं लोकांना त्यानें उत्तेजन दिलें, असा त्याच्यावर कांहीं ग्रंथकारांचा आरोप आहे. असें केल्यानें इंग्लंड बरोबर आयर्लंडाचें ऐक्य होण्याला फार सोपें जाईल असें त्याचें मन होतें, असें या ग्रंथकारांचें

ह्मणणें आहे. वर सांगितलेल्या नाइंटिंथ सेंचरींतल्या लेखकानें हे आरोप कोणचे ते दिले आहेत. तो ह्मणतो.

"This is the accusatiou Ireland makes against Pitt that he planned an insurrection in order to support it; that he allowed the people to be goaded into rebellion and then used that rebellion as a means of intensifying hatred between men of different religions in the same land; that he widened and deepened the, chasm between the mass of people and the dominant class; and that he did all this in order to smooth the way for the carrying of the Legislative Union.

प्रसिद्ध इतिहासकार लेकी व सर जॉर्ज बॅरिंगटन यांनीं आपल्या अनुक्रमें 'Leaders of Publie Opinion in Ireland' आणि 'Rise and Fall of the Irish Nation या पुस्तकांत वर दिलेल्या मताचेंच समर्थन केलें आहे.

टीप नंबर १६. --A full and authentic report of the Tilak case pp. 114-119.

सं-भा-३/१५

# ड्यानियल ओकोनेलचें चरित्र.

## भाग १ ला.

### बाळपण आणि ब्यारिस्टरचा धंदा.

ड्यानियल ओकोन्नेल् याचा जन्म ता० ६ ऑगस्ट १७७५ रोजीं केरी ( टीप नंबर १ पहा. ) प्रांताच्या अगदीं एका कोपऱ्यांत असणाऱ्या काहिरा सिव्हीन नांवाच्या गांवांत झाला. आयर्लंडाच्या नैऋत्येकडील अरण्यमय प्रदेशांत ओकोनेल् घराण्यांतील पुरुष फार दिवसांपासून वसती करून राहिले होते. ओकोनेल्चें घराणें क्याथलिक धर्मानुयायी होतें. क्याथलिक लोकांची स्थिति या वेळेस फारच शोचनीय होती. इंग्लिश लोकांनीं वेळोवेळ अपराध्यांनां शिक्षा देण्याच्या हेतूनें पसंत केलेल्या कायद्यांच्या ( टीप नंबर २ पहा.). अंमलाखालीं ते अगदीं चिरडून गेले होते. आपल्या निर्वाहापुरती जमीन खरेदी घेण्याची देखील कायद्यानें ( टीप नंबर ३ पहा ). त्यांना सवड ठेविली नव्हती. अशा या करड्या अमलांत, वास्तविक ह्मटलें तर ओकोनेलचे पूर्वज अन्नाला महाग होऊन, केव्हांच देशोधडीला लागावयाचे; परंतु त्यांच्या सुदेवानें, ते ज्या प्रदेशांत रहात होते, तो प्रदेश अगदीं एकीकडे असल्यानें, सरकारी अधिकाऱ्यांची नजर तिकडे फारशी जात नसे व त्यामुळें त्यांच्या पोटाला पुरे इतकी जमीन ते जवळ बाळगून होते. अठराव्या शतकाच्या शेवटीं ही सर्व जमीन मॉरिस या नांवाच्या एका गृहस्थाच्या ताब्यांत होती. मॉरिसला मॉरगन या नांवाचा एक धाकटा भाऊ होता व तो रेशीम आणि दारू यांचा व्यापार करीत असे. हाच मॉरगन आमच्या चरित्रनायकाचा बाप होय. त्याला क्याथरिन— हें त्याच्या बायकोचें नांव होतें—पासून पुष्कळ अपत्यें झालीं. त्यांतील

दहाच काय तीं त्या उभयताच्या पश्चात् जिवंत राहिलीं, बाकीचीं सर्व मरण पावलीं. या दहा भावंडांत ड्यानियल् हा सर्वांत वडील होता.

मॉरिस ओकोनेलच्या पोटीं मूलबाळ कांहीं नव्हतें. ह्मणून ड्यानियल हा तीन चार वर्षांचा झाला नाहीं तोंच, त्याला त्यानें दत्तक ( टी. नं. ४ प ). घेतलें. ड्यानियल हा मुलगा दिसण्यांत फारच तरतरीत आणि बुद्धिमान् होता. त्याची स्मरणशक्ति तर इतकी कांहीं विलक्षण होती कीं, अगदीं मरेपर्यंत आपल्या लहानपणच्या गोष्टी एकूणएक त्याला चांगल्या आठवत होत्या. तो चार वर्षांचा झाला नाहीं तोंच, त्यांच्या चुलत्यानें त्याला एका लहान शाळेंत घातलें. त्या शाळेंत एक ह्मातारा पंतोजी होता. ड्यानियलचा तो पाणीदार चेहरा पहाताक्षणींच त्या ह्मातान्याच्या मनांत त्याच्याविषयीं मोठें प्रेम उत्पन्न झालें. त्यानें त्याला झट्कन उचलून आपल्या मांडीवर घेतलें, व मांडीवर घेतल्या घेतल्याच त्याला तो मूळाक्षरें शिकवूं लागला. ड्यानियलनें तीं आपल्या बुद्धीच्या जोरावर तास दीड तासाच्या आंतच अगदीं मुखोद्गत करून टाकिलीं! त्याला पुस्तकें वाचण्याचा या शाळेंत असतांनांच मोठा नाद लागला, तो इतका कीं, त्याच्या बरोबरीचे त्याचे सोबती खेळण्यांत अगदीं गढून गेले ह्मणजे, तो त्यांचा डोळा चुकवून एकीकडे जाऊन करमणुकीचीं पुस्तकें वाचीत बसे.

वर सांगितलेल्या कायद्यांत एक कायदा असा होता कीं, त्याच्या योगानें, रोमन क्याथलिक लोकांना आपल्या मुलांनां शिक्षण देणें, अगदीं अशक्य नाहीं, तरी पण फारच कठीण झालें होते. आठराव्या शतकाच्या आरंभाला अशी स्थिती होती कीं, क्याथलिक लोकांनां खाजगी रीतीनें शाळा घालण्याची, किंवा प्रॉटेस्टट शाळांमधून शाळामास्तरांची नोकरी धरण्याचीदेखील सक्त मनाई होती. त्यांतल्या त्यांत समाधान मानून घेण्याला एवढीच जागा होती कीं, आपआपल्या घरांत आपल्या स्वताच्याच मुलांना शिक्षण देण्याला कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नव्हता. परंतु घरच्या घरीं मुलांचें शिक्षण मनाजोगें होणें त्या वेळेस फार दुरापस्त होतें. ह्मणून ज्या

गृहस्थाला द्रव्याची अनुकूलता होती, तो आपलीं मुलें बहुतकरून फ्रान्स जर्मनी वगैरे देशांत शिकण्याकारितां पाठवीत असे. इ. स. १७९२ सालापर्यंत या दुष्ट कायद्याचा अम्मल चालू असल्यामुळें, ड्यानियलला व त्याच्या भावाला विद्या संपादन करण्याकरितां आपल्या वयाच्या तेराव्या चौदाव्या वर्षाच्या सुमारास घराबाहेर पडावें लागलें. तो आपल्या चुलत्याच्या सांगण्यावरून १७९१ सालीं प्रथम सेंट ओमर [ टीपनं. ५ पहा] येथील कॉलेजांत शिकण्याकरितां राहिला. त्या कालेजांत शिकत असतांना आपल्या विशालबुद्धीच्या जोरावर तो सर्व गुरुवर्गास अत्यंत प्रिय झाला होता. त्या कॉलेज्याचा मुख्य गुरु डॉक्टर ग्रेगरी यानें १७९२सालीं त्याच्या संबंधानें खालील उद्गार काढिले:—" या दोन मुलांपैकीं वडील ड्यानियल याच्यासंबंधानें मला एकच वाक्य लिहावयाचें आहे, तें हें कीं, तो लोकांत फारच मोठ्या मान्यतेला चढेल; आणि हें माझें भविष्य चुकलें तर, यासारखी दुसरी ढोबळ चूक या जन्मांत माझ्या हातून पूर्वी कधीं झाली नाहीं, व यापुढेंही कधीं होणार नाहीं, असेंच मी समजेन. " असो; १७९२ सालच्या आगस्ट महिन्यांत त्यानें तें कॉलेज सोडलें, आणि नंतर तो डुआई [ टीपनंबर ६ पहा. ] येथील कॉलेजांत जाऊन राहिला; परंतु तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांनीं तें कॉलेज बंद झाल्यामुळें १७९३ सालाच्या आरंभालाच त्याला घरीं परत यावें लागलें.

शिक्षणाच्या निमित्तानें तो फ्रान्स देशांत असतांना, त्या देशांतील राज्यक्रांति संबंधानें त्यानें जी हकीगत कानांनीं ऐकिली, व अंशतः डोळ्यांनीं पाहिली, तीपासून त्याच्या मनावर जो कांहीं एक चमत्कारिक परिणाम झाला, तो मरेपर्यंत तसाच कायम होता; ( टीपनंबर ७ पहा. ) राज्यक्रांति व ती घडवून आणणारे लोक, यांच्यासंबंधानें त्याच्या त्या कोंवळ्या मनांत फार किळस उत्पन्न झाली. अशी ही किळस उत्पन्न होण्याला आणखी एक कारण हें असावें कीं, क्याथलिक धर्मांतील लोकांचा या राज्यक्रांतीवाल्या लोकांनीं फार छल केला होता. स्वधर्मीयांचा झालेला छळ पाहून किंवा ऐकून ज्याच्या मनाला चटका लागत नाहीं, असा मनुष्यच विरळा. त्यांतून ओकोनेल तर आपल्या ह्मणजे क्याथलिक

धर्माचा कट्टा अभिमानी होता; आणि जसें जसें अधिकाधिक शिक्षण त्याला मिळत गेलें—तसा तसा त्याचा तो अभिमान जास्त दृढ होत गेला होता. यामुळें फ्रान्स देशांत स्वधर्मानुयायांबरोबर तेथील लोकांनीं केलेल्या अनुदार वर्तनाबद्दल त्याच्या मनाला अगदीं चटका लागून राहिला, व ती गोष्ट तो साऱ्या जन्मांत कधींही विसरला नाहीं!

मागच्याच प्यारिग्राफांत सांगितल्याप्रमाणें सन १७९३ सालाच्या आरंभालाच घरीं परत आल्यानंतर, बाकी राहिलेले आठ दहा महिने त्यानें केरी प्रांतांत आपल्या गांवाच्या आसपास राहूनच काढिले. तेथें असतांना तो शेतकरी लोकांशीं फारच प्रेमानें वागत होता. नेहमीं एकाच ठिकाणीं बसणें, बोलणें, सर्वांनीं मिळून शिकारीला जाणें, यांच्या योगानें गरीब शेतकरी लोकांची खरी स्थिति कशी असते, हें त्याला चांगलें कळून आलें. अशा प्रकारानें बरेच दिवस आनंदांत घालविल्या-नंतर १७९४ सालीं तो लंडन येथें गेला व लिन्कन्स इन् ( टीपनंबर ८ पहा. ) नांवाच्या संस्थेंत जाऊन तेथें त्यानें कायद्याचा अभ्यास सुरू केला. आयर्लंडांतील कोर्टांत ब्यारिस्टरचा किंवा वकीलाचा धंदा करा-वयाचा झाला, तरीदेखील लंडन शहरांत राहून कायद्याचा अभ्यास केला पाहिजे, असा त्या वेळेस निर्बंध होता. ह्मणून लंडन शह-रास जाणें त्याला भागच पडलें. तेथें गेल्यावर त्यानें कायद्याचा अभ्यास फार झटून आणि मन लावून केला, व त्यांत उत्तम प्रकारचें प्राविण्य मिळविलें. बॅरिस्टरचा धंदा करूं लागल्यावर थोडेच दिवसांत तो सार्व-जनिक कामांत पुढें सरसावला, व पक्षकार लोकांकडून त्याला कामेंही अतिशय येऊं लागलीं. यामुळें विद्यार्थिदशेंत असतांना मिळविलेल्या कायद्याच्या ज्ञानांत भर घालण्याला त्याला मिळावा तितका अवकाश मिळाला नाहीं; अर्थात् पूर्वीच्या ज्ञानावरच त्याला वेळ मारून न्यावी लागत होती. परंतु त्या ज्ञानाचा पाया फार भक्कम घातलेला होता, ह्मणून त्याच्याच जोरावर, कोर्टांतून काम चालवीत असतां आपलें काय-द्याचें ज्ञान कमी आहे, असें न्यायाधीशांस किंवा आपल्या अशिलांस त्यानें कधींही भासूं दिलें नाहीं.

स-VT-30198



फ्रान्स देशांतील राजकीय गोष्टींची त्याला जी आठवण होती, तीमुळें इंग्लंडांतील ( टी. नं. ८ प. ) व्हिग व टोरी या दोन राजकीय पक्षांपैकीं टोरीपक्षाकडेच त्याच्या मनाची विशेष धांव होती, व त्यांच्याच मताचा अनुवाद तो नेहमीं करीत असे. यामुळें तिसऱ्या जॉर्ज राजाच्या कारकीर्दींत टोरी पक्षाचा पिट् नांवाचा प्रसिद्ध मुत्सद्दी अधिकारारूढ असतांना, हार्डी प्रभृति लोकांवर, प्रजेंत बेदिली उत्पन्न करण्याचे हेतूनें लिहिलेल्या लेखांबद्दल, राजद्रोहाच्या आरोपाखालीं इंग्लंडांत जेव्हां खटले सुरू झाले, तेव्हां त्याला फार आनंद झाला. तो इतका कीं, हे खटले न्यायासनासमोर सुरू असतां ते ऐकण्याकरितां तो प्रत्येक दिवशीं कोर्टांत जात असे. हार्डीवरील खटला चालू असतां, सरकार पक्षाचा पुरावा अगदीं लंगडा आहे, व हार्डीचाच पक्ष फार बळकट आहे, असें त्याला दिसून आलें. सरकारी वकिलाचें भाषण त्याला अगदींच पोंचट असें वाटलें, व तें भाषण ऐकल्यापासून त्याच्या मनावर असा परिणाम झाला कीं, टोरीपक्षाकडील लोकांचीं मतें अगदीं त्याज्य आहेत असें त्यालाच वाटूं लागलें. शेवटीं तो खटला संपल्यानंतर त्याच्या मनांत नवीन उद्भवलेला विचार इतका दृढ झाला कीं, तो यापुढें आपल्याला टोरी असें ह्मणवून न घेतां व्हिग् असें ह्मणवून घेऊं लागला, व शेवटपर्यंत तो त्याच पक्षाला धरून राहिला. यावरून आपलीं फार दिवसांचीं मतें एकदम बदलून जाण्याला एखादीच गोष्ट कशी कारणीभूत होते, हें चांगलें स्पष्ट होतें. पहिल्यानें एक मत, व मागाहून दुसरें मत, असे प्रकार बऱ्याच जगत्प्रसिद्ध मुत्सद्यांच्या चरित्रांत आढळून येतात. लिबरलपक्षाभिमानी वृद्ध मुत्सद्दी मि. ग्लॅडस्टन् हेही आरंभाला कॉन्सरव्हेटिव्ह मताभिमानी होते, ही गोष्ट पुष्कळांस माहीत असेलच. ती लक्षांत घेऊन ओकोनेलच्या या मतांतराबद्दल त्याला दोष द्यावा किंवा नाही, हें सुज्ञ वाचक ठरवितीलच!

लिंकन्स इन् या संस्थेंत चार वर्षें राहून कायद्याचा अभ्यास पुरा झाल्यावर तो आयर्लंडांत परत आला, आणि १७९८ सालच्या मे महिन्यांत ब्यारिस्टर लोकांच्या पटांत त्यानें आपलें नांव घातलें. ड्यानियलला सेंट ओमर येथें पाठविण्यांत व सर्व शिक्षण पुरें झाल्यावर,

त्यानें कोणच्या धंद्यांत शिरावें, या बाबतींत, त्याच्या चुलत्याचे काय हेतू होते, याची अटकळ बांधण्याला आमच्यापाशीं खात्रीलायक अशीं कांहीं साधनें नाहींत. सबब त्यासंबंधानें आह्मांला कांहीं सांगतां येत नाहीं; परंतु एवढें मात्र निश्चयात्मक सांगतां येईल कीं, तेथें गेल्यावर, चारचौघांत जर मान्यता मिळवावयाची असली, तर ब्यारिस्टराचा धंदा पतकरण्याशिवाय आपल्या देशांत, कायद्यांच्या सक्तीमुळें, दुसरा कोणचाही मार्ग खुला नाहीं, ही गोष्ट ओकोनेलनें आपल्या दूरदृष्टीनें, विद्यार्थिदशेंत असतांनाच, ताडिली होती. या दूरदर्शीपणाला शोभेल अशीच महत्वाकांक्षा अगदीं लहानपणापासून त्याच्या अंगांत दिसून येत होती. व त्यासंबंधानें एकच उदाहरण दिलें असतां पुरें होईल. तें उदाहरण हें:—तो दहा वर्षांचा असतां, एकदां त्याच्या घरच्या मंडळींतच त्या वेळेस फार प्रसिद्धीस आलेल्या फ्लड [ टीप नंबर १० पहा. ] ग्रेटन, चार्लेमांट या लोकनायकांविषयीं मोठा कडाक्याचा वाद चालला होता. त्या वेळेस हा धूर्त मुलगा त्या सर्वांचें बोलणें अगदीं मुकाट्यानें ऐकत बसला होता. हें पाहून त्याची आत त्याला ह्मणाली ' ड्यानियल्, कां? कसला विचार करीत आहेस?' त्यावर त्यानें उत्तर दिलें ' विशेष कांहीं नाहीं, अजून देखील सारें जग मी हालवून टाकीन किंवा नाहीं याचा विचार चालविला आहे. ' रामाचें सर्व सैन्य मारून तुमचे डोळे निववीन, असें लवानें वाल्मिकी ऋषीला सांगितल्यावर ' ऐकुनि शब्द ऋषी मग स्तब्धचि होऊनिया हृदयांतरिं डोले ' अशी जशी त्या ऋषिवर्याची स्थिति झाली, तशीच कांहीं अंशानें त्या बाईची, हें उत्तर ऐकून झाली असावी, यांत कांहीं शंका नाहीं. असो. ड्यानियलचा दुसरा एक चुलता या वेळेस इंग्लंड देशांत लष्करी खात्यांत नोकरीवर होता, व तेथें त्यानें फारच मोठा लौकिक संपादन केला होता. चुलत्याचा हा लौकिक ऐकून आपणही जगांत असेंच नांव मिळविण्याची कांहीं तरी खटपट केली पाहिजे, अशी अनिवार इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली असावी, असा कांहीं लोकांचा तर्क आहे. घरांतील वडील माणसें जो कित्ता घालून देतील, तो वळविण्याची प्रायः लहान मुलांची

प्रवृत्ति असते. सद्‌गुणी आईबापांचीं मुलें दुर्गुणी निघण्याचा, किंवा दुर्गुणी आईबापांचीं मुलें सद्‌गुणी निघण्याचा संभव फार कमी असतो. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां लोकांचा हा तर्क कदाचित् खरा असूं शकेल, नाहीं असें नाहीं; परंतु शाळेंत असतानांच मागें सांगितल्याप्रमाणें, आपण कोणचा धंदा करावयाचा यासंबंधान एकदां जो त्याचा ग्रह झाला, तोच पुढें बळकट होऊन ब्यारिस्टरचा धंदा सुरू करण्याचा त्याचा निश्चय झाला असावा असें निदान आमचें तरी मत आहे.

अगोदर आयरिश लोकांच्या अंगांत स्वभावतःच असे कांहीं गुण आहेत कीं, त्यांच्या योगानें ते वकीलाच्या किंवा ब्यारिस्टरच्या धंद्यांत चांगलें यश संपादन करितात. त्यांतून या गुणांपैकीं मार्मिकपणा, दक्षता, वादप्रियता आणि चतुरता हे गुण आमच्या चरित्रनायकाच्या अंगांत विशेषच वसत होते. ज्या आयर्लंड देशांत मोठेमोठे जमिनदार व दुसरे वरिष्ठ दर्जाचे लोक, स्वदेशाच्या कल्याणाची पर्वा न बाळगतां आपला देश सोडून देऊन, दुसऱ्या देशांत जाऊन राहण्यास नेहमीं तयार असे होते, ज्या देशांत धनाढ्य आणि मोठ्या हिय्याचे व्यापारी लोकांचा भरणा फारच कमी होता व त्यांतून जे कांहीं थोडे होते, ते सर्व डब्लिन [ टीप नंबर ११ पहा. ] किंवा बेलफास्ट अशा मोठ्या शहराचा आधार धरून रहात असत, त्या देशांत लोकांच्या नजरेसमोर येण्याला ब्यारिस्टर मंडळीला अनायासें संधि मिळाली. जमिनदार व धनाढ्य व्यापारी यांनीं लोकसेवेचें आपलें व्रत जर सोडलें नसतें, तर त्यांना ही संधि मिळाली नसती, हें अगदीं उघड आहे. या संधीचा त्यांनीं, चांगला उपयोग करून घेऊन; लोकाग्रणीची बहुमानाची जागा पटकाविली होती. शिवाय आपण या मानाला सर्वस्वी पात्र आहों, असें आपल्या लोकांच्या प्रत्ययाला आणून देण्याच्या कामीं, खटल्याच्या निमित्तानें न्यायासनासमोर उभे राहून कराव्या लागणाऱ्या भाषणांचा त्यांना फार चांगला उपयोग झाला. कारण न्यायासनासमोर चालणाऱ्या वाग्युद्धानें आयरिशलोक अगदीं मोहून जात होते. ते इतके कीं, त्याची कल्पना देखील इंग्लिश लोकांना किंवा आपल्याला करितां याव-

याची नाहीं. निरनिराळीं न्यायासनें आणि त्यांच्या समोर चालणारी कामें यांच्याकडे इंग्लंडांतील लोकांचें लक्ष कामापुरतें तेवढें असतें. आयर्लंडांतील लोकांची स्थिति मात्र याहून फार भिन्न आहे. त्या सर्वांना, आणि त्यांतूनही विशेषतः शेतकरी लोकांनां, न्यायासनासमोर चालणारा खटला रंगभूमीवर चालणाऱ्या नाटकाच्या प्रयोगाप्रमाणें चित्ताकर्षक वाटतो. एखाद्या संगीत नाटक मंडळींतील प्रसिद्ध गायकाचें गाणें चालू असतांना, कांहीं श्रोते लोक जसे अगदीं तल्लीन होऊन जातात, तसें एखाद्या प्रसिद्ध बॅरिस्टराचें किंवा वकिलाचें मोठें आवेशयुक्त मुद्देसूद व कोटीबाज बोलणें ऐकलें ह्मणजे, आयरिश् लोक आनंदातिशयानें अगदीं डोलावयाला लागतात. आयरिश् लोकांच्या या साहजिक मनोवृत्तीमुळें ही मंडळी त्यांना इतर लोकांहून प्रिय झाली होती, हें तर खरेंच; पण त्यांतल्या त्यांत आपल्याला आवडून घेण्याजोगे त्यांच्या अंगीं ब्यारिस्टर या नात्यानें गुणही तसेच होते, यांत कांहीं शंका नाहीं. कामापुरतें लागणारें तेवढें कायद्याचें ज्ञान संपादन करून स्वस्थ न बसतां, इतर विद्यांचा व्यासंगही त्यांच्या हातून मोठी वाखाणणी करण्यास रखा होत होता. अशा विद्याव्यासंगी लोकांची कोर्टांतील भाषणें कोणालाही प्रिय झाली असतीं; मग तीं अगोदरच तिकडे ओढा असणाऱ्या आयरिश लोकांना प्रिय वाटत होती यांत आश्चर्य कसचें? आयरिश लोकांची गोष्ट तर एकीकडेच राहो; परंतु खुद्द इंग्लंडांतील लोकांचीदेखील या वेळेस अशी दृढ समजूत होती कीं, आयर्लंडांत जर कोठें विद्या वसत असेल, तर ती ब्यारिस्टर व वकील लोकांतच वसत आहे; आणि वास्तविक पाहिलें असतां वस्तुस्थिति अशी होती यांतही कांहीं शंका नाहीं. पूर्वीपासून चालत आलेलें ' विद्यायां व्यसनं ' हें आपलें व्रत त्यांनीं आज मित्तीला देखील कायम राखिलें आहे, हें त्यांस अत्यंत भूषणास्पद आहे. या कामांत इंग्लंडांतील ब्यारिस्टर व वकील मंडळीला आयर्लंडांतील त्यांच्या बंधूनीं खालीं पहावयास लाविलें आहे, असें कोणीही निःपक्षपाती मनुष्य कबूल करील.

इंग्लंड देशांत हल्लींच्या काळांतही या मंडळींत विद्यादेवीचे खरे व निस्सीमभक्त फारच थोडे आहेत, असा कांहीं इंग्लिश ग्रंथकारांचा-देखील यांच्यावर आक्षेप आहे, व तो जोंपर्यंत कोणी खोडून काढला नाहीं, तोंपर्यंत तो खराच आहे असें मानून चालण्यास आह्माला कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं! हल्लींच्या काळांत त्यांच्यासंबंधानें जर असा आक्षेप घेण्यांत येतो, तर तो शंभर वर्षांपूर्वी किती यथार्थ रीतीनें घेतां येत असला पाहिजे, याची कल्पना वाचकांनींच करावी. इंग्लिश ब्यारिस्टर आपल्या आयरिश बंधूपेक्षां स्वतःच्या धंद्यांत कमी प्रवीण होते किंवा आहेत असें सांगण्याचा आमचा हेतु नाहीं. सांगावयाचें तें हेंच कीं, कायद्याच्या पुस्तकाच्या पलीकडे यांची दृष्टी पूर्वी कधीं गेली नाहीं, व दुर्दैवानें अजूनदेखील ती जात नाहीं. आमच्या इकडील या धंद्यांतल्या लोकांची स्थिति याहूनही फार वाईट आहे. इतर विद्येचा अभ्यास एकीकडे राहो. त्यासंबंधानें आह्मी कांहीं लिहीतच नाहीं. परीक्षा पास झाल्यानंतर आपल्या उपजीवनाला साधनीभूत जो कायद्याचा अभ्यास तो तसाच पुढें चालू ठेवणारे वकील आमच्या इकडे फार थोडे सांपडतील. डायजेस्टें व गोषवाऱ्यांचीं पुस्तकें (Epitomes) यावरच निर्वाह करणाऱ्या मंडळींचा भरणा फार! तीं पुस्तकें जर कां जगांतून नाहींशीं झालीं, तर या मंडळीचे फार हाल होतील, यांत शंका नाहीं. परमेश्वर करो आणि ही स्थिति लवकरच नाहींशी होवो!

आतांपर्यंत केलेल्या वर्णनावरून असें दिसून येईल कीं, धंद्याच्या मानानेंच तेवढा ब्यारिस्टरचा धंदा आयर्लंडांतील व होतकरू लोकांना चित्ताकर्षक वाटत होता असें नाहीं, तर त्या धंद्यांतील लोकांचा राजकीय कामाशीं, व त्यांतल्या त्यांत साधारणतः एकंदर लोकांच्या मनाची धांव जिकडे विशेष असेल, अशा राजकीय कामाशीं, अति निकट संबंध असल्यामुळें तो विशेष चित्ताकर्षक वाटत होता. शिवाय लोकांनीं स्वीकारलेल्या पक्षाचें मंडन करून, त्यांत त्यांची वाहवा मिळविल्याला, या धंद्यांतील लोकांना जितका सुलभ मार्ग होता तितका दुसऱ्या कोणच्याही धंद्यांतील लोकांना नव्हता. हें त्यांत आणखी अधिक होतें. याची सत्यता पहा-

वयाची असल्यास, आयरिश् पार्लमेंटाकडे थोडीशी नजर टाकिली ह्मणजे तेथेंही लोकहिताच्या कामांत पुढाकार घेऊन भांडणारे जेवढे सभासद होते, त्यांपैकीं बरेच ब्यारीस्टरचा धंदा करणारे होते असें आपल्याला दिसेल; पण यांत फारसें आश्चर्य वाटावयास नको. कारण, आयर्लंड देशाचा राज्यकारभारच आतांपर्यंत अशा धोरणावर चालला होता कीं, त्यापासून वकील लोकांशिवाय इतर लोकांना सार्वजनिक कामांत पुढाकार घेण्याला मार्गच राहिला नव्हता. वकील ह्मणजे लोकांचा कैवारी, लोकांच्या हक्काकरितां आपला देह झिजविणारा, अशी आयरिश लोकांची समजूत होती. यामुळें हा धंदा आणि राजकीय बाबतींत पुढाकार घेणें यांचा एकमेकाशीं इतका कांहीं निकट संबंध जडून गेला होता कीं, एका कामांत यश आलें ह्मणजे तें दुसऱ्या कामांत आलें ह्मणून समजावेंच. जे ब्यारिस्टर किंवा वकील लोक सार्वजनिक कामांत पुढाकार घेत होते, त्यांना कोर्टांतील कामाची केव्हांही उणीव पडूं नये असा शंभर वर्षांपूर्वी आयर्लंडांत बहुतेक नियमच होऊन बसला होता. हल्लीं देखील त्या देशांत हा नियम लागू आहे; परंतु तो पूर्वीच्या प्रमाणानें नाहीं इतकेंच. शंभर वर्षांपूर्वी आयर्लंडची जी ही स्थिति होती ती आपल्या हिंदुस्थान देशाला राष्ट्रीय सभेचा उदय झाल्यापासून हळू हळू येऊं लागली आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. इकडे देखील राष्ट्रीय सभेसारख्या राजकीय चळवळी सुरू करण्याच्या कामांत ब्यारिस्टर व वकील याच लोकांचें मुख्यत्वेंकरून अंग आहे. इकडीलही राज्यपद्धति अशाच धोरणावर चालू आहे कीं, तिच्या योगानें अशा कामांत या धंद्यांतील लोकांशिवाय दुसऱ्या कोणच्याही धंद्याचे लोक पुढें येणें शक्यच नाहीं. व्यापारी व दुसरे धनसंपन्न लोक पुढें यावयाचे; परंतु त्यांच्यामध्यें व्हावा तितका विद्येचा प्रसार अद्यापि न झाल्यामुळें हा 'महत्कार्यभर' वर सांगितलेल्या लोकांच्याच अंगावर पडत आहे. कै० नामदार तेलंग, न्यायमूर्ति बद्रुद्दीन तय्यबजी, नामदार फेरोशामेथा, आनंदा चार्लु, शंकर नायर, उमेशचंद्र बानर्जी इत्यादि या धंद्यांत नांवाजलेल्या विद्वद्रत्नांचीं नांवें आह्मीं वाचकांच्या लक्षांत आणून दिलीं ह्मणजे

H-MI 3-/14



आमच्या ह्मणण्याचा खरेपणा त्यांच्या ध्यानांत येईल व त्यामुळें ' ज्याला त्याला आपल्या धंद्याची बडेजाव करण्याची संवय असते ' या दोषाचा ते आमच्यावर आरोप करणार नाहींत अशी आह्मांला पूर्ण उमेद आहे. असो.

अशा प्रकारानें या धंद्याची सर्वत्र मान्यता असतां, मागें सांगितल्या प्रमाणें सन १७९८ सालीं, ओकोनेल् या धंद्यांत शिरला आणि शिरला तोही पण चांगल्याच मुहूर्तावर! तो असा कीं, इतके दिवसपर्यंत जो जो ह्मणून रोमन क्यॉथलिक मनुष्य या धंद्यांत शिरे त्याला त्याला प्रथम आपल्या धर्माच्या विरुद्ध शपथ घेणें, इतके दिवस चालू असणाऱ्या एका कायद्यानें, भाग पडत होतें. परंतु ओकोनेल् या धंद्यांत पडण्याच्या पूर्वीं थोडेच दिवस आयरिश् पार्लमेंटानें हा कायदा रद्द करून टाकिला होता व त्यामुळें वर सांगितलेली अडचण अनायासेंच दूर झाली होती. ओकोनेल् हा आपल्या धर्माचा कट्टाअभिमानी होता हें आह्मीं मागें सांगितलेंच आहे. यामुळें वर सांगितल्याप्रमाणें स्वधर्माविरुद्ध शपथ घ्यावयास लावणारा कायदा जर रद्द झाला नसता, तर त्याचा या धंद्यांत प्रथमतः प्रवेश होणेंच फार कठिण पडलें असतें; आणि तसा प्रवेश झाला नसता तर पुढच्या भागांत ज्यांचें वर्णन येणार आहे, अशीं सार्वजनिक कामें त्याच्या हातून झालीं असतीं किंवा नसतीं हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. सारांश, " अव्याक्षेपो भविष्यन्त्याःकार्यसिद्धेर्हिलक्षणम्" [ टीपनंबर १२ पहा. ] या महाकवि कालिदासाच्या उक्तीप्रमाणें, आपल्या मार्गावरचें फार मोठें विघ्न अनायासें नाहींसें झालें, हें पाहून, जगांत लौकिक संपादन करण्याचा त्याचा जो मूळ हेतु होता तो साध्य करून घेण्याच्या इराद्यानें, मोठ्या ईर्षेनें त्यानें आपला धंदा सुरू केला. धंदा सुरू केल्यानंतर सुमारें दोन तीन वर्षांपर्यंत त्यानें राजकीय कामाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. डब्लीन शहरांत असतांना तो एकदोन क्लबांचा सभसद झाला होता व केवळ आपल्या मनाची करमणूक करून घेण्याकरतां मात्र तो तेथें केव्हां केव्हां जात होता. याच वेळेस " युनायटेड आयरिश मन् ( United Irishmen ) ह्मणजे एक दिलानें वागणारे आय-

ल्डडांतील लोक " या नांवाची एक मंडळी डब्लीन येथें होती. ती मूळ १७९१ सालीं बेलफास्ट येथें स्थापन झाली होती व नंतर थोड्याच दिवसांनीं तिची एक शाखा डब्लीन येथें निघाली. आयर्लंडांतील निरनिराळ्या धर्माच्या लोकांत स्नेहभाव व ऐक्य उत्पन्न करावें, आणि त्याच्यायोगानें पार्लमेंट सभेंत सर्व लोकांच्या तर्फेनें चांगले व योग्य मुखत्यार निवडून येतील, अशा तऱ्हेचा एखादा कायदा पास करून घेण्याची खटपट करावी, या हेतूनें ही मंडळी प्रथम स्थापन झाली [टीप १३ पहा.] होती. पुढें फ्रान्स देशांत राज्यक्रांति झाली व ती घडवून आणणाऱ्या लोकांना फारच चांगलें यश मिळालें, हें पाहून या मंडळीचे जे पुढारी होते त्यांचे डोळे अगदीं दिपून गेले! त्यांना असें वाटूं लागलें कीं, फ्रान्स देशांतील लोकांप्रमाणें आपणही जरा हातपाय हालविले तर, हॅनोव्हर [टीप १४ पहा] घराण्यांतील राजांची आयर्लंडावरील सत्ता तेव्हांच झुगारून देऊन आपण पूर्णपणें स्वतंत्र होऊं; हा हेतु मनांत धरून सन १७९८ सालीं फ्रान्स देशाच्या मदतीनें या लोकांनीं इंग्रज सरकारा विरुद्ध बंड केलें. तें बंड लवकरच उघडकीस आलें व त्यांतील पुढारी लोकांना देहान्त प्रायश्चित्त मिळालें. त्या बंडांत ड्यानियलचें अंग थोडें कां होईना पण होतें अशाविषयीं प्रत्यक्ष त्याच्या मुलाच्याच हातचा लेखी पुरावा आहे. सुदैवानें त्याला चांगली बुद्धि लौकरच उत्पन्न झाली व त्यानें आपल्या मित्र मंडळीच्या सूचनेवरून आपलें अंग त्यांतून तेव्हांच काढून घेतलें, ही फार चांगली गोष्ट झाली. बंडखोर लोकांच्या, अगदीं अल्प काल पावेतों कां होईना, नादीं लागल्याबद्दल त्याचें त्यालाच पुढें फार वाईट वाटलें. त्याला नुसतें वाईट वाटूनच राहिलें असें नाहीं तर अशा तऱ्हेच्या बंडखोर लोकांशीं, व सरकाराविरुद्ध गुप्त रीतीनें कारस्थानें करणाऱ्या लोकांशीं, संबंध ठेविल्यानें आपली स्वतःची फार मोठी हानि होण्याचा संभव आहे, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली, व त्यामुळें मरेपर्यंत तो अशा भानगडींत पडल्याचें केव्हाही आपल्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. अठ्याणव सालच्या बंडवाल्या लोकांविषयीं पुढें पुढें तर तो असें म्हणूं लागला कीं, या लोकांनीं त्यावेळेस जर हें बंड केलें

नसतें तर इंग्लंडला आयर्लंड जोडून टाकण्याच्या कामांत पिटला [ टीप-नंबर १९ पहा. ] यश कधींही आलें नसतें. " असो. आतां त्याचा ब्यारिस्टरचा धंदा कसा काय चालत होता इकडे आपण वळूं.

पहिल्या वर्षी त्याला ५८ पौंड मिळाले. दुसऱ्या वर्षी १५०, तिसऱ्या वर्षी २००, चवथ्या वर्षी ३१५, याप्रमाणें दरवर्षी त्याला जास्त जास्त किफायत होत गेली, आणि चवथ्या वर्षापासून पुढें तर त्याच्या घरांत पैशाचा पाऊसच पडूं लागला! पहिल्या पहिल्यानें फौजदारी कामांचाच त्याच्याकडे विशेष भरणा होता! कांहीं कालपावेतों कोर्टांत संभाषण करण्याची व तद्वारा आपलें निरुपम वाक्चातुर्य लोकांच्या नजरेस आणून देण्याची, त्याला जितके वेळ संधि यावयास पाहिजे होती तितके वेळ आली नाहीं. याचें कारण असें होतें कीं, जूरीला उद्देशून भाषण करण्याचा अधिकार कैद्याच्या वकिलाला त्यावेळेच्या कायद्यानें दिलेला नव्हता. या अडचणीमुळें कायद्याच्या मुद्यावर न्यायाधिशाला तक्रारी कळविण्याच्या मिषानें, जूरींतील लोकांना आपल्या पक्षाचें काय ह्मणणें आहे, हें तो कळवून देत होता आणि अशा तऱ्हेनें कायदा संभाळूनच्या संभाळून आपला इष्ट हेतु साध्य करून घेण्याच्या कामांत ओकोनेलच्या अंगचें वकीली कौशल्य दिसून येत होतें. साऱ्या हिंदुस्थान देशांत किंबहुना इंग्लंडांतदेखील प्रसिद्धीस आलेल्या रा० रा० बाळ गंगाधर टिळक यांच्या खटल्यांत, त्यांच्या तर्फेचे बॅरिस्टर मि० प्यू यांनीं, सन १८७० सालीं इंडियन पीनलकोडांत १२४ अ कलम घालण्यांत, मि० स्टीफन यांचा काय हेतु होता, हें जूरीला समजावून देणें, प्रीव्हीकौन्सिलच्या ठरावाविरुद्ध होतें तरी, मोठ्या युक्तीनें न्यायमूर्ती स्ट्रयाची यांच्या संमतीनेंच कसें समजावून [ टीपनंबर १६ पहा.] दिलें ही गोष्ट येथें सांगितली असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. जूरीला उद्देशून भाषण करण्याची पूर्ण स्वतंत्रता नसल्यामुळें डॅनियल्ला या युक्तीचा नेहमीं उपयोग करावा लागत होता. साक्षिदारांची उलट तपासणी अगदीं कसोशीनें करण्याच्या कामांत हा फार निष्णात होता. एकदां त्यानें एका साक्षिदाराची उलट तपासणी इतकी कसून केली कीं, तो

साक्षिदार त्याच्यावर अतीशय संतापला व त्याला मारण्याकरितां त्याच्या अंगावर मोठ्या जोरानें धांवून गेला. परंतु त्याच्या सुदैवानें वाटेंतच तो साक्षिदार आडखळून धाडदिशीं जमिनीवर पडला व त्यामुळें ओकोनेल बचावला साक्षीदारांना अशा प्रकारानें जर्जर करून टाकल्याचीं अनेक उदाहरणें इंग्रजी ग्रंथांतून दिलेलीं आहेत. परंतु तीं सर्व येथें देऊन ग्रंथ विस्तार करण्याची आमची इच्छा नाहीं. ड्यानियल्ची शरीर प्रकृती अगदीं निकोप होती. यामुळें खटले चालविण्याकरितां तो दूर दूर ठिकाणीं अनेक वेळां जात होता. परंतु या प्रवासाच्या श्रमानें आपल्या करमणुकींत, किंवा सभा भरविणें, वादविवाद करणें, या आपल्या नेहमींच्या कृत्यांत त्यानें केव्हांही खळ पडूं दिला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आयर्लंडांत आतां जशा सर्वत्र आगगाड्या झाल्या आहेत तशा पूर्वीं नव्हत्या व त्यामुळें हल्लीं प्रवास करणें जितकें सोपें आहे तितकें पूर्वीं नव्हतें. परंतु तें त्यानें कांहीं एक न जुमानतां आपल्या आशिलाकरितां लांबचा प्रवास करण्यास तो सदोदित तत्पर असे. एकदां असें झालें होतें, कीं, त्याच्या जन्मभूमी शेजारच्या एका गांवांतील कांहीं शेतकरी लोकांवर खटला झाला होता. तो चालविण्याकरितां बारा तेरा तासांत त्यानें नव्वद मैलांचा मोठा त्रासदायक असा प्रवास केला. वास्तविक पाहिलें असतां या वेळेस त्याचें वय बरेंच झालें होतें. व पूर्वीप्रमाणें त्याच्या अंगांत तकवाही नव्हता. परंतु इतका लांबीचा प्रवास केला तरी त्यानें तो मुळींच जुमानिला नाहीं. असो. तो नेमलेल्या ठिकाणीं जाऊन पोंचण्याच्या अगोदरच खटला सुरूं झाला होता. त्यामुळें अल्पसा उपहार करण्याची देखील त्याला सवड राहिली नाहीं. मग त्यानें तेथल्या तेथेंच घोडेंसें दूध घेतलें आणि कामास सुरुवात केली. त्याला पाहतांक्षणींच आरोपी लोकांना जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. ओकोनेलनें तो खटला फार बिकट होता तरी आपल्या बुद्धिकौशल्यानें व वक्तृत्वाच्या सामर्थ्यानें जिंकला. याप्रमाणें ते शेतकरी लोक आलेल्या आरोपांतून सुटल्यावर त्यांनीं त्याचा मोठा जयजयकार केला. शेतकरी लोकांनीं त्याचा जयजयकार केल्याची

त्याच्या कारर्दींत अनेक उदाहरणें आहेत. त्यांच्या कल्याणाकरितां तो नेहमीं मनापासून झटत असे. यामुळें त्यांचे त्याच्यावर अतोनात प्रेम जडलें होतें. ओकोनेलनें अमुक एक गोष्ट त्यांना सांगितली आणि ती त्यांनीं ऐकिली नाहीं, असें केव्हांही झालें नाहीं. अशी स्थिति थोडेथोडके दिवस नाहीं तर एकसारखी पंचवीस वर्षें चालू होती. ओकोनेल्नें आपल्या धंद्यांत हीं जी लोकप्रियता संपादन केली होती, ती सर्व श्लाघ्य व सभ्य मार्गानेंच केली होती असें नाहीं. न्यायाधीश या नात्यानें केलेल्या वर्तणुकीबद्दल न्यायाधिशांवर प्रत्यक्ष न्यायसभेंत किंवा वर्तमानपत्रांमधून मोठा जोराचा हल्ला करणें, आयरिश लोकांना हल्लीं जसें प्रिय आहे, तसें ओकोनेलच्या वेळेसदेखील होते. या गोष्टीचा फायदा घेऊन ओकोनेल आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर व न्यायाधिशावर प्रसंग विशेषीं फार कडक टीका करीत होता व त्यामुळें तो लोकांना विशेषच प्रिय वाटत होता. राजकीय गुन्ह्यांची चवकशी करण्याच्या कामांत त्यावेळेस न्यायाधिशाचें वर्तन टीकास्पद होतें, नव्हतें असें आह्मीं ह्मणत नाहीं. आणि अशाच कामांत तेवढी ओकोनेलनें वाटेल तितकी कडक टीका केली असती, तर त्याबद्दल तो दोष देण्याला पात्र झाला नसता; परंतु योग्य कारण असो वा नसो, सरहा लोकांना शिव्या देत सुटणें हें कोणाला केव्हांही पसंत पडणार नाहीं. नुसती कडक टीका व शिव्यांचा वर्षाव करूनच त्याच्या मनाचें समाधान होत होतें असें नाहीं, तर केव्हां केव्हां न्यायसभेंत देखील तो फार उद्धटपणानें व धरसोडीनें वागत होता. परकीयांच्या अमलाखालीं चिरडून गेलेल्या रोमन क्यॉथोलिक लोकांत स्वतःविषयीं अभिमान उत्पन्न करण्याकरितां, व प्राटेस्टंट धर्मांतील लोकांप्रमाणें त्यांनाही कांहीं हक्क आहेत आणि ते हक्क संपादन करण्याकरतां अश्रांत श्रम करणारा आपल्यासारखा एक योद्धा तयार आहे, हें त्यांच्या निदर्शनास आणून देण्याकरितां, असें वर्तन करणें आपल्याला भाग पडतें, असें ह्मणून तो आपल्या कृतींचें समर्थन करीत होता. परंतु हें त्याचें ह्मणणें अगदीं पोकळ आहे असें कोणीही ह्मणेल.

एके दिवशीं कोर्टांत एक खटला चालला होता. त्यांत त्याचा कांहीं एक संबंध नव्हता. पण असें असून खटला चालत असतां मध्यें मध्यें तो बोलूं लागला, तें पाहून खटला चालविणाऱ्या न्यायाधिशांपैकीं एका न्यायाधिशानें "या कज्यांत तुह्मांला वकीलपत्र आहे काय?" असें त्याला विचारलें. त्यावर त्यानें उत्तर दिलें "नाहीं. परंतु हें काम वरच्या कोर्टाकडे जाणार आहे व तेथें मला वकीलपत्र येणार आहे" न्यायाधिश ह्मणाला "मी ज्यावेळेस वकील होतों, त्यावेळेस वकीलपत्रें येण्याची तुमच्यसारखी मी वाट पहात बसत नव्हतों." ओकोनेल ह्मणाला "आपण वकील असतांना आपल्याला मी कधींच चांगलें ह्मटलें नाहीं, व आपण आतां न्यायाधिश झाला आहां तरी देखील मी आपलें सांगणें थोडेंच ऐकतो आहे." असें उत्तर दिल्याबरोबर आपण मोठ्या ताणाताणानें कोर्टाच्या बाहेर पडला. इतकेंच नाहीं तर आपल्या जवळ बसलेल्या एका ब्यारिस्टरला, त्याचा हात धरून फराफर ओढीत आपल्याबरोबर बाहेर घेऊन आला. हें वर्तन कोणालाही योग्य वाटणार नाहीं पण त्याचें देखील समर्थन करणारे ओकोनेलचें कांहीं चरित्रकार आहेत, हें वांचकांनीं विसरतां कामा नये. न्यायाधिशाबरोबर उद्धटपणानें वर्तन केल्याचें हें एक उदाहरण झालें. आतां आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर, क्षुल्लक कारणावरून, कटु शब्दांचा प्रहार तो कसा करीत होता, याचें एक उदाहरण देऊन हा भाग आह्मीं संपवितों.

एके प्रसंगीं एक फौजदारी खटला चालविण्याच्या कामांत ड्यानियलच्या हांतून थोडीशी चूक झाली. ती चूक सरकारतर्फेच्या वकीलानें न्यायाधिशाच्या नजरेस आणिली व ड्यानियलच्याच बोलण्याचा आधार देऊन आरोपीस जास्त शिक्षा देण्याविषयीं त्यानें कोर्टाला विनंति केली. या त्याच्या करण्यानें त्याला फार राग आला व त्या रागाच्या आवेशांत खालील उद्गार काढले.

"सरकारी वकीलाला याप्रसंगाला देखील मी कोणच्याही रीतीनें हार जाणार नाहीं. माझ्यापेक्षां आपलें ज्ञान अधिक आहे, असें जें त्यांना

वाटतें तें अगदीं निराधार व वेडगळपणाचें आहे, असें मी बिनदिक्कत ह्मणतों. यांच्यासारखेंच माझें कुलशील चांगलें आहे. विद्येंत त्यांची व माझी बरोबरी तर खचित आहे, आणि बुद्धिसामर्थ्याच्यासंबंधानें आतां माझें मीच बोलणें हें चांगलें नाहीं हें खरें, पण त्यांत त्यांची व माझी बरोबरी आहे असें ह्मणण्यांत मला कांहीं विशेष किंमत वाटत नाहीं. ........गेल्या जुलै महिन्यापासून त्यांनीं माझ्यावर आपला झालेला राग आतांपर्यंत मोठ्या शहाणपणानें गिळला होता. परंतु तो प्रकट करण्याला व माझ्यासंबंधानें अनुदार भाषा मोठ्या धीटपणानें वापरण्याला न्यायमंदिराचीच जागा पसंत केली, याबद्दल मला खरोखर आनंद वाटतो. ह्याचें कारण असें आहे कीं, या न्यायमंदिरासंबंधानें माझा फार पूज्यभाव आहे, व त्यामुळें माझ्या स्वभावांत जा एक दोष आहे तो मी होतां होईल तितका दाबून धरतों. हेंच भाषण जर कां त्यांनीं दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं केलें असतें तर त्याबद्दल योग्य शिक्षा त्यांना केल्याशिवाय मी कधींही राहिलों नसतों." सरकारी वकीलांच्या भाषणांतइतका राग येण्याजोगा मजकूर मुळींच नव्हता असें न्यायाधिशांनीं ओकोनेलला पुष्कळ प्रकारानें सांगितलें, पण त्याची समजूत पडेना. शेवटीं "तुमचें उणें काढण्याचा माझा कोणच्याही प्रकारचा हेतु नव्हता" असें खुद्द सरकारी वकीलानें जेव्हां त्याला सांगितलें तेव्हां तो स्तब्ध बसला. अशा प्रकारचे प्रसंग ओकोनेलच्या जन्मांत अनेक आहेत, त्याचें वर्णन कोठवर देत बसावें? "एका शितावरून साऱ्या भाताची परीक्षा करतां येते." या न्यायानें हीं एकदोनच उदाहरणें दिलीं असतां ओकोनेलचें वर्तन प्रसंग विशेषीं किती उद्धटपणाचें होतें, याची वाचकांना चांगली कल्पना करतां येईल, असें समजून हा भाग आह्मी येथें पुरा करतों.

---

# ड्यानियल ओकोनेलचें

## चरित्र.

# भाग २ रा.

## क्याथलिक लोकांची पूर्वपीठिका.

१८००—१८१३.

मागच्या भागांत सांगितलेल्या व शिक्षा देण्याच्या हेतूनें पास केलेल्या जुलुमी कायद्यांपासून आपणांस होणाऱ्या दु:खांचा परिहार करण्यासाठीं इ० स० १७६० सालापासून तों १७९२ सालापर्यंत क्याथलिक लोकांनीं बराच उद्योग केला, व त्या उद्योगाला शेवटच्या वर्षी थोडेसें फलही आलें; परंतु पुढें, हें फल प्राप्त झाल्यामुळें त्यांच्या अंगांत शिथिलता आली ह्मणून ह्मणा, किंवा सरकाराशीं भांडण करण्याची त्यांच्या अंगांत ताकद राहिली नाहीं ह्मणून ह्मणा, हा स्तुत्य उद्योग दिवसानुदिवस हळूहळू बंद पडत चालला, व शेवटीं तर तो अगदींच बंद पडला याप्रमाणें आळशीपणांत बराच काळ गेल्यानंतर पुढें अनेक वर्षांनीं त्यांच्यांत नवीन पुढारी उत्पन्न झाले, पूर्वीचा उद्योग पुन: चालू करण्याचे नवीन मार्ग प्रचारांत आले, व पूर्वी जे हक्क अगदीं दुष्प्राप्यसे वाटत होते, तेच मिळविण्याकडे सर्वांच्या मनाची प्रवृत्ति होत चालली. हा. एवढा महत्त्वाचा फरक पाडण्याचें सर्व श्रेय ओकोनेलशिवाय दुसऱ्या कोणालाही देतां यावयाचें नाहीं. तिसऱ्या वुइलियमच्या कार-

---

१. १६८९ सालीं फ्रान्सच्या राजाच्या मदतीनें इंग्लंडचा पदच्युत झालेला राजा दुसरा जेम्स आपल्याबरोबर थोडेसें सैन्य घेऊन आयर्लंडांत आला. आयरिश लोक, रोमन क्याथलिक धर्माचे असल्यामुळें त्याच्या बाजूला मिळाले व त्यांनीं तिसऱ्या वुइलियमविरुद्ध बंड केलें. बॉयनी येथें वुइलियमनें या बंडाचा अगदीं मोड केला. १६९१ सालीं लिमरिकचा तह झाला व तेव्हांपासून या बंडाचा अगदीं मागमूसदेखील नाहींसा झाला.

कीर्दीत १६९१ सालीं आयरिश् लोकांबरोबर लिम्रिक येथें जो तह झाला, त्या तहांत धर्माच्या बाबतींत यापुढें आयर्लंडांतील क्याथलिक लोकांचा छल केला जाणार नाहीं, अशा अर्थाचीं दोन तीन कलमें होतीं. परंतु रॉबिनसन् नांवाच्या एका इतिहासकारानें आपल्या आयर्लंडाच्या इतिहासांत ह्मटल्याप्रमाणें " त्या तहाची शाई वाळते न वाळते, इतक्यांतच त्यांतील कलमांना हरताळ फासण्याची सुरुवात झाली, " व क्याथलिक लोकांविरुद्ध मोठे सक्तीचे कायदे पास होऊं लागले. सन १६९१ सालापासून तों अमेरिकेंतील ३ लढाई बंद होईपर्यंत, ह्मणजे सरासरी १०० वर्षें, हा क्रम एकसारखा सुरू होता. अशा तऱ्हेचे कायदे प्रत्येक राजाच्या कारकीर्दीत पास होत गेले व त्यामुळें क्याथलिक लोकांवर जास्त जास्त जुलूम होत गेला हें खरें; पण त्यांतल्या त्यांत तिसऱ्या वुइलियमच्या आणि ॲन राणीच्या कारकीर्दीत तर त्याचा अगदीं कळसच झाला. तो इतका कीं, ॲनराणीच्या कारकीर्दीत पास झालेल्या कांहीं कायद्यांना बर्कनें " अतिशय भयंकर कायदे " ( Ferocious laws ) असें नांव दिलें आहे. असो. या कायद्यांना 'पीनल कोड' ह्मणजे अपराध्यांस शिक्षा करण्याचा कायदा—अशी इंग्रजी इतिहासांत संज्ञा दिलेली आहे हें आह्मीं मागें सांगितलें आहेच. हिंदुस्थानांत चालू असणाऱ्या पीनल कोडाची व या पीनल कोडाची आमचे मराठी वाचक जर तुलना करूं लागतील, तर त्यांच्या हातून चूक होण्याचा बराच संभव आहे. कारण, आमच्या इकडील पीनलकोडाचा उद्देश सर्व हिंदुस्थानांतील अपराधी लोकांस शिक्षा कर-

---

२ Irish History for English readers P. 79 पहा.

३ ही लढाई १७८३ सालीं खलास झाली. त्या वर्षी व्हरसाईल येथें तह झाला व त्या तहांत अमेरिकेंतील १३ संयुक्त संस्थानांचें स्वातंत्र्य इंग्लंडनें कबूल केलें. ही लढाई इंग्रजी इतिहासांत फार प्रसिद्ध आहे व मराठी वाचकांनाही तिची बरीच माहिती असते यामुळें तिची सविस्तर हकीगत देण्याचें कारण नाहीं, असें आह्मांस वाटतें.

ण्याचा आहे. कोणच्याही एखाद्या विशिष्ट धर्मामधील लोकांवर त्या कायद्याचा कटाक्ष नाहीं. आयर्लंडांतील पीनल कोड मात्र केवळ क्याथलिक लोकांचा छल करण्याच्या हेतूनेंच तयार केलें होतें! त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, धर्मद्दष्ट्या उल्लंघन करण्यास फार कठीण अशा नाना प्रकारच्या अडचणी उत्पन्न करून, आयरिश लोकांना राजकीय कामांत अगदीं पुढें येऊं द्यावयाचें नाहीं. परंतु हा कायदा करणारांचे हेतू व्हावे तसे सफल झाले नाहींत. कारण त्याचा अम्मल करणारांच्या कामांत नाहीं नाहीं त्या अडचणी उत्पन्न झाल्या. या कायद्यासंबंधानें स्पेन्सर वॉलपोल आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत असें ह्मणतो कीं, "कितीही केलें तरी या कायद्यांचा अम्मलच होईनासा झाला. त्यांच्या कडकपणामुळेंच त्यांच्या ठिकाणीं हा दोष उत्पन्न झाला. कायदे करणाऱ्या मंडळीनें मनांत धरलेला हेतु ह्मणून पाडण्याकरितां लोक कायदेशीरच लपंडाव करूं लागले. पीनल कोडाचा अम्मल व्हावा तसा होत नाहीं, ही गोष्ट राज्यकर्त्यांच्या मनांत येऊन चुकली होती. परंतु आयरिश क्याथलिक लोकांवर होत असलेला जुलूम आपण होऊन कमी करण्याची त्यांनीं मुळींच खटपट केली नाहीं. शेवटीं 'इंग्लंडें कचाटींत सांपडलें ह्मणजे आयर्लंडचें फावतें' या तत्वावर ज्यावेळेस अमेरिकेंतील वसाहतींबरोबर इंग्लंड देशाचें युद्ध सुरू झालें व इंग्लंडांतील बहुतेक फौज अमेरिकेंतील लढाईवर गेली, त्यावेळेस फ्रान्सच्या मदतीनें बंड करण्याची भीति दाखवून क्याथलिक लोकांनीं राज्यकर्त्यांकडून वर सांगितलेल्या पीनल कोडांतील कांहीं भाग रद्द करवून घेतला. पुढें कांहीं दिवसांनीं पीनल कोडाचा बाकी राहिलेला जो भाग रद्द झाला, तो तरी त्यांच्या हातून मोठ्या खुषीनें आपण होऊनच झाला असें नाहीं, तर ज्यावेळेस सर्व इंग्लंडांतील लोकमत या कायद्यांच्या अगदीं उलट झालें त्याच वेळेस झाला. असो.

---

४ Vol. II p. 239 पहा.

५ 'England's difficulty is Ireland's opportunity' या इंग्रजी वाक्याचें हें आह्मीं भाषांतर केलें आहे.

हे कायदे जोंपर्यंत अमलांत होते, तोंपर्यंत आयरिश क्याथलिक अगदीं सत्वहीन व विपत्तिग्रस्त असे होते. ज्ञानाचा लवलेश त्यांच्या अंगीं नव्हता. या सर्वांत अति शोचनीय गोष्ट आणखी ही होती कीं, त्यांच्यांत एकी मुळींच नव्हती, व त्यामुळें आपल्या कल्याणाचें कोणचेंही काम त्यांच्या हातून, एक दिलानें पार पडत नव्हतें. ही स्थिति नाहींशी होण्याला त्यांना बराच काळ कंठावा लागला, व प्रयासही फार करावे लागले. परंतु पूर्वींच्या कष्टमय स्थितीनें त्यांच्यावर जे वाईट परिणाम झाले होते, ती स्थिति नाहींशी झाल्यावरदेखील बराच काळपावेतों, त्यांच्या ठिकाणीं दृग्गोचर होत होते. खुद्द आकोनेलच असें ह्मणत असे कीं, वाटेनें जात असतांना अगदीं भयभीत झालेला, आळसत आळसत चालणारा व आपण अगदीं हलक्या दर्जाचे आहोंत असें आपल्या वर्तनानें दाखविणारा एखादा मनुष्य भेटला ह्मणजे तो क्याथलिकच आहे, असें खात्रीनें कोणालाही सांगतां येत होतें; व हा प्रकार तरी मागें सांगितल्याप्रमाणें त्यांची स्थिति सुधारल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं, हें त्यांत विशेष.

ॲन राणीच्या कारकीर्दीनंतर इंग्लंडच्या गादीवर बसणाऱ्या प्रत्येक राजाच्या कारकीर्दीत क्याथलिक लोकांविरुद्ध कायदे पास होत गेले, असें मागें ह्मटलें आहे. तरी पण एकंदरीच्या मानानें पाहिलें असतां, अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत त्यांची स्थिति हळू हळू सुधारतच चालली होती. याप्रमाणें सुधारतां सुधारतां ते लोक एकोणिसाव्या शतकाच्या आरंभाआरंभाला बरेच पुढें सरसावले यांत शंका नाहीं. या आमच्या लिहिण्यावरून प्रॉटेस्टंट लोकांच्या बरोबरीनें ते सुस्थितीला पोंहोंचले होते असें वाचकांनीं समजूं नये. आमच्या ह्मणण्याचा अर्थ इतकाच कीं, इंग्लंडांत जे क्याथलिक लोक होते, त्यांच्यापेक्षां पुष्कळ पटीनें हे जास्त सुखी होते. असो.

ही सुधारणा करण्याचें सर्व श्रेय क्याथलिक धर्मांतील श्रेष्ठ व कुलीन घराण्यांतील लोकांना दिलें पाहिजे. कारण या कामांत जर कोणी मनापासून खटपट केली असेल तर ती प्रथमतः यांनींच केली. त्यांच्याच

परिश्रमानें १७६० सालीं ' जनरल असोसियेशन ऑफ क्याथलिक्स इन आयर्लंड ' ( General association of Catholics in Ireland.) ह्मणजे ' आयर्लंडांतील क्याथलिक लोकांची सर्वसाधारण सभा ' या नांवाची एक सभा स्थापन झाली व तिच्या आश्रयाखालीं क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याचे उद्योग सुरू झाले. या उद्योगांना सन १७७६ सालीं अंशत: फलही मिळालें. तें असें कीं, रोमन क्याथलिक लोकांनीं जमीनी विकत घेऊं नयेत, असे प्रतिबंध करणारे आतांपर्यंत जे कायदे अमलांत होते, ते यापुढें रद्द झाले. व ते रद्द झाल्यामुळें, त्यांची अन्नाची ददात बरीच नाहींशी होऊन, त्यांना थोडेसे सुखाचे दिवस दिसूं लागले.

वर सांगितलेल्या संस्थेंत व्यापारी लोकांचा बराच भरणा होता. परंतु ही गोष्ट वरिष्ठ दर्जाच्या लोकांना पसंत पडत नव्हती व यामुळें त्या उभय पक्षांत बरेंच वैमनस्य उत्पन्न झालें होतें; अर्थात् सभेचें काम जितकें एक विचारानें चालावयास पाहिजे होतें तितकें चालेनासें झालें. शेवटीं फ्रान्स देशांत ज्यावेळेस राज्यक्रांति झाली, त्यावेळेस या व्यापारी लोकांनीं त्याबद्दल फार मोठा आनंद प्रदर्शित केला, व या कामांत आपण फ्रान्सचें उदाहरण गिरविलें असतां आपल्या देशाचा फायदा झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, असें उघड रीतीनें प्रतिपादन केलें. यामुळें उभय पक्षांमध्यें उत्पन्न झालेलें वैमनस्य जास्त विकोपाला गेलें. आणि ह्मणून वरिष्ठ दर्जाच्या लोकांनीं त्या सभेंतून आपलें अंग काढून घेतलें. क्याथलिक लोकांच्या उद्योगाला एका अर्थी ह्यामुळें बराच मोठा धक्का बसला हें खरें; परंतु दुसऱ्या अर्थी त्यापासून एक मोठा फायदा झाला हेंही खोटें नाहीं. तो कसा, तर हे सर्व बडे लोक नाहींसे झाल्यामुळें त्या सभेंतील सर्व सत्ता व्यापारी वर्गांतील एक अति बुद्धिवान मनुष्य जॉन किओ Keogh याच्या हातीं आली व ती त्यानें मोठ्या अकलेनें व हुषारीनें सरासरी वीस वर्षें चालविली. तेवढ्या अवकाशांत त्यानें अतोनात खटपट करून आयरिश् पार्लमेंटाकडून बरेच जुलमी कायदे रद्द करून घेतले व त्यामुळें क्याथलिक लोकांना व्यारि-

स्टरचा धंदा करतां येऊं लागला, आपल्या मुलांना शिक्षण देण्याकरितां शाळा घालतां येऊं लागल्या, व प्रॉटेस्टंट धर्मांतील लोकांबरोबर लग्नें लावितां येऊं लागलीं. स्वत: ओकोनेलला आपल्या शिक्षणाच्या कामीं कोणकोणच्या अडचणी सोसाव्या लागल्या याचें दिग्दर्शन पहिल्या भागांत केलें आहेच. त्यावरून ह्या सुधारणां झाल्यामुळें क्याथलिक लोकांची संसारयात्रा किती सुखकर झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

याप्रमाणें आपल्या यत्नाला थोडेंसें यश आलेलें पाहून किओच्या मनांत, स्वदेशाच्या कल्याणाकरितां जास्त खटपट करण्याविषयीं फार मोठा उत्साह उत्पन्न झाला, व त्याप्रमाणें तो आपल्या उद्योगालाही लागला. आपला मित्र वुल्फटोन[६] याला बरोबर घेऊन साऱ्या आयर्लंडभर प्रवास केला व नवीन हक्क मिळविण्याकरितां सर्वांनीं खटपट करावी, अशाविषयीं सर्व लोकांस उपदेश केला. त्या सर्वांकडून दोनशें मुखत्यार निवडवून आणले, व त्यांची डब्लीन येथें एक सभा भरविली: त्या सभेनें कीओ धरून पांच जणांचें डेप्युटेशन नेमिलें. त्या डेप्युटेशननें इंग्लंडांत जाऊन तेथील राजा तिसरा जॉर्ज[७] व त्याचा

---

६ वुल्फटोन—जन्म १७६३ मरण १७९८. हा एक गाडीवाल्याचा मुलगा होता. १७८९ त ब्यारिस्टरचा धंदा सूरू केला. हा क्याथलिक कमेटीच्या सेक्रेटरीचें काम वरेच दिवस पहात होता. 'युनायटेड आयरिशमेन' नांवाची मंडळी स्थापन करण्याचा यानें प्रयत्न केला व त्यामुळें याला अमेरिकेला आणि फ्रान्सला पळून जावें जावें लागलें. १७९८ त त्याला इंग्लिश सरकारानें पकडलें व त्याच्यावर खटला करून त्याला फांशीची शिक्षा दिली. शिक्षा झाल्यावर तुरुंगांत असतांनाच त्यानें गळा कापून घेतला.

७ तिसरा जॉर्ज यानें इंग्लंड देशावर १७६० ते १८२० अखेर राज्य केलें. महाराणी व्हिक्टोरिया यांची कारकीर्द खेरीज करून याच्या इतकी मोठी कारकीर्द इंग्लंडच्या कोणच्याची राजाची नाहीं. अमेरिकन लोक स्वतंत्र झाले ते याच्याच कारकीर्दीत. हा प्राटेस्टंट धर्माचा कट्टा अभिमानी होता. आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं याला वेड लागलें. हा फार नीतिमान आणि सदाचरणी होता.

मंत्री पिर्ट या दोघांची गांठ घेतली, क्याथलिक लोकांच्या ज्या कांहीं अडचणी होत्या त्या त्यांच्या कानावर घातल्या, मोठ्या युक्तीप्रयुक्तीनें आपल्या ह्मणण्याकडे त्यांचें मन वळवून घेतलें, व सरकारी कामाला आणि राजकीय हक्क संपादन करण्याला क्याथलिक लोकांनां सर्वस्वी नालायक ठरविणारे जे अनेक कायदे होते, त्यांपैकीं बरेच त्यांच्याकडून रद्द करून घेतले. यापुढें क्याथलिक लोकांना माजिस्त्रेटाच्या जागा पतकरतां येऊं लागल्या, ज्यूरर या नात्यानें न्यायमंदिरांत बसतां येऊं लागलें, लष्करी खात्यांत नोकऱ्या धरतां येऊं लागल्या, व पार्लमेंटमधील सभासद निवडून देतां येऊं लागले. याशिवाय ज्यांचा रोजच्या घरगुती व्यवहारांत पुष्कळ उपयोग होईल असे आणखी अनेक हक्क त्यांना प्राप्त झाले; परंतु ते सर्व येथें सांगत बसण्याचें प्रयोजन नाहीं. सारांश पार्लमेंटांत प्रवेश व लष्करी आणि सिव्हिल खात्यांत फार मोठ्या दर्जाच्या जागा, एवढ्याच गोष्टी कायत्या आतां त्यांना साध्य करून घ्यावयाच्या राहिल्या होत्या. कीओ व त्याचे मित्र यांनीं अशा उत्तम रीतीनें कामगिरी बजावल्यामुळें ओकोनेलला पुढील मार्ग बराच सोपा झाला होता, व या दृष्टीनें पाहिलें असतां कीओची योग्यता फार मोठी ठरते यांत शंका नाहीं.

या भागाच्या आरंभालाच सांगितल्याप्रमाणें बराच कालपावेतों ह्मणजे सरासरी १७९३ पासून तों १८०० पर्यंत क्याथलिक लोकांनीं कोणच्याही प्रकारची हालचाल केली नाहीं. अर्थात् या सहा सात

८ पिट् जन्म १७५९ व मरण १८०६. एक अति प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दी. अर्ल ऑफ् च्याथ्यामचा दुसरा मुलगा. हा आपल्या वयाच्या एकविसाव्या वर्षी पार्लमेंटाचा सभासद झाला व चोविसाव्या वर्षी मुख्य प्रधान झाला. तो मोठा विद्वान असून अप्रतिम वक्ता होता. नेपोलियनबरोबर यानें फार नेटानें युद्ध केलें. याची महत्वाकांक्षा फार जबर होती.

९ लष्करा (Military) खातेंखेरीजकरून इतर जीं निरनिराळीं खातीं असतात त्यांना इंग्रजींत 'Civil' खातीं ह्मणतात. 'Civil' या शब्दाला मराठी प्रतिशब्द कोणी सुचविल्यास बरें होईल.

वर्षांत त्यांना कांहीं फायदाही झाला नाहीं. आयरिशपार्लमेंटांत यावेळेस ग्रेटन[१०] नांवाच्या एका लोकनायकाचें बरेंच प्राबल्य होतें, तें इतकें कीं, त्या पार्लमेंटाला त्याच्याच नांवावरून 'ग्रेटनचें पार्लमेंट'' अशी संज्ञा प्राप्त झाली होती. निरनिराळ्या बंधनापासून क्याथलिक लोकांची सुटका करण्याकरतां पूर्वी ग्रेटननें नाना प्रकारचे यत्न केले होते, पण ते सर्व निष्फल झाले होते. यामुळें आपली दाद जर कोठें लागावयाची असेल, तर ती इंग्लिश पार्लमेंटांतच लागेल, आयरिश् पार्लमेंटांत लागावयाची नाहीं, असा त्या लोकांचा पक्का ग्रह झाला होता. इंग्लंड देशाशीं आयर्लंड देश जोडून टाकण्याविषयीं ज्या वेळेस दोन्ही देशांतील पुढारी लोकांचीं बोलणीं सुरू झालीं, त्या वेळेस रोमन क्याथलिक लोकांची बंधनापासून सुटका करण्याविषयीं आह्मीं एक कायदा लवकरच पास करूं असें मुख्य मुत्सद्दी पिट यानें आयरिश पुढाऱ्यांस अभिवचन दिलें. आयर्लंडांतील पुष्कळ लोकांना हा प्रकार श्रेयस्कर असा जरी वाटला नाहीं, तरी त्यांच्या वतीनें आयर्लंडांतील पुढाऱ्यांनीं इंग्लिश मुत्सद्यांचें ह्मणणें कबूल केलें, व त्याप्रमाणें सन १८०० या वर्षीं आयर्लंड देश इंग्लंड देशांत सामील करण्यांत आला. याप्रमाणें आयरिश पुढाऱ्यांनीं आपला शब्द खरा केला; पण आपण दिलेलें वचन आपल्याला पाळतां येईल किंवा नाहीं याची स्वत: इंग्लिश लोकांनाच शंका येऊं लागली. इंग्लंडचा राजा तिसरा जार्ज प्राटेस्टंट धर्माचा पूर्ण अभिमानी होता. क्याथलिक लोकांना आहेत हीं बंधनें फार थोडीं आहेत. यापेक्षां

---

१० ग्रेटननें चालविलेल्या उद्योगाची थोडक्यांत माहिती करून घेणें असल्यास वाचकांनीं 'Outlines of Irish History by Justin M'cCarthy' Chap. VII पहावा. तो १७४६ त जन्मला व १८१९ त मरण पावला. हा १७७५ त प्रथम आयरिश पार्लमेंटमध्यें शिरला. पुढें इंग्लंड व आयर्लंड यांचीं दोन पार्लमेंटें एक झाल्यावर आयर्लंडच्यातर्फे सभासद निवडून आला. क्याथलिक लोकांना राजकीय हक्क मिळण्याकरितां यानें अविश्रांत श्रम केले. हा फार उत्तम प्रतीचा वक्ता होता. याच्या मुलानें याचीं भाषणें छापून काढलीं आहेत तीं वाचण्याजोगी आहेत.

तीं आणखी जास्त पाहिजे आहेत असें त्यांचें ह्मणणें होतें. यामुळें पिटनें दिलेलें अभिवचन अगदीं त्याच्या इच्छेविरुद्ध होतें. आपलें वचन पाळण्याकरितां क्याथलिक लोकांना अनुकूल असा एखादा कायदा पिटनें पार्लमेंट सभेपुढें आणिला, व तेथें तो जरी पास झाला, तरी मी कांहीं त्याला आपली संमति केव्हांही देणार नाहीं, असें त्यानें आपल्या जवळच्या लोकांना उघड बोलून दाखविलें. राजाचें मन वळविण्याविषयीं पिटनें भगीरथ प्रयत्न केले, परंतु त्यांपासून कांहीं एक उपयोग झाला नाहीं. राजाच्या मर्जीविरुद्ध आपण वागलों, तर त्याच्या अगोदरच नाजूक झालेल्या प्रकृतीला फार मोठा धक्का बसेल, अशी पिटला भीति उत्पन्न झाली, व त्यामुळें राजाचें मन वळविण्याविषयीं एकदां यत्न करून पाहण्याचें त्याला धैर्य होईना. एकीकडे वचनभंगाचा कलंक आणि दुसरीकडे राजाची प्रकृति बिघडण्याची भीति, अशा कचाट्यांत पिट सांपडला. काय करावें हें त्याला सुचेना, शेवटीं राजाच्या प्रकृतीकडे त्यानें दृष्टी दिली व आपल्या उज्वळ कीर्तीला वचनभंगाचा अक्षय्य डाग लावून घेतला.[११] हें पाहून आयरिश लोक गांधील माशांप्रमाणें चवताळले, व दोन देशांचा समेट करण्याकरितां निव्वळ लबाडीनें इंग्लिश लोकांनीं क्याथलिक लोकांना थाप दिली, असें ते उघड रीतीनें प्रतिपादन करूं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, आयर्लंडांत चोहोंकडे अस्वस्थता उत्पन्न झाली, लोक बंड करूं लागले. इंग्लिश अधिकाऱ्यांनीं बंड मोडण्याचे

---

११ राजाच्या दुराग्रही स्वाभावामुळें आपण दिलेलें वचन आपल्या हातून पाळलें जात नाहीं, असें पाहून दोन देशांचें ऐक्य झाल्यापासून ११ दिवसांच्या आंतच पिटनें आपल्या कामाचा राजीनामा दिला. परंतु तेवढ्यानेंच त्याला लागलेला कलंक नाहींसा होणें शक्य नाहीं. यासंबंधानें म्याकार्थीनें पुढें लिहिलेले उद्गार काढले आहेत :—

'The obstinate folly of the 3rd George does not excuse the minister, who had done his best to delude Ireland by arousing hopes, which he was not certain of gratifying and making pledges that he was unable to fulfil. Outlines of Irish History p. 80.

उपाय योजिले, त्यामुळें जिकडे तिकडे रक्तपात होऊं लागला. शेवटीं हजारों लोकांचे बळी पडल्यावर, असा दंगाधोपा व बंडें करून आपला इष्ट हेतु साध्य होण्याची आशा नाहीं, असें जेव्हां आयरिश लोकांना टवां लागलें, तेव्हां त्यांनीं तो नाद सोडून दिला. बरें, शस्त्रास्त्रांचा उपाय खुंटल्यावर इंग्लिश पार्लमेंटाचें सामोपायानें व गोड शद्बांनीं मन वळविण्याच्या उद्योगास लागावें, तर तेंही प्रस्तुत प्रसंगीं कठीणच होतें. कारण इंग्लिश पार्लमेंट पडलें दूर अंतरावर. इतक्या दूर अंतरावर जाऊन खटपट ती कोण करणार व त्या खटपटीला पार्लमेंटांतील मंडळीकडून उत्तेजन तें कसें मिळणार; अशा स्थितींत सर्वांनींच मौनवृत्ति धारण केली व ही मौनवृत्ति बरेच दिवस कायम राहिली. कारण ओकोनेलला उदयाला येण्याला व बंड न करतां इंग्लिश पार्लमेंटाची पांचावर धारण बसवितां येते, आणि गोड शब्दांनीं जें मिळवितां आलें नाहीं, तें धाकदपटशा दाखवून शस्त्रहीन अशा आयरिश् लोकांना देखील हिरावून घेतां येतें, असें सर्व जगाच्या प्रत्ययास त्यानें आणून देण्याला अजून किती तरी अवकाश होता! कीओसारखे देशकार्याकरतां शरीराची व द्रव्याची झीज सोसणारे कांहीं लोक या वेळेला होते. परंतु त्यांनाही एका प्रकारच्या उदासीनतेनें पछाडलें होतें. आतां अशा प्रकारची उदासीनता स्वीकारणें सर्वस्वीच दोषास्पद होतें, असें ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण गेल्या वीस वर्षांत याच मंडळींच्या परिश्रमानें इंग्लंडांतील क्याथलिक लोकांपेक्षांही आयर्लंडांतील क्याथलिक लोकांची स्थिति सर्व प्रकारांनीं चांगली सुधारली होती यांत कांहीं संशय नाहीं. पूर्वीच्या क्याथलिक लोकांच्या स्थितीचा जर विचार केला, तर प्रत्येक मनुष्याला असें कबूल करावेंच लागेल कीं, त्यांच्या मानानें एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभाला असणाऱ्या क्याथलिक लोकांची राजकीय व सामाजिक स्थिति हजार वांट्यानें चांगली होती. आतां प्रॉटेस्टंट लोकांचें वर्चस्व अर्दाच नाहींसें झालें होतें असें नाहीं. पण तेवढी गोष्ट खेरीजकरून आपल्या उद्योगाचें बरेंच चीज झालें, असें समाधान मानून घेण्याला क्याथलिक लोकांना बरीच जागा होती, व त्यामुळें त्यांच्या व

त्यांच्या पुढाऱ्यांच्या अंगांत थोडासा आळस शिरला असला, तर तो क्षम्य होता असें आह्मांला वाटतें. असो; यावेळेस आमचा चरित्र-नायक आपला धंदा रेखारूपास कसा आणावा या विचारांत गर्क होता. आणि प्रस्तुतची स्थिति आहे ती बरी आहे, असें ह्मणून तो इतरां-प्रमाणेंच कांहींएक उद्योग न करतां स्वस्थ होता. याप्रमाणें उदासीन-तेचें कांहीं काळ साम्राज्य झाल्यावर थोड्या अवकाशानेंच, ' अकरणा-न्मंदकरणं श्रेय: ' या न्यायानें क्याथलिक लोक पुन: जरा जरा हात-पाय हालवूं लागले. पुन: त्यांच्या सभा हळूहळू भरूं लागल्या. त्या सभांना कांहीं कांहीं ब्यारिस्टर लोक जाऊं लागले. ओकोनेलही त्यांपैकीं एक होता. त्यानें तर एकदेखील सभा चुकूं दिली नाहीं. यामुळें सभांच्या कामांत त्याचें मन बरेंच रमलें व दिवसानुदिवस सार्वजनिक कामांत तो विशेष लक्ष घालूं लागला.

आरंभी आरंभी ज्या सभा झाल्या त्यांच्या हातून नांव घेण्याजोगी कोणचीच कामगिरी झाली नाहीं. याचें कारण असें होतें कीं, ह्या सभा भरविणारांच्या अंगांत जितकें धैर्य असावयाला पाहिजे होतें तितकें नव्हतें. कीओ या कामांत अजून मन घालीत होता हें खरें आहे. तथापि त्याचें आतां उतार वय झालें होतें, यामुळें त्याच्या मनांत एक उदासीनता उत्पन्न झाली होती. अशी स्थिति होती तरी पिटनें राजिनामा दिल्यानंतर अधिकारारूढ झालेल्या विग पक्षाच्या पुढाऱ्याकडून क्याथलिक लोकांचीं संकटें दूर करण्याचें त्यानें अभिवचन घेतलें होतें. शेवटीं १८०७ सालीं विग पक्षाकडील लोकांनीं देखील राजाच्या हठ-वादी स्वभावापुढें हात टेकले, व त्यामुळें बिचाऱ्या क्याथलिक लोकांच्या मनांत उद्भवलेला आशावृक्ष जागच्याजागीं करपून गेला. ही शोचनीय स्थिति पाहून ओकोनेलच्या मनाची अशी पूर्ण खात्री होऊन चुकली कीं, स्वधर्मानुयायी लोकांकरतां कांहीं हक्क संपादन करण्याची क्याथ-लिक लोकांच्या पुढाऱ्यांची जी खटपट चालली आहे, ती कांहींतरी व्यवस्थित चळवळ सुरू केल्याखेरीज नुसतें बोलून अथवा राज्यकर्त्यां-च्या चांगुलपणावर नजर ठेऊन फलद्रूप होणार नाहीं.

क्याथलिक लोकांचे यावेळेस जे पुढारी होते त्यांना, त्याचप्रमाणें सरदार लोकांना व जुन्या चालीचे व्यापारी यांना, ओकोनेल हा इतर तरुण लोकांप्रमाणेंच मोठा आग्रही व तापट स्वभावाचा असा वाटत होता व त्याचें सांगणें त्यांना मुळींच पटत नसे. आपल्या राज्यकर्त्यांकडून आपल्याला कांहीं हक्क मिळावेत अशी जर लोकांची इच्छा असली, तर त्यांनीं आपल्या तर्फेचे प्रतिनिधि निवडावे, त्या प्रतिनिधींची एक सभा भरवावी, व मग काय मागणें असेल तें, त्या सभेच्या मार्फत मागावें, असा ओकोनेलचा फार हेतु होता, पण तो हेतु, सर्व लोकांच्या मान्यतेनें सिद्धीस जाण्याची, तूर्तच्या प्रसंगीं तरी त्याला फारशी आशा नव्हती. ह्मणून आपलें इच्छित कार्य सिद्धीस नेण्याची त्यानें एक निराळीच पद्धत सुरू केली; ती ही कीं, तेवढ्या वेळेपुरत्याच व त्यासंबंधानें फारसा बोभाटा अथवा बभ्रा न करतां मोठमोठ्या सभा भरवून त्यांच्याकडून कमेट्या नेमून द्यावयाच्या, व जें कांहीं करणें असेल तें सर्व या कमेट्यांकडून करवावयाचें. ही पद्धत जरी त्यानें स्वीकारली, तरी वर सांगितलेला हेतु साध्य करून घेण्याकरितां आपल्या ह्मणण्याकडे सर्वांचें मन वळविण्याविषयीं त्याचा एकसारखा प्रयत्न चालला होता. मनापासून केलेल्या यत्नाला यश आल्यावांचून कधींही रहात नाहीं, हा नेहमींचा सिद्धांत ओकोनेलच्याही प्रत्ययाला आला. कारण १८०९ सालीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें 'क्याथलिक कमेटी' या नांवाची एक सभा स्थापन झाली. प्रथमत: तिला कायमचें स्वरूप प्राप्त होण्याचें कांहीं चिन्ह दिसत नव्हतें; परंतु सुदैवानें तिला तें स्वरूप लवकरच प्राप्त झालें, व त्यामुळें ओकोनेलला अतिशय आनंद झाला. सन १८१० सालीं या सभेनें असा एक मोठा महत्वाचा ठराव पास केला कीं, क्याथलिक कमेटीच्या देखरेखीखालीं काम करणारीं लोकलबोर्डें (स्थानिक मंडळ्या) किंवा कमेट्या स्थापन कराव्या. या ठरावा अन्वयें मुख्यत्वें करून दक्षिणेकडील प्रांतांत काय त्या स्थानिक सभा स्थापन झाल्या होत्या; इतर ठिकाणीं झाल्या नाहींत. परंतु ओकोनेल हा तेवढ्यानेंच निराश झाला नाहीं.

लोकांत आपली मानमान्यता वाढत चालली व लोकांचा आपल्यावर विश्वास बसत चालला ह्मणजे ते आपलें ह्मणणें मान्य करतील, अशी त्याला पूर्ण आशा होती व ती पूर्ण होण्याचीं चिन्हेंही त्याला दिसूं लागलीं होतीं. कारण या निरनिराळ्या सभांच्या द्वारानें ओकोनेल् व दुसरे आणखी बरेच क्याथलिक ब्यारिस्टर यांचें वजन दिवसानुदिवस लोकांत जास्त वाढत चाललें होतें यांत शंका नाहीं. हे लोक आपल्या धंद्यामुळें लोकांना प्रथमपासूनच प्रिय होते; त्यांतून त्यांचें तें वक्तृत्व, भाषण करण्याची त्यांची ती शैली, व एखाद्या विषयावर लोकांच्या मनावर अगदीं उत्तम प्रकारचा ठसा वठविण्याजोगी त्यांची ती विषयाची मांडणी, या तीन गुणांमुळें ते लोकांना विशेषच प्रिय वाटूं लागले. बऱ्याच ब्यारिस्टर व वकील लोकांच्या अंगांत आतां वर्णन केलेले गुण असतात हें खरें, परंतु या गुणांच्या बरोबरीनेंच त्यांच्या भाषणांत कांहीं ठराविक दोषही असतात. एखादा शब्द घेऊन त्यावरच कोट्या करीत बसणें, व त्याच त्या मुद्यावर पुनः पुनः भाषण करणें, हे दोष त्यांच्या भाषणांत जितके आढळतात, तितके दुसऱ्या कोणाच्याही भाषणांत सहसा आढळत नाहींत. ओकोनेल्प्रभृति मंडळी या दोषांतून अगदीं अलिप्त होती असें नाहीं. परंतु 'प्रेम आणि सदसद्विवेकशक्ति मनुष्यांच्या[१२] ठायीं एकत्र कधींही असूं शकत नाहींत, असें जें बेकनचें ह्मणणें आहे, व ज्याचा बर्कनें मोठा मजेशीर रीतीनें अनुवाद केला आहे, त्याला अनुसरून त्यांच्या श्रोते मंडळींच्या लक्षांत हे दोष कधींही आले नाहींत.

वर सांगितल्याप्रमाणें जे ब्यारिस्टर लोक नेहमीं सभेला येत असत, त्या सर्वांत ओकोनेल्वर लोकांचा जास्त विश्वास बसत चालला होता. कारण, त्याची इतर साहाय्यकारी मंडळी आली नाहीं तरी, तो प्रत्येक सभेला गेल्याशिवाय व तेथें भाषण केल्याशिवाय कधींही रहात नसे.

---

१२. 'It is not given to man to love and to be wise' बेकन. 'To love and to be wise, no more than to tax and to please is not given to man' बर्क.

सभांमधून पसंत होणाऱ्या ठरांवांचे मसुदे करण्याचें काम त्याच्यावांचून दुसरे कोणीही करीत नव्हते. यामुळें वर सांगितलेल्या संस्थेंत प्रथमतः जरी दुसरे लोक पुढारीपणानें काम करीत होते तरी, ओकोनेल्ला सर्वांना मागें सारून आपण पुढें सरण्यास वारंवार संधि मिळूं लागली, व तिचा त्यानें उपयोगही चांगला करून घेतला. प्रत्येक सभेला मोठा समाज जमावा अशी त्याची फार इच्छा होती. या करितां सभेच्या वेळीं तो एखाद्या चवाठ्यावर जाऊन उभा रहात असे व रस्त्यानें जाणाऱ्या प्रत्येक क्याथलिकास सभेस जाण्याविषयीं आग्रह करीत असे. याप्रमाणें सभा भरविण्याच्या कामांत तो नुस्ती अंगमेहनतच करून रहात होता असें नाहीं, तर प्रसंग पडल्यास पदरचे पैसेही खर्च करीत होता. याविषयीं वाचकांना आपली खात्री करून घ्यावयाची असेल, तर त्यांनीं लॉर्ड श्रूसबरी नांवाच्या गृहस्थाला ओकोनेल्नें लिहिलेलें पत्र वाचून पहावें[१३] अशी त्यांस आह्मीं शिफारस करितों.

ओकोनेल्सारखा तीक्ष्णबुद्धीचा मनुष्य लोकांच्या नजरेआड असा कधींच राहिला नसता; केव्हांना केव्हांतरी तो पुढें आलाच असता, हें अगदीं खरें आहे. तरी सार्वजनिक कामांत मन घालूं लागल्यापासून थोड्या अवकाशांतच पुढारीपणाची त्यानें जी जागा पटकावली ती, आतांपर्यंत क्याथलिक लोकांकरितां झीज सोसलेल्या व सर्वांना मान्य अशा किओला मागें सारून त्यानें पटकावली हें निर्विवाद आहे, व त्यामुळें किओसारख्या वृद्ध व तेजस्वी मनुष्याचा त्याच्या हातून एकप्रकारचा अपमान झाला असें ह्मणणें आह्मांला भाग आहे. ह्मातारपणामुळें किओनें सार्वजनिक कामांतून मन काढून घेतलें होतें व तो शांत व निर्जन अशा स्थलांत जाऊन राहिला होता, या त्याच्या तर्फेनें कांहीं ग्रंथकारांनीं पुढें आणलेल्या गोष्टी लक्षांत घेण्याजोग्या आहेत. परंतु त्यांतल्या-

१३. Life of O'connell by I. A. Hamilton pp. 30/31 पहा ह्मणजे तेथें हें पत्र सांपडेल.

त्यांत त्याचा मान राखून ओकोनेलनें आपला हेतु जर साध्य करून घेतला असतां तर तो वरील दोषाला कधींही पात्र झाला नसता असें आमचें मत आहे. क्विओ हा आपला एक प्रतिस्पर्धी आहे, अशी त्याची मुळापासून समजूत होती आणि प्रतिस्पर्ध्याविषयीं सहनशीलता दाखवावयाची हे तर त्याच्या स्वप्नांतदेखील त्याला ठाऊक नव्हतें. यामुळें त्याच्या हातून वरील प्रमाद घडला हें उघड आहे.

ओकोनेलच्या देखरेखीखालीं व त्यानें घालून दिलेल्या तत्त्वांवर क्याथलिक लोकांची चळवळ इतकी बळावत चालली कीं, सरकाराला तिच्याकडे यापुढें कानाडोळा करतां येणें अशक्य झालें. इतका वेळ पर्यंत क्याथलिक लोकांचें काम, मोठ्या धूर्तपणानें व कायदेशीर मर्यादेचें उल्लंघन न करतां चाललें होतें; परंतु शेवटीं त्यांच्याहातून, एक चूक झाली, ती कोणची, हें पुढील हकीकतीवरून वाचकांचे ध्यानांत येईल. सन १८०९ सालापर्यंत निरनिराळ्या प्रसंगीं भरलेल्या सभांकडून, निरनिराळे ठराव नेहमींच्या पद्धतीप्रमाणें पसंत होत असत; परंतु त्या सभांना सर्व ठिकाणचे प्रतिनिधि येत होते व त्यामुळें सर्व आयर्लंड देशाच्या वतीनें, त्या सभा, ते ठराव पसंत करीत होत्या, असें आतांपर्यंत सभेच्या चालकांनीं केव्हांही प्रसिद्ध केलें नव्हतें. सरकारानेंही इकडे पुरवावें तितकें लक्ष पुरविलें नसल्यानें, हा गुप्त क्रम बरेच दिवस सुरू होता; तेव्हां अर्थात्च क्याथलिक लोकांच्या अंगांत थोडासा धीटपणा आला व त्यांनीं पूर्वीचा ठरीव मार्ग सोडून नवीन मार्ग स्वीकारला. सन १८११ यावर्षीं क्याथलिक कमेटीच्या सेक्रेटरीनें प्रसिद्धपणें एक सरक्युलर काढिलें. व प्रत्येक कौंटी (परगणा) मधल्या लोकांनीं डब्लिन येथील सभेला दहा दहा प्रतिनिधि पाठवावे अशी सर्वांना सूचना केली. प्रतिनिधि निवडण्यासंबंधाचें सरक्युलर काढणें बेकायदेशीर आहे, असें ठरविणारा एक कायदा[१४] सरकारी अधिकाऱ्यांपाशीं तयार होताच. त्यांनीं

१४, या कायद्याचें नांव Convention Act. हा १७९३ सालीं पास झाला.

त्याचा अम्मल करण्याची लागलीच सुरवात केली. लॉर्ड लेफ्टेनंट या नांवाच्या आयर्लंडांतील मुख्य अधिकाऱ्यानें, आपल्या सेक्रेटरी-मार्फत सर्व माजिस्ट्रेट लोकांना एक पत्र लिहविलें, व त्यांत त्यांना असा हुकूम दिला कीं, जे जे लोक वर सांगितलेल्या सरक्युलराप्रमाणें प्रतिनिधी निवडतील किंवा निवडण्याच्या कामांस मदत करतील, त्या सर्वांना एकदम कैद करावें. या हुकुमाअन्वयें दोन तीन प्रतिनिधी सरकारी अधिकाऱ्यांनीं कैद केले व त्यांच्यावर खटले सुरू केले. इतक्या थराला गोष्ट येऊन पोहोंचली, तरी सरकारी अधिकाऱ्यांना न जुमानतां, प्रत्येक कौंटी ( परगणा ) मधल्या लोकांनीं, आपल्यातर्फे दहा दहा मुखत्यार निवडून पाठविले व त्या सर्वांची एक सभा भरविली; परंतु आयत्या वेळेस एक माजिस्ट्रेट येऊन त्यानें ती सभा मोडून टाकली. इतकी फजिती झाल्यावर, क्याथलिक लोकांचे डोळे उघडले व त्यांनीं आपण होऊनच आपली क्याथलिक कमेटी मोडून टाकली. पुनः थोडे दिवस गेल्यानंतर "क्याथलिक बोर्ड" ( सभा ) या नांवाची एक सभा स्थापन केली; परंतु त्या सभेला प्रतिनिधी वगैरे कोणी बोलाविले नाहींत. याप्रमाणें राजपक्षाची सरशी झाली व क्याथलिक लोक सर्वस्वी हरले. मागें सांगितल्याप्रमाणें, दोन प्रतिनिधींवर खटले सुरू केले होते, त्यांतही राजपक्ष विजयी झाला. अशा रीतीनें क्याथलिक लोकांचा चोंहोंकडून मोड होत गेल्यामुळें, त्यांना स्वस्थ बसण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. मधूनमधून सभा भरवून सरकारी अधिकाऱ्यांनीं स्वीकारिलेला हा मार्ग अगदीं अन्यायाचा आहे, असे ठराव ते पास करीत, परंतु तसें करणें अरण्यरुदिताप्रमाणें होतें, ह्मणून त्यापासून कांहींएक उपयोग झाला नाहीं हें निराळें सांगणें नकोच !

सन १८१० च्या पावसाळ्यांत तिसरा जार्ज राजा पुनः आजारी झाला. या खेपेचा त्याचा आजार इतका कांहीं दुर्धर होता कीं, तो त्यांतून बरा होण्याची आशा मुळींच नव्हती. ह्मणून राज्यकारभार चालविण्याची तेवढ्यापुरतीच व्यवस्था करणें मंत्रिमंडळीला भाग पडलें.

त्याप्रमाणें त्यांनीं जार्ज राजाच्या सर्वांत वडील मुलाला रीजंट ह्मणजे राजाचा प्रतिनिधि नेमिलें व त्याला जे अधिकार दिले त्यांत बरेच निर्बंध ठेविले. परंतु पुढें सन १८१२ सालच्या आरंभा आरंभाला ते सर्व निर्बंध[१५] नाहींसे झाले. त्याबरोबर आपल्या सर्व अडचणी आतां या रीजंटाच्या अमलांत नाहींशा होणार, अशी क्याथलिक लोकांच्या मनांत प्रबल आशा उत्पन्न झाली. कारण 'मी अधिकारारूढ झालों ह्मणजे तुमची सर्व विंपत्ति दूर करीन' असें अभिवचन अनेक वेळां त्याच्यापासून क्याथलिक लोकांना मिळालें होतें. शिवाय या राजपुत्राचा ओढा पहिल्यापासून विग् पक्षाच्या मुत्सद्यांकडे होता व ते मुत्सद्दी क्याथलिक लोकांना अनुकूल होते. यामुळें विग् पक्षाच्या मुत्सद्यांचें मंत्रिमंडळ एकदां त्यानें पसंत केलें ह्मणजे तेही आपल्या वर्तीनें खटपट करण्याला मुळींच मागें पुढें पाहणार नाहींत, अशी त्यांच्या मनांत दुसरी एक आशा उत्पन्न झाली होती. परंतु या सर्व आशा एकदम विलयाला गेल्या. कारण रीजंटाचें व विग् पक्षाकडील लोकांचें एका अगदीं क्षुल्लक कारणावरून[१६] बरेंच बिनसलें, व त्यामुळें टोरी लोकांचें मंत्रिमंडळ होतें तसेंच कायम ठेवण्याचा त्यानें विचार केला व मि० परसिव्हल नांवाच्या मुत्सद्याला मुख्य मंत्र्याच्या जागेवर नेमिलें. या मंत्र्याचें व क्याथलिक लोकांचें फारच वैमनस्य होतें, व तो त्यांना अगदीं पाण्यांत पहात होता. परंतु पुढें थोड्याच दिवसांत दुर्दैवानें ह्मणा किंवा सुदैवानें ह्मणा, एका वेड्यानें आपल्या बंदुकीनें परसिव्हलाचा जीव घेतला. त्याच्या पश्चात् लार्ड लिव्हरपूल नांवाच्या मुत्सद्याला मुख्य मंत्रि नेमिलें. त्याच्या कारकीर्दीत मात्र क्याथलिक लोकांच्या हक्काकडे पार्लमेंटाचें लक्ष गेलें. क्यानिंग नांवाच्या प्रसिद्ध मुत्सद्यानें एक अशी सूचना आणिली कीं, "ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड या संयुक्त राज्यांतील क्याथलिक प्रजेला लागू असणाऱ्या कायद्यांची स्थिति कशी आहे, यासंबंधानें कॉमन्स सभेनें चांगला पोक्त विचार करावा".

---

१५. Walpole's History of England. Vol 2 P. 250 पहा.
१६ Bright's History of England Vol III P. 1325 पहा.

ही सूचना बहुमतानें पास झाली. याप्रमाणें थोडेंसें यश आल्यापुढें आयर्लंडाच्या वतीचा मुख्य सभासद ग्रेटन यानें ब्रिटिश पार्लमेंटमध्यें अशी सूचना आणिली कीं, "रोमनक्याथलिक लोकांना लष्करी व सिव्हिल (लष्करी खात्याहून इतर) खात्यांत नोकऱ्या धरण्यासंबंधानें कायद्यानें जे अनेक प्रतिबंध ठेविले आहेत ते दूर करावे". ही सूचनादेखील बहुमतानें पास झाली. त्यानंतर या सूचनेप्रमाणें अम्मल करण्याच्या हेतूनें ग्रेटननें कॉमन्स सभेपुढें एक बिल आणिलें, व त्यांत असें एक कलम घातलें कीं, रोमन क्याथलिक लोकांनीं पार्लमेंट सभेंत सभासद या नात्यानें बसण्याच्या किंवा लष्करी किंवा सिव्हिल खात्यांत नोकरी धरण्याच्या अगोदर एक शपथ घेतली पाहिजे. ती शपथ ह्मणजे ही:—इंग्लंडच्या राजाविषयीं स्वामिभक्ति मनांत बाळगीन व फक्त प्रॉटेस्टंट धर्माचे अनुयायी इंग्लंडच्या गादीवर बसूं देईन, घरगुती कामांत पोपची (क्याथलिक धर्माचा रोम येथें राहणारा मुख्य गुरू) सत्ता चालूं देणार नाहीं, 'पोपच्या हातून कधींही चूक होण्याचा संभव नाहीं' हें जें तत्व आहे त्यावर भरंवसा ठेवणार नाहीं, व इंग्लंडांतील प्रस्थापित धर्मसंस्थेची सत्ता झुगारून देण्याचा यत्न करणार नाहीं." क्याथलिक धर्मांतील पुरोहितांना याहीपेक्षां जास्त जखडून घेण्याची ग्रेटनच्या बिलांत व्यवस्था केली होती. ती अशी:—संयुक्त राज्याच्या बाहेर जन्मलेल्या, किंवा संयुक्त राज्याबाहेर वस्ती करून राहणाऱ्या, कोणाही मनुष्यास धर्माधिकाऱ्याची (बिशप्) जागा मिळावयाची नाहीं. याशिवाय त्यांनीं खालीं लिहिलेल्या प्रकारची शपथ घेतली पाहिजे असें एक कलम होतें. ती शपथ येणेंप्रमाणें:—ज्याच्या राजनिष्ठेबद्दल शंका घेण्याला यत्किंचित् देखील जागा असणार नाहीं, व जो सार्वजनिक स्वस्थतेचा भंग करणार नाहीं अशी खात्री असेल, अशाच मनुष्याची धर्माधिकाऱ्याच्या जागीं नेमणूक करण्याविषयीं मी मत देईन, दुसऱ्याला देणार नाहीं; व पोपबरोबर, किंवा पोपनें नेमिलेल्या न्यायाधिकाऱ्याबरोबर, धर्माहून इतर कोणच्याही बाबतींत मुळींच पत्रव्यवहार करणार नाहीं.

क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याकरितां ग्रेटननें आणिलेल्या बिलाचें स्वरूप आतां वर्णन केल्याप्रमाणें होतें. ग्रेटन हा आयरिश लोकांचा जरी पुढारी होता, तरी तो प्रॉटेस्टंट धर्मानुयायी होता; यामुळें त्यानें पुढें आणिलेल्या बिलांत क्याथलिक लोकांना व विशेषतः पुरोहित लोकांना इतकें जखडून घेण्याची योजना कशाकरितां केली होती, हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. असो. या बिलाचा कामन्स सभेंत विचार होत असतां धर्माधिकाऱ्याच्या जागेवर योग्य मनुष्याचीच निवडणूक व्हावी, अयोग्य मनुष्य कधींही निवडला जाऊं नये, या हेतूनें वरील बिलाला कांहीं उपसूचना आपल्याला आणावयाच्या आहेत, असें क्यानिंगनें बोलून दाखविलें. या उपसूचनांचा आशय असा होता कीं, इंग्लंड आणि आयर्लंड या दोनही देशांत कमिशनर नेमावे, आणि त्या कमिशनरांना धर्माधिकाऱ्याचें काम पतकरणाऱ्या प्रत्येक इसमाचें नांव कळवावें. मग त्यांनीं त्याच्या योग्यायोग्यतेविषयीं आपलें जें काय मत असेल तें वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लिहून पाठवावें. त्यांचें ज्याप्रमाणें लिहून येईल, त्याप्रमाणें राजानें किंवा लॉर्ड लेफ्टनंट्नें त्या इसमाची धर्माधिकाऱ्याच्या जागीं नेमणूक करावी किंवा करूं नये. अशा तऱ्हेची उपसूचना आणण्यांत क्यानिंगचा हेतु असा होता कीं, पार्लमेंट सभेंत व निरनिराळ्या खात्यांत क्याथलिक लोकांचा प्रवेश झाला ह्मणजे त्यांना प्राटेस्टंट धर्माविरुद्ध कांहीं एक गडबड करतां येऊं नये, क्याथलिक धर्मामधील निरनिराळ्या धर्माधिकाऱ्यांवर राजाचा अम्मल असावा व पोपची सत्ता बऱ्याच अंशानें नाहींशी करावी. ग्रेटननें सुचविलेली शपथ घेणें, व क्यानिंगनें सुचविलेली व्यवस्था कबूल करणें, ह्मणजे आह्मी प्रॉटेस्टंट धर्माविरुद्ध किंवा इंग्लंडच्या राजाविरुद्ध यत्किंचित् देखील हालचाल करणार नाहीं, अशा प्रकारची हमी घेण्यासारखेंच होतें. अशा प्रकारची हमी घेण्याची कल्पना सर्व पुरोहितवर्गास अगदीं नापसंत झाली. परंतु या बिलासंबंधानें अनुकूल किंवा प्रतिकूल असें मत देण्याला कॉमन्स सभेला संधीच मिळाली नाहीं. कारण या बिलाचा कमेटींत वि-

चार चालू असतां कॉमन्स सभेच्या अध्यक्षानें (स्पीकरनें) एक अशी सूचना सभेपुढें आणिली कीं, पार्लमेंटमध्यें बसण्याचा व मत देण्याचा हे दोन अधिकार खेरीजकरून बाकीचे सर्व अधिकार क्याथलिक लोकांना असावे. कामन्स सभेंत या अध्यक्षाचें फार वजन होतें ह्मणून त्याची सूचना बहुमतानें पसंत झाली. या सूचनेप्रमाणें क्याथलिक लोकांना पार्लमेंट सभेंत बसण्याचा अधिकार असूं नये, असें कॉमन्ससभेनें बहुमतानें ठरविल्यानंतर ग्रेटनची पूर्वींची सूचना सभेपुढें आणण्यांत कांहीं तात्पर्यच राहिलें नाहीं. कारण क्याथलिक लोकांचा पार्लमेंटांत प्रवेश व्हावा हें त्यानें पुढें आणिलेल्या बिलांत मुख्य कलम होतें, व तें पास होण्याचा आतां मार्गच खुंटला होता.

याप्रमाणें इच्छित हेतु साधण्याची बळकट आशा क्याथलिक लोकांच्या मनांत उत्पन्न होते तोंच ती विलयाला गेली, यामुळें ते अतिशय खिन्न झाले. परंतु मागील प्यारिग्राफांत सांगितलेल्या अध्यक्षाच्या सूचनेला चारच मतें कायतीं जास्त मिळालीं होतीं. या गोष्टीनें त्यांतल्यात्यांत त्यांना बरीच उमेद आली, व पार्लमेंटाच्या पुढच्या बैठकीच्या वेळेस नवीन पास झालेला ठराव ह्मणून पाडावयाचा त्यांनीं निश्चय केला. अशा तऱ्हेची कांहीं तरी उचल आपल्या प्रतिस्पर्ध्यांकडून होईल, असें प्रॉटेस्टंट लोकांना वाटलें होतें. लंडनशहरांत व इतर ठिकाणीं त्यांच्या सभा स्थापन झाल्या, व आपल्या धर्माचें वर्चस्व कायम राखण्याविषयीं पार्लमेंट सभेला अर्जांवर अर्ज होऊं लागले. प्रॉटेस्टंट लोकांनीं कितीही गडबड केली असती व कितीही अर्ज केले असते तरी ग्रेटनसारखा धैर्याचा माणूस आपला इष्ट हेतु साध्य करून घेतल्याशिवाय कधींही राहिला नसता. परंतु या प्रसंगीं त्याला निमूटपणें बसणें भाग पडलें. कारण ज्यांच्या कल्याणाकरतां तो झटत होता, त्या क्याथलिक लोकांनीं व मुख्यतः आयर्लंडांतील क्याथलिक लोकांनींच त्या त्याच्या मार्गांत अनेक विघ्नें उत्पन्न केलीं. तीं कोणचीं हें पुढील हकीगतीवरून वाचकांचे ध्यानांत येईलच.

लंडन शहरांतही डब्लीनप्रमाणेंच 'क्याथलिक बोर्ड' नांवाची एक संस्था होती. त्या संस्थेंतील सभासदांनीं एक सभा भरविली, व त्या सभेंत वर वर्णन केलेल्या प्रकाराबद्दल आपला अत्यंत खेद प्रदर्शित केला, व या खेपेला जरी आपल्याला यश आलें नाहीं, तरी तें लवकरच आल्यावांचून राहणार नाहीं, याकरितां हल्लीं सुरू असलेले उपाय अधिक नेटानें पुढें चालू ठेवावे, अशा अर्थाचे अनेक ठराव त्यांनीं पसंत केले. असे ठराव पसार करण्यांत त्यांनीं योग्य त्याच मार्गाचें अवलंबन केलें. परंतु मधील क्याथलिक बोर्डाच्या सभासदांनीं लंडन शहरांतील आपल्या बंधूंचा मार्ग न स्वीकारतां भलत्याच मार्गानें ते गेले, व त्यांनीं असें ठरविलें कीं, ग्रेटननें पुढें आणिलेलें बिल अगदीं अपुरें आणि अयोग्य होतें. आयर्लंडांतील पुरोहितांनीं तर यांच्यापेक्षांही अधिक मूर्खपणा केला व आपल्या सभेंत त्यांनीं असें ठरविलें कीं, या बिलांत धर्मसंबंधाच्या जेवढ्या बाबी घातल्या होत्या, त्या सर्व क्याथलिक धर्मसंस्थेनें प्रतिपादन केलेल्या तत्त्वांच्या अगदीं उलट आहेत व त्या बाबी आह्मी कबूल केल्या तर, आमच्या धर्मगुरूनें [ पोपनें ] आह्मांला घालून दिलेल्या नियमांचें आह्मीं उल्लंघन केल्यासारखें होईल, सबब त्या आह्मांला कधींही मान्य होणार नाहींत. अशी भीति बाळगणें व्यर्थ आहे, ग्रेटननें जो उपाय सुचविला आहे, त्याला तुह्मीं आपली मान्यता द्यावी, असें रोम येथील धर्माधिकाऱ्यांनींदेखील आयर्लंडांतील पुरोहित मंडळींना कळविलें. धर्माच्या बाबतींत राजाचा हात मुळींच शिरूं देतां उपयोगीं नाहीं, असें या मंडळींचें ठाम मत होतें, ह्मणून खुद्द धर्मगुरूचा देखील हा उपदेश त्यांना रुचला नाहीं. उलट असा उपदेश केल्याबद्दल त्यांनीं त्याला मनास वाटतील तशीं दूषणें दिलीं. त्यांच्या त्यांच्यातच पुढें प्राप्त होणाऱ्या फळावर नजर ठेऊन, धर्माच्या बाबतींत राजाचा थोडासा हात शिरला तरी चिंता नाहीं, असें ह्मणणारे बरेच लोक होते. त्यांना आपल्या मित्रमंडळींचें वर सांगितलेलें अविचारीपणाचें वर्तन पसंत पडलें नाहीं. त्यांचें मन वळविण्यासाठीं त्यांनीं आपल्या हातून होईल तेवढी खटपट केली, पण तिचा कांहीं उपयोग

झाला नाहीं. याप्रमाणें रोमन क्याथलिक धर्मसंस्थेमधील लोकांत आपआपसांत दुही माजून राहिली, व धर्माच्या बाबतींत राजाची सत्ता कबूल करणारे ते सत्तावादी व नाकबूल करणारे ते असत्तावादी असे दोन पक्ष झाले. व ते तरी अशा आणीबाणीच्या प्रसंगीं कीं, ज्यावेळेस प्रत्येक रोमन क्याथलिक मनुष्यानें थोडीशी झीज सोसण्याकरितां अगदीं एका पायावर तयार असणें अगदीं जरूर होतें.

अशाप्रकारची दुही उत्पन्न होण्याला आमच्या चरित्रनायकाचेंच वर्तन कांहीं अंशीं कारणीभूत झालें होतें. धर्माधिकारी (बिशप) मंडळींना त्यांचें पूर्ण पाठबळ होतें. तो त्यांच्या वतीनें भांडत होता व ग्रेटननें त्यांची स्वतंत्रता नष्ट होईल अशा गोष्टी आपल्या बिलांत कशा नमूद करूं दिल्या, ह्मणून त्यानें त्याचा फार निषेध केला. जागोजाग मोठमोठ्या सभा भरून त्यांत ग्रेटनच्या बिलाला प्रतिकूल असे ठराव होऊं लागले. या सर्व गोष्टींचा परिणाम फार अनिष्ट झाला. क्याथलिक लोकांनीं आपला हा हट्टवादीपणा फार फार लांबवर पोंचविला व त्यामुळें क्याथलिक लोकांच्या वतीनें पार्लमेंटाच्या पुढील बैठकीच्या वेळेस त्यांच्यातर्फेनें काम करण्याचें ग्रेटननें आपल्या अंगाबाहेर टाकलें. नेपोलियन इंग्लंडावर कदाचित् स्वारी करील, अशी इंग्लिश राज्यकर्त्यांच्या मनांत गेल्या दहा पंधरा वर्षांत भीति होती. त्यामुळें आपल्या देशांत शांतता राखण्याचा व आपली सर्व प्रजा संतुष्ट राखण्याचा त्यांचा पूर्ण इरादा होता, व त्यास अनुसरूनच क्याथलिक लोकांची स्थिति सुधारली पाहिजे अशा आशयाचे अनेक ठराव आतांपर्यंत कामन्स सभेंत पास झाले. परंतु १८१३।१४ सालाच्या सुमारास नेपोलियनचा पूर्ण पराभव झाला व त्यामुळें तो आयरिश् लोकांना आपल्या विरुद्ध कांहीं मदत करील किंवा काय अशी इंग्लिश लोकांच्या मनांत सरासरी गेल्या वीस वर्षांत, जी एकसारखी भीति होती ती पार नाहींशी झाली. आयरिश लोकांच्या हक्कांचा जरी आपण योग्य विचार केला नाहीं व त्यामुळें आपल्या विरुद्ध त्यांचीं मनें कितीही जरी बिथरलीं तरी त्यापासून आपलें आतां कांहीं एक वांकडें होणार नाहीं, असा इंग्लिश

लोकांत पूर्ण भरंवसा आला, व त्याचा परिणाम असा झाला कीं, १८१४ सालच्या जून महिन्यांत 'क्याथलिक बोर्ड' नांवाची डब्लीन येथें जी सभा होती, ती बेकायदेशीर आहे, असें इंग्लिश सरकारनें ठरविलें.

क्याथलिक लोकांनीं परिणामावर नजर ठेऊन ग्रेटननें पुढें आणिलेल्या बिलाला जर आपली संमति दिली असती, तर निरनिराळ्या अडचणींतून त्याची सुटका[17] लवकरच झाली असती. परंतु तसें वर्तन त्यांच्या हातून न झाल्यामुळें ही सुटका होण्याला त्यांना आणखी १४ वर्षें वाट पहावी लागली! आतां ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, १८१३ या सालांत क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्यासंबंधानें कामन्स सभेंतील ज्या सभासदांनीं आपलीं अनुकूल मतें दिलीं, तीं त्यांनीं, नेपोलियनबरोबर सुरू असणाऱ्या लढाईमुळें क्याथलिक लोकांत जर असंतुष्टपणा उत्पन्न झाला, तर तो एकंदर देशाच्या कल्याणाला विघातक होईल, या भीतीनें केवळ दिलीं नाहींत, तर क्याथलिक लोकांसंबंधानें होणारा अन्याय नाहींसा केला पाहिजे अशी बुद्धि त्यांच्यांत उत्पन्न झाल्यामुळेंच दिलीं. क्याथलिक आपल्या कामाकरतां जर एकदिलानें झटले असते व आपल्या भाषणांत जर त्यांनीं थोडा मितस्थपणा राखला असता, तर लोकमताचा कांटा थोड्याच दिवसांत त्यांच्या बाजूला झुकला असता यांत कांहीं संशय नाहीं. मार्किस ऑफ् वेलस्लीनें १८१२ सालीं एका गृहस्थापाशीं असे उद्गार काढिले होते कीं, क्याथलिक लोक आपला उद्योग जर सत्याला धरून चालू ठेवतील तर त्यांना तीन वर्षांत, नाहीं कदाचित् एक वर्षांतच यश मिळेल, असें मी खात्रीनें सांगतों. यशप्राप्ति होण्याचे दिवस इतके जवळ आले असतां, १८२९ साला-

---

१७. 'Emancipation' या शब्दाच्या जागीं 'सुटका' हा शब्द आह्मीं वापरला आहे. 'Catholic Emancipation' हे शद्ब या ग्रंथांत पुढें बरेच वेळा येणार आहेत, ह्मणून त्याचें स्पष्टीकरणही आह्मीं पुढेंच करणार आहोंत. तूर्त 'सुटका' हा शद्ब आह्मीं कोणच्या शद्बाच्या ऐवजीं वापरला आहे एवढें कळलें ह्मणजे पुरे आहे.

पर्यंत त्यांना वाट पहात जें बसावें लागलें, तें पुरोहित मंडळी आणि ओकोनेल् या उभयतांच्या कृतीचें फळ होय यांत शंका नाहीं.

गेल्या पन्नास साठ वर्षांपूर्वी पुरोहितवर्गांतील लोकांची जी स्थिति होती, तीहून फार भिन्न प्रकारची स्थिति या वेळेस त्यांची झाली होती व त्यामुळें त्यांच्या स्वभावांतही अंतर दिसूं लागलें होतें. पूर्वी विद्या संपादन करण्याकरतां पुरोहित लोकांना परदेशांत जाण्यावांचून गत्यंतर नव्हतें, आणि ह्मणून द्रव्याची अनुकूलता जेवढ्यांना होती तेवढेच लोक या कामांत पुढें सरसावत होते. आयरिश लोकांप्रमाणें इंग्लिश लोकांना पैशाची ददात नव्हती, ह्मणून त्यांच्यापैकीं जेवढे धनसंपन्न व सुस्थित असे होते तेवढेच ह्या धंद्यांत शिरत असत व यामुळें इंग्लिश लोकांचाच पुरोहितवर्गांत विशेष भरणा होता. धर्माच्या बाबतींत जरी राजाच्या हातांत सत्ता असली, तरी तो एकंदर समाजाच्या कल्याणाकरतांच तिचा उपयोग करील, असा यांना पूर्ण भरंवसा होता, ह्मणून तशा प्रकारची सत्ता राजाच्या हातीं राहूं देण्याला त्यांनीं कधींच हरकत घेतली नाहीं. परंतु क्याथलिक लोकांच्या शिक्षणांत निरनिराळ्या हरकती उत्पन्न करणाऱ्या कायद्यांत फेरबदल झाल्यापासून आपल्या देशांत राहूनच विद्याभ्यास करण्याचीं साधनें पुरोहित लोकांना उपलब्ध झालीं व त्यामुळें परदेशांत जाऊन राहण्याचा प्रसंगच त्यांना येईनासा झाला. पण यांत त्यांचा फार तोटा झाला. परदेशांत राहिल्यानें, व नव्या नव्या मंडळींचा सहवास झाल्यानें मनुष्याची बुद्धि विकास पावते व त्यांच्या विचारांत प्रगल्भता येते, हे परदेशगमनाचे दोन मोठे महत्वाचे फायदे आहेत. परदेशांत जाण्याचें यापुढें कारण राहिलें नाहीं, ह्मणून आयर्लंडांतील पुरोहित लोक या फायद्यांना सर्वस्वी आंचवले; व त्याचा परिणाम असा झाला कीं, आपल्या धंद्यापलीकडे त्यांची दृष्टि पोंचेनाशी झाली, व ते खरे आयरिश् बनून राहिले. अर्थात् धर्माच्या बाबतींत त्यांच्या वर्त-

---

१८. आयरिश् लोकांचा उपजतच स्वभाव कसा असतो याबद्दल McCarthy's History of our own Times Vol. I p. 194 येथें दिलेलें वर्णन पहा.

नावर राजानें थोडीशी देखरेख ठेवण्याचें मनांत आणिलें तरी त्यांना तें अगदीं खपेनासें झालें. या कामांत ओकोनेल्चें त्यांना पूर्ण साहाय्य होतें, व तो त्यांच्या वतीनें मोठ्या उत्साहानें व वाजवीपेक्षां जास्त आवेशानें भांडत होता. पुरोहितवर्गाविषयीं एक प्रकारचा पक्षपातीपणा त्याच्या स्वभावांत पूर्णपणें खिळून गेलेला होता. त्याचें बहुतेक सर्व शिक्षण त्यांच्याच हातून झालें होतें, शिवाय स्वधर्मावर त्याची पराकाष्ठेची भक्ति होती. या दोन कारणांमुळें, पुरोहितवर्गाशीं तो फार एकनिष्ठपणानें वागत होता, यांत आश्चर्य कसचें? इंग्लंड, आयर्लंड वगैरे देशांत साधारण नियम असा आहे कीं, एखादा मनुष्य, मग तो कितीही धर्मनिष्ठ असो, राजकारणांत ह्मणून या मंडळीचें साहाय्य घेण्याच्या भानगडींत कधींही पडत नाहीं. ओकोनेलची समजूत मात्र अगदीं त्यांच्या उलट होती, ह्मणून पुरोहित मंडळीपासून कोणच्याही राजकीय गोष्टी तो चोरून ठेवीत नसे. अशा प्रकारचा परस्परांचा संबंध असल्यामुळें, ओकोनेल् हा पुरोहितांच्यातर्फेनें वाद करण्यास पुढें कां सरसावला हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

धर्माच्या बाबतींत राजाचा हात मुळींच शिरकूं द्यावयाचा नाहीं असा पुरोहित मंडळींकडून ओकोनेल्नें जो आग्रह धरविला, त्यांत कांहीं तरी राजकारण साध्य करून घेण्याचा त्याचा विचार होता. आयर्लंड इंग्लंडला जोडल्यापासून जुलमी कायदे पास करण्यापलीकडे सार्वभौम (imperial) पार्लमेंटाकडून आयर्लंडाचें कांहीं कल्याण झालें नाहीं. परराष्ट्रांबरोबर युद्ध करण्यांत इंग्लिश लोक गुंतले असतां आयर्लंडांत वरचेवर बंडें उपस्थित होऊं लागलीं, या व अशा प्रकारच्या दुसऱ्या कारणामुळें सक्तीचे कायदे सुरू करणें फारसें अन्यायाचें होतें असें आमचें ह्मणणें नाहीं. पण तेवढ्यावरून, ब्रिटिश पार्लमेंटाला आयरिशांच्या कल्याणाची एक देखील गोष्ट करतां येणें शक्य नव्हतें, असें मात्र ह्मणण्यास आह्मी तयार नाहीं. क्याथलिक लोकांविरुद्ध सुरू असलेल्या कायद्याच्या प्रत्येक भागांत सुधारणा होणें जरूर होतें. आतां या सर्व सुधारणा करणें बरेंच कालावधीचें काम

होतें, सत्रत्र त्या सवडीप्रमाणें केल्या असत्या तर त्यांत विशेष दोष ठेवण्याला जागा राहिली नसती. परंतु ज्यांच्यायोगानें आयरिश लोकांत विशेष असंतोष उत्पन्न झाला होता असे ते भिनपगारी माजिस्ट्रेट, त्यांची काम चालविण्याची ती घाणेरडी पद्धति, त्यांचा तो लांच खाण्याचा प्रकार—या सर्व गोष्टी थांबविण्याला फारसा वेळ लागला नसता. आयरिश लोकांच्या कल्याणाविषयीं राजकर्त्यांच्या मनांत याप्रमाणें असलेली अनास्था पाहून ओकोनेल् मनांतल्यामनांत जळत असे. आयर्लंड व इंग्लंड ह्या दोहोंचें एकराज्य केल्यानें देखील जर आयर्लंडचें हित होत नाहीं, तर तीं राज्यें पहिल्याप्रमाणेंच पृथक् पृथक् करून टाकावीं, अशी प्रबळ इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. आपल्याप्रमाणेंच आपल्या देशबांधवांची देखील या कामांत खात्री होण्याकरितां क्याथलिक लोकांच्या हक्कांचा विचार होणें ब्रिटिश पार्लमेंटकडून जितकें कालावधीवर जाईल, तितकें त्याला इष्ट होतें. कारण हा विचार जर लवकरच झाला असता, व क्याथलिक लोकांना कांहीं थोडासा फायदा जर झाला असता, तर तेवढ्यावरच ते संतुष्ट राहून आपली स्थिति सुधारण्याला कोणचा मार्ग स्वीकारला पाहिजे, याचा विचार करण्याचें त्यांनीं सोडून दिलें असतें; आणि मग आपल्या मताप्रमाणें आपल्या देशांतील सर्व लोकांचें मत झालें नसतें, अशी त्याला भीति होती. स्वधर्मानुयायी लोकांची स्थिति सुधारावी अशी त्याची अत्युत्कट इच्छा होती. पण ती इच्छा आयर्लंडाला स्वतंत्र पार्लमेंट दिल्यावांचून कधींही सफळ व्हावयाची नाहीं, अशी त्याची चालचाल खात्री झाली होती. आणि ह्मणून राजकीय बाबतींत पडण्याचा अगदीं प्रथमपासून शेवटपर्यंत त्याचा हा हेतु होता कीं, आयर्लंडाला स्वतंत्र पार्लमेंट मिळवून द्यावें; त्यानें एका प्रसंगीं यासंबंधानें खालीं लिहिलेले उद्गार काढिले:—' राजकीय बाबतींत पुढाकार घेण्याला या दोन देशांच्या झालेल्या ऐक्यामुळें मला प्रोत्साहन मिळालें.

१९. Raleigh's Irish Politics p. 53 पहा.

याच ऐक्यामुळें आयर्लंडची फार मोठी मानहानि झाली हें लक्षांत न येऊन, आयरिश लोकांनीं तो दिवस मोठ्या राष्ट्रीय उत्सवाप्रमाणें पाळला व जागोजाग देवळांतून घांटा वाजविण्याची सुरूवात केली. या घंटांचा नाद ऐकून मी तर अगदीं वेड्यासारखा होऊन गेलों. क्रोधातिशयानें माझ्या शरीरांतील रक्त अतिशय गरम झालें आणि त्याच दिवशीं मी अशी प्रतिज्ञा केली कीं, ही निकृष्ट स्थिति, माझ्या हातून, होईल तितक्या उपायांनीं, फार दिवस टिकूं देणार नाहीं. ही प्रतिज्ञा लक्षांत ठेवून त्या दिवसापासून तिच्या अनुरोधानें काम करण्याचा क्रम त्यानें सुरू ठेविला. जसाजसा त्याला जास्त अनुभव येत गेला, तसातसा आपण स्वीकारलेला मार्ग हाच कायतो श्रेयस्कर आहे, अशी त्याची खात्री होत गेली. पण त्याच्याच बरोबर त्याची दुसरी आणखी अशी खात्री झाली कीं, आपल्याला स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याच्या कामांत आयरिश लोकांच्या हातून एकदिलानें आपल्यास मदत होणें शक्य नाहीं. " बहूनामप्यसाराणां संहतिः कार्यसाधिका " हें तत्व आयरिश लोकांना राजकीय बाबतींत अजून देखील चांगलें कळूं लागलें नाहीं, मग ओकोनेल्च्या वेळेस ते मुळींच कळत नव्हतें यांत आश्चर्य तें काय? स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचें तर एकीकडेच राहो, पण निरनिराळ्या अडचणीपासून आपली सुटका करून घेण्याच्या कामांत देखील एकाचें तोंड पूर्वेस तर एकाचें पश्चिमेस, असा त्यांच्यांत प्रकार होता.—वरिष्ठ प्रतीच्या लोकांनीं व्यापाऱ्यांचा द्वेष करावा, व्यापाऱ्यांनीं वरिष्ठ प्रतीच्या लोकांचा करावा व ब्यारिस्टर लोकांनीं एकमेकांना पाण्यांत पहावें, अशी सर्वत्र शोचनीय स्थिति होती; शहाण्या व समजूतदार लोकांत जर हा प्रकार, तर बोलून चालून अडाणी व केवळ शेतकीवर उदरनिर्वाह करणाऱ्या रयतेची गोष्ट तर बोलावयासच नको. त्यांनीं एखादें काम हातांत घेतलें आणि तें धैर्य धरून व कोणच्याही प्रकारची धरसोड न करतां शेवटास नेलें, असें प्रायः कधींही होत नव्हतें. राजकीय बाबतींत पाहूं गेलें तर ते अगदींच सत्वहीन होते. एखाद्या वक्त्याचें बोलणें पसंत पडलें तर त्याच्या सन्मानार्थ तेवढ्या वेळेपुरत्या ते टोप्या

काढीत, आनंदानें आरडा ओरडा करीत; पण याच्या पलीकडे त्यांची मजल केव्हांच जात नव्हती. अशा लोकांना राजकीय स्वातंत्र्याकरितां हातांत शस्त्र धरावयास लावणें हें तर अगदींच मूर्खपणाचें व घातुक आहे, असें ओकोनेलचें मत झालें. हातांत शस्त्र न घेतां राजकीय हक्क संपादन करावयाचे झाले तर, त्यानां राजकीय शिक्षण देणें व ऐक्याची महती समजावून देणें, याशिवाय दुसरा मार्ग त्याला दिसत नव्हता. लोकांनीं वारंवार सभा भरविल्या पाहिजेत, क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याचे मार्ग कोणचे, याविषयीं एकसारखा खल चालू ठेविला पाहिजे, तरच वर लिहिलेले दोन्हीही हेतु साध्य होतील, असें तो नेहमीं प्रतिपादन करीत होता. डब्लिन येथें १८१३ सालीं त्यानें एका सभेंत खालीं लिहिलेले उद्गार काढिले :—

" तुमच्या शत्रूंचें असें ह्मणणें आहे कीं, इंग्लंड आणि आयर्लंड या दोन देशांत फाटाफूट करण्याचा माझा विचार आहे. तुमच्या शत्रूंचा माझ्यावर आणखी असा आरोप आहे कीं, आयर्लंडदेश स्वतंत्र करण्याची माझी इच्छा आहे. हा आरोप खरा आहे असें माझें मीच कबूल करतो; आणि त्याबद्दल ते माझ्यावर लागतील तितके वेळा हल्ले करोत, मी त्यांची पर्वा करणार नाहीं. आयर्लंड हें एक स्वतंत्र राज्य असलेलें मी आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. तेंच आयर्लंड हल्लीं एका राज्याचा भाग झालेला पाहण्यास मी अजून जिवंत आहे, याबद्दल माझा मीच आपल्याला दोष देत आहे. इंग्लंड बरोबर झालेलें ऐक्य नाहींसें करून आयर्लंडाला पूर्वीप्रमाणें पूर्ण स्वतंत्रता देण्याचा माझा कायमचा विचार आहे, हें मी कबूल करतों, आणि हें मोकळ्या मनानें कबूल केल्याशिवाय मी कधींही रहाणार नाहीं........इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य मोडून टाकण्याचा माझा हेतु तर आहेच, आणि ह्मणूनच तो सफल करण्याकरितां आपल्या शत्रुपक्षाकडून जें एक प्रकारचें आपल्याला साहाय्य मिळत आहे तें पाहून मला फार आनंद होतो. होय, आयर्लंडाशी वैर धरूनच आमचे इच्छित हेतु साधण्याचा आमचा मार्ग ते अधिक सुगम करीत आहेत. क्याथलिक लोकांना स्वतंत्रता देण्याच्या

कामांत ते दिरंगाई करीत आहेत; परंतु त्यांच्या तसें करण्यानेंच आमचा व्हावा त्याच्यापेक्षां जास्त फायदा होत आहे. या कामांत ते जों जों जास्त दिरंगाई करतील, तों तों आयर्लंड पूर्वस्थितीला लवकर जाऊन पोहोंचेल अशी मला पूर्ण उमेद आहे............आमच्या अडचणी दूर करण्याच्या कामांत बराच उशीर होत आहे हें पाहून मला फार आनंद होतो, हें मी पुन: एकदां सांगतों. कारण, असा उशीर झाला तरच माझ्या जन्मभूमीला स्वतंत्र करून टाकण्याचा जो माझा मुख्य आणि शेवटचा हेतु आहे, तो सिद्धीस जाण्याचा बराच संभव आहे".

असा संभव कितपत होता, व इंग्लंडबरोबर झालेलें आयर्लंडचें ऐक्य नाहींसें करणें किती फायद्याचें होतें, या दोन गोष्टींचा ज्या दृष्टीनें विचार करावा, त्या दृष्टीनें ओकोनेल्चे हे उद्गार शहाणपणाचे होते किंवा वेडेपणाचे होते, याचा निर्णय होण्याजोगा आहे. दोन देशांचें राजकीय ऐक्य नाहींसें झाल्याशिवाय आयर्लंडाचें खरें कल्याण व्हावयाचें नाहीं, हें त्याचें मत चुकीचें होतें असें प्रतिपादन करणारे लोक अनेक आहेत. परंतु त्यांना ही एक गोष्ट कबूल करणें भागच आहे कीं, तो जो या उद्योगाला लागला होता, तो अगदीं निरिच्छपणानें व केवळ आपल्या देशाचें कल्याण करण्याच्या हेतूनें लागला होता. त्याच्या सारख्या ऐन भरभराटींत असणाऱ्या ब्यारिस्टरानें आपला धंदा सोडून सर्व वेळ सार्वजनिक कामांत खर्च करावा हा कांहीं लहानसहान स्वार्थत्याग नव्हे. ओकोनेल् हा अजूनपर्यंत इंग्लंडांतील कोणाही मनुष्याला किंवा कोणच्याही पक्षाला त्रासदायक असा वाटूं लागला नव्हता. यामुळें त्याच्या धंद्यांतच सरकाराकडून जेवढा त्याचा गौरव होणें शक्य होतें, तेवढा अगदीं थोड्या अवकाशांत झाल्यावांचून राहताना. याहीपेक्षां उच्च मान मिळविण्याची ह्मणजे न्यायाधीशाची पदवी मिळविण्याची त्याची जर इच्छा असती तर तीदेखील खचित सफल होती. पण त्यानें तिकडे नुसतें ढुंकूनदेखील पाहिलें नाहीं. या त्याच्या गुणामुळेंच आयरिश् लोकांचा, पुढारी या नात्यानें त्याच्यावर फारमोठा विश्वास होता. धनाचा अभिलाष त्यानें धरला असता, तर तो इतक्या योग्यतेला कधींही

चढला नसता. याला जस्टिन म्याकार्थी या लोकमान्य इतिहासकाराची उत्तम साक्ष आहे. तो ह्मणतो – 'आपल्या बरोबरीच्या लोकांची नाखुषी पतकरून व आपल्या धंद्यांत नुकसान करून घेऊन पुरोहिताच्या तर्फेनें भांडण्याचा, व इंग्लंडबरोबर झालेलें आयर्लंडाचें ऐक्य मोडून टाकण्याची खटपट करण्याचा मार्ग स्वीकारण्यांत त्यानें शहाणपणा केला किंवा नाहीं, याविषयीं, पुढें ज्या गोष्टी घडून आल्या त्यांनीं त्याच्या हयातींतच लोकांच्या मनांत संशय उत्पन्न केला व तो संशय अजूनपर्यंतदेखील तसाच कायम आहे. परंतु अशी जरी खरी स्थिति आहे, तरी त्या कामांत ओकोनेलचें धैर्य, दूरदर्शित्व व निरिच्छपणा जगाच्या नजरेस चांगला आला, याविषयीं कोणाला संशय घेण्याला जागा नाहीं.

२०. History of our own Times. Vol. I, p. 198.

# ड्यानियल ओकोनेलचें

## चरित्र.

---

# भाग ३ रा.

## क्याथलिक लोकांची उदासीनता.

---

१८१४—१८२३

सन १८१४ सालीं ‘ क्याथलिक बोर्ड ’ या नांवाची संस्था विलयाला गेल्यामुळें क्याथलिक लोकांची बरीच पीछेहाट झाली. ज्या दहा सालांची माहिती या भागांत आह्मीं देणार आहों, त्या दहा सालांत ओकोनेलचे दिवस फारच निराशेंत गेले. नाहीं ह्मणावयाला शेवटच्या दोन तीन वर्षांत, दग्ध झालेल्या आशावृक्षाला थोडेसे अंकुर फुटूं लागले होते. सन १८१४ च्या आरंभालाच त्याच्या घरीं एक सभा भरली व तींत असें ठरलें कीं, उलट पक्ष फार प्रबल असल्यानें त्याला शरण गेल्याशिवाय क्याथलिक लोकांना दुसरा मार्ग उरला नाहीं. आपली सांथीदार मंडळी एके ठिकाणीं जमवून, शत्रुपक्षाशीं जरासा सामना करावा, असा ओकोनेलनें यत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं.. त्यांतल्यात्यांत त्याची उमेद फारच मोठी ह्मणून त्यानें आपल्या कर्तबगारीवर विश्वास ठेवून, आपल्या अनुयायी मंडळींत असें प्रसिद्ध केलें कीं, पुढील वर्षाच्या पार्लमेंटाच्या बैठकीमध्यें क्याथलिक लोकांची सुटका अंशतः तरी करून घेतल्याशिवाय मी खचित राहणार नाहीं! त्याचा अदमास अगदीं चुकीचा ठरला व त्याच्या मनांत जी आशा उत्पन्न झाली होती ती अगदीं निराधार होती, असें पुढें घडून आलेल्या गोष्टी वरून पूर्णपणें शाबीत होतें.

मागच्या भागांत सांगितल्याप्रमाणें क्याथलिक लोकांच्या कंपूंत सत्तावादी व असत्तावादी असे दोन पक्ष होऊन आपआपसांत दुही माजून राहिली होती, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. या दोन पक्षांपैकीं एखादा पक्ष जरी राज्यकर्त्यांबरोबर टक्कर देण्यास समर्थ असता, तरी त्यापासून एकंदर क्याथलिक लोकांचें कल्याण झाल्यांवाचून राहतेना. परंतु दुर्दैवानें त्यांच्यापैकीं एकाच्याही अंगांत पुरेसें सामर्थ्य नव्हतें. असत्तावाद्यांचा पुढारी ओकोनेल् यानें थोडेसे हातपाय हालविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याला यश आलें नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. सत्तावाद्यांचीही हीच स्थिति होती. नाहीं ह्मणावयास त्यांचा पुरस्कर्ता लार्ड फिंगल याच्या घरीं अनेक वेळां सभा भरल्या व त्यांत असे ठराव पास झाले कीं, क्याथलिक लोकांच्या वतीनें अर्ज वगैरे करण्याचें सर्व काम पूर्वीप्रमाणेंच ग्रेटनच्या हातांत राहूं द्यावें व क्याथलिक बोर्डाच्या जागीं दुसरी एक सभा स्थापन करावी. अमुक करावें, तमुक करावें, अशा अर्थाचे कोरडे ठराव पास करून क्याथलिक लोकांची स्थिति थोडीच सुधारणार होती. उभयपक्षाच्या मंडळींनीं एकत्र जमून आपआपसांमधील तंटे मोडून टाकले असते व एकमतानें आपला उद्योग चालू ठेविला असतां तर किती बहार झाली असती? परंतु हें व्हावें कसें? 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः' या न्यायानें उभय-पक्षांचा समेट होण्याचें तर एकीकडेच राहिलें; उलट, परस्परांमधील वितुष्टपणा जास्त जोरावत जाऊन, लहान मुलांप्रमाणें एकमेकांचीं एकमेकांनीं उणीं काढावीं व शिव्यागाळी करावी येथपर्यंत मजल येऊन पोहोंचली. सत्तावाद्यांनीं जेव्हां आपली एक सभा स्थापन केली, तेव्हां त्यांच्या उलट पक्षाच्या लोकांनीं १८१९ या वर्षी 'क्याथलिक असोसिएशन' या नांवाची आपली एक सभा स्थापन केली. याप्रमाणें सभेला सभा उडवून टाकण्याचा सल्ला मुख्यत्वेंकरून ओकोनेलचाच होता हें निराळें सांगणें नको. आपल्या प्रतिस्पर्ध्यांनीं स्थापन केलेली सभा—क्याथलिक लोकांची नाहीं, क्याथलिक लोकांच्या तर्फेनें ठराव पसंत करण्याचा त्या सभेला अधिकार नाहीं, असें तो प्रतिपादन करूं लागला. एकदा असें

झालें कीं, उलटपक्षाची सभा भरली असतां, दारावर असणाऱ्या लोकांशीं दंगामस्ती करून, तो सभेच्या ठिकाणीं गेला, आणि तेथें एकदम मोठ्या आवेशाचें भाषण करूं लागला. ओकोनेलनें आपल्या सभेच्या उलट कितीही जोराचें भाषण जरी केलें, तरी त्यापासून आपल्या क्रामाला व्यत्यय येण्याचा संभव नाहीं, असा विचार करून सर्व सभासदांनीं शांतपणानें त्याचें बोलणें ऐकून घेतलें. त्यानीं जर कां असा पोक्त विचार केला नसता, तर ओकोनेलला आपल्या अरेरावी वर्त्तनाबद्दल शारीरिक प्रायश्चित्त द्यावें लागलें असतें यांत संशय नाहीं! अशा वर्तनानें आपल्या अगांत लोकोत्तर धैर्य आहे अशी ओकोनेलनें कदाचित् आपल्या अनुयायांची खात्रीकरून दिली असेल, आह्मी नाहीं असें ह्मणत नाहीं. परंतु आपआपसांतील वाद वाढविणें चांगलें नाहीं, व त्यांतून वर सांगितलेल्या मार्गाचें अवलंबन करणें तर केव्हांही चांगलें नाहीं, हें त्याच्या ध्यानांत यावयास पाहिजे होतें तें आलें नाहीं, असें मात्र आह्मांला मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. असो. इतकेंही करून ओकोनेलनें आपलें तोंड जर आपल्या स्वाधीन ठेविलें असतें तर बराच फायदा झाला असता व दोन पक्षाचा कदाचित् समेट झाला असता. परंतु त्यानें आपला नेहमीचा क्रम अव्याहत चालू ठेविला होता. ' डब्लीन कॉरपोरेशन ' या नांवाची निव्वळ प्रॉटेस्टंट लोकांची एक संस्था होती, तिकडे यानें आपला मोर्चा फिरविला, व त्या सभेला ' भिकाऱ्यांची सभा ' असें नांव दिलें. डि एसटेर ( D'Esterre ) या नांवाचा त्या कॉर्पोरेशनचा एक सभासद होता. त्यानें, अर्थात् दुसऱ्यांच्या चिथावणीनें आपल्या सभेचा अपमान केल्याबद्दल ओकोनेल यास द्वंद्व युद्ध करण्याबद्दल आव्हान केलें. एखाद्या मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याचा अपमान केला किंवा अब्रूची खराबी केली तर त्याच्यावर दिवाणी किंवा फौजदारी कोर्टांत फिर्याद करण्याचा हल्लींचा जो मार्ग आहे, तो आतां इतका पूर्वी प्रचारांत नव्हता. ज्याला आपला अपमान झाला किंवा अब्रूची खराबी झाली असें वाटत असेल, त्यानें आपला अपमान किंवा अब्रूची खराबी करणाऱ्या इसमास द्वंद्व युद्धाला आव्हान करणें हा त्यावेळेचा लोकमान्य असा मार्ग होता.

या युद्धांत जो विजयी होईल त्याचा पक्ष खरा, व ज्याचा पराजय होईल त्याचा पक्ष खोटा अशी त्यावेळेची समजूत होती. सुधारलेल्या लोकांमधील द्वंद्व युद्धाचा हा काय प्रकार आहे, याची कल्पना आमच्या निव्वळ मराठी जाणणाऱ्या वाचकांना आपल्या इकडे होणाऱ्या दोन पैलवानांमधील कुस्तीवरून सहज होण्यासारखी आहे. आपल्या इकडे कुस्ती खेळतांना पैलवान लोक हातांत शस्त्रें वगैरे घेत नाहींत, किंवा घोड्यावरही बसत नाहींत. परंतु द्वंद्व युद्धांतील योद्ध्यांनी हातांत शस्त्रें घेऊन मर्जी वाटल्यास घोड्यावर बसून किंवा नुसतें उभें राहून युद्ध करण्याची परवानगी होती. युद्ध करणाऱ्या दोन वीरांपैकीं एखादा मृत वीर झाल्याशिवाय किंवा भीतीनें रणांगणामधून त्यानें पळ काढल्याशिवाय, हें युद्ध कधींही थांबावयाचें नाहीं. असा सक्त नियम होता. झालेल्या अपमानाबद्दल किंवा अब्रूनुकसानीबद्दल, अशा प्रकारानें न्याय मिळविण्याचा, हा कांहीं अशीं रानटी व अमानुष मार्ग सर्व युरोप खंडांत प्रचलित होता, परंतु हल्लीं तो अगदीं नाहींसा झाला आहे. व त्याबद्दलचें बरेंचसें श्रय, इंग्रजी इतिहासकार आपल्या महाराणी व्हिक्टोरिया यांच्या प्रिय भर्त्यास देतात. असो; डी एस्टरनें युद्धाकरतां केलेलें पाचारण ओकोनेलनें पतकरलें व तोही युद्धास सिद्ध झाला. ओकोनेल आपल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर द्वंद्व युद्ध करणार ही बातमी हां हां ह्मणतां डब्लिन शहरांत पसरली. या युद्धांत जयश्री कोणाला माळ घालते याविषयीं ओकोनेलचे स्नेही व अनुयायी चिंताक्रांत होऊन बसले. शेवटीं युद्धाचा ठरविलेला दिवस आला. ओकोनेल युद्धाच्या जागीं नेमल्या वेळेला आला. त्याचा शत्रु त्याच्या मागून जरा उशीरानें आला. नंतर मग दोघांच्याही हातांत पिस्तुलें देऊन दोघांना एकमेकासमोर उभें केलें. पुढें थोड्याच वेळानें युद्धास सुरुवात करण्याची इशारत झाली. डी एस्टरचे स्नेही ओकोनेलला हा खचित ठार मारणार व तेणेंकरून आपल्या मागची एकमोठी ब्याद नाहींशी करणार, अशा उत्सुकतेनें त्याच्या मरणाची तें अगदीं वाटपहात बसले. तो इकडे काय प्रकार झाला तो पहा! ओकोनेलचीच गोळी त्याच्या

शत्रूला लागली व तो रक्तबंबाळ होऊन धाडदिशी जमिनीवर पडला व प्राणास मुकला. युद्धाचा असा शेवट झालेला पाहून डिएस्टराच्या मित्राची

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजश्रीः।
इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार॥

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें स्थिति झाली असेल, यांत शंका नाहीं. ओकोनेलपक्षाकडील लोकांनीं त्याच्या विजयाबद्दल त्याचा फार गौरव केला. डब्लिन शहरांत त्या दिवशीं जिकडे तिकडे आनंदी आनंद भरला होता. आपला आनंद प्रदर्शित करण्याकरितां लोकांनीं त्या रात्रीं शहरांत दीपोत्सव केला. आपल्याला यश आलें याबद्दल ओकोनेलला आनंद झाला खरा, परंतु आपल्या प्रतिस्पर्ध्याचा सूड घेण्याचा हा अमानुष प्रकार अत्यंत गर्हणीय आहे, अशी या पहिल्या प्रसंगानेंच त्याची खात्री झाली व आपण अशा रीतीनें एका गृहस्थाचा व्यर्थ प्राण घेतला याबद्दल त्याला फार वाईट वाटलें. मग त्या दिवसापासूनच त्यानें अशी शपथ घेतली कीं, आजपासून द्वंद्वयुद्ध ह्मणून खेळावयाचें नाहीं. प्रतिपक्षावर तीक्ष्ण शब्दांचा प्रहार करण्याचा त्याचा क्रम, ही गोष्ट घडून आल्यावर देखील सुरू होतांच व त्यामुळें ज्या लोकांना त्याचें बोलणें झोंबलें त्यांनीं त्याला युद्धास तयार होण्याविषयीं अनेकवेळां आव्हान केलें. परंतु त्यानें तिकडे मुळींच लक्ष न देतां, आपली शपथ शेवटपर्यंत पाळली, हें त्यास भूषणावह आहे. त्याच्या शत्रूंनीं मात्र त्याच्या या नामर्दपणाच्या वर्तणुकीबद्दल त्याचा बराच निषेध केला. त्या वेळच्या आयरिश् लोकांच्या दृष्टीनें ओकोनेलचें हें वर्तन जरी गैर होतें तरी, त्याचा पुढें जो परिणाम झाला तो लक्षांत आणला ह्मणजे, आमचे प्रस्तुतचे वाचक त्याला खचित दोष देणार नाहींत, असें आह्मांस वाटतें. कारण त्या दिवसापासूनच द्वंद्वयुद्धाच्या राक्षसी उपायाबद्दल लोकांचें मन विटत चाललें, व थोड्याच वर्षांत तो उपाय सर्वथैव त्याज्य आहे असें ठरलें. सर वाल्टर बेसंट एके ठिकाणीं असें ह्मणतो कीं, “ या

१. Article in the Jubilee No. of the Illustrated London News. 1897.

दिवसांत द्वंद्वयुद्धाचें नुसतें नांव काढणेंदेखील मूर्खपणाचें लक्षण होऊन बसलें आहे. आपली अब्रू मळीण झाली असें ज्याला वाटत असेल तो आतां टाइम्ससारख्या एखाद्या वर्तमानपत्रांत पत्र देऊन, आपली अब्रू मळीण करणाऱ्या गृहस्थाचा चांगला समाचार घेतो आणि स्वस्थ बसतो.

ओकोनेल्नें ब्यारिस्टरचा धंदा सुरू केल्याला आतां सरासरी १४।१६ वर्षें झालीं होतीं व इतक्या. अवकाशांत त्याचा धंदा खूपच जोरावला होता. सर्व कोर्टांमधून त्याच्या इतकें काम दुसरे कोणालाही नव्हतें. सन १८१३ सालच्या जुलै महिन्यांत ' डब्लिन ईव्हिनिंग पोस्ट ' नामक वर्तमानपत्राच्या जॉन म्यागी नांवाच्या संपादकावर अब्रूनुकसानीचा लेख लिहिल्याबद्दल खटला झाला. त्या खटल्यांत आरोपीतर्फेनें काम करीत असतां आपल्या वकीली कसबाची त्यानें कमाल करून दाखविली. वास्तविक पाहिलें तर वादविषयक लेख स्कली या नांवाच्या गृहस्थानें लिहिला होता. परंतु जॉन म्यागी त्या पत्राचा संपादक ह्मणून त्याजवर राजदरबारीं व्यवहार सुरू झाला होता. कित्येक लोकांचें असें मत होतें कीं, तो लेख खुद्द ओकोनेल्च्याच हातचा होता. असो, वर सांगितलेलें वर्तमानपत्र क्याथलिक कमेटीच्या आश्रयाखालीं निघत होतें, ह्मणून त्या कमेटींतील लोकांना वर्तमानपत्रें काढण्याची बंदी करण्याच्या हेतूनें मुख्यत्वेंकरून सरकारानें म्यागीवर हा खटला सुरू केला होता. म्यागीनें लेखकाचें नांव सांगितलें तर त्याला आपल्या (क्येथलिक) कमेटींत तोंड काढावयाला जागा राहणार नाहीं. बरें कमेटीनें जर त्याला एकट्यालाच पुढें करावें, तर त्याला तोंडघशीं पाडल्यासारखें होईल. अशा स्थितींत ओकोनेल्नें आरोपीतर्फे काम करण्याचें पतकरलें. खटल्याला सुरवात होण्याच्या पूर्वी जूरी निवडण्यांत आली व तींत आरोपीला प्रतिकूल अशीच सर्व मंडळी आली. " प्रत्यक्ष परमेश्वर जरी आरोपी ह्मणून या जूरीसमोर पिंजऱ्यांत उभा केला असता तरी तोदेखील या जूरीच्या मतानें अपराधी ठरला असता. ", असे कांहीं लोकांनीं या जूरीसंबंधानें उद्गार काढिले. अशा जूरीपुढें उभें राहून आरोपीला निर्दोषी

ठरवून घेणें दुरापास्त आहे, ही गोष्ट ओकोनेल्च्या तेव्हांच लक्षांत आली आणि ह्मणून आरोपीला सोडवून घेण्याची खटपट एका बाजूला ठेवून, एकंदर क्याथलिक लोकांनीं आपल्या राज्यकर्त्यांपासून प्रजेचे सर्व हक्क संपादन करण्याकरितां ज्या मार्गाचें अवलंबन केलें आहे, तेच मार्ग सर्व प्रकारानें योग्य आहेत, असें प्रतिपादन करण्यास आरंभ केला. मुख्य न्यायाधीशानें त्याच्या भाषणाला हरकत घेतली व प्रस्तुत गोष्टीशीं याचा कांहीं संबंध नाहीं असें ठरविलें. त्यावर ओकोनेल्नें त्या न्यायाधिशाला असा जबाब दिला कीं, "सरकारी वकीलांनीं आह्मा-लोकांवर आतांपर्यंत यथेच्छ तोंडसुख घेतलें व तें आपण अगदीं शांतपणानें ऐकून घेतलें, याकरितां आतां त्याच्या उलट आमचें ह्मणणें काय आहे, तें आपण ऐकलेंच पाहिजे. ओकोनेलचें बोलणें संपल्यावर न्यायाधी-शानें आपला निकाल सांगितला व त्यांत म्यागी यास दोन वर्षांची कैद आणि ५०० पौंड दंड अशी शिक्षा दिली. खरें पाहिलें तर ज्या लेखा-बद्दल म्यागीला शिक्षा झाली, तो लेख त्याचा स्वतःचा नव्हता, आणि ह्मणून ओकोनेल्ला व त्याच्या मित्राला झालेल्या निकालाबद्दल फार वाईट वाटलें. परंतु वास्तविक ह्मटलें तर यांत आश्चर्य वाटण्याचें प्रयोजन नव्हतें. कारण एकानें लेख लिहावा व त्याबद्दल दुसऱ्याला प्रायश्चित्त मिळावें, हा प्रकार आतांप्रमाणेंच पूर्वींही वर्तमानपत्रकर्त्यांच्या अंगवळणीं पडला होता.

ओकोनेल याप्रमाणें आपल्या धंद्याच्या उद्योगांत असतां, त्याची अनुयायीमंडळी कांहीं हातपाय न हालवितां स्वस्थ बसली होती. या त्यांच्या उदासीनतेबद्दल मनांतल्या मनांत तो अगदीं जळत होता. सन १८१३ सालीं क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याबद्दल रिलीफ[२]

२. 'रिलीफ' या शब्दाचा अर्थ दुःखोपशम, दुःखाचें परिमार्जन असा आहे. 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ आक्ट' नांवाच्या महाराष्ट्रांतील कांहीं जिल्ह्यांत चालू असणाऱ्या कायद्याला 'दक्षिणेंतील शेतकरी लोकांची स्थिति सुधारण्याचा कायदा' असें मराठींत ह्मणतात. त्याला अनुसरूनच वरील अर्थ आह्मीं दिला आहे.

बिल नांवाचें जें एकबिल पुढें आणलें होतें, तें नापास झाल्यापासून क्याथलिक लोकांना नवीन राजकीय हक्क मिळण्याचे दिवस बरेच दूर गेले होते. ग्रेटनपार्नेल आदिकरून मुत्सद्यांनीं कामन्ससभेंत निरनिराळे उपाय सुचविले, पण त्यांतून एकही पसंत पडला नाहीं. इ. स. १८२० सालीं ग्रेटन हा अगदीं निराश होत्साता मरण पावला. त्याच्या मरणानें क्याथलिक लोकांचा महान् उद्योगी व मनापासून काम करणारा असा एक पुरस्कर्ता नाहींसा झाला.

ग्रेटन् मेला त्यावर्षी क्याथलिक लोकांच्या हातून कांहींच खटपट झाली नाहीं. तिसरा जार्ज मेल्यावर त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा चवथा जार्ज राज्यपदावर आरूढ झाला होता. तो व त्याची राणी क्यारोलिन[3] या उभयतांमध्यें कांहीं नाजूक कारणावरून तंटा उपस्थित झाला होता. तो तंटा मोडण्यांतच कॉमन्स सभेची एकदोन वर्षे गेलीं. पुढें सन १८२१ च्या फेब्रुवारी महिन्यांत कॉमन्स सभेपुढें क्याथलिक लोकांच्या हक्कांचा विचार निघाला. त्यांच्या नशिबानें वुइलियम प्लंकेट[4] या नांवाचा ग्रेटनच्या तोडीचाच पार्लमेंटमध्यें एक पुरस्कर्ता त्यांना मिळाला होता. त्यानें ती संधि साधून कॉमन्ससभेंत या विषयावर दोन बिलें सादर केलीं. तीं दोन्हीही बिलें बहुमतानें पास झालीं. पहिल्या बिलानें असें ठरविलें कीं, क्याथलिक लोकांना कॉमन्ससभेंत

---

3. पहा Erskine May's Constitutional History of England Vol. II, p. 256.

४. वुइलियम प्लंकेट—जन्म १७६४, मृ. १८५४. हा एक प्रसिद्ध आयरिश मुत्सद्दी व ब्यारिस्टर होता. आयरिश पार्लमेंटांत हा एका परगण्याच्या तर्फेनें सभासद होता. याची वक्तृत्वशक्ति फार अवर्णनीय होती. तो विग पक्षाचा अनुयायी होता व त्यांना साहाय्य देण्याच्या कामांत नेहमीं तत्पर असे. १८२७ सालापासून मोठमोठ्या अधिकाराचीं कामें त्याला मिळत गेलीं. 'क्याथलिक इमॅन्सिपेशन' नांवाचें बिल पास करण्याच्या कामांत प्रधान मंडळीला त्यानें बरेंच साहाय्य केलें.

बसण्याची परवानगी असावी, व लॉर्ड च्यान्सलॅर व लॉर्ड लेफ्टेनंट या दोन अम्मलदारांच्या जागा खेरीजकरून बाकीच्या सर्व दर्ज्याच्या जागा क्याथलिक लोकांना मिळाव्या. दुसऱ्या बिलानें असें ठरविलें कीं, धर्माध्यक्षाची नेमणूक झाल्यावर ती कायम किंवा रद्द करण्याचा अधिकार राजास असावा व १८१३ सालीं क्याथलिक पुरोहितांनीं जी शपथ घ्यावी असें ग्रेटनचें ह्मणणें होतें, तशाच अर्थाची शपथ त्यांनीं यापुढें घ्यावी. कॉमन्ससभेंत आतां सांगितल्याप्रमाणें प्लंकेटला यश आलें खरें, परंतु 'कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें' या मयूरकवीच्या उक्तीप्रमाणें हें बिल ज्यावेळेस लॉर्ड्सच्या सभेंत गेलें, त्यावेळेस तेथें क्याथलिक लोकांचें दुर्दैव दत्त ह्मणून उभें राहिलें. अशाप्रकारचें बिल पास केलें असतां ब्रिटिश राज्याला धक्का बसल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, असें अनेक लाटसाहेबांचें ह्मणणें पडलें व तें बिल बहुमतानें नापसंत झालें.

पार्लमेंटांत याप्रमाणें निराशा झाल्यामुळें क्याथलिक लोकांच्या मनांत आपले दुःखाचे दिवस लवकरच संपणार, अशी आशा उत्पन्न होण्याला एक नवीन कारण झालें. तें असें कीं, तिसऱ्या वुइलियमच्या कारकीर्दीपासून राजाचे पाय आयर्लंडाला लागण्याचा सुप्रसंग आज अनेक वर्षांत आला नव्हता, तो १८२१ सालच्या पावसाळ्यांत चवथ्या जार्जनें आणला. फार वर्षांनीं ज्याअर्थीं हा योग घडून आला, त्याअर्थीं राजाच्या हातून आपला फायदा झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशी आशा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. याच वेळेस आणखी एक आनंदाची अशी गोष्ट झाली होती कीं, क्याथलिक व प्रॉटेस्टंट यांचा जो अनेक वर्षांचा बेबनाव होता, तो थोड्याच दिवसांपूर्वीं नाहींसा

---

५. १ लार्ड च्यान्सेलर नांवाचा अधिकारी आपल्या इकडील अष्टप्रधानांपैकीं 'पंडितराव' यांच्याबरोबरीचा कांहीं अंशीं आहे.

२ लॉर्ड लेफ्टेनंट हा आपल्या इकडील लेफ्टेनंट गव्हरनरच्या दर्जाचा अम्मलदार आहे.

होऊन ते एकमेकांशीं अगदीं सलोख्यानें वागूं लागले होते. यामुळें राजाच्या आगमनानें झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां दोन्हीपक्षांचे लोक अगदीं मनापासून झटत होते. क्याथलिक लोकांनीं जार्जला एक मानपत्र दिलें व त्यांत राजाचें आगमन आयर्लंडांत होणार, अशी बातमी आल्याबरोबर आज अनेक शतकांपर्यंत क्याथलिक व प्रॉटेस्टंट यामध्यें असलेलें वैमनस्य पार नाहींसें झालें, इतकें राजदर्शनाचें माहात्म्य आहे, असा उल्लेख करून त्याचा फार गौरव केला. स्वारी ज्यावेळेस परत जावयास निघाली, त्यावेळेस ओकोनेल गुढगे टेकून त्याच्या पुढें उभा राहिला व त्यानें राजाला एक फुलांची माळ अर्पण केली. ती राजानें मोठ्या प्रेमानें ग्रहण केली. राजानें पुनः आयर्लंडांत यावें याबद्दल त्याला कांहीं तरी आमिष दाखविण्याच्या हेतूनें त्याच्या नांवाचा एक राजवाडा बांधण्याचा ओकोनेलनें निश्चय केला, व त्याकरतां तो लोकांपासून वर्गणी गोळा करूं लागला. परंतु पुरेशी वर्गणी जमा न झाल्यामुळें तो बेत रहित करून, त्यानें जेवढी रक्कम गोळा झाली तेवढ्यांतच एक पूल बांधला. त्याचप्रमाणें राजाच्या आगमनानें उभय पक्षांमध्यें झालेल्या सलोख्याचें चिरकाल स्मरण राखण्याकरतां त्यानें एक क्लब स्थापन केला. याप्रमाणें ह्या प्रसंगाला आयरिश् लोकांनीं जी राजनिष्ठा व समाधानवृत्ति दाखविली तशीं पूर्वी कधींच दाखविली नव्हती. परंतु ही समाधानवृति व एकोपा फार दिवस टिकला नाहीं. राजा परत इंग्लंड देशाला निघून गेल्यानंतर हिंवाळ्यांत जिकडे तिकडे दंगे धोपे सुरू झाले, व लोकांमधील स्वास्थ्य अगदीं नाहींसें झालें. अर्थात् राजाच्या येण्यानें उत्पन्न झालेली आशा जागच्याजागीं विलयाला गेली. या विषयावर लिहितांना वॉलपोल आपल्या इतिहासांत ह्मणतो "आयर्लंड देशाच्या कमनशीबानें जें असंतुष्टतेचें अभ्रपटल आलें होतें तें राजाच्या आगमनरूपी सूर्यप्रकाशानें पार नाहींसें झालें, निदान झाल्यासारखें दिसलें. सूर्य अस्ताला गेल्यावर ढग पुनः एकत्र होऊं

6. पहा Vol. II, p. 261.

लागतात, असा साधारण अनुभव आहेच. त्या प्रमाणें राजानें तेथून आपला पाय काढल्याबरोबर असंतुष्टतेचें साम्राज्य तेथें पुनः सुरू झालें.' त्यांतल्या त्यांत दुष्काळाचीही आणखी भर पडली. या सर्व प्रकरणामुळें पुढच्या ह्मणजे १८२२ सालीं क्याथलिक लोकाकरितां खटपट करण्याचें प्लंकेटला धैर्य होईना. डब्लिन शहरांत क्याथलिक व प्रॉटेस्टंट यांचे पूर्वी प्रमाणें तंटे सुरू झाले, क्याथलिक लोकांतही आपआपसांत तंटे बखेडे होऊं लागले. थोड्याच दिवसांपूर्वी त्यांचा जो सलोखा झाला होता, तो लक्षांत आणला ह्मणजे आतांचा हा प्रकार कोणालाही कष्टप्रद असा वांटल्यावाचून राहणार नाहीं.

सन १८२७ सालीं ओकोनेल्‌चा मुख्य मदतनीस शील[७] यानें एक भाषण केलें. त्यांत त्यानें वेळोवेळीं क्याथलिक लोकांची स्थिति कशी होती ह्याचें वर्णन केलें. त्यांपैकीं कांहीं भाग आमच्या वाचकांकरतां या खालीं दिला आहे. तो वाचला ह्मणजे क्याथलिक लोकांना या वेळेस किती निकृष्ट स्थिति प्राप्त झाली होती याची त्यांना चांगली कल्पना करतां येईल.

" सन १८२३च्या आरंभाला क्याथलिक लोकांच्या सर्व सभा मृतप्राय झाल्या होत्या. सभा भरविण्याच्या प्रश्नाचा आह्मी विचार करण्याचें सोडून दिल्यासारखेंच होतें; पार्लमेंटांत त्यासंबंधानें चर्चा चाल नव्हती इतकेंच नाहीं, तर आयर्लंडांतदेखील एखादी कमेटी किंवा बोर्ड किंवा असोशिएशन कांहीं ह्मणतां कांहीं नव्हतें. याचा परिणाम असा

---

७. रिचर्ड शील, जन्म १७९१, मृ. १८५१. हा अलौकिक बुद्धीचा मनुष्य होता. विद्यार्थिदशेंत असतांनाच यानें पांच नाटकें लिहिलीं व त्यांच्या उत्पन्नावर त्यानें आपलें शिक्षण पुरें केलें. क्याथलिक धर्माचा त्याला फार मोठा अभिमान होता. क्याथलिक असोसिएशनचा तो सभासद होता. प्रत्येक सार्वजनिक बाबतींत ओकोनेल् व तो अगदीं एकदिलानें वागत होते. कामन्स सभेचा सभासद असतांना आपल्या अमोघ वक्तृत्वानें तो सर्व सभागृह हालवून सोडीत होता. शेवटीं शेवटीं सरकारी हुद्याचीं बरींच महत्वाचीं कामें त्यानें केलीं.

झाला होता कीं, आमच्या मधील सार्वजनिक हिताची कळकळ बहुतेक लोपून गेली होती. मी वाजवीपेक्षां जास्त कांहीं फुगवून सांगत नाहीं, अगदीं खरें आहे तेंच सांगतों, आणि ह्मणून ह्मणतों कीं, त्या वेळेस आह्मी आपल्या हक्कांचा विचार करावयाचें सोडून देऊन अगदीं दगडासारखे स्वस्थ बसलों होतों............" याचा परिणाम शेवटीं काय झाला? याचा परिणाम दोन प्रकारचा झाला. क्याथलिक लोकांना हक्क देण्याचा प्रश्न इंग्लंडांत अगदीं मागें पडला, कोणी त्याची चौकशीही करीनासे झाले हा एक, व दुसरा हा कीं, इंग्लंडांतच तो लोकांच्या स्मरणांतून नाहींसा झाला होता असें नाहीं, तर आयर्लंडांतदेखील लोक जिकडे तिकडे निरुत्साह व निर्बल असे झाले होते. सर्व क्याथलिक लोकांना नीतिदृष्ट्या जी अवनति प्राप्त झाली होती, तींतून त्यांना वर निघण्याला यत्न करावयाचा ह्मटलें तर त्याकरितां फारच मोठा खटाटोप करणें जरूर होते, एवढ्यातेवढ्यानें कांहीं झालें नसतें.

# ड्यानियल ओकोनेलचें

## चरित्र.

---

## भाग ४ था.

---

### क्याथलिक असोसिएशन.

---

१८२३—१८२८.

सन १८२३ च्या एप्रिल महिन्यांत ग्लेनकलेन् नांवाच्या गांवांत आपल्या एका मित्राच्या घरीं विश्रांति घेण्याकरतां ओकोनेल् जाऊन राहिला होता. शीलची व आमच्या वाचकांची मागील भागाच्या शेवटीं थोडीशी ओळख झाली आहेच. तो व ओकोनेल्चे आणखी चारपांच स्नेही हे कांहीं कारणामुळें याच वेळेस त्या गांवांत एकत्र जमले होते. एके दिवशीं संध्याकाळीं जेवण झाल्यानंतर ही सर्व मंडळी एके ठिकाणीं जमली असतां, ओकोनेल्नें जी एक कल्पना आपल्या मनांत फार दिवसांपासून योजून ठेविली होती, ती त्यांना कळविली. तीच कल्पना पुढें चांगली रेघारूपाला येऊन 'क्याथलिक असोसिएशन' नांवाची सभा स्थापन झाली व त्या सभेच्याच द्वारानें 'क्याथलिक रिलीफ आक्ट'-क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याचा कायदा—या नांवाचा एक कायदा पास झाला. वरच्या दर्जाचे लोक व सुशिक्षित लोक या उभयतांमध्यें असावी तशी एकी नव्हती, यामुळें क्याथलिक लोकांच्या राज्यकारणाचा अगदीं विचका होत होता, ही गोष्ट ओकोनेल्च्या मनांत फार दिवसांपासून येऊन चुकली होती. शेतकरी व पुरोहित या दोन वर्गांतील लोकांच्या अंगांत बराच जोम दिसत होता व तो

---

१—'Aristocracy' या इंग्रजी शब्दाऐवजीं आह्मी हे शब्द वापरले आहेत.

आजपर्यंत कसाला लावून पाहण्याचा प्रसंगही आला नव्हता. राजाच्या आगमनानें क्याथलिक लोकांच्या मनांत जी आशा उत्पन्न झाली होती ती कशी विलयाला गेली, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. तेव्हांपासून वरिष्ठ प्रतीच्या लोकांकडून आपण मनांत योजिलेल्या उद्योगाला काडीचीही मदत घ्यावयाची नाहीं, सर्व भिस्त काय ती पुरोहित आणि सुशिक्षित व शेतकरी लोक यांजवर ठेवावयाची, असा त्यानें निश्चय केला.

ओकोनेलचा असा विचार होता कीं, डब्लीन येथें एक मोठी संस्था स्थापन करून तिच्या निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन कराव्या. या संस्थांमधील सर्व सत्ता सुशिक्षित लोकांच्या हातांत ठेवून त्यांनीं पुरोहित मंडळींची अधिकाऱ्यांच्या जागेवर नेमणूक करावी. विशेषत: शेतकीवर उदरनिर्वाह करून राहणाऱ्या आयरिश लोकांच्या मनांत या सभेविषयीं जेणेंकरून उत्साहबुद्धि जागृत होईल अशी तजवीज प्रत्येक अधिकाऱ्यानें करावी. या लोकांत योग्य उत्साह उत्पन्न होऊन, ते जर आपल्या हक्काकरितां सुशिक्षित लोकांच्या बरोबरीनें भांडावयाला लागतील, तर क्याथलिक लोकांचा कार्यभाग साध्य झाल्याशिवाय रहावयाचा नाहीं, असा ओकोनेलला पूर्ण भरंवसा होता. एवढी जंगी चळवळ सुरू करण्याला पैसा कोठून आणावयाचा हाच काय तो मुख्य प्रश्न होता. धनसंपन्न लोकांनीं उदारबुद्धीनें देणगीदाखल कितीही मोठ्या रकमा दिल्या, तरी पुरेशी रकम उभी राहण्याचा संभव नव्हता, कारण अशा लोकांची संख्या असावी तितकी मोठी नव्हती. शिवाय या कामांत त्यांच्या अंगीं असावा तितका उत्साहही नव्हता. ह्मणून त्यांच्याकडून एक पैही न घेतां सर्व रक्कम गरीब लोकांच्या देणगीनेंच उभारावयाची, असा ओकोनेलनें निश्चय केला होता. सर्व प्रकारच्या व सर्व दर्जाच्या लोकांस सभासद होण्याची परवानगी होती. एकंदर सभासदांचे दोन वर्ग केले होते. दर वर्षाला एक गिनी देणारांचा एक वर्ग व एक शिलिंग देणारांचा दुसरा.

परंतु या नवीन उद्योगाला चांगलें यश येण्याजोगी वेळेची अनुकूलता नव्हती. आयर्लंडांत कायद्याच्या सक्तीमुळें[२] निरनिराळ्या प्रकारचे कारखाने अगदीं बंद पडले होते. बरें ते जर पुनः सुरू करावे तर तेंही अशक्यच; कारण दगडी कोळशांची त्या देशांत फार मोठी वाण होती. यामुळें तेथील लोकांना शेतकीवर अवलंबून रहाण्याशिवाय उपजीविकेचें कोणचेंच अन्य साधन नव्हतें. नेपोलियनबरोबर फार दिवस चालू असलेली लढाई संपल्यानंतर जिकडे तिकडे धान्याच्या किंमती उतरल्या व त्यामुळें पुष्कळ शेतकरी आपल्या[३] धंद्यांत बुडाले. बऱ्याच व्यापारी लोकांनीं नफा मिळविण्याच्या आशेवर देशांतील जमिनी व व्यापाराचे जिन्नस खरेदी करण्याचा एकसारखा सपाटा सुरू केला. परंतु शेवटीं त्यांचा अदमास चुकून ते तोंडघशीं पडले व त्यामुळें बाजारांत उधारीचा व्यापार अगदीं बंद पडला. शाकुंतल नाटकांतील मैत्रेयाच्या ' गण्डस्योपरि पीटिका संवृत्ता ' या ह्मणण्याप्रमाणें या सर्व दुःखांत १८२२ सालीं दुष्काळ आणि सांथीचा आजार या दोहोंची भर पडली, व त्यायोगानें सर्व लोकांची आणि त्यांतून विशेषतः शेतकरी लोकांची फारच त्रेधा उडाली. आयरिश् लोकांची मुख्यत्वें-करून बटाट्यावर उपजीविका होते. तें बटाट्याचें पीक ह्या सालीं अगदीं ठार बुडालें होतें. क्लेअर परगण्यांतील ९९,६३९ इतके लोक केवळ भिक्षेवर आपला उदरनिर्वाह करीत होते. कॉर्क परगण्यांत अशाच तऱ्हेनें उदरनिर्वाह करणारे १,२२,००० लोक होते. इतक्या विपन्नावस्थेंत देखील जमिनदारांनीं आपल्या कुळांकडून जमिनीचा सारा सक्तीनें वसूल करण्यास आरंभ केला. ह्या सर्व कारणांमुळें मनसर

---

२—हे कायदे कोणच्या प्रकारचे होते, यासंबंधीं माहिती पुढील पुस्तकांत चांगली दिली आहे—Robinson's Irish History For English Readers, Ch. XVII.

३— See Bright's History of England Vol. III pp. 1350--51 and Walpole's History of England Vol. II pp. 265 to 270.

प्रांतांतील शेतकरी लोक फारच खवळले व त्यांनीं चोहोंकडे दंगे आरंभिले. ते दंगे मोडण्याकरितां अधिकाऱ्यांना बरेंच मोठें सैन्य आणणें भाग पडलें. दंगे करण्यांत शेतकरी लोकांचा दोष नाहीं, ते दारिद्र्यानें अगदीं गांजले आहेत, सबब तें त्यांचें दारिद्र्य नाहींसें करण्याला जमिनदार लोकांनीं कांहीं तरी यत्न केला पाहिजे असें त्यांना दाखविण्याकरितां विगिन्स नांवाच्या एका गृहस्थानें 'जमिनदार लोकांना सूचना' या मथाळ्याखालीं त्या वेळेस लिहिलेला एक लेख वाचण्याजोगा आहे. त्या लेखांत दंगे मोडण्याकरितां आणिलेल्या सैन्यासंबंधानें तो असें ह्मणतो कीं, "संगिनींची किंवा कायद्यांची भीति दाखवून' आयरिश लोकांप्रमाणें शूर व टणक लोकांवर नेहमीं सत्ता चालवीन ह्मटलें तर तें शक्य नाहीं व अवश्यही नाहीं. त्यांचें दारिद्र्य नाहींसें करून सर्व विपत्ति दूर करण्यांत नुसतें त्यांचेंच कल्याण आहे असें नाहीं. तर त्यांत तुमचेंही पुष्कळ अंशानें कल्याण आहे. फार तर काय तुह्मीं जमिनीचे मालक या नात्यानें तसें करणें तुमचें कर्तव्यकर्म आहे असें मी ह्मणतों." विगिन्सनें केलेल्या या सूचनेचा त्यावेळेस कांहीं उपयोग झाला नाहीं. दंगे करणाऱ्या लोकांना ताळ्यावर आणण्याकरितां एकसारखा संगिनींचाच उपयोग होऊं लागला व त्यांच्या माराखालीं ते अगदीं दबून गेले. त्यांच्यापैकीं पुष्कळ लोकांना पकडून आणून त्यांच्यावर खटले केले व शिक्षा दिल्या. सुमारें प्रस्तीस लोक फांसावर चढविले. या सर्व अस्वस्थतेचा परिणाम असा झाला कीं, क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं क्यानिंगनें केवळ मासल्याकरतां ह्मणून

४—क्यानिंग–१७७०–१८२५. इंग्लंडच्या इतिहासांत हा एक फार प्रसिद्ध मुत्सद्दी होऊन गेला. मि० पिट याचा अनुयायी ह्मणून १७९३ या सालीं प्रथमतः यानें पार्लमेंटमध्यें प्रवेश केला आणि तो जिवंत असेपर्यंत त्यानें त्याची बाजू सोडली नाहीं. आपल्या गुरूप्रमाणें हा फ्रेंच रेव्होल्यूशनच्या उलट होता. हा केव्हां केव्हां स्वपक्षाच्या अभिमानाला पडून कांहीं कांहीं चांगल्या गोष्टींच्या विनाकारण उलट जात असे. गुलामांचा व्यापार बंद करण्याच्या बिलाला यानें आपली संमति दिली. पण ती तरी वरील कारणामुळें मोठ्या कष्टानेंच दिली. क्याथलिक

जे उपाय सुचविले, ते कॉमन्स सभेला जरी पसंत पडले, तरी लॉर्ड्सच्या सभेनें नापसंत केले. याप्रमाणें आपल्या हक्कांचा कांहीं तरी विचार होईल अशी जी क्याथलिक लोकांना आशा उत्पन्न झाली होती ती यावेळेसही निष्फळ झाली.

ओकोनेलनें निराशा वगैरे सर्व एका बाजूला ठेऊन आपलें मुख्य हेतु लक्षांत आणून एक प्रिलिमिनरी ह्मणजे अगोदरची सभा भरविली. त्या सभेला मंडळी बेताचीच आली होती. परंतु पुढें मे महिन्यापासून ज्या सभा भरूं लागल्या त्यांना पुष्कळ लोक येऊं लागले. पार्लमेंट सभेच्या धर्तीवर सभांमधून वादविवाद चालविण्याचे नियम केले, व वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना व इतर लोकांना सभेला येण्याची परवानगी दिली. दुसऱ्या भागांत वर्णन केलेलें भांडण उपस्थित होऊन आजला सुमारें १० वर्षें होऊन गेलीं होतीं; यामुळें त्या वेळेस भडकलेला क्रोधाग्नि आतां बहुतेक शांत झाला होता, व सर्व लोकांनीं एकदिलानें वागण्याचा मार्ग खुला झाला होता. सरदार, धर्माध्यक्ष, पुरोहित व शेतकरी लोक हे सर्वजण हळू हळू नवीन स्थापन झालेल्या असोसिएशनभोंवतीं जमा होऊं लागले. ही सभा स्थापन करण्याचा हेतु असा होता कीं, वरिष्ठ प्रतीच्या लोकांच्या हातांत असलेली सत्ता हिरावून घेऊन ती सर्वसाधारण जनतेच्या स्वाधीन करावयाची. सभेचा हा हेतु लक्षांत घेऊन देखील जे वरिष्ठ प्रतीचे लोक सभेचे सभासद झाले ते खरोखरच स्तुतीस पात्र होते. असो. ही सभा शेतकरी लोकांना दिवसानुदिवस जास्तच प्रिय वाटूं लागली. त्यांच्या अडचणी काय आहेत, त्यांना जीं दुःखें भोगावीं लागतात त्यांचीं खरीं कारणें काय आहेत, हें या सभेंतील लोक ऐकून घेऊं लागले; त्या अडचणी व तीं दुःखें निवारण्याचे उपाय आह्मी काढल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशीं त्यांना त्यांच्यापासून आश्वासनें मिळूं लागलीं, व केव्हां केव्हां त्यांच्या श्रमानें त्यांच्या कांहीं अडचणी दूरही होऊं लागल्या. त्यांच्या-

---

( मागील पृष्ठावरून )
लोकांना अनुकूल अशीं यांचीं कांहीं मतें होतीं. हा उत्तम वक्ता असून कोणत्याही कामांत जहाली जाणारा नव्हता.

पैकीं कोर्टाची पायरी चढण्याचा जर कोणाला प्रसंग आला तर त्या प्रसंगी त्याला योग्य ती मदत मिळेल असें सभेनें त्यांना अश्वासन दिलें होतें, व त्यामुळें ती सभा विशेषच प्रिय झाली होती. सर्व प्रकारच्या राजकीय बंधनापासून क्याथलिक लोकांची सुटका करून घेण्यासाठीं जी ही चळवळ सुरू केली होती, तिच्यापासून वरिष्ठ प्रतीच्या लोकांचाच तेवढा फायदा व्हावयाचा होता असें नाहीं, तर दरिद्र्यांत जो दरिद्री होता त्याला देखील तिच्यापासून फायदा व्हावयाचा होता. पुरोहित लोकांनीं आजपर्यंत कोणच्याही राज्यकारणांत ह्मणण्यासारखें मन घातलें नव्हतें. पण तेच लोक आतां आपल्या धर्माध्यक्षांच्या देखरेखीखालीं असोसिएशनचें काम करूं लागले. याप्रमाणें सन १८२३ अखेर, क्याथलिक लोक केव्हांना केव्हां तरी एकत्र होतील अशी जी ओकोनेलच्या मनांत फार दिवसांपासून आशा होती, ती हळू हळू सफळ होण्याचा रंग दिसूं लागला.

या नवीन व्यवस्थेंत गरीब लोकांकडून सभेच्या खर्चाकरतां पैसे वसूल करण्याची ओकोनेलनें मागें सांगितल्याप्रमाणें जी युक्ति काढली होती, ती पहिल्या पहिल्यानें लोकांना जरी टीकास्पद अशी वाटली, तरी अनुभवांतीं फारच उत्तम अशी वाटूं लागली. ‘क्याथलिक कमेटी’ नांवाची संस्था ज्या वेळेस पूर्वीं अस्तित्वांत होती, त्याच वेळेस पुष्कळसे पैसे गोळा झाल्याशिवाय अशा प्रकारचे उद्योग चांगल्या प्रकारानें शेवटास जाणार नाहींत, हें ओकोनेलच्या लक्षांत आलें होतें, व त्यास अनुसरून प्रत्येक पुरोहिताच्या अमलाखालीं असणाऱ्या दर पेठेगणिक वर्गणी गोळा करण्याचा त्यानें यत्न केला होता, परंतु त्यांत त्याला त्या वेळेस ह्मणण्यासारखें यश आलें नाहीं. परंतु या वेळेस त्यानें असें ठरविलें कीं, अगदीं गरीब लोकांपासून देखील त्यांच्या शक्तीप्रमाणें वर्गणी घ्यावयाची, मग ती कितीही थोडी असली तरी हरकत नाहीं. याप्रमाणें श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत द्याव्या लागणाऱ्या वर्गणीला ‘क्याथलिक रेंट’ ह्मणजे क्याथलिक लोकांनीं देण्याचा कर किंवा पट्टी अशी व्यापक संज्ञा त्यानें दिली.

आतां सांगितलेल्या उपायाची योजना जरी दूरदृष्टिपूर्वक करण्यांत आली होती, तरी नवीन स्थापन केलेल्या असोसिएशनकडे पहिल्या पहिल्यानें लोकांचें जितकें लक्ष वेधावें तितकें वेधलें नाहीं. १८२४ च्या फेब्रुवारी महिन्यांत एक सभा भरली होती व त्या सभेंत वर सांगितलेल्या 'क्याथलिक रेंट' संबंधानें विचार व्हावयाचा होता. पण त्यांत मौज अशी झाली कीं, पंचवीस मिनिटांपर्यंत मुळीं कोरमच (सभेचें काम सुरू होण्याला अवश्य लागणारी सभासदांची संख्या) जमलें नाहीं. अर्ध्या तासाच्या आंत जर कोणी मंडळी आली नाहीं, तर सभेच्या नियमाप्रमाणें सभा पुढें ढकलणेंच भाग होतें. पण सभा पुढें ढकलणें अगदीं इष्ट नव्हतें, कारण 'शुभस्य शीघ्रं' हा तर ओकोनेल्चा अगदीं बाणा होता व त्याप्रमाणें आजचें काम उद्यांवर ढकलणें त्याला कधींही पसंत नव्हतें. ह्मणून जेथें सभा भरली होती तेथून तो झटक्यासरसा बाहेर पडला आणि रस्त्यावर जाऊन उभा राहिला. व तेथें असतांना सभेच्या सभासदांपैकीं वाटेनें जे कोणी येणारे जाणारे भेटले, त्यांपैकीं कांहींना चार सोईच्या गोष्टी सांगून, त्यानें सभेला आणिलें. याप्रमाणें नियमित संख्या झाल्यानंतर त्यानें आपली सूचना सभेपुढें मांडली व ती बहुमतानें पसंत झाली.

ओकोनेल्च्या या युक्तीची लोकांनीं आरंभाला बरीच थट्टा केली. पण जेव्हां सालअखेरीचे दिवस जवळ आले, तेव्हां ही युक्ति किती फायदेशीर आहे हें लोकांच्या चांगलें निदर्शनास आलें. आक्टोबर महिन्यांत दर आठवड्याला ३९० पौंड, नोव्हेंबर महिन्यांत ५९० पौंड, आणि डिसेंबर महिन्यांत ८०० पौंड असा वर्गणीच्या रूपानें, लोकांकडून वाढत्या प्रमाणावर वसूल येत गेला. दरसालाला १९० पौंड भाड्याची असोसिएशनकरतां एक जागा घेतली. एम्डोनेल् या नांवाच्या गृहस्थास दरसाल ३०० पौंड पगारावर लंडन येथें पार्लमेंटच्या कामासंबंधाचा एजंट नेमिलें. आजपर्यंत स्वस्थ बसलेल्या क्याथलिक लोकांना ओकोनेल्नें एवढा मोठा उद्योग करावयास लाविलें यामुळें सरकारी अधिकाऱ्यांच्या व प्रधान मंडळींच्या पोटांत भीतीनें मोठा थोरला गोळा उभा

राहिला. इकडे ओकोनेल्च्या मनांतदेखील या मंडळीसंबंधानें थोडीशी भीति उत्पन्न झाली होती यांत शंका नाहीं. जसें जसें एक एक पाऊल आपण पुढें टाकावें, तसें तसें नवीन विघ्नाला आमंत्रण केल्यासारखें होतें आहे, हें तो पूर्णपणें जाणून होता. आरंभिलेला उद्योग शेवटास नेण्याविषयीं आपल्या श्रोत्यांच्या मनांत उत्साहबुद्धि जागृत करण्याजोगें मोठें कळवळयाचें व आवेशयुक्त असें भाषण करणें, व त्यांतल्या त्यांत राजद्रोहाच्या कायद्याच्या तडाक्यांत न सांपडणें, या दोन्ही गोष्टी खरोखरच फार कष्टसाध्य होत्या. परंतु ओकोनेल्नें कोणाचीही फारशी पर्वा न बाळगतां हीं सर्व धोरणें संभाळून सरकारावर हल्ला करण्याचा एकसारखा क्रम सुरू केला होता. कायद्याच्या तडाक्यांत न सांपडण्याजोगें व तशांतूनही सणसणीत असें भाषण करण्याच्या कामांत ओकोनेल्सारखा पटाईत मनुष्य फारच क्वचित् सांपडेल! तरी पण केव्हां केव्हां त्याच्या हातूनदेखील चुका होत असत. अशा तऱ्हेची एक चुकी झाल्याबरोबर सरकारी अधिकाऱ्यांनीं असोसिएशनवर कशी गदा आणिली, ती हकीकत फार मनोरंजक आहे, ह्मणून आह्मी आपल्या वाचकांकरतां ती याखालीं देतों.

याचवेळेस ह्मणजे १८२४ सालीं बोलिव्हॉर नांवाच्या एका शूर पुरुषाच्या साहाय्यानें दक्षिण अमेरिकेंतील वसाहतींतल्या लोकांनीं स्पेन-

---

५—बॉलिव्हार सायमन–१७८३ ते १८३०. या शूर व राज्यकारण कुशल पुरुषानें दक्षिण अमेरिकेंतील वसाहतींना कसें स्वातंत्र्य दिलें, ही हकीकत फार मनोरंजक असून बोधपर आहे. या एवढ्याशा टीपेंत तिचा सारांश देणेंदेखील कठीण आहे. ज्यांना थोडक्यांत या पुरुषाचें चरित्र पाहिजे असेल त्यांनीं Encyclopedia Britanica Vol. IV, 9th edition pp. 7–10 पहावीं. त्याच ग्रंथांत चरित्राच्या शेवटीं ग्रंथकर्त्यानें जे विचार प्रकट केले आहेत, ते या खालीं आमच्या इंग्रजी जाणणारांकरतां देतों, तेवढ्यानें त्यांचें समाधान होत असल्यास त्यांनीं पहावें.

In the career of this remarkable man, who was often embittered and was perhaps shortened by the suspicions and slanders of his colleagues in the work of liberation. certain

विरुद्ध बंड करून स्वतंत्रता मिळविली. या कामांत बोलिव्हारनें आपल्या देशाची जी लोकोत्तर सेवा केली, तीबद्दल तो प्रत्येक देशांतील लिबरल पक्षाला फारच प्रिय झाला होता. डिसेंबर महिन्यांत एके दिवशी कोर्टांमधून दमून भागून आल्यानंतर असोसिएशनमध्यें ओकोनेल्, बोलावयाला उभा राहिला. सर्व जगांत स्वतंत्रता मिळविण्याकरितां कोणकोणचे लोक कसे कसे झटत आहेत, हें तो जमलेल्या सभासदांस सांगत होता. बोलतां बोलतां तो असें ह्मणाला " रोमनक्याथलिक लोकांच्या हक्कांकडे पार्लमेंटनें जर दुर्लक्ष केलें, तर ते हक्क संपादन करण्याकरितां आपल्या देशांत एखादा बोलिव्हार उत्पन्न होवो अशी माझी इच्छा आहे. " असोसिएशननें आरंभिलेला उद्योग कितपत कायदेशीर आहे, हें कोर्टांतून एकदां ठरवून घेण्याची सरकारी अधिकारी मोठ्या काळजीनें वाट पहात होते. यामुळें ओकोनेल्वर, या भाषणानें फिर्याद

---

circumstances, apparently well established, stand out which deserve particular mention. He expended ninetenths of a splendid patrimony in the service of his country, and although he had for a considerable time unlimited control over the revenues of three countries--Columbia Bar and Bolvia he died without a shilling of the public money in his possession. He conquered the independence of three states and called forth a spirit, in the southern portion of the New World, which can never be extinguished. He purified the administration of justice, he encouraged the arts and sciences; he fostered national interests and he induced other countries to recognize that independence which was in a great measure the fruit of his own exertions '

६. मागें एका प्रसंगीं अशाच प्रकारच्या बेसावधपणानें त्यानें खालीं लिहिलेल्या बायरन कवीच्या ओळी ह्मटल्या होत्या; पण त्या वेळेस तिकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं:—

" Hereditary bondsmen, know ye not
Who would be free themselves must
strike the blow, "

Walpole's History of England Vol. II P. 304

करण्याची सुदैवानें संधि मिळाली, याचा त्यांना फार आनंद झाला व त्याला फौजदारी कोर्टांत खेचून नेण्याचा त्यांनीं संकल्प केला. ओकोनेलचें हें भाषण शुक्रवारीं झालें. त्यानंतर दोन तीन दिवसांनीं, दुपारचे तीन चार वाजण्याच्या सुमारास तो आपल्या घरींच घरच्या मंडळीबरोबर गप्पा मारीत बसला होता, इतक्यांत एक सरकारी अधिकारि बरोबर एक शिपाई घेऊन त्याच्या घरांत शिरला, व पुढील सेशनांत सरकारानें आणलेल्या राजद्रोहाच्या आरोपाची चवकशी करून घेण्याकरतां मी हजर राहीन, असा त्याच्याकडून जातमुचलका लिहून घेतला. राजद्रोहात्मक शब्द मी केव्हां बोललों, माझ्यावर व्यवहार ( case ) कोणाचा आहे, ह्मणून त्यानें आलेल्या अधिकाऱ्यांस विचारिलें. परंतु वरिष्ठाचा त्याला तसा हुकूम नव्हता, ह्मणून त्याला ही माहिती देण्याचें त्या अधिकाऱ्यानें नाकारलें. शेवटीं रीतीप्रमाणें फिर्याद दाखल झाली. ही फिर्याद दाखल करूं नये असें खुद्द राजाचें, व त्याचा मुख्य प्रधान ड्यूक ऑफ् वेलिंगटन या उभयतांचें मत होतें. परंतु क्याबिनेटमधल्या बऱ्याच मुत्सद्यांचें मत फिर्याद करावी असें असल्यामुळें, ती सरकारतर्फे दाखल करण्यांत आली. फिर्याद दाखल करणें सोपें होतें. पण आरोपीनें उच्चारलेले शब्द कोणचे याचा पुरावा करणें फार कठीण होतें. ओकोनेल् हा फार जलद बोलणारा होता. यामुळें निरनिराळ्या छापखान्यांच्या बातमीदारांकडे तोंड वेंगाडण्याची सरकाराला पाळी आली. सर्व बातमी-

---

श्री शिवाजी महाराजांच्या उत्सवांत इतिहासदृष्ट्या त्यांच्या कारकीर्दीचें वर्णन करणें १२४ अ कलमाखालीं यावयाचें नाहीं. पण ती मर्यादा सोडून आपण पुढें गेलों व श्री शिवाजी महाराजासारखे पुरुष आज मितीला हिंदुस्थानांत उत्पन्न झाले पाहिजेत असें ह्मटलें, किंवा त्यांच्या सारखा आपणही पराक्रम करून दाखविला पाहिजे असें ह्मटलें, ह्मणजे आपलें तें ह्मणणें राजद्रोहात्मक होईल, असें न्या. स्ट्रॅची यांनीं ठरविलें आहे, हें प्रस्तुत प्रसंगीं वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. See An authentic report of Tilak Trial ( charge of the jury ) P. P. 16-32

७. ' क्याबिनेट ' ह्मणजे काय, तिची रचना कशी असते या संबंधाची कच्ची माहिती आमच्या ' इंग्लडांतील प्रधानमंडळ ' नांवाच्या पुस्तकांत सांपडेल.

दारांनीं सरकारास असें साफ सांगितलें कीं, आमच्याकडून या खटल्यांत कांहीं मदत होणार नाहीं! ' डब्लीन मार्निंगपोस्ट ' व ' फ्रीमन ' या पत्रांच्या कर्त्यांना पोलिसांनीं समन्सें काढिलीं, परंतु त्यांनीं आपलीं टिपणें पोलिसांपुढें हजर केलीं नाहींत; व टिपणाशिवाय आरोपीनें कोणचे शब्द वापरले होते, हें आह्माला सांगतां येत नाहीं, असा त्यांनीं जबाब दिला. ' सॉडर्स न्यूजलेटर ' नांवाच्या वर्तमानपत्राच्या बातमीदारानें तर सर्वांपेक्षां अधिक मौज केली. त्यानें शपथेवर असा जबाब दिला कीं, वादविषयक भाषण करण्याच्या सुमारालाच मला गाढ निद्रा लागली होती, यामुळें ओकोनेल्‌नें काय भाषण केलें याची मला कांहीं एक माहिती नाहीं! याप्रमाणें पुरावा करणें जेव्हां अगदीं अशक्य झालें, तेव्हां सरकाराला आरोपीवरील फिर्याद काढून घेणें भाग पडलें. अर्थात् सरकाराची या कामांत फार फजीती झाली हें निराळें सांगणें नकोच. सरकाराविरुद्ध एवढा मोठा जय मिळविल्यामुळें ओकोनेल् व त्याचे अनुयायी अगदीं हर्षभरित होऊन गेले, हें निराळें सांगावयास नकोच.

क्याथलिक असोसिएशन ह्मणून पाडण्याच्या कामांत वर सांगितल्याप्रमाणें अपयश आल्यानें प्रधान मंडळी बरीच विमनस्क झाली. सरकारानें कडक उपायांची योजना करून असोसिएशन नाहींशी केलीच पाहिजे असा प्रॉटेस्टंट लोकांनीं सर्वत्र गवगवा सुरू केला. प्रॉटेस्टंट मंडळीचें याप्रमाणें पाठबळ मिळाल्यावर प्रधान मंडळीनें असोसिएशनच्या विरुद्ध एक कायदा पास करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें १८२९च्या फेब्रुवारी महिन्यांत पार्लमेंट जेव्हां उघडलें तेव्हां त्या कायद्याचें 'सूतउवाच' करण्याकरितां राजाच्या[८] भाषणांत त्यांनीं खालील वाक्य घातलें:—

---

८. नवीन पार्लमेंट सुरू होण्याच्या वेळेस किंवा पार्लमेंटाचें एक सत्र ( Session ) संपून दुसरें सुरू होण्याच्या वेळेस आरंभीं लॉर्ड्सच्या सभेंत ' राजाचें भाषण ' ह्मणून एक भाषण वाचण्यांत येत असतें, तें भाषण प्रधान मंडळीकडून तयार होऊन राज्यव्यवस्थेसंबंधाचे त्यांचेच विचार त्यांत प्रकट केलेले असतात, राजाचा त्यांत कांहीं संबंध नसतो. तरी पण अशा तऱ्हेनें तयार झालेलें भाषण ' राजाचें भाषण ' असें ह्मणण्याचा प्रघात आहे.

" आयर्लंड देशांत कांहीं नवीन सभा झाल्या आहेत. त्या सभांमधून चालणारीं कामें असावीं तितकीं व्यवस्थित व कायदेशीर नसतात यामुळें आह्माला वाईट वाटत आहे. " राजाच्या या भाषणावर ब्रोगह्याम नांवाच्या मुत्सद्यानें बरीच टीका केली. तो ह्मणाला " सभा हा शब्द अनेकवचनीं वापरण्यानें क्याबिनेटमधील प्रधान मंडळी कदाचित् असें सुचवित असतील कीं, आह्मी जो कायदा करणार आहों तो क्याथलिक लोकांच्या व प्रॉटेस्टंट लोकांच्या सभांना ( ज्यांना ' ऑरेंज लॉजिस् '—Orange lodges—अशी संज्ञा होती ) सारखाच लागू पडणारा आहे. पण दाखवावयाचे दांत एक व खाण्याचे दांत एक असा यांत प्रकार आहे हें मी खात्रीनें सांगतों. नवीन होणाऱ्या कायद्याचा सर्व अम्मल क्याथलिक असोसिएशनवर होणार आणि प्रॉटेस्टंट असोसिएशनविरुद्ध केव्हांही होणार नाहीं. " ब्रोगह्यामच्या या भाषणाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण पुढें ६।७ दिवसांच्या आंतच क्याथलिक असोसिएशन आणि ' ऑरेंजलॉजीस् ' बंद करण्याकरितां कामन्स सभेपुढें एक बिल आलें व तेंच बिल एक महिन्याच्या आंत पास होऊन त्याच्या अनुरोधानें ' सप्रेशन आक्ट ' ( Suppression Act ) ह्मणजे नियमन करणारा कायदा अंमलांत आला. कोणचीही गोष्ट कायद्याच्या उलट करावयाची नाहीं असा ओकोनेलचा प्रथमपासून हेतु होता. त्यामुळें हा कायदा पास झाल्याबरोबर त्यानें असोसिएशन मोडून टाकिली. आपण केलेल्या कायद्याचा व्हावा तो परिणाम झाला

९. ब्रोगह्यामचें हें भाषण वाचीत असतांना ना० मि० चामर्स यांच्या पीनल कोडाच्या दुरुस्तीच्यासंबंधानें ' इंडिया ' पत्रांतील खालील लेखाचें वाचकांना स्मरण होईल.

Hitherto, and probably in the future, the European Editor has been and will be moderatly safe. It is the Native Press that will bear the real brunt of official displeasure—India ( 28-1-98.)

१०. See Walpole's History of England Vol. II P. 305.

असें पाहून प्रधान मंडळीच्या जीवांत थोडासा जीव आला असेल यांत शंका नाहीं.

आयर्लंडांत हा प्रकार चालू असतांना क्याथलिक लोकांना अनुकूल असा जो इंग्लंडात पक्ष होता, तो तिकडे हळू हळू बळावत चाललेला होता. क्याथलिक लोकांची सभा बुडवून त्यांच्या कल्याणाची एकही गोष्ट करावयाची नाहीं. हें कांहीं बरोबर नाहीं, असें पार्लमेंटमधील सभासदांनाही वाटू लागलें होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं, बरडेट नांवाच्या सभासदानें कॉमन्स सभेपुढें रिलीफ् बिल नांवाचें एक बिल आणलें व तें बऱ्याच अधिक मतानें पास झालें. बरटेडच्या बिलाचा विचार चालू असतां क्याथलिक लोकांना अगदीं प्रतिकूल ह्मणून आजपर्यंत नाणावलेले जे लोक होते, त्यांनीं देखील या बिलाला अनुकूल अशीं मतें दिलीं. याप्रमाणें कॉमन्स सभेंत बरडेटला यश मिळालें खरें; पण लार्ड्सच्या सभेंत मात्र या बिलाची विपरीत दशा झाली. तशी दशा होण्याला चवथ्या जॉर्जचा वारस व त्याच्या पश्चात् इंग्लंडच्या गादीवर बसणारा ड्यूक ऑफ् यॉर्क हा मुख्य कारण झाला हें निर्विवाद आहे. कारण त्यानें अशी प्रतिज्ञा केली होती कीं, माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत, मग मी राज्यपद भोगीत असो किंवा नसो, क्याथलिक लोकांना कांहीं केल्यानें मी हक्क मिळूं देणार नाहीं. ही घोर प्रतिज्ञा ऐकून राजाचा कल पाहून वागणाऱ्या पुष्कळ सरदारांनीं बिलाला प्रतिकूल अशीं आपलीं मतें दिलीं.

याप्रमाणें क्याथलिक लोकांना दोहोंकडून थपडा बसल्यामुळें ते बरेच निराश झाले. ओकोनेल्सारखा मोठा युक्तिवान्, विलक्षण उत्साहाचा व कोणचीही गोष्ट मनाला फारशी लावून न घेणारा असा पुढारी सुदैवानें त्यांना मिळाला होता, ह्मणून झालेला प्रकार सर्व विसरून टाकून ते पुनः दुसऱ्या उद्योगाला लागले. असोसिएशन बंद करणारा कायदा–सप्रे-

---

११. See Bright's History of England Vol. III P.1391.

शन अॅक्ट—जा पास केला, त्याला क्याबिनेटमधल्या सर्व सभासदांची संमति नव्हती व त्या कायद्याचा मसुदाही निष्काळजीपणानेंच झाला होता. या निष्काळजीपणाचा ओकोनेल्नें चांगलाच फायदा घेण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें त्यानें अशी एक शक्कल काढिली कीं, तिच्या योगानें तो कायदा जागच्याजागींच थंड पडला! त्या कायद्यांत विशेष प्रतिबंधक असें हें एक कलम होतें कीं, " धर्मसंस्था व राजकीयसंस्था या दोहोंत सुधारणा करण्याच्या हेतूनें जी सभा स्थापन केली असेल, ती चवदा दिवसांपेक्षां जास्त दिवस भरवितां येणार नाहीं, किंवा लोकांपासून तिच्या खर्चाकरितां पैसे वसूल करतां येणार नाहींत. " हें कलम चुकविण्याकरितां ओकोनेल्नें एक नवीन ' असोसिएशन ' काढिली. दानधर्म करणें व कायद्यानें ज्यांचा प्रतिबंध केला नाहीं, अशीं सर्व कामें करणें, हा या नवीन सभेचा उद्देश आहे, असें त्यानें प्रसिद्ध केलें. सार्वजनिक स्वस्थता राखावयाची, सर्व लोकांनीं एकमेकांशीं सलोख्यानें वागण्याविषयीं त्यांना उपदेश करावयाचा, धर्म शिक्षणाला उत्तेजन द्यावयाचें, क्याथलिक पंथाच्या लोकांकरतां देवळें व स्मशानभूम्या बांधावयाच्या, शेतकी व व्यापार या दोहोंला उत्तेजन द्यावयाचें, अशीं एक वा दोन, अनेक कामें या सभेच्या आश्रयाखालीं चालावयाचीं होतीं. सर्व ख्रिस्ती लोकांना, वर्षाला एक पौंड दिल्यावर, या नवीन सभेचे सभासद होण्याची मोकळीक होती. वर लिहिलेल्या सर्व विषयाचा ऊहापोह करण्याकरतां असोसिएशनच्या आश्रयाखालीं सभा भरूं लागल्या. अशा तऱ्हेनें भरलेल्या सभांचें काम कधीं एक दिवस कधीं दोन दिवस व कधीं कधीं कायद्यानेंच सवलत दिल्याप्रमाणें चवदा दिवस चाललें होतें. वर्गणी गोळा करण्याचें काम पूर्वीप्रमाणेंच चालू होतें. प्रत्येक इसम वर्गणी देतेवेळेस " दुःखानें पीडिलेल्या क्याथलिक लोकांच्या मदतीकरतां " असें ह्मणून ती देत असे. ओकोनेल् आपली स्वतःची वर्गणी देतेवेळेस आपल्या नांवापुढें ' कायद्याचा ज्यांना प्रतिबंध येणार नाहीं, अशा सर्व कामाकरतां ' असा शेरा मारीत होता. याप्रमाणें वर सांगितलेल्या मुख्य कलमाची वाट लावून आपला इष्ट हेतु साध्य करून

घेण्याकरितां ओकोनेल्नें योजिलेली युक्ति सर्वप्रकारें सिद्धीस गेली, असें त्याच्या शत्रूनांदेखील कबूल करणें भाग आहे.

सरकारच्या अगदीं नजरेखालीं जरी या सर्व गोष्टी सुरू होत्या, तरी त्यांचा प्रतिकार न करितां सरकारचे अधिकारी स्वस्थ बसले होते. ओकोनेल्प्रभृति लोकांवर कायद्याविरुद्ध वर्तन केल्याबद्दल खटले करून नवीनच स्थापन झालेली ही असोसिएशन जागच्या जागीं चिरडून टाकणें सरकारला फार कठीण गेलें असतें असें नाहीं. त्यांतून आयरिश सरकाराला आपल्या तंत्राप्रमाणें चालणारे न्यायाधीश लागतील तितके मिळत होते व आपल्याला सर्व प्रकारानें अनुकूल अशीच जूरी निवडून काढण्याचा त्यांचा अनेक दिवसांपासून क्रम सुरू होता. वास्तविक पाहिलें तर ही नवीन असोसिएशन पूर्वींच्या क्याथलिक असोसिएशनचीच सख्खी बहीण होती. गरीब लोकांना दानधर्म करावयाचा, कलाकौशल्याला उत्तेजन द्यावयाचें, हा सर्व व्यूह केवळ कायद्याचा अम्मल चुकविण्याकरितां केला होता हें अगदीं निर्विवाद आहे. क्याथलिक लोकांचे अगदीं हाडवैरी असे जे मुत्सद्दी क्याबिनेटमध्यें होते, त्यांनीं कायद्याचा अम्मल करण्याची आपल्याकडून कसूर केली नसती, पण ते करतात काय? कायद्यांत वापरलेल्या शब्दांच्या बाहेर त्यांना जातां येईना. कायद्यांतील शब्दांकडे नजर देऊन पाहिलें ह्मणजे क्याथलिक लोकांनीं केलेल्या नवीन व्यवस्थेंत बोट घालण्याला काडीचाही वाव नव्हता! यामुळें जागच्याजागीं मूग गिळीत बसण्याशिवाय त्यांना दुसरा मार्गच उरला नव्हता. यदाकदाचित् क्याथलिक लोकांच्या कांहीं पुढाऱ्यांना कोर्टाची पायरी चढण्याचा त्यांनीं प्रसंग आणिला असताच तर, त्यांच्या मनासारखा न्यायाधीश व त्यांच्या मनासारखी जूरी जरी मिळाली असती, तरी त्यांत यशःप्राप्ति झाली असती किंवा नाहीं याविषयीं त्यांची त्यांनाच असावी तितकी खात्री नव्हती, ह्मणून ते या मार्गालाही गेले नाहींत. असो.

क्याथलिक असोसिएशनच्या विरुद्ध कायदा पास झाल्यानें क्याथलिक लोकांना फारसें वाईट वाटलें नाहीं, पण रिलीफ बिल नापास

झालेलें पाहून व त्यावेळेस ड्यूक ऑफ् यार्कनें लॉर्ड्सच्या सभेंत काढिलेले उद्गार ऐकून, त्यांना अतोनात वाईट वाटलें. ड्यूक ऑफ् यॉर्कच्या योग्यतेचा मनुष्य, कीं जो पुढें राज्याचा मालक होणार, व ज्याच्या मताला लोक विशेष मान देणार, त्याच्या तोंडून सदरहू उद्गार निघणें अत्यंत उद्वेगजनक होतें आणि ह्मणून क्याथलिक लोकांना त्याबद्दल वाईट वाटलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु नुसतें वाईट वाटण्यापासून कांहीं फलप्राप्ति व्हावयाची नाहीं हें लक्षांत आणून, व्यवस्थित व कायदेशीर उपाय विशेष जारीनें चालू ठेवण्याचा त्यांनीं निश्चय केला. तो निश्चय तडीस नेण्याला मुख्य गोष्ट साधावयाची ह्मटली ह्मणजे ही कीं, आपलें खरें कल्याण कशांत आहे हें क्याथलिक लोकांना नीट समजून द्यावयाचें, व तें कल्याण साधून घेण्याविषयीं अंगांतील आळस टाकून देऊन एकसारखा उद्योग करण्याची संवय त्यांना लावावयाची. हें काम किती अवघड आहे हें ओकोनेल्ला चांगलें कळत होतें, व यासाठींच आपल्या अनुयायी मंडळींच्या मनांत अशा प्रकारची उत्साहबुद्धि जागृत ठेवण्याकरितां तो आपल्या हातून होईल तितकी खटपट करीत होता. ही खटपट करीत असतां त्याच्या उलट बाजूचे लोक कांहीं प्रसंगीं त्याच्यावर अगदीं तुटून पडत, पण त्यांच्याकडे त्यानें फारसें लक्ष दिलें नाहीं. त्यांच्यासंबंधानें उलट हें तत्व तो प्रतिपादन करीत होता कीं, आपल्या विरुद्ध बाजूचे जे लोक आहेत, त्यांना आपल्याकडे वळवून घेणें फारसें कठीण नाहीं. यामुळें ते कितीही रागावले व त्यांनीं कितीही बडबड केली तरी तिकडे आपण लक्ष देतां उपयोगीं नाहीं. कारण केव्हांना केव्हां तरी ते आपल्या बाजूला येण्याचा संभव आहे. उलट बाजू न घेतां तटस्थवृत्तीनें जर ते राहिले असते, तर मग मात्र त्यांना आपल्या बाजूस वळवून घेणें कठीण गेलें असतें. क्याथलिक असोसिएशनला उलट असणाऱ्या लोकांसंबंधानें आपण असें पाहिलेंच आहे कीं, ओकोनेल्चें हें ह्मणणें हळू हळू खरें होत चाललें होतें. कारण त्या सभेच्या आश्रयाखालीं भरणाऱ्या सभांना फार दिवसांपासूनचे त्याचे प्रतिस्पर्धी जे प्रोटेस्टंट लोक ते एकामागून एक येऊं लागले होते, व

आतांपर्यंत विशेष रीतीनें अंग मोडून काम न करणारी पुरोहित मंडळी असोसिएशनकरतां मेहनत करूं लागली होती, आणि असोसिएशन-करतां वर्गणी गोळा करूं लागली होती. सभा भरावयाच्या झाल्या तर त्यादेखील कधीं कधीं प्रत्यक्ष त्यांच्याच देखरेखीखालीं प्रार्थनामंदिरांत भरूं लागल्या होत्या. देशांतल्या देशांत याप्रमाणें क्याथलिक लोकांनीं कांहीं अंशानें यश संपादन केल्यानंतर परदेशांतील लोकांचें मन आपल्या चळवळीकडे वेधून घेण्याचा त्यांनीं यत्न केला, व त्याप्रमाणें न्यूयॉर्क या शहरांत क्याथलिक असोसिएशनची एक शाखा स्थापन केली. त्या शाखेकरितां अमेरिकन लोकांकडून वर्गणी येऊं लागली. सभेमध्यें चालणाऱ्या कामाचे रिपोर्ट निरनिराळ्या देशांत पाठवून तिकडच्या लोकांचें सभेसंबंधानें काय मत आहे तें मागविण्यांत येऊं लागलें. ही सर्व चळवळ व हा सर्व उद्योग पाहून क्याथलिक लोकांच्या अंगांत इतकें पाणी कोठून आलें, याविषयीं इंग्लिश लोक तोंडांत बोटें घालून आश्चर्यच करीत राहिले; परंतु याहूनही आश्चर्य वाटण्याजोग्या गोष्टी पुढेंच व्हावयाच्या होत्या.

क्याथलिक असोसिएशनचें खरें सामर्थ्य किती आहे हें ब्रिटिश सर-काराला दाखविण्याचा ओकोनेलनें निश्चय केला. आयर्लंडांत कौंटी ( परगणा ) मधील मतदार लोक आतांपर्यंत आपआपल्या जमिनदाराच्या तब्येतीप्रमाणें वागत असत, व ते सांगतील त्या उमेदवारांना मतें देत असत. याचें कारण असें होतें कीं, बहुतेक मतदार लोकांकडे या जमिनदारांच्या जमिनी कूळ या नात्यानें लागणीस होत्या. जमिन-दारांच्या ह्मणण्याप्रमाणें वागलें नाहीं ह्मणजे हातांतील जमीन जाऊन अन्नाकरितां दारोदार भीक मागण्याचाच प्रसंग यावयाचा. तसा प्रसंग न यावा ह्मणून ते जमिनदाराशीं फार नमून वागत असत. जमिनदारांचें हें प्रस्थ नाहींसें करणारा, अर्थात् त्यांना वरचढ असा कोणी तरी मनुष्य उत्पन्न झाला आहे, व जमिनदारांची आज्ञा झुगारून देऊन मतदार लोक यापुढें या नवीन मनुष्याच्या आज्ञेंत वागूं लागले आहेत, असें लोकांच्या निदर्शनाला आणून देण्याचा ओकोनेलचा इरादा होता, व तो साधण्या-करितां ज्या कौंटीमध्यें जमिनदारांचें अतिशयच वजन होतें, त्या

कौंटीवर प्रथमतः हल्ला करण्याचा त्यानें बेत योजिला. वॉटरफर्ड कौंटींत बिअर्सफर्ड घराण्यांतल्या पुरुषांचें फार दिवसांपासून मोठें प्रस्थ माजलें होतें. वॉटरफर्ड शहरातर्फे आज सरासरी ७०० वर्षांत त्यांच्याच घराण्यापैकीं कोणाना कोणाची तरी निवडणूक होत असे. लॉर्ड जॉर्ज बिअर्सफर्ड या नांवाचा गृहस्थ अलीकडे कांहीं वर्षें वॉटरफर्ड शहराच्यातर्फे पार्लमेंटांत सभासद निवडून येत होता. पूर्वीचें पार्लमेंट बरखास्त होऊन नव्या पार्लमेंटाची निवडणूक होण्याचे दिवस आतां अगदीं जवळ आले होते. त्या निवडणुकीच्या वेळेस लॉर्ड जॉर्जला टक्कर देण्याचा व त्याच्यातर्फेचीं सर्व मतें हिसकावून घेण्याचा ओकोनेलचा निश्चय झाला व त्याप्रमाणें व्हिलिअर्स स्टुअर्ट या नांवाचा एक त्याला प्रतिस्पर्धी ह्मणून त्यानें उभा केला. व्हिलियर्सनें मतदार लोकांपाशीं आपल्याला मतें द्या असें ह्मटल्याबरोबर, ओकोनेलच्या बाजूचा हा आहे असें जाणून, सर्व लोक आपल्या नेहमींच्या जमिनदाराची बाजू सोडून त्याच्याकडे धांवले व मतें गोळा करणाऱ्या अधिकाऱ्याकडे जाऊन आपलीं मतें स्टुअर्टला देऊं लागले. स्टुअर्टला याप्रमाणें यशःप्राप्ति होण्याला ओकोनेलचेच श्रम सर्वस्वी कारण होते. त्यानें पुरोहितांची मदत घेऊन बिअर्सफर्डला एकही मत न मिळूं देण्याबद्दल अतोनात खटपट केली. आपल्या जमिनदारांना खूष करण्याकरतां आपल्या इच्छेविरुद्ध जो मत देईल, तो ईश्वरापुढें फार मोठा दोषी ठरेल अशी दहशत पुरोहितांनीं घातली, व त्यामुळें धमभोळ्या लोकांच्या मनावर बराच परिणाम झाला. निवडणुकीच्यापूर्वी किती तरी दिवस प्रत्येक देवालयां-( chapel )मधून याच विषयाची चर्चा एकसारखी चालू होती. हीं सर्व चळवळ पाहून साऱ्या कौंटीभर दंगा होतो कीं काय या भीतीनें सरकारी अधिकाऱ्यानीं चार हजार घोडेस्वार आणविले. पण दंगाधोपा जर होईल, तर घोडेस्वारांचा उपयोग लागणार, नाहीं तर कशाला लागतो आहे? स्टुअर्ट तर्फेनें मत देणारे लोक कोणच्याही प्रकारचा दंगा न कारितां व कोणच्याही प्रकारचें गैरकायदेशीर वर्तन न करतां इकडून तिकडे स्वस्थ हिंडत होते, व स्टुअर्टनें भरविलेल्या सभांना जात होते. हा सर्व प्रकार पाहून बिअर्सफर्डची अशी जेव्हां खात्री होऊन चुकली

कीं, आपल्या प्रतिस्पर्ध्यापुढें या निवडणुकीला आपला टिकाव लागत नाहीं, तेव्हां त्याणें आपण होऊनच माघार घेतली. अर्थात् स्टुअर्टलाच सर्व मतें मिळून तो यशस्वी झाला. पार्लमेंट सभेंत क्याथलिक धर्माच्या मनुष्याची निवडणूक झाल्याचा हा पहिलाच प्रसंग होय! वॉटरफर्ड-कौंटींत जसा क्याथलिक उमेदवाराला जय मिळाला, तसा आणखी तीन चार कौंटींमध्येंही मिळाला. याप्रमाणें जमिनदार लोकांना आतांपर्यंत जो भ्रम होता कीं; आपलीं कुळें अगदीं आपल्या ताब्यांत आहेत, आपल्या विरुद्ध जाण्याची त्यांची छाती नाहीं तो सर्व नाहींसा झाला, व 'भ्रमाचा भोंपळा' फुटून नुस्ता त्याचा डेंखमात्र त्याच्या हातांत राहिला.

जमिनदार लोकांचा याप्रमाणें पराभव झाल्यावर, आपल्या कुळांनीं आपल्या ह्मणण्याप्रमाणें मतें दिलीं नाहींत ह्मणून त्यांचा सूड घेण्याचा त्यांनीं आरंभ केला. साऱ्याची बाकी ज्या कुळांकडे थकली होती, त्या कुळांककडून जमिनी काढून घेतल्या, व पैसा वसूल करण्याकरितां कोर्टांत त्यांच्यावर दावे लाविले. ज्या कुळांवर अशा प्रकारचे दावे झाले, त्यांना आपल्या खर्चानें वकील देण्याची असोसिएशननें व्यवस्था केली. ज्या कौंटीमधल्या लोकांनीं जमिनदाराविरुद्ध आपलीं मतें दिलीं होतीं त्या कौंटीमधून त्यांच्या संरक्षणाकरितां 'प्रोटेक्टिंग कमेटीज' Protecting committees) ह्मणजे संरक्षण करणाऱ्या कमेट्या नेमिल्या. जमिनींतून काढलेल्या कुळांना मदत करण्याकरितां ह्मणून निराळी वर्गणी गोळा होऊं लागली. मागें सांगितलेल्या क्याथलिक--रेन्ट नांवाच्या पट्टी पासून १८२६ ते १८२९ या सालांत फारच मोठी रक्कम वसूल झाली. परंतु दरसाल ५०,००० पौंड रकम जमा झालीच पाहिजे, असा जो सभेच्या चालकाचा हेतु होता तो सिद्धीस जाण्यास अजून बराच अवकाश होता. त्याचें कारण असें होतें कीं, पट्टी गोळा करण्याच्या कामांत जितकी व्यवस्था असावयाला पाहिजे होती तितकी अजूनपर्यंत नव्हती. ही गोष्ट लक्षांत आणून दर 'प्यारिश' (एक किंवा अनेक पुरोहितांच्या अधिकाराखालीं असणारी पेठ) पुरती पट्टी वसूल करण्याकरितां स्वतंत्र व्यवस्था करावी, असें ओकोनेल्नें सुचविलें. त्याप्रमाणें प्रत्येक पॅरिशमध्यें वर्गणी गोळा करण्याकरितां पुरोहितांच्या तर्फेचा एक, व

लोकांच्या तर्फेचा एक, असे दोन अधिकारी नेमावयाचे असें ठरलें. त्या अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवण्याकरितां स्थानिक असोसिएशनची योजना केली, व डब्लीन येथें असणाऱ्या मुख्य असोसिएशनची या सर्वांवर देखरेख ठेविली. या सर्व सभांमधून चालणाऱ्या कामाची कच्ची हकीगत सर्व लोकांना कळावी या हेतूनें 'वीक्ली रजिस्टर' (Weekly Register) नांवाचें एक वर्तमानपत्र मुख्य असोसिएशनच्या आश्रयाखालीं निघूं लागलें. प्रत्येक देवालयांत उपासना झाल्यानंतर वर्गणी गोळा करण्याकरितां नेमिलेल्या अधिकाऱ्यांनीं तें वर्तमानपत्र तेथें जमलेल्या सर्व लोकांना वाचून दाखवावें अशी योजना केली. थोडक्या अवकाशांत हें पत्र इतकें लोकप्रिय झालें कीं, तें काढूं लागल्यापासून सरासरी एक महिन्याच्या आंतच त्याच्या ६००० प्रति खपूं लागल्या. असोसिएशनपुढें निघणाऱ्या विषयांची सर्व चर्चा व्हावी या इराद्यानें जागोजाग क्लब स्थापन करण्यांत आले. कोणच्याही क्लबांतील सभासदांनीं कायद्याच्या विरुद्ध वर्तन करूं नये, किंवा सार्वजनिक स्वस्थतेचा भंग करूं नये, असा सर्व बंदोबस्त केला. निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन झालेल्या सभा व क्लब अगदीं एकदिलानें वागत होते. एकदां अशी गंमत झाली कीं, एकाच दिवशीं त्याच वेळेला निरानिराळ्या ठिकाणीं एकंदर पंधराशें सभा भरल्या. त्यांत विशेष आनंद वाटण्याजोगी ही गोष्ट होती कीं, इतक्या ठिकाणीं जरी सभा भरल्या, तरी त्यांपैकीं एकाही सभेंत सभासदांच्या हातून गैरशिस्त किंवा बेकायदेशीर वर्तन झालें नाहीं.

सन १८२७ सालीं प्रसिद्ध मुत्सदी क्यानिंग हा मुख्य प्रधानाच्या जागेवर आला. क्याथलिक असोसिएशनमधल्या लोकांनीं, फार कडक भाषा न वापरतां, सौम्य शब्दांनीं आपल्याला काय मागावयाचें असेल तें मागावें, असा खासगी रीतीनें त्यानें असोसिएशनला एक निरोप पाठविला; व आणखी असेंही आश्वासन दिलें कीं, आपल्या या ह्मणण्याचा असोसिएशननें जर अंगिकार केला, तर क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याविषयीं आपल्या हातून होईल तितकी खटपट करूं. असोसिएशनमधल्या मंडळींनीं क्यानिंगचें हें ह्मणणें मान्य केलें नाहीं. पुढें तो त्याच वर्षाच्या ऑगस्ट महिन्यांत मरण पावला व गॉडरिच नांवाचा

एक मुत्सद्दी त्याच्या जागीं मुख्य प्रधान झाला, परंतु त्यानें थोड्याच दिवसांत आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्याच्या पश्चात् ड्यूक ऑफ् वेलिंगटन हा अधिकारारूढ झाला. तो क्याथलिक लोकांचा अगदीं कट्टा शत्रू होता. यामुळें क्याथलिक असोसिएशननें असा ठराव पास केला कीं, जो आयरिश सभासद वेलिंगटनच्या हाताखालीं एखादी अधिकाराची जागा पतकरील तो सभेचा शत्रु असा समजला जाईल. असा ठराव पास करण्यानें उभय पक्षांमधील वितुष्ट जास्तच वाढण्याचा संभव होता. आणि ह्मणून असा ठराव पास करूं नये अशी स्वत: ओकोनेल्‌ची इच्छा होती, पण बाकीच्या सर्व सभासदांपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं.

आतां सांगितलेला हा ठराव अमलांत आणण्याचा प्रसंगही सुदैवानें ह्मणा अथवा दुर्दैवानें ह्मणा लवकरच आला. ड्यूक ऑफ् वेलिंगटन व हसकिसन् या नांवाचा क्याबिनेटमधील एक मुत्सद्दी, या उभयतांचा कांहीं कारणावरून बेबनाव झाल्यामुळें हसकिसन्‌नें आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्याच्यामागून त्याच्या बोर्ड ऑफ् ट्रेड ( व्यापाराची सभा ) च्या प्रेसिडेंटाच्या जागेवर आयर्लंडांतील क्लेअर कौंटीच्या तर्फेचा सभासद फिट्झ्‌झराल्ड याची नेमणूक झाली. कॉमन्स सभेंतील कोणच्याही सभासदानें, सरकारी नोकरी पतकरली ह्मणजे, आपल्या सभासदाच्या जागेचा राजीनामा द्यावा, व पुन: निवडणुकीकरतां उभें रहावें, असा एक इंग्रजी राज्यव्यवस्थेचा नियम आहे. त्या नियमाला अनुसरून फिट्झ्‌झराल्डला पुन: निवडणूक करून घेण्याकरितां उभें राहणें भाग पडलें. क्लेअर परगण्यांतील सर्व मतदार आज कित्येक वर्षें फिट्झ्‌झराल्डच्या अगदीं मुठींत होते. यामुळें आपण पुन: खात्रीनें निवडले जाऊं असा त्याला पूर्ण भरंवसा होता. सरकारी अधिकाराची जागा पतकरल्यामुळें पुन: निवडणूक होईपर्यंत कांहीं आठवडे लंडन शहर सोडावें लागेल व पुन: थोडासा खर्च करावा लागेल, याच्यापलीकडे निवडणुकीसंबंधानें त्यांच्या मनांत दुसरी कसलीही भीति नव्हती. क्लेअर तर्फे पुन: फिट्झ्‌झराल्ड निवडणुकीकरतां उभा राहणार, अशी बातमी आयर्लंडांत आल्याबरोबर त्याची निवडणूक होऊं न देण्याविषयीं असोसिएशनमधल्या लोकांनीं आपल्या ठरावाप्रमाणें कंबरा बांधल्या. फिट्-

झराल्डला निवडणुकीच्या कामांत कोण प्रतिस्पर्धी उत्पन्न करावा, याचा सर्व मंडळीला मोठा विचार पडला. या कामाला खुद्द ओकोनेल्शिवाय दुसरा कोणीही माणूस लायक नव्हता. सबब फिट्झराल्डशीं सामना देण्याला त्यानें उभें रहावें, असें ओमॉरमन, शीलप्रभृति मंडळींनीं ठरविलें. या सामन्यांत आपल्याला यश येईल अशी ओकोनेलची खात्री नव्हती, व त्याचें कारण असें होतें कीं, क्लेअरमध्यें त्याची कोणाशीं फारशी ओळख नव्हती. फिट्झराल्ड हा तेथें फार लोकप्रिय होता, पैशाचें साधन त्याच्यापाशीं विपुल होतें, शिवाय क्याथलिक पक्षाला अनुकूल असेंच त्याचें मत होतें. ड्यूक ऑफ् वेलिंगटनच्या हाताखालीं क्याबिनेटमधील जागा त्यानें पतकरली हाच काय तो त्याचा दोष होता, व तोही असोसिएशनमधल्या लोकांच्या दृष्टीनें. या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे विजयश्री हाटकून त्यालाच माळ घालणार, मग आपण तरी हात दाखवून अवलक्षण कां करून घ्यावें? असें ओकोनेल्चें ह्मणणें होतें; पण तें त्याचें ह्मणणें कोणी ऐकेना. शेवटीं आपल्या मित्रमंडळीच्या आग्रहावरून क्लेअर तर्फेनें निवडणूक करून घेण्याकरितां तो उभा राहिला. तो उभा राहिल्याची बातमी लोकांना कळल्याबरोबर ते हर्षातिशयानें अगदीं उड्या मारूं लागले. पुरोहित मंडळी ओकोनेल्ला मदत करण्याकरितां धांवली. त्यांच्यातील एक जण काय तो फिझट्राल्डच्यावतीनें खटपट करीत होता, तें लोकांना कळल्याबरोबर त्यांनीं त्याचा मुषाहिरा बंद केला. एकदां अशी मौज झाली कीं, सर ओब्रायन् नांवाचा फिट्झराल्डच्या बाजूचा एक बडा गृहस्थ आपल्या पक्षाची बरीच मंडळी बरोबर घेऊन चालला होता. वाटेंत ओकोनेल्च्या पक्षांतील एका पुरोहिताची व त्याची गांठ पडली. नंतर त्यांचें व सर ओब्रायन् बरोबर असणाऱ्या लोकांचें थोडेसें भाषण झालें. त्यासरसें ते सर्व लोक ओब्रायनूला सोडून देऊन ओकोनेल्च्या पक्षाला येऊन मिळाले. या लोकांशीं भाषण तरी करावें लागलें. परंतु अगस्थइन बटलर नांवाच्या एका जमिनदाराचीं सर्व कुळें, नुसतीं डोळ्यानें खुण केल्याबरोबर ओकोनेल्कडे आलीं. मतें घेण्याचें काम सुरू

असतां एके दिवशीं कोणाला किती मतें मिळालीं आहेत हें पहाण्याकरतां पुष्कळ लोकांची गर्दी पोलिंग ऑफिस ( मतांची नोंद करण्याची कचेरी ) पुढें जमली होती. त्या गर्दीतून अंगानें अगदीं किरकोळ असा एक पुरोहित उठून उभा राहिला, व मोठ्यानें ओरडून ह्मणाला कीं, एका क्याथलिक मनुष्यानें फिझराल्डला मत दिलें आहे. त्यासरशी जमलेल्या गर्दीतून तिरस्कारयुक्त असा ध्वनि निघाला. तो ध्वनि ऐकून तो पुरोहित ह्मणाला "ह्रां-शांत व्हा, गडबड करूं नका. देवाच्या हातचा तडाका त्याला आंताच बसला आहे. तो अजीर्णाच्या विकारानें नुक्ताच मरण पावला! त्याच्या आत्म्याकरतां तुह्मीं सर्वजण प्रार्थना करा!" पुरोहितांच्या सांगण्याप्रमाणें सर्व लोकांनीं त्या मेलेल्या मनुष्याच्या आत्म्याकरतां एकाग्र चित्तानें प्रार्थना केली. अशा प्रकारची निवडणुकीची धांदल सुरू असतां कोणीही दंगा केला नाहीं. प्रसंगविशेषीं तीस तीस चाळीस चाळीस हजार माणूस एके ठिकाणीं जमत असे. पण त्यांत एकही माणूस दारू प्यालेला आढळण्यांत येत नव्हता. फक्त एक माणूस कायतो इतक्या गडबडींत दारू प्यालेला आढळला. तो ओकोनेल्चाच कोचमन होता. पण धर्मानें तो प्रॉटेस्टंट होता. यावेळेस क्लेअरमधले लोक कदाचित् दंगा करतील या भीतीनें सरकारानें कडेकोट बंदोबस्त ठेविला होता. परंतु खरें ह्मटलें तर एका देखील शिपायाची तेथें जरूर नव्हती. आपल्या निवडणुकीसंबंधानें पहिल्यापासूनच फिटझराल्डची आशा सुटत चालली होती. पहिल्या दिवशीं ओकोनेल् आपल्या सामनेवाल्यापेक्षां सहा मतांनीं पुढें होता; तिसऱ्या दिवशीं हजार मतांनीं पुढें गेला. पांचव्या दिवशीं फिटझराल्डनें माघार घेतली व ओकोनेल् क्लेअरच्यातर्फे पार्लमेंटाचा सभासद झाला!

याप्रमाणें ओकोनेल्ला यश मिळालेलें पाहून इंग्लंडांतील सर्व लोकांना आश्चर्य वाटलें. ओकोनेल्नें मिळविलेला जय आश्चर्यकारक तर होताच, पण त्यानें आपल्या हजारों अनुयायांना आपल्या अगदीं हुकमांत ठेवून कोणच्याही प्रकारचा तंटाबखेडा होऊं दिला नाहीं, सर्व व्यवस्था अगदीं कित्ता घेण्यासारखी ठेविली, हें त्याहूनही अधिक आश्चर्यकारक होतें.

यासंबंधानें लॉर्ड पालमरस्टन नांवांच्या मुत्सद्यानें काढलेले उद्गार[१२] लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. तो ह्मणतो, क्लेअर येथें झालेला प्रकार मोठा मनोरंजक आणि आल्हादजनक आहे. इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉर्ड्सच्या सभेंत भाषण करतांना असा उपदेश करितो कीं, जर तुह्मीं कांहीं वर्षें आपल्या हक्का करतां न भांडतां स्वस्थ बसाल, व त्या विषयाचा विचार देखील करण्याचें तुह्मीं सोडून दिलें आहे असें आपल्या वर्तनानें दाखवाल तर पुढें कांहीं वर्षांनीं तुमच्या हक्कांचा आह्मीं विचार केल्यास तर करूं. हा उपदेश केल्या नंतर दोन तीन आठवड्याच्या आंतच तो त्यांना कितपत रुचला याची उत्तम साक्ष ते देतात, व कांहीं एक चळवळ न करतां स्वस्थ बसण्याविषयीं मुख्य प्रधानानें सांगितलें होतें त्याच्या अगदीं उलट असें वर्तन करतात. तें असें कीं, एका प्रांतांतील हजारों लोक एके ठिकाणीं जमून, कोणच्याही प्रकारचें बेकायदेशीर वर्तन न करतां अगदीं व्यवस्थित व कायदेशीर उपायांनीं क्याबिनेट. मधल्या एका मंत्र्याला पार्लमेंटामधून हांकून देतात. क्लेअर कौंटींतील मुक्य गांवांत सरासरी २० हजार लोक या प्रसंगाला एकेठिकाणीं जमले होते. पण त्यांत एकही मनुष्य दारू प्यालेला आढळला नाहीं. घराच्या बाहेर एवढेसे चरी जावयाचें झालें तरी हातांत काठी घेतल्याशिवाय एकही आयरिशमन् बाहेर पडावचा नाहीं, असा नेहमींचा संप्रदाय आहे; पण निवडणुकीच्या धांदलींत एकाही मनुष्याच्या हातांत काठी दृष्टीस पडली नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्याख्यानें देण्याकरतां बाहेर गांवचे १५० पुरोहित आणले होते. निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन तेथें व्याख्यानें द्यावयाची, मतदार लोकांना मतें देण्याकरतां आपल्या बरोबर घेऊन जावयाचें, हें सर्व काम त्यांच्यावरच सोंपविलें होतें. सर्व गोष्टी कशा अगदीं व्यवस्थित चालल्या होत्या." हें वर्णन वाचून आमच्या चरित्र नायकाच्या अचाट कर्तृत्वशक्तीचा वाचकांना चांगला अजमास करता येईल अशी आह्माला आशा आहे.

---

१२—See Bright's History of England Vol. III p. 1404.

# ड्यानियल ओकोनेलचें

## चरित्र.

## भाग ५ वा.

### क्याथलिक लोकांची मुक्तता[1].

१८२८ ते १८३२.

इ. स. १८२८ सालीं ड्यूक ऑफ् वेलिंगटनप्रभृति प्रधान मंडळीला हा प्रश्न उत्पन्न झाला कीं, सन १८२५ सालीं आयर्लंडांतील गुप्त सभा व मंडळ्या नाहींशा करण्याकरतां जो कायदा पास केला होता व ज्याचें वर्णन आह्मीं मागील भागांत केलें आहे तो पुनः चालू करावा किंवा नाहीं. अठ्ठावीस सालांतील जुलै महिन्यापर्यंतच त्या कायद्याचा अम्मल होता, यामुळें जुलै महिनाअखेर त्या कायद्याचा अम्मल पुनः सुरू करावा हा एक मार्ग, किंवा त्याचें मुळींच नांव काढूं नये हा दुसरा, असे एकंदर दोन मार्ग कायते खुले होते. त्यांपैकीं दुसऱ्या मार्गाचेंच अवलंबन करणें शहाणपणाचें व मुत्सद्दीपणास शोभण्यासारखें होतें. कारण

---

१. 'Catholic emancipation' या शब्दाच्या ऐवजीं आह्मीं वरील शद्व वापरले आहेत. हरएक प्रकारच्या बंधनापासून मुक्त करणें असा 'emancipation' या शब्दाचा इंग्रजींत अर्थ आहे. आणि त्यालाच अनुलक्षून 'emancipation' या शद्वाऐवजीं 'मुक्तता' हा शद्व आह्मीं योजिला आहे. क्याथलिक लोकांविरुद्ध जीं निरनिराळीं राजकीय बंधनें होतीं तीं दूर करून त्यांना नागरिक हक देणें असा 'मुक्तता' या शब्दाचा येथें व्यापक अर्थ आहे. निव्वळ मराठी जाणणाऱ्यांच्या मनांत 'मुक्तता, मुक्ति' या शब्दामुळें क्याथलिक लोकांची संसारबंधनापासून सुटका व्हावयाची होती कीं काय, असा संशय येणें साहजिक आहे. ह्मणून आह्मीं वर दिलेला विशेष प्रकारचा अर्थ त्यांनीं लक्षांत ठेवणें जास्त जरूर आहे.

क्याथलिक लोकांच्या व निःपक्षपातीपणाचा आव घालण्याकरतां त्यांच्याचबरोबर प्रॉटेस्टंट लोकांच्या सभा मोडून टाकण्याचा या कायद्याचा जो मुख्य हेतु तो, त्याची नीट अम्मलबजावणी न झाल्यामुळें, कोणच्याही प्रकारानें सिद्धीस गेला नाहीं. दोन्हीं वर्गांतील लोकांच्या सभा, हा कायदा अमलांत होता तरी, अगदीं पूर्वीप्रमाणें भरत होत्या. लार्ड अँगलसी हा या वेळेस लॉर्ड लेफ्टेनंट (हें आयर्लंडांतील मुख्य अधिकाऱ्याचें नांव होय) च्या जागेवर होता. त्यानें आयर्लंडाच्या राजकीय स्थितीचें फार सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें होतें व त्यावरून त्याचें असें मत झालें होतें कीं, क्याथलिक लोकांत आपआपसांत बरीच फाटाफूट आहे व त्यामुळें क्याथलिक असोसिएशनविषयीं सर्व लोक सारखी आस्था बाळगित नाहींत. या मताच्या जोरावर त्यानें इंग्लंडांतील प्रधान मंडळीला असा सल्ला दिला कीं, क्याथलिक लोकांचा, त्यांच्या गृहकलहानेंच, मोड होण्याचा बराच संभव आहे, करितां १८२५ सालांतील कायदा पुनः सुरू करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. प्रधान मंडळी तरी हें जाणूनच होती कीं, तो कायदा पुनः सुरू करावयाचा ह्मणजे कांहीं सोपें काम नव्हतें. त्यांतून आयर्लंडांतील मुख्य अधिकाऱ्याचा अभिप्रायही आतां सांगितल्याप्रमाणें त्यांना अनुकूल असाच पडला. मग तर त्यानीं एकदम असें ठरवून टाकिलें कीं, तूर्त कोणच्याही प्रकारचा कायदा पास न करतां स्वस्थ बसूनच काय प्रकार होतो तो पहावा.

वर सांगितलेलें लॉर्ड अँगलसीचें मत अगदीं चुकीचें होतें असें नाहीं. त्याणें वर्णन केल्याप्रमाणें कांहीं अंशीं क्याथलिक लोकांची स्थिति होती खरी. परंतु मागच्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें, क्लेअर येथें क्याबिनेटमधल्या मुत्सद्यांचा जेव्हां पराभव झाला, तेव्हां पूर्वीचें सर्वच स्वरूप एकदम पालटलें; व त्यांच्यांत एकोपा झाल्याचीं चिन्हें स्पष्टपणें दिसूं लागलीं. ओकोनेल् जेव्हां परत डब्लिन येथें गेला, तेव्हां वाटेवरील सर्व लोकांनीं त्याचा मोठा जयजयकार केला. यावरून वरील विधानाची सत्यता दिसून येण्याजोगी आहे. सन १८२९ तील सभा भरविण्याच्या

उलट पास केलेल्या कायद्याचा अम्मल नाहींसा झाल्याबरोबर जुनी क्याथलिक असोसिएशन पुनः अस्तित्वांत आली; प्रॉटेस्टंट लोकही " ऑरेंज लॉजीस " Orange Lodges नांवाच्या आपल्या सभा भरवूं लागले. शिवाय त्यांनीं जागोजाग ' ब्रन्स विक् क्लब्स ' Brunswick clubs नांवाचे नवीन क्लब स्थापन केले. या सर्वांत उत्तरेकडे अल्सटर परगण्यांत स्थापन झालेला क्लब मुख्य होता. तेथील प्रॉटेस्टंट लोकांना अशी भीति होती कीं, क्याथलिक लोकांचा हल्ला केव्हांना केव्हांतरी आपणावर येणार. यामुळें आपल्या बाजूची अगदीं जय्यत तयारी ठेवून ते शत्रूची वाट पहात बसले. याप्रमाणें आयर्लंडांत उभयपक्षांचीं सैन्यें एकमेकांवर तुटून पडण्याच्या तयारीनें समोरासमोर उभीं होतीं. दक्षिणेकडील प्रांतांत देखील उभयपक्षाकडील लोकांत या नमुन्याची चळवळ सुरू झाली होती. टिपेरेरी येथें क्याथलिक लोकांच्या भल्या मोठ्या सभा भरूं लागल्या व त्या सभांना जाणाऱ्या मंडळींचा थाटही अगदीं लष्करी नमुन्याचा होता. प्रत्यक्ष सरकाराला देखील डोईजड झालेल्या असोसिएशनचें सामर्थ्य पाहून कोणाला कसलाही उपद्रव न देणारी व अगदीं त्रयस्थ या नात्यानें वागणारी जी मंडळी होती, त्यांच्या मनांत देखील असोसिएशनमधले लोक कोणच्या वेळेस काय करतील यासंबंधानें बरीच भीति उत्पन्न झाली; परंतु खरें ह्मटलें तर दक्षिणेकडील भागापेक्षां उत्तरेकडील भागांतच उभयपक्षांत तंटेबखेडे होण्याची विशेष—भीति होती. दक्षिणेकडे सर्व गोष्टी क्याथलिक— लोकांच्या मनाप्रमाणें होत असत. कारण उलटपक्षाचे लोक तिकडे अगदीं थोडे होते, यामुळें त्यांना कोणच्याही प्रकारची आडकाठी येण्याचा मुळींच संभव नव्हता. उत्तरेकडे मात्र दोन्ही पक्षाचे लोक सारख्यास सारखे होते. ब्रन्सविक् क्लबवाले व क्याथलिक लोक अगदीं एका शेजारीं एक रहात आहेत, अशीं खेडीं पुष्कळ होतीं व त्यामुळें भांडण होण्याचे प्रसंगही वरचेवर येत. लहानशी ठिणगी पडण्याचाच अवकाश कीं, झालाच तेथें मोठा थोरला जाळ! एकदा तंटा सुरू झाला ह्मणजे त्यांत माघार

घेणें, हें आयरिश लोकांना स्वप्नांत देखील ठाऊक नव्हतें. तेव्हां अर्थातच ठिणग्या पडून कलहाग्नि पेटण्यास केव्हांही फारसा वेळ लागत नसे. असो.

डब्लीन येथील क्याथलिक असोसिएशनमध्यें शील आणि लॉलेस् हे दोन ओकोनेल्चे मुख्य साहाय्यकारी होते. त्यापैकीं शील हा मोठा बुद्धिमान होता व लॉलेस् मोठा शूर आणि धाडसी होता. यामुळें असोसिएशनतर्फें मोठीं धाडसाचीं कामें करण्याला तो नेहमीं तयार होता. अलस्टर परगण्यांत प्रॉटेस्टंट लोकांचा विशेष भरणा होता आणि ह्मणून त्या प्रांतावर स्वारी करून, क्याथलिक लोकांच्या तर्फेनें चळवळ सुरू करावयाची ह्मणजे इतर ठिकाणापेक्षां तेथें तें काम जरा जास्त धोक्याचें होतें. परंतु लॉलेस्नें तेथेंही जाऊन खटपट करण्याचा बोजा आपल्या शिरावर घेतला. निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन प्रॉटेस्टंट धर्मामधील लोकांच्यांविरुद्ध लोकांची मनें क्षुब्ध होतील अशीं भाषणें करण्याचा त्यानें एकसारखा क्रम सुरू केला. त्याचप्रमाणें पुष्कळसे क्याथलिक लोक बरोबर घेऊन तो प्रॉटेस्टंट लोकांच्या मोठमोठ्या शहरांतूनही जाऊं लागला. एके प्रसंगीं प्रॉटेस्टंट लोकांच्या आरमाघ नांवाच्या मोठ्या शहराजवळ गेल्या नंतर " मी माझ्या बरोबरच्या लोकांच्या साहाय्यानें शहर तेव्हांच सर करून घेईन, 'आहे मशीं कवण तो झगडा कराया' " असें मोठ्या गर्वानें प्रसिद्धपणें ह्मणूं लागला. या गर्वोक्तीच्या उत्तरादाखल प्रॉटेस्टंट लोक शस्त्रास्त्रानिशीं आपल्या शहरांचें रक्षण करण्यासाठीं तयार होऊन बसले. यामुळें लॉलेस्नें आपला मोर्चा फिरवून प्यालीबेचा रस्ता सुधारला. तेथल्याही लष्करी अधिकाऱ्यांनीं, उभयपक्षांची कदाचित् चकमक उडेल या भीतीनें, त्याला दुसऱ्या गांवांकडे जाण्यास सांगितलें. लॉलेस्चें हें वर्तन पाहून, प्रॉटेस्टंट धर्मामधील लोकांशीं लढाई करण्याचा क्याथलिक असोसिएशनचा उद्देश होता अशी वाचकांची समजूत होण्याचा बराच संभव आहे. परंतु आह्मीं हें खात्रीनें सांगतों कीं, त्या असोसिएशनच्या मनांत असा विचार केव्हांही आला नव्हता. अर्थात् लॉलेस्चें हें दांडगेपणाचें वर्तन कोणालाही

पसंत नव्हतें, व त्यामुळें त्याला परत बोलावणें ओकोनेल्‌ला भाग पडलें. क्याथलिक असोसिएशनसारख्या लोकांच्या वतीनें काम करणाऱ्या सभांनीं बाहेर गांवाला आपल्यातर्फे उमेदवार पाठविण्याच्या कामांत फार खबरदारी घेतली पाहिजे, तशी खबरदारी घेतली नाहीं; ह्मणजे त्याचा परिणाम कसा होतो, याबद्दल पुणें येथील सार्वजनिक सभेचें ढळढळींत उदाहरण आमच्या वाचकांच्या नजरे समोर आहेच; असो.

परपक्षाबरोबर सामना करण्याकरितां दंड थोपटून उभे राहिलेले क्याथलिक लोक लढण्याची वेळ केव्हां येईल याची मोठ्या उत्कंठेनें वाट पहात होते. दक्षिणेकडे जमा झालेले लोक अगदीं लष्करी बाण्यानें वागत होते. लॉलेस्‌ला परत बोलाविल्याची बातमी जेव्हां त्यांच्या कानावर गेली तेव्हां ते बरेच संतापले. अशाप्रकारचा नामर्दपणा आपल्या पुढाऱ्यांनीं दाखवावा, हें त्यांना मुळींच पसंत पडलें नाहीं. शेवटीं ते इतके उत्सुक झालें कीं, यापुढें लढाईला आरंभ तरी केव्हां करावयाचा? आह्मीं पेटविलेली काडी बहुतेक विझतच चालली, आतां आग लावावी तरी कशी? असे प्रश्न ते ओकोनेल् व शील यांस वारंवार विचारूं लागले. एका महत्कार्याला आपल्या हातून होईल तितकी मदत करावयाची या हेतूनें आह्मी एकमेकांमधील तंटे नाहींसे केले, व सर्वजण एक दिलानें वागूं लागलों. इतकें असून शत्रूंची डोकीं फोडण्याचा आनंदाचा प्रसंग अजून जर येत नाहीं तर या थंडपणाला ह्मणावें तरी काय? दुसऱ्याबरोबर लढाई करावयाची संधि जर आह्माला येत नाहीं तर आह्मी परस्परांमधील भांडणें नाहींशीं केलीं याचा काय उपयोग? सरकार आणि ऑरेंजमेन् (Orange men) ह्मणजे प्रॉटेस्टंट लोक, यांच्यासारखे योग्य दुसरे कोणचे लोक आह्मांला लढाईला मिळणार. आणि ही लढाई सुरू तरी केव्हां—केव्हां होणार अशी ओरड सर्वत्र सुरू झाली. ही ओरड ऐकून लॉर्ड ॲंगलसी जरी बराच धैर्याचा माणूस होता, तरी तो देखील घाबरला, व आतां बंड झाल्याशिवाय खचित रहात नाहीं असें त्याला वाटूं लागलें. कदाचित् तसा प्रसंग आलाच तर, देशांत बंदोबस्त कसा ठेवावा, याची त्याला

मोठी काळजी उत्पन्न झाली. लोकांत उत्पन्न झालेल्या उन्मादाची बरीचशी छाया सोलजर लोकांवर पडली होती. यामुळें प्रसंग पडल्यास सरकारावर देखील उलटून पडण्यास ते कमी करणार नाहींत अशी त्याला मोठी भीति होती. परंतु वस्तुतः ही भीति बाळगण्याचें मुळींच कारण नव्हतें. सरकारच्या सुदैवानें आयर्लंडांतील क्याथलिक लोकांचा मुख्य पुढारी जो ओकोनेल् तो जितका साहसी होता तितकाच शहाणाही पण होता. ही गोष्ट तो पूर्णपणें जाणून होता कीं, दक्षिणेकडील क्याथलिक लोकांनीं वैरभाव मनांत ठेवून एवढीशी जरी हालचाल केली, तरी त्यांचा प्रतिकार करण्याकरितां उत्तरेकडील ब्रन्सवीकक्लबवाल्या लोकांपेक्षां फार बलाढ्य असा शत्रू समरंगणांत येऊन उभा राहील. अल्सटर येथील प्रॉटेस्टंट लोकांबरोबर टक्कर देणें वेगळें व ग्रेटब्रिटनमधील प्रॉटेस्टंट लोकांबरोबर टक्कर देणें वेगळें. याप्रमाणें ओकोनेल् हा जरी इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट लोकांचें सामर्थ्य पूर्णपणें ओळखून होता, तरी आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, कांहींअंशीं त्यानें उत्तेजन दिल्यामुळेंच लोकांनीं हातांत शस्त्रें धारण केलीं होतीं, व आयर्लंड देश प्रतिरण बनण्याला त्याचीच कृति कारण होती. त्या रणांत दोन सैन्यें समोरसमोर उभीं होतीं व तीं एकमेकांवर तुटून पडण्याच्या अगदीं घाईला आलीं होतीं. त्या उभतांमध्यें प्रत्यक्ष सामना होऊं द्यावयाचा नाहीं असा त्याचा अंतस्थ बेत असेल; परंतु हा सामना आतां झाल्याशिवाय खचित रहात नाहीं असें निदान दुरून पहाणारांस तरी दिसत होतें. तरी पण ही गोष्ट ते जाणून होते कीं हें रण न माजूं देण्याची जर कोणाच्या अंगांत धमक असेल तर ती एकट्या ओकोनेलच्याच अंगांत आहे. कारण आपल्या हाताखालच्या लोकांवर त्याचें चांगलें वजन आहे व त्याच्या वचनाबाहेर वागण्याची एकाचीही छाती नाहीं. याकरतां वेळेवरच आपल्या लोकांना इशारा देऊन त्यानें हल्लींची स्थिति सुधारावी हें बरें असे त्यांच्या तोंडून उद्गार निघूं लागले. असे उद्गार कानावर आल्यानंतर ओकोनेल्नें फार वेळ वाट पाहिली नाहीं.

मोठमोठ्या सभांमधून होणारीं भाषणें ऐकून लोक बिथरतात व दंगा करण्यास प्रवृत्त होतात, सबब प्रथम त्या सभा नाहींशा केल्या पाहिजेत, असा आपल्या मनाशीं विचार करून त्यानें सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस आपला एक ॲड्रेस जाहीर छापून प्रसिद्ध केला. लोकांनीं यापुढें सभा भरविण्याचें बंद करावें असें त्यांत त्यानें अगदीं निक्षून लिहिलें होतें. ओकोनेल् अशा तऱ्हेचा हुकूम करील ही कल्पना देखील लोकांच्या मनांत नव्हती. परंतु त्यानें ज्याअर्थीं हा हुकूम केला आहे त्याअर्थीं तो आपण पाळलाच पाहिजे, असें ह्मणून सभा भरविण्याचा क्रम लोकांनीं अगदीं मुकाट्यानें सोडून दिला व तेणेंकरून लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन दंगा करण्यास प्रवृत्त होण्याचा मार्गही खुंटला. रक्तपात करण्याकरतां उद्युक्त झालेल्या लोकांनां नुसत्या एका लेखानें ओकोनेल्नें ताळ्यावर आणलें. यावरून त्याची योग्यता व लोकांवरचें त्याचें वजन स्पष्टपणें दिसून येतें.[२]

इतक्या या अवधींत इंग्लंडांतील प्रधान मंडळी जरी स्वस्थ बसली होती, तरी त्यांच्या चित्तवृत्तींत चलबिचल चालू असल्याचीं पूर्ण चिन्हें दिसत होतीं. क्याथलिक लोकांना प्रतिकूल अशा धोरणावर प्रधान मंडळीची योजना झाली आहे, असा बहुतेक लोकांचा तर्क होता, परंतु तो तर्क खोटा होण्याची वेळ आतां जवळ येत चालली होती. क्याथलिक लोकांचे जेवढे ह्मणून द्वेष्टे होते, तेवढ्यांचाच या प्रधान मंडळीमध्यें प्रवेश झाला होता. क्याथलिक लोकांना मुक्त करूं नये असें पीलचें फार दिवसापासून मत होतें, व तें तो मोठ्या जोरानें व आवेशानें प्रतिपादन करीत होता. क्याथलिक लोक बंधमुक्त झाले कीं प्रॉटेस्टंट लोकांचें वर्चस्व कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा त्याच्या मनाचा पक्का निश्चय झाला होता. कायद्यानें त्यांच्या अंगीं आणिलेली अपामता नाहींशी करतो असें एकीकडे दाखवावयाचें, आणि

२. See Walpole's History of England Vol. II Pp. 397--99.

सरकारी अधिकाऱ्यांच्या जागा त्यांना न देतां दुसरीकडून वस्तुतः त्या कायद्याचा अम्मल सुरू ठेवावयाचा, या दोन विसंगत गोष्टी एकदम चालू ठेवणें त्याच्या त्या सरळ मनाला सयुक्तिक दिसेना. पण आयर्लंडांत सरकारी कामावर असतां त्याला जो अनुभव आला होता त्यावरून क्याथलिक लोकांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागा देणें ह्मणजे देशांतील स्वस्थता नाहींशी करणें होय, असें त्याचें मत झालें होतें. तशांतून लोकांनीं आपले हक्क संपादन करण्याकरितां व्यवस्थित व कायदेशीर मार्गाचें अवलंबन करणें हेही त्याला मनापासून आवडत होतें. क्याथलिक लोक आपली मुक्तता करून घेण्याकरितां अशाच मार्गाचें अवलंबन करीत आहेत, अशी क्लेअर येथें झालेला प्रकार पाहून त्याची पुरती खात्री झाली. याप्रमाणें एकमेकाला अगदीं विरुद्ध अशा विचारांनीं त्याच्या मनांत अगदीं काहूर करून सोडलें. हा मार्ग स्वीकारावा किंवा तो मार्ग स्वीकारावा याचा त्याला आपल्या मनाशींच निश्चय करतां येईना. पोक्त विचारांतीं क्याथलिक लोकांना मुक्त करूं नये हें ह्मणणें अगदीं पोकळ आहे असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें व शेवटीं क्याथलिक लोकांचें ह्मणणें मान्य केलेंच पाहिजे असें त्यानें आपलें मत ठरवून टाकलें. सन १८२६ मध्यें पार्लमेंटाच्या सभासदांच्या निवडणुकी होतेवेळेस "पोपच्या तंत्रानें वागणाऱ्या रोमन क्याथलिक लोकांना मोरा पाडा" हीच ओरड सर्व ऐकूं येत होती; परंतु १८२७ त पहिल्याप्रथमच जेव्हां क्याथलिक लोकांचा प्रश्न त्या पार्लमेंट सभेपुढें आला व बरडेटनें सुचविल्याप्रमाणें त्यांच्या हक्कांचा विचार करण्याकरतां एक कमेटी नेमावी किंवा नाहीं याचा खल सुरू झाला, तेव्हां ५४० सभासदांत चौघाजणांच्याच मताधिक्यानें बरडेटचें ह्मणणें नापसंत ठरलें, आणि १८२८ त रसेलनें केलेल्या सूचना पास झाल्यावर, मे महिन्यांत बरडेटची तीच सूचना सहाजणांच्या मताधि-

---

३. इंग्रजींतील 'No popery cry' याचा वरील शब्दांनीं खुलासा केला आहे.

क्ष्यानें पास झाली! क्याथलिक लोकांना ह्मणून पाडण्याचा ज्या पार्लमेंटानें विडा उचलला होता, त्याच पार्लमेंटांत त्यांना अनुकूल अशी सूचना व्हावी हें केवढें आश्चर्य! अथवा त्यांत आश्चर्य तरी कसचें? क्याथलिक लोकांची आहे. हीच स्थिति बरी आहे असें मत प्रतिपादन करणाऱ्या लोकांचें सामर्थ्य दिवसानुदिवस कमी होत चाललें होतें व चारचौघांसमोर येऊन आपलें तें मत सांगण्याची त्यांच्या अंगांत धमक राहिली नाहीं ह्याचाच हा परिणाम होय. असो; 'टोरी' तर्फेचा सभासद, अल्स्टर येथील प्रॉटेस्टंट लोकांचा पुढारी व प्रत्यक्ष पीलचा मेहुणा जॉर्ज डॉसन् हा क्याथलिक लोकांच्या उलट बाजूचा एक गृहस्थ होता. क्लेअर येथें ओकोनेल्चा जय झाल्यावर, आतां आपण माघार घेतलीच पाहिजे, असें आयर्लंडसंबंधानें केलेल्या एका भाषणांत त्यानें स्पष्टपणें बोलून दाखविलें. हें भाषण ऐकत असतां आकाशांतून आपणांवर वीजच कोसळली कीं काय असें डासनच्या प्रॉटेस्टंट श्रोते मंडळीस वाटलें. इतके दिवस आपण याचीं भाषणें ऐकलीं, पण असे विचार आह्मीं आजपर्यंत कधींही ऐकले नाहींत, असें सर्व श्रोते आपआपसांत ह्मणू लागले. हा ज्याअर्थीं असें ह्मणतो आहे त्याअर्थीं पीलचें तर पाठबयाला नसेलना? पीलचें स्वत:चें मत बदललें असून त्याचाच हा अनुवाद करीत नसेलना? असेही तर्क अनेक लोकांच्या मनांत तेथल्या तेथें उद्भवले. परंतु आपल्यासंबंधानें असे तर्क करण्याची लोकांना पीलनें सवड ठेविलीच नव्हती. मागें सांगितल्याप्रमाणें त्यानें आपलें मत केव्हांच ठरवून ठेविलें होतें. पीलसारख्या वजनदार मुत्सद्याची क्याथलिक लोकांना अनुकूलता मिळाल्यावर पुढें कशी काय हकीगत झाली ती वाचकांना मागाहून कळेलच. खुद्द कॉमन्ससभेंतील सभासदांची या प्रश्नासंबंधानें कशी स्थिति होती याचा आपण तूर्त थोडासा विचार करूं.

एकट्या कॉमन्स सभेच्या हातांत जर एखादा कायदा पास करण्याचा अधिकार असता, तर गेल्या पंधरावर्षांत क्याथलिक लोकांची स्थिति

सुधारण्याचा कायदा (Catholic Relief Act) त्या सभेनें केव्हांच पास केला असता. परंतु कोणचाही कायदा, लॉर्ड्सची सभा व राजा यांच्या संमतीशिवाय एकट्या कॉमन्ससभेच्या संमतीनें केव्हांही पास होऊं शकत नाहीं, असा इंग्रजी राज्यव्यवस्थेचा नियम आहे. व हाच नियम मुख्यत्वेंकरून क्याथलिक लोकांच्या विशेष आड येत होता. लॉर्ड्सची सभा व राजा हे उभयताही क्याथलिक लोकांच्या अगदीं उलट होते. त्यांनीं आरंभिलेल्या उद्योगानें कॉमन्स सभेंतील मोठमोठ्या व वजनदार अशा शहारातर्फे आलेल्या सभासदांच्या मतांत अलीकडे बरेच वर्षांपासून फरक पडत चालला होता, व क्याथलिक लोकांची बंधमुक्तता करणें कोणच्याही प्रकारानें धोक्याचें नाहीं, असें त्यांना वाटूं लागलें होतें. मोठ्या मंडळीपैकीं पीलचें मत मात्र हे उद्योग सुरूझाल्यानंतरही बराचकाळपावेतों अगदीं पहिल्या प्रमाणें राहिलें होतें. पण क्लेअर येथील निवडणुकीनें त्याच्यामनावर मागें सांगितल्याप्रमाणें फार विलक्षण परिणाम झाला, व क्याथलिक लोकांचीं बंधनें नाहींशीं कशीं होतील याचा विचार तो करूं लागला पीलच्या मनांत इकडे हे विचार जेव्हां घोळत होते, तेव्हां आयर्लंड देशांत राज्यकारभार चालविण्याकरितां ब्रिटिशसरकारनें नेमिलेले अधिकारी अगदीं स्वस्थ बसले होते. यावरून देशात दंगाधोपा कदाचित् झाला तर तो आपण हां हां ह्मणतां नाहींसा करूं इतका त्यांना आपल्यासामर्थ्याविषयीं विश्वास होता असें कोणी समजूं नये. उलट भीतीमुळें ते गांगरून गेले होते असेंच ह्मणणें विशेष सयुक्तिक दिसेल. यावेळेस चोहोंकडे जी शांतता दिसून येत होती, ती क्याथलिक असोसिएशनच्या कृतीचें फळ होतें, राजसत्तेचें नव्हतें. येवढ्यावरूनच आमच्या या ह्मणण्याचा खरेपणा व्यक्त होतो. सन १८२८. च्या पावसाळ्यांत जगांतील सर्व राष्ट्रांबरोबर इंग्लंड देशाचा सलोखा होता व सर्व देशांत चोहोंकडे शांतता वास करीत होती. संयुक्तराज्यांत एकंदर ३०,००० इनफंट्री होती. त्यापैकीं २९००० आयर्लंडांत स्वस्थता

राखण्याकरतां तेथें पाठविणें भाग पडलें होतें. यादवीयुद्ध सुरू होण्याचा समय इतका जवळ येत चालला होता कीं, ड्यूक ऑफ् वेलिंगटन-सारखा निधड्या छातीचा शिपाई देखील या प्रसंगाला डगमगूं लागला. हल्लीं प्राप्त झालेली स्थिति सर्वांना असह्य अशी वाटूं लागली होती. परंतु तींतून बाहेर पडण्याचा कोणालाही योग्य मार्ग दिसेना. ही सुरू आलेली चळवळ तीक्ष्ण उपायांनीं बंद पाडणें अगदीं अशक्य होतें. कारण घोडेस्वार किंवा पोलीस शिपाई या उभयतांवरही विश्वास टाकून राहण्याची सोय नव्हती. कॉमन्स सभेकडे जाऊन कांहीं सक्तीचे उपाय योजण्याचा अधिकार मागवावा तर तेंही अशक्यच; कारण या सभेनें थोड्याच दिवसांपूर्वी क्याथलिक लोकांचीं बंधनें नाहींशीं करण्याच्या कामांत अनुकूल असा ठराव पास केला होता. पार्लमेंट बंद करावें तर बंड करण्याला आपण होऊन उत्तेजन दिल्यासारखें होणार व क्लेअर येथें जो प्रकार झाला त्याची पुनरावृत्ति करण्याला आयर्लंडांतील एकूणएक कौंटीमधील लोकांना प्रोत्साहन दिल्यासारखें होणार. मग आतां उपाय तरी काय करावा? असा इंग्लंडांतील सर्व मुत्सद्यांना प्रश्न उत्पन्न झाला. याला काय तो फक्त एकच उपाय राहिला होता. तो कोणचा तर क्याथलिक लोकांना हार जाण्याचा! टोरी पक्षाच्या प्रधान मंडळींची या योगानें जगांत अप्रतिष्ठा होईल अशी त्यांच्यापैकीं कोत्या समजुतीच्या लोकांना भीति होती, परंतु वास्तविक पाहिलें तर अशी अप्रतिष्ठा होण्याचा मुळींच संभव नव्हता. उलट त्यांत एकप्रकारची प्रतिष्ठाच होती. कारण पहिल्यापासून क्याथलिक लोकांच्या अगदीं उलट अशारीतीनें नांवाजलेल्या मुत्सद्यांनीं पूर्वींची

---

४. ड्यूक ऑफ् वेलिंगटन—ज० १७६९, म० १८५२. इंग्लंडांत जे उत्तम जनरल-सेनापति- झाले, त्यांपैकीं हा एक होता. यानेंच नेपोलियनचा पराभव करून इंग्लंड देशाचें वर्चस्व वाढविलें. त्यामुळें इंग्लिश लोकांच्या मनांत याच्याविषयीं फार मोठा अभिमान आहे. तो जिवंत असतां लोक त्याला 'आयर्न ड्यूक' म्हणत असत.

सर्व परिस्थिति बदलली असें पाहतांक्षणींच त्यांना सर्व नागरिक हक्क दिले, यापेक्षां जगाला आपल्या न्यायप्रियतेची दुसरी अधिक चांगली साक्ष त्यांना कोणची देतां आली असती? असो. शेवटीं प्रधान मंडळीनें क्याथलिक लोकांना सर्व हक्क देण्याचें तर ठरविलेंच; परंतु मागें सांगितल्याप्रमाणें या कामीं सर्वांत मोठी हरकत काय ती राजाची होती. ती हरकत दूर करण्याकरितां ड्यूक ऑफ् वेलिंगटन व पील यांना फारच खटपट करावी लागली. अखेरीस त्या खटपटीस यश येऊन पार्लमेंट उघडल्यानंतर आरंभीं होणाऱ्या आपल्या भाषणांत यासंबंधाचा उल्लेख करण्याची त्यानें प्रधान मंडळीस आज्ञा दिली. वर सांगितलेल्या उभयतां मुत्सद्यांनीं राजाचें मन कसें वळविलें ही हकीकत फार मनोरंजक आहे. परंतु विस्तारभयास्तव ती आह्मीं येथें दिली नाहीं. ती समजून घेण्याची आमच्या वाचकांपैकीं कोणाला जिज्ञासा उत्पन्न झालीच तर त्यांनीं स्पेन्सरवॉलपोलच्या इंग्लंडचा इतिहास[५] पहावा.

ता० ५ फेब्रुवारी १८२९ रोजीं पार्लमेंट जेव्हां उघडलें, तेव्हां राजाचें भाषण वांचून दाखविण्यांत आलें. त्यांत प्रस्तुत विषयासंबंधानें प्रधान मंडळींनीं खालील उल्लेख केला होता. राजे सरकारची तुह्मांला—कॉमन्स सभेंतील सभासदांना—अशी शिफारस आहे कीं, तुह्मीं आयर्लंड देशाच्या स्थितीविषयीं फार काळजीपूर्वक विचार करावा. तसेंच आपल्या रोमन क्याथलिक प्रजेविरुद्ध चालू असणाऱ्या कायद्यांनीं नागरिक लोकांचे हक्क संपादण्याचे कामीं त्यांचे ठिकाणीं जी अपात्रता उत्पन्न केली आहे तिचाही विचार करावा. त्याच भाषणांत आणखी असाही मजकूर होता कीं,—'क्याथलिक रिलीफचा' कायदा पास करण्याच्या अगोदर देशांत स्वस्थता राखण्याकरितां अम्मलबजावणी करणाऱ्या अम्मलदारास जास्त अधिकार कॉमन्स सभेनें दिले तर फार सोईचें होईल." हा मजकूर राजाच्या भाषणांत घालण्यांत प्रधान मंडळीचा सर्व रोख क्याथलिक असोसिएशन बंद करण्याकडे होता.

५. Vol II Pp. 400—405.

हें धूर्त वाचकांच्या तेव्हांच ध्यानांत येईल. सभेच्या कामाला सुरुवात झाल्याबरोबर थोडक्याच अवकाशांत राजाच्या आज्ञेला मान देण्याच्या सबबीवर क्याथलिक असोसिएशन बंद करण्याच्या हेतूनें एक बिल त्यांनीं सभेपुढें आणिलें. उलट पक्षाच्या मंडळींना ह्मणजे विगलोकांना हें बिल पसंत पडलें नाहीं. त्यांत ठरविल्याप्रमाणें लार्ड लेफ्टनेंटला वाटेल तसे अधिकार देणें त्यांना मान्य नव्हतें. लॉर्ड अँगलसी हा नुक्ताच आयर्लंडांतील आपल्या जागेवरून परत आला होता. तो या नवीन बिलासंबंधानें एका प्रसंगीं असें बोलला कीं, "प्रॉटेस्टंट लोकांच्या बरोबरीनें क्याथलिक लोकांना राजकीय हक्क देण्याचें बिल पसंत करा. तसें बिल पसंत झाल्यानंतर क्याथलिक असोसिएशनसारखी एखादी सभा अस्तित्वांत आली तर त्याची जबाबदारी माझ्यावर आहे." अँगलसीचें हें ह्मणणें विग् पक्षाला मान्य होतें. परंतु 'रिलीफ बिल' ज्याअर्थीं लवकरच पुढें आणण्याचें प्रधान मंडळीनें आश्वासन दिलें होतें, त्याअर्थीं वर सांगितलेल्या हेतूनें प्रधान मंडळीनें पुढें आणलेलें बिल पास झालें काय किंवा नापास झालें काय एकूणएकच, असा त्यांनीं आपल्या मनाशीं विचार करून त्या बिलाविरुद्ध भांडण्याचें आपल्याला प्रयोजन नाहीं असें ठरविलें. मग अर्थात्च तें बिल बहुमतानें पास झालें. कॉमन्स सभेंत एकदां पास झाल्यावर लॉर्डस्च्या सभेंत तें पास होण्याला किंवा राजाची त्याला संमति मिळण्याला फारसा अवकाश लागला नाहीं. फेब्रुवारी महिन्याच्या १० व्या तारखेला कॉमन्स सभेपुढें हें बिल आलें व मार्च महिन्याच्या ५ तारखेस त्याला राजाची संमति देखील मिळाली. एखादें बिल पास करून घेण्याच्या कामांत इतकी घाई फार क्वचितच झाली असेल. इतकी ही घाई कां झाली हें क्याथलिक लोक जाणून होते. आणि ह्मणून त्या बिलाला आक्टाचें स्वरूप येऊन त्याचा अम्मल सुरू होण्याचे अगोदरच क्याथलिक असोसिएशन आपण होऊनच मोडून टाकावी, असें त्या असोसिएशनमध्यें दूरवर दृष्टि देणारे जे सभासद होते त्यांचें मत पडलें. टोरी पक्षाकडून आपलें वचन पाळलें जाणार नाहीं, अशी ओकोनल्ला

बरीच भीति होती. ह्मणून त्यानें या मताला आपली असंमति दर्शविली. तो या वेळेस डब्लीन येथें नव्हता, लंडनहून निघून डब्लीनच्या मार्गावर होता. पण त्याचा स्नेही शील हा डब्लीन येथेंच होता. त्याचें मत ओकोनेलच्या मताहून भिन्न होतें, ह्मणून त्यानें तो डब्लीन येथें येऊन पोंचण्याचे अगोदरच, असोसिएशन मोडून टाकावी अशा अर्थाचा एक ठराव पास करून घेतला व त्या ठरावा-अन्वयें असोसिएशन बरखास्त देखील करून टाकिली. डब्लीन येथें परत आल्यावर झाली गोष्ट ही एका अर्थी बरीच झाली असें समजून ओकोनेलही स्वस्थ बसला. वर सांगितल्याप्रमाणें राजाचें भाषण झाल्यामुळें क्याथलिक लोकांचा इष्ट हेतु बहुतेक साध्य झाल्यासारखाच होता; परंतु या अशा वेळेला देखील त्यांच्या पुढाऱ्यांत आपआपसांत कलह उत्पन्न होऊं लागला. तरी क्याथलिक असोसिएशन बरखास्त करण्याच्या बाबतींत शीलबरोबर करावा लागणारा ओकोनेलनें टाळला हें त्यांतल्या त्यांत बरें झालें. परंतु लंडन येथील एजंट म्याकडोनेल, यानें वाजवीपेक्षां जास्त पैसा खर्च केला ह्मणून त्या उभयतांचें भांडण जुंपावयाचें तें जुंपलेंच. त्याचप्रमाणें सेक्रेटरी ओ, जरमन याजबरो-बरही असोसिएशनच्या कागदपत्राबद्दल वाद सुरू झाला. एकंदरींत याप्रमाणें आपण सर्वजण एकवाक्यतेनें वागत आहों असें सर्व जगाला दाखविणें ज्या वेळेस जरूर होतें त्या वेळेस देखील आयरिश लोकांच्या पुढारी लोकांत कलीनें प्रवेश केला ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय.

मार्च महिन्याच्या पांचव्या तारखेला कॉमन्स सभेपुढें पीलनें ' रिलीफ बिल ' आणिलें व त्याबरोबर राजाचें मन पुनः चलबिचल करूं लागलें. त्या बिलाला अगोदरच त्यानें आपली संमति मोठ्या कष्टानें दिली होती आणि त्यांतून ड्यूक ऑफ् कंबरलंडप्रभृति जवळ असणाऱ्या लोकांच्या अशी ही संमति आपण कशी दिली, याबद्दल त्याचेमागें सारख्या टोंचण्या सुरू झाल्या होत्या. त्याच्या त्या अप्रबुद्ध व चंचल मनाला त्या टोंचण्या सहन न होऊन प्रधान मंडळीला त्यानें आपल्यासमोर बोलावून आणिलें व ' पूर्वी मी जी तुह्मांला संमति दिली होती ती माझी

मी परत घेतों ' असें त्यांना सांगितलें. राजाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच वेलिंगटनप्रभृति मंडळींनीं आपल्या कामाचे तेथल्या तेथेंच राजीनामें खरडले. राजानें त्यांचे ते राजीनामे ठेवून घेतले व त्यांचा मोठा आदरसत्कार करून त्यांना परत पाठवूनं[६] दिलें व त्यांच्या जागीं दुसरें प्रधानमंडळ बोलावण्याचा त्यानें निश्चय केला; पण रात्रींच्यारात्रींत त्याच्या मनांत पुनः फरक पडला. नवीन प्रधानमंडळ नेमण्याचा विचार केला थांत " कार्यभार बहुत थोर " उचलला आहे, असें त्याला वाटूं लागलें. अर्थात् त्याची सारी रात्र " नाहीं सुगति भासत कांहिं न सुचत " हा मंत्र ह्मणण्यांत गेली असेल यांत शंका नाहीं. असो. शेवटीं वेलिंगटनचा राजीनामा घेण्यांत, आपल्या हातून मोठी चुक झाली अशीच त्याच्या मनाची पक्की खातरी झाली व मग मोठ्या पहाटेस त्यानें सगळ्या मुत्सद्यांचे राजीनामे परत पाठविले व वेलिंगटन यास एक पत्र पाठवून त्यांत त्याला असें सांगितलें कीं, तुमच्या इच्छेस येइल त्याप्रमाणें तुह्मीं कायदा पास करा, माझी त्याला कांहीं हरकत नाहीं. याप्रमाणें राजाच्या हातचा लेख जरी प्रधानमंडळीच्या हातांत आला तरी पीलप्रभृति मंडळींनीं, आपण करतों आहों याला राजाची कायमची संमति आहे, अशी पुनः एकदां खातरी करून घेतली आणि नंतर कॉमन्ससभेपुढें 'क्याथलिक इमॅनसिपेशन्' (Catholic emancidation ) नांवाचें बिल आणिलें. या बिलावर भाषण करतांना पीलनें राजास पुनः खालीं सांगितल्याप्रमाणें बांधून घेतलें. तो ह्मणाला ' क्याबिनेटनें एकवाक्यतेनें राजाला दिलेला सल्ला सर्वथैवं योग्य आहे, असें प्रतिपादन करण्याकरतां राजाचा मंत्री या नात्यानें भाषण करण्यास मी उठलों आहें व तसें भाषण करण्यास राजानें मला पूर्ण अधिकार दिलेला आहे. ' पीलनें बिलाची रचना फार साधी व क्याथलिक लोक

---

६. परत पाठवून देते वेळेस तेथें असणाऱ्या प्रत्येक मंत्र्याच्या दोन्ही गालाचे राजानें मुके घेतले, असें वॉलपोलनें गमतीचें वर्णन केलें आहे. See Vol II P. 408.

कुरकुर न करतील अशी केली होती व ती पुढें लिहिल्याप्रमाणें होती. 'रीजंट, लॉर्डचान्सेलर मग तो इंग्लंडचा असो, किंवा आयर्लंडचा असो, व आयर्लंडचा व्हाइसराय या तीन जागा खेरीजकरून बाकीच्या सरकारी अधिकाराच्या सर्व जागा क्याथलिक लोकांस देण्याला प्रतिबंध नसावा. क्याथलिक धर्माविरुद्ध कोणच्याही प्रसंगीं शपथ घेण्याचें त्यांना भाग नसावें.' बिलाचा हा मुख्य भाग झाला. परंतु त्यालाच क्याथलिक लोकांना जाचेल असा एक भाग जोडिला होता व त्याचें तात्पर्य असें होतें कीं:—आतांपर्यंत दरसाल २ पौंड ह्मणजे ४० शिलिंग, इतकें ज्याचें उत्पन्न आहे, अशा लागणीनें जमीन करणाऱ्या कुळांना ( ज्यांना इंग्रजींत फ्री-होल्डर अशी संज्ञा आहे. ) पार्लमेंटांतील सभासद निवडण्याच्या कामांत मत देण्याचा जो अधिकार होता तो काढून घ्यावा व दरसाल ज्याचें उत्पन्न १० पौंड आहे अशाच कुळांना तेवढा तो असावा. आयर्लंडाच्या धर्मसंस्थेच्या आश्रयाखालीं असणाऱ्या धर्माध्यक्षांना यापूर्वींच धर्माध्यक्षतेचे जे अधिकार मिळाले आहेत ते त्यांच्याकडे तसेच राहू द्यावेत, क्याथलिक लोकांना ते केव्हांही मिळूं नयेत. पार्लमेंटाचा सभासद होण्याच्या अगोदर जी एक शपथ[७] घ्यावी लागते त्या शपथेंत क्याथलिक लोकांना धर्मदृष्ट्या असंमत असलेला भाग काढून टाकावा; परंतु अशा रीतीनें फेरफार केलेल्या शपथेचा फायदा यापुढें जे क्याथलिक सभासद निवडून येतील त्यांनाच मिळावा इतरांना मिळूं नये. याशिवाय क्याथलिक धर्मसंस्थेसंबंधाच्या किरकोळ बाबी अनेक होत्या, परंतु त्यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

पीलनें आतां सांगितलेलें हें बिल पुढें आणल्यावर त्या बिलावर कॉमन्ससभेंत बराच वादविवाद झाला, पण त्यांतील कलमांना कोणी ह्मणण्यासारखी हरकत घेतली नाहीं. तेथें तें बिल पास झाल्यावर लॉर्डस्च्या सभेंतही तें लवकरच पास झालें. आपल्या बाजूचा आधार

७. ही शपथ 'Oath of Supremary' या नांवानें इंग्रजी इतिहासांत प्रसिद्ध आहे.

कायतो राजा व तोही जेव्हां परपक्षाला जाऊन मिळाला असें त्या सभेनें पाहिलें तेव्हां तींतील सभासदांनीं या बिलाला हरकत घेतली नाहीं. हें सयुक्तिकच आहे. लॉर्ड्सच्या सभेची मंजुरी मिळाल्यानंतर ता० १३ एप्रिल रोजीं राजाचीही त्याला संमति मिळाली. याप्रमाणें गेल्या साठ सत्तर वर्षांत जी चळवळ आयर्लंडांत चालली होती तिला एकदांचें यश आलें व क्याथलिक लोक राजकीय बंधनापासून मुक्त झाले.

वरील बिलांत दरसाल चाळीस शिलिंग उत्पन्नाच्या कुळांना मत देण्याचा जो इतके दिवस अधिकार होता तो काढून घेतला, ही एक फार महत्वाची बाब आहे हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तो अधिकार केव्हां मिळाला होता व तो आतां काढून घेणें पीलला कां अवश्य वाटलें याची खालीं थोडक्यांत माहिती दिली आहे व ती आमच्या वाचकांना पुरे आहे असें आह्मांस वाटतें.

आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत या बाबतींत एक कायदा पास झाला व त्या कायद्यानें सालीना ज्यांचें निव्वळ उत्पन्न चाळीस शिलिंग आहे. अशा कबुलायतीनें लागण करणाऱ्या कुळांना मत देण्याचा अधिकार आहे असें ठरविलें. पुढें १७९५ सालीं हाच कायदा पुनः कायम करण्यांत आला. या कायद्याचा परिणाम असा झाला कीं, मोठमोठे जमिनदार दरसाल चाळीस शिलिंग उत्पन्नाच्या मानानें जमिनीचे लहान लहान तुकडे करून कुळांकडे लागणी करितां देऊं लागले. असें केल्यानें जितकीं जास्त कुळें करावीं तितकीं जास्त मतें त्यांच्या हातांत येण्याचा व तेणेंकरून पार्लमेंटांत त्यांचें वर्चस्व वाढण्याचा संभव होता. मतें देण्याच्या कामांत कुळांना आपल्या जमिनदारांच्या उलट जाण्याची मुळींच सोय नव्हती. कारण उलट गेलेंच तर जमिनींतून बाहेर निघण्याची भीति होती आणि जमिनींतून बाहेर निघणें ह्मणजे आयरिश कुळांना मृत्यूच्या घराचीच वाट धरण्यासारखें होतें. या कारणामुळें

८. ही माहिती आह्मीं पुढील पुस्तकांतून घेतली आहे. An outline of Irish History by mcCarthy P. 84.

आयर्लंडांतील सर्व राजकीय सत्ता जमिनदारांच्या हातीं येऊन बसली होती. परंतु क्लेअर येथें झालेल्या निवडणुकीनें आतां असें निदर्शनास आणिलें होतें कीं, प्रसंग पडल्यास जमिनदारांचीही सत्ता झुगारून देऊन आपल्या मनाप्रमाणें मत देण्यास लागणदार कुळें पूर्णपणें समर्थ आहेत. त्याचप्रमाणें लोकांत एखादी सार्वजनिक चळवळ सुरू झाली असतां तिला त्यांचें साहाय्य मिळविणें फार सोपें आहे, असेंही त्याच निवडणुकीनें लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें होतें. याप्रमाणें जमिनदारांची सत्ता सर्वस्वी नाहींशी होणें राज्याला फार घातुक आहे अशा समजुतीनें ४० शिलिंग उत्पन्नाच्या कुळांचा मत देण्याचा अधिकार काढून घेण्याच्या हेतूनें पीलनें 'इमॅनसिपेशन' बिलांत एक कलम घातलें. याप्रमाणें या कायद्यांत हें कलम त्यानें घुसडलें खरें, पण तसें करण्यांत त्याचा जो हेतु होता तो कांहीं शेवटीं सिद्धीस गेलाच नाहीं. कारण हा कायदा पास झाल्यानंतर क्लेअरतर्फे पुन: निवडून घेण्याकरतां जेव्हां ओकोनेल् उभा राहिला तेव्हां पूर्वीप्रमाणेंच त्याला यश आलें. असो.

आतां सांगितलेली ही एक गोष्ट खेरीजकरून क्याथलिक लोकांच्या उद्योगाला जें हें यश आलें त्याचें सर्व श्रेय ओकोनेलला दिलें पाहिजे. ओकोनेल् उदयाला येण्याच्या पूर्वी आयर्लंडांत राजकीय हक्क संपादन करण्याचे त्या सभांनीं सुचविलेले व स्वीकारलेले मार्ग प्रतिष्ठितपणाचे व कायदेशीर नव्हते. ओकोनेलनें जी कायदेशीर व व्यवस्थित चळवळ सुरू केली तींत बुद्धीनें किंवा दर्जानें श्रेष्ठ अशा एकाही माणसाची त्याला मदत नव्हती. त्यांतून ज्यांच्याशीं त्याला सामना करावयाचा होता त्यांचें सामर्थ्य फारच मोठें होतें. शील खेरीजकरून खरा आधार त्याला कोणाचाही नव्हता. असें असून केवळ त्यानें आपल्या एकट्याच्याच जिवावर क्याथलिक लोकांत एकी उत्पन्न करून फार मोठी चळवळ सुरू केली. आणखी त्यांत विशेष हें कीं, ती चळवळ आयर्लंडांत चोहोंकडे एकसारखी सुरू होती तरी तिला कायदेशीर मर्यादेच्या बाहेर त्यानें केव्हांच जाऊं दिली नाहीं. ड्यूक ऑफ् वेलिंगटनसारख्या प्रचंड शत्रूबरोबर एकट्यानेंच लढाई करून तींत

त्यानें यश संपादन केलें, यांत त्याची केवढी थोरवी वर्णन करावी! पण चमत्कार हा कीं, एवढ्या योग्यतेच्या मनुष्याचा अनुदार मनानें अपमान करण्याला इंग्लिश लोकांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. तो अपमान कोणचा याची हकीगत खालीं दिली आहे.

ओकोनेल्ची क्लेअर येथील मतदारांनीं निवड केल्यानंतर कित्येक महिने तो कॉमन्स सभेंत सभासद या नात्यानें बसला नाहीं. शेवटीं मे महिन्याच्या १५ व्या तारखेला तो त्या सभेपुढें हजर झाला व आपल्याला शपथ द्यावी अशी त्यानें अध्यक्षाला—ज्याला इंग्रजींत 'स्पीकर' (Speaker) अशी संज्ञा आहे—विनंति केली. रोमन क्याथलिक धर्मांतील मनुष्याचा सभासद या नात्यानें कॉमन्स सभेंत येण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें त्या दिवशीं सभागृहाची ग्यालरी प्रेक्षकांनीं अगदीं गच्च भरून गेली होती. नवीन पास झालेल्या कायद्यांत मागें सांगितल्याप्रमाणें असें एक कलम होतें कीं, "या कायद्यानें पार्लमेंटांतील सभासदानें घेण्याच्या शपथेंत जो फेरफार केला आहे त्याचा फायदा हा आक्ट पास झाल्यानंतर निवडून येण्याच्या रोमन क्याथलिकासच तेवढा घेतां येईल." ओकोनेल्ची निवडणूक हा आक्ट पास होण्याच्या अगोदर झाली होती. यामुळें शपथ घेण्याच्या कामांत कसा काय प्रकार होतो हें पहाण्याकडे सर्वांचें लक्ष लागलें होतें. नेहमींच्या रीतीप्रमाणें लॉर्ड डंक्यानन या नांवाच्या गृहस्थानें ओकोनेल्ची व अध्यक्षाची ओळख करून दिल्यानंतर शपथ घेण्याकरतां तो अध्यक्षाच्या टेबलाजवळ जाऊन उभा राहिला. यावेळीं अध्यक्षाबरोबर व इतर सभासदांबरोबर त्यानें केलेली वागणूक फारच मर्यादेची व विनययुक्त अशी होती. टेबलाजवळ गेल्यानंतर अध्यक्षाच्या कारकुनानें जुन्या पद्धतीप्रमाणें शपथ घेण्यास त्याला सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें दोन शपथा घेतल्या. पण तिसरी शपथ रोमन क्याथलिक धर्माच्या विरुद्ध होती ह्मणून ती घेण्याचें त्यानें नाकारलें व नवीन पास झालेल्या आक्टाप्रमाणें रोमन क्याथलिक धर्माला असंमत नाहीं अशी शपथ आपणांस

द्यावी अशी त्यानें अध्यक्षांची विनंति. केली. त्यावर अध्यक्षानें असा हुकूम केला कीं, नवीन कायदा, तो पास होण्याच्या अगोदर निवडून आलेल्या सभासदास लागू नाहीं. जुनी शपथ घेण्याला ओकोनेल् तर कांहीं तयार नव्हता. अर्थातच कामन्स सभा सोडून जाण्याविषयीं अध्यक्षानें त्याला फर्माविलें. ओकोनेल्च्या पक्षाची जी मंडळी सभेंत होती त्यांनीं असा ठराव केला कीं, या कामांत आपल्या तर्फेनें ज्या तक्रारी ओकोनेल्ला कळवावयाच्या असतील त्या. त्यानें आपण स्वतः किंवा मुखत्यारमार्फत कळवाव्या. आपल्या तक्रारी आपण स्वतःच सांगणार असें त्यानें सांगितल्यावर नेमिलेल्या एका दिवशीं त्याच्या तक्रारी ऐकून घेण्याकरतां कॉमन्स सभा भरली. सर्व सभा भरली आहे व तिच्यापुढें एकटा ओकोनेल् उभा राहून आपलें ह्मणणें काय आहे तें सांगतो आहे, हा देखावा त्या वेळेस ज्यांनीं ज्यांनीं पाहिला असेल त्यांना त्यांना तो फारच चित्ताकर्षक वाटला असेल यांत शंका नाहीं. जमलेल्या सभासदांपैकीं कित्येकांची अशी समजूत होती कीं, ओकोनेल् ह्मणजे एक विलक्षण प्रकारचा रानटी मनुष्य आहे. कित्येकांची समजूत अशी होती कीं, हा फार साहसिक व दगलबाज आहे. परंतु त्याला प्रत्यक्ष पाहण्याचा व त्याचें भाषण कानांनीं ऐकण्याचा त्यांना जेव्हां प्रसंग आला तेव्हां आपलें मत अगदींच चुकीचें आहे अशी त्यांची लागलीच खात्री झाली. त्याचें या वेळेचें भाषण शांत व मितस्त असें होतें. त्याची वर्तणूक नम्र व सभ्यपणाची होती. त्याची वादविवाद करण्याची पद्धत जरी प्रत्ययजनक अशी नव्हती तरी ती तेथें बसलेल्या बऱ्याच प्रसिद्ध अशा ब्यारिस्टरांना पसंत पडली. आपल्या बाजूच्या समर्थनार्थ ओकोनेलनें पराकाष्ठेची मेहनत घेतली, परंतु त्याचें बोलणें कॉमन्ससभेंतील टोरीपक्षाच्या मंडळीला रुचलें नाहीं. कॉमन्ससभेंत टोरीपक्षाच्या लोकांचाच फार मोठा भरणा होता. ह्मणून ओकोनेल्ला प्रतिकूल असाच निकाल तेथेंही मिळाला. हा निकाल झाल्यावर जुनी शपथ घेण्यास तुह्मी तयार आहां काय ह्मणून अध्यक्षानें पुनः त्याला विचारलें. परंतु माझ्या

धर्माविरुद्ध मी शपथ घेऊं इच्छित नाहीं असा त्यानें रोकडा जबाब दिल्यानंतर क्लेअर कौंटीतर्फे पुन: त्याची निवडणूक व्हावी असा सर्वानुमतें ठराव पास झाला.

याप्रमाणें एका क्षुल्लक कारणावरून टोरीपक्षाच्या लोकांनीं ओकोनेल् याचा व्यर्थ अपमान केला. हा अपमान करण्यांत त्यांचा अदमास असा होता कीं, चाळीस शिलिंग उत्पन्नाच्या कुळांनीं निवडलेला मनुष्य दहा पौंडांचें उत्पन्न असणाऱ्या मतदारांकडून पुन: खचित निवडून येणार नाहीं, परंतु हा अदमास फार चुकीचा होता असें थोडक्याच अवकाशांत त्यांच्या अनुभवास आलें. बऱ्याच इतिहासकारांचें असें मत आहे कीं, इंग्लिश लोकांनीं ओकोनेल्चा वर सांगितल्या प्रकारचा अपमान केला नसता तर फार बरें झालें असतें. या वेळेस आयरिश लोकांना तो इतका प्रिय होता कीं, त्याचा जो अपमान झाला तो आपल्या सर्वांचा झाला असें त्यांना वाटूं लागलें व त्यामुळें, रिलीफ आक्ट पास झाल्यानें इंग्लिश लोकांविषयीं त्यांच्या मनांत प्रेमभाव जो उत्पन्न व्हावयाचा तो एकीकडेच राहून उलट त्यांच्याविषयीं तिटकारा मात्र उत्पन्न झाला. ओकोनेल् हा फार मोठ्या योग्यतेचा माणूस आहे अशी प्रथमपासून आयरिश लोकांची समजूत होती. ती समजूत घालविण्याकरितां व त्यांच्यामध्यें असलेलें त्याचें वजन नाहींसें करण्याकरितां, कॉमन्ससभेसारख्या वजनदार सभेंत त्याच्या शत्रूंनीं वर सांगितल्याप्रमाणें त्याची फजिती केली खरी, पण त्यापासून आयरिश लोकांच्या दृष्टीनें त्याची योग्यता व त्याचें महत्व एक रतिभर देखील कमी न होतां उलटें अधिकच झालें. अशा तऱ्हेनें ओकोनेल्चा अपमान केला व क्याथलिक लोकांचे हक्क इंग्लिश मुत्सद्यांनीं त्यांना अनेक वर्षेपावेतों दिले नाहींत, यांत त्यांनीं फार मोठी चूक केली याबद्दल म्याकार्थीनीं एके ठिकाणीं काढलेले उद्गार फार महत्वाचे आहेत ह्मणून ते आह्मीं वाचकांकरितां याखालीं जसेच्या तसे देतों.

---

१. See McCarthy's Epoch of Reform P. 23.

" क्याथलिक लोकांची मुक्तता कशी झाली, यासंबंधाची हकीगत या लहानशा इतिहासांत देणें अप्रासंगिक होईल ह्मणून ती आह्मीं देत नाहीं. पण ती मुक्तता करण्याच्या कामांत इंग्रजी मुत्सद्यांनीं जो मार्ग स्वीकारला, त्याचा परिणाम काय झाला तो वाचकांना समजावून देणें हें आह्मीं हल्लीं ज्या विषयावर लिहीत आहों, त्या विषयाच्या मानानें पाहूं गेलें असतां खचित अप्रासंगिक होणार नाहीं. वेलिंगटन व पीलसारख्या इंग्रजी मुत्सद्यांची जगांत जी तारीफ झाली आहे, ती योग्यच आहे. क्याथलिक लोकांना मुक्त करावें अशी जरी त्यांची मनापासून इच्छा नव्हती, तरी त्यांनीं प्रसंग कसा आला होता, हें बरोबर ताडलें व या कामांत आतां आपण दिरंगाई केली तर देशावर कदाचित् भयंकर परिणाम गुदरेल हें लक्षांत आणून त्यांनीं क्याथलिक लोकांना मुक्त केलें. यांत त्यांनीं खरोखर फार शहाणपणा केला. आतां सांगितलेल्या मार्गाचा अंगीकार केल्यामुळें राज्यक्रांति होण्याचे प्रसंग इंग्रजी मुत्सद्यांनीं अनेक वेळां टाळले आहेत, यांत कांहीं शंका नाहीं. परंतु मोठें अरिष्ट टाळण्याच्या कामांत ते गुंतले असतां त्यांनीं दुसऱ्या एका लहानशा अरिष्टाला आपण होऊन बोलावणें केलें, हें कांहीं खोटें नाहीं. एखादें काम करणें न्यायाचें आहे, एवढेंच केवळ मनांत आणून तें केलें ह्मणजे त्यांत जो एक प्रकारचा मोठेपणा व जी एक प्रकारची शोभा असते, ती त्यांनीं केलेल्या राज्यकारणांत नव्हती व त्यामुळें त्याची प्रभा जितकी फांकावी तितकी फांकली नाहीं हें उघड आहे. जें न्याय्य दिसेल तें करावयाचेंच यांत जो मुत्सद्दीपणा आहे, तो आपल्या अंगांत आहे असें लोकांना दाखवून त्यांच्या मनावर ह्मणण्यासारखा त्यांनीं कोणच्याही प्रकारचा परिणाम केला नाहीं, किंवा त्यांच्या मनांत आपल्याविषयीं आदरबुद्धीही उत्पन्न केली नाहीं. आपल्या राज्यकर्त्यांनीं न्यायाचें असें एक सुंदर कृत्य केलें हें लोकांच्या नजरेस आलें, पण त्याचबरोबर त्यांच्या हेंही नजरेस आलें कीं तें कृत्य केवळ न्याय्य होतें ह्मणून केलें असें नाहीं, तर तें करणें त्यांना भाग पडलें ह्मणूनच त्यांनीं तें केलें. लोकांच्या आणखी

असेंही नजरेस आलें कीं, आपण एखादी मागणी केली व ती मागणी करण्याला पुरे इतका जोर आपल्या अगांत आहे असें राजकर्त्यांना दिसून आलें ह्मणजे आपली ती मागणी सयुक्तिक आहे असें त्यांना वाटूं लागतें. क्याथलिक लोकांची मुक्तता जी झाली ती न्यायाकडे बघून झाली नाहीं. ड्यूक ऑफ् वेलिंगटननें एके प्रसंगीं असें बोलून दाखविलें कीं, 'यापुढें मी जर ओढून धरलें तर माझ्यामागें बाहेरून अतिशय कैची लागेल व तींतून मला पार पडतां यावयाचें नाहीं, इतक्या पल्ल्याला जेव्हां ही गोष्ट येऊन पोंचली तेव्हां मी हें काम करण्याला तयार झालों.' त्यानें आणखी असेंही बोलून दाखविलें कीं, 'क्याथलिक लोकांना मुक्त करणें आणि देशांत यादवी युद्ध सुरू करणें या दोहोंपैकीं युद्धाला तोंड देणें माझ्या हातून होणार नाहीं.' क्याथलिक लोकांना मुक्त केलें तें तरी मोठ्या कष्टानें आणि शिवाय त्यांच्यावर कांहीं शर्ती लादल्या त्या निराळ्याच! ओकोनेल्‌नें जितकी मेहनत केली तितकी केली नसती किंवा त्यानें आपल्या वक्तृत्वाचा जितका प्रभाव दाखविला तितका दाखविला नसता तर प्रधानमंडळीनें बाकीचीं सर्व कारणें बाजूला ठेऊन क्याथलिक लोकांचीं संकटें दूर केलीं नसतीं यांत शंका नाहीं. परंतु त्याच ओकोनेल्‌बरोबर त्यांनीं पुढें कसें वर्तन केलें तें पहा! आपल्या हातून जितके लपंडाव होण्याजोगे होते तितके सर्व करून त्याला पार्लमेंटांत येऊं दिलें नाहीं. शेवटीं जेव्हां त्यांचे सर्व उपाय खुंटले तेव्हां त्यांचा नाइलाज झाला व मग त्यांनीं त्याला पार्लमेंटांत येऊं दिलें. या सर्व कृत्याचा परिणाम मात्र फार चमत्कारिक झाला तो असा. तेव्हांपासून आयरिश लोकांची त्याचप्रमाणें इंग्लिश लोकांचीदेखील अशी अगदीं खात्री झाली कीं, शक्तीचा उपयोग करण्याची भीति घालण्याशिवाय न्याय मिळत नाहीं. आणि कोणचीही गोष्ट साध्य करून घेण्याला आपल्या अंगांत पुरी इतकी धमक आहे असें दिसून आलें ह्मणजे ती साध्य होण्याला फार आयास लागत नाहीं. क्याथलिक लोकांना मुक्त करण्याच्या कामांत अधिकारारूढ असणाऱ्या लोकांनीं

आपल्या हातून होईल तितका मोडता घातला व शेवटीं जे प्रसन्न झाले तेही मोठ्या कष्टानेंच, या दोन गोष्टींचा विचार केला असतां आज मित्तीला आयर्लंडांत असंतुष्टता आणि बेदिली दिसून येते तिच्या मुळाशीं या वेळेचें अनुदारपणाचें वर्तनच आहे असें ह्मटलें असतां अतिशयोक्तीचा दोष खचित येणार नाहीं. एखादें मागणें न्यायाचें आहे ह्मणून तें मान्य करून त्याप्रमाणें सुधारणा झाली असें फार क्वचितच आढळण्यांत येतें. आमच्या व्यवस्थित राज्यपद्धतींत जे कांहीं दोष आहेत त्यांतलाच आतां सांगितलेला हाही एक दोष आहे, हें अगदीं उघड आहे. सर्व सत्ता लोकांच्या हातांत राहूं देणाऱ्या राज्यपद्धतींत हा दोष प्रायः असावयाचाच आणि मनुष्यानें निर्माण केलेल्या आणि त्यानेंच चालू ठेवलेल्या व्यवस्थेंत जे अनेक दोष असावयाचे त्यांतलाच हा एक आहे, असें ह्मणूनच केवळ त्याच्याकडे आपण फारसें लक्ष देतां उपयोगी नाहीं. कसेंहीं झालें तरी दोष तो दोषच आहे आणि त्याचें अस्तित्व आमच्या राजकीय इतिहासाच्या प्रत्येक भागांत आपल्या नजरेस आल्याशिवाय रहात नाहीं. एखादी सुधारणा होणें जरी कितीही सयुक्तिक असलें तरी केवळ तिच्या सयुक्तिकपणामुळें किंवा चांगुलपणामुळें आपल्याला ती अनायासानें प्राप्त होईल अशी इच्छा मनांत बाळगणारा एखादा मुत्सद्दी क्वचितच सांपडेल! जिकडे तिकडे चळवळ सुरू झाली पाहिजे. लोकांनीं एकसारखी ओरड चालविली पाहिजे. तसेंच ती सुधारणा अमलांत येण्याच्या पूर्वी कायद्यांचीं बंधनें देखील तोडून टाकण्याचें आपल्या अंगांत सामर्थ्य आहे अशी निदान हुलकावणी तरी दाखविली पाहिजे. ''

याप्रमाणें म्याकार्थीनें वर्णन केलेल्या इंग्लिश लोकांच्या अनुदारपणाच्या वर्तनाचा असा परिणाम झाला कीं, आयर्लंडांत ओकोनेल् जो परत गेला तो, उलट पक्षाच्या लोकांनीं केलेल्या अपमानाबद्दल त्यांचा सूड उगविल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशी घोर प्रतिज्ञा करीतच गेला. क्लेअर येथील मतदार लोकांना उद्देशून त्यानें फार सणसणीत भाषेंत लिहिलेला असा एक आड्रेस् छापून प्रसिद्ध केला, व तो त्या लोकांना

फारच पसंत पडला. डब्लीनहून क्लेअरकडे जेव्हां तो गेला तेव्हां वाटेंत त्याचा लोकांनीं फार मोठा जयजयकार केला. आरमाघ शहराला पोंचण्याला त्याला बरीच रात्र झाली. पण तितक्या रात्रीं त्याच्या सन्मानार्थ तेथील लोकांनीं मोठा दीपोत्सव केला. रात्रीच्या रात्रींच तो लिम्रीक शहराकडे जाण्यास निघाला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेथें जाऊन पोहोंचला. वाटेनें प्रवासाची फार दगदग झाली होती यामुळें थोडीशी विश्रांती घेणें त्याला भाग पडलें. तितक्या अवकाशांत त्याला पहाण्याकरतां मोठ्या उत्सुकतेनें आलेल्या लोकांची, तो जेथें उतरला होता तेथें, अतिशय गर्दी झाली व तो एकदां निजून केव्हां उठेल असें त्यांना झालें. कित्येक जे त्याचे अगदीं निःसीम भक्त होते त्यांनीं ज्या ठिकाणीं तो निजला होता तेथील एका खिडकीसमोर एक झाड रोविलें आणि त्याच्या फांद्यावर गवई मंडळी बसवून त्यांच्याकडून वीररसानें भरलेलीं आयरिश गाणीं ह्मणविण्याची सुरवात केली. एनिस (क्लेअर परगण्याचें मुख्य शहर) येथें गेल्यावर त्याला बसण्याकरतां एक सुंदरशी गाडी त्याच्याकरतां तेथलि लोकांनीं अगदीं तयार ठेविली होती. तेथें तो गेल्यावर अनेक सभा झाल्या, व प्रत्येक सभेंत त्याचीं भाषणें झालीं. त्याचीं तीं जोरदार भाषणें ऐकून पूर्वीप्रमाणेंच याही प्रसंगीं मतदार लोकांच्या अंगांत आवेश पूर्णपणें खेळूं लागला. त्याला प्रतिस्पर्धी कोणीच उभा राहिला नाहीं, यामुळें सर्व मतें त्याला मिळालीं व तो पुनः क्लेअरतर्फे निवडून आला.

सन १८३० च्या आरंभाला पार्लमेंट सभेची बैठक होती. त्या बैठकीला हजर होऊन ओकोनेल् आपल्या सभासदाच्या जागीं जाऊन बसला. त्यावेळेस त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. इतक्या उतार वयांत पार्लमेंटसारख्या अगदीं अनभ्यस्त ठिकाणीं जाऊन व तेथील सगळ्या भानगडी समजावून घेऊन प्रमुखपणा मिळवावयाचा ह्मणजे फार कठीण काम होतें. त्यांतून तो इंग्लंडांत एकसारखा असा फार दिवस कधींही राहिला नव्हता व ह्यामुळें इंग्लिश लोकांच्या स्वभावाची त्याला जितकी माहिती व्हावयाला पाहिजे होती तितकी झाली नव्हती. आयरिश

लोकांची इंग्लंडांतील लोकांना फारच थोडी माहिती होती. तेव्हां अर्थात् उभय देशांमधील लोकांत परस्पराविषयीं प्रेमही बेताबाताचेंच होतें. त्यांतून ओकोनेलच्या मनापासून द्वेष करणारे लोक इंग्लंडांत पुष्कळ होते. या द्वेषानें मोठमोठ्या योग्यतेच्या लोकांनाही कसें पछाडलें होतें, याबद्दल तो स्वतःच आपल्यासंबंधानें अशी एक गोष्ट सांगत असे कीं, ज्या ज्या वेळेस एखादें भाषण करण्याकरितां कॉमन्स सभेंत मी उठून उभा राही, त्या त्या वेळेस अध्यक्ष ( स्पीकर ) माझ्याकडे मुद्दाम पाठ करून बसे; व हा क्रम थोडा थोडका नाहीं तर एकसारखा दोन वर्षें चालू होता. अशी जरी स्थिति होती तरी अगदीं आरंभापासून सभेंतील मंडळी त्याचें बोलणें मोठ्या उत्सुकतेनें ऐकून घेऊं लागली व थोड्याच अवकाशांत वादविवाद करण्याच्या कामांत तो फार कुशल आहे अशी सर्व लोकांची त्यानें खात्री केली. लोक त्याला शिव्या देत त्याची हुर्यो करीत, पण त्याचा त्यानीं तिरस्कार कधींही केला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हा प्रकार पुढें आपोआप लवकरच बंद झाला. कारण थोड्याच दिवसांत लोकांवर आपली चांगली छाप बसवून आपल्याविषयीं त्यानें त्यांच्या मनांत आदर उत्पन्न केला. कॉमन्स सभेमधील श्रोतेमंडळींचा नेहमींचा कल कसा असतो हें समजून घेऊन त्यांच्याकडून शाबासकी मिळविणें फार कठिण काम आहे. त्यांतून तें उतार वयांतील मनुष्याच्या हातून कधींही व्हावयाचें नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणिली ह्मणजे ओकोनेलनें कॉमन्स सभेंत आपलें नांव गाजवून सोडलें, यांत त्यानें खरोखरच महत्कृत्य केलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पार्लमेंटाच्या या बैठकींत त्याचीं पुष्कळ भाषणें झालीं, पण त्यांपैकीं एकाही भाषणांत त्याच्या हातून मर्यादातिक्रम झाला नाहीं. ह्याप्रमाणें तो पार्लमेंटांत काम करीत असतां सन १८३० च्या जून महिन्यांत चवथा जॉर्ज राजा मरण पावला, व त्यामुळें इंग्लंडांतील राज्यव्यवस्थेच्या नियमाप्रमाणें चालू असलेलें पार्लमेंट बरखास्त झालें, आणि पार्लमेंटाची पुनः निवडणूक झाली.

नवीन निवडणुकींत अधिकारारूढ असणाऱ्या टोरीपक्षाचा बराच पाडाव झाला. पूर्वींच्यापेक्षां तिप्पटीनें कमी त्यांच्या पक्षाचे लोक निवडून आले. ओकोनेल् स्वत: वॉटरफर्ड तर्फेनें निवडून आला. या निवडणुकीच्या वेळेस त्यानें जीं भाषणें केलीं त्यांत इंग्लंड व आयर्लंड या दोन देशांत झालेलें ऐक्य नाहींसें केल्यावांचून

---

१०. 'Repeal of Union' या शब्दावर विशेष टीप देणें (निदान मराठी जाणणाऱ्या लोकांकरितां) फार अवश्य आहे. आयर्लंड हें प्रथम स्वतंत्र राष्ट्र होतें. परंतु दुसरा हेन्री इंग्लंडच्या गादीवर असतां (११५४ पासून ११८९ पर्यंत) ११७२ सालीं त्यानें आयर्लंड इंग्लिश सत्तेखालीं आणलें. त्या दिवसापासून आज तागाईत आयर्लंड इंग्लंडच्या राजाच्या अमलाखालीं आहे. ११७२ सालीं आयर्लंड देशावर जरी इंग्लंडचें स्वामित्व स्थापित झालें तरी आपलें आपण पार्लमेंट बोलावणें व त्या पार्लमेंटच्या संमतीनें राज्यकारभार चालविणें वगैरे आयरिश लोकांकडे जे हक्क होते, ते त्यांचेकडे तसेच चालू ठेवले होते. परंतु या व्यवस्थेपासून आयर्लंड देशाचा कारभार जितक्या सुरळीत रीतीनें चालावा तितका चालत नाहीं असें इंग्लिश मुत्सद्यांस दिसून आलें व त्याप्रमाणें त्यांनीं १८०१ सालीं इंग्लंड व आयर्लंड या दोन देशांचीं जीं दोन पार्लमेंटें होतीं तीं मोडून त्यांचें एक पार्लमेंट केलें आणि त्याला 'ग्रेटब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचें पार्लमेंट' असें नांव दिलें. याप्रमाणें दोन पार्लमेंटाच्या झालेल्या एकीकरणाला इंग्रजी इतिहासांत 'यूनियन्' (Union) ह्मणजे ऐक्य असें अगदीं सोपें पण अर्थपूर्ण नांव दिलें आहे. या यूनियन् शब्दाला मराठींत कोणचा प्रतिशब्द योजावा हें आमच्या नीटसें लक्षांत येत नाहीं. तूर्त त्या शब्दाऐवजीं 'ऐक्य' हा शब्द आह्मीं वापरला आहे. ऐक्य या शब्दाचा येथें विशेष प्रकारचा अर्थ आहे आणि तो लक्षांत ठेवला ह्मणजे कार्यभाग होण्याजोगा आहे. 'यूनियन्' या शब्दाची ज्याप्रमाणें वाट लाविली त्याप्रमाणेंच 'रिपील' या शब्दाचीही वाट लाविली पाहिजे. 'रिपील' या शब्दाचा अर्थ रद्द करणें, नाहींसें करणें असा आहे. यूनियन् रिपील करावयाची ह्मणजे इंग्लंड व व आयर्लंड या दोन देशाकरितां जें एकच पार्लमेंट केलें तें मोडून टाकून पूर्वीप्रमाणें इंग्लंडचें पार्लमेंट निराळें व आयर्लंडचें पार्लमेंट निराळें करावयाचें. इतकें स्पष्टीकरण केल्यावर 'Repeal of the union' याकरितां 'ऐक्य रद्द करणें अथवा नाहींसें करणें' हे शब्द आह्मीं जे उपयोगांत आणले आहेत त्यांचा अर्थ किती व्यापक आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. हे शब्द चांगले आहेत, असें आमचें

आयर्लंडाचा फायदा कधींही व्हावयाचा नाहीं, हें आपलें मत त्यानें लोकांना स्पष्टपणें सांगितलें. ओकोनेल्सारख्या वजनदार मनुष्याच्या तोंडांतून वरील अर्थाचे शब्द निघाल्याबरोबर जिकडे तिकडे त्याचा प्रतिध्वनि ऐकूं येऊं लागला. ओकोनेल् नुस्ती तोंडाची वाफ दवडूनच स्वस्थ बसला असें नाहीं, तर बोलल्याप्रमाणें कृति करून दाखविण्याच्या उद्योगासही त्यानें लवकरच आरंभ केला. क्याथलिक असोसिएशन पूर्वी मोडून टाकली होती. तिच्या जागीं दुसरी[११] असोसिएशन स्थापन केली व तिला ' मित्रसमाज ' अशा अर्थाचें नांव दिलें. ही सभा स्थापन करण्याचे एकंदर पंचवीस हेतु होते. त्यांत ऐक्य रद्द करणें हा एक मुख्य होता. पण ती सभा लॉर्ड लेफ्टेनंटनें १८२९ च्या कायद्याच्या आधारानें तेव्हांच मोडून टाकली. या कायद्यानें एखादी सभा, मग ती कायदेशीर असो किंवा बेकायदेशीर असो, मोडून टाकण्याचा पूर्ण अधिकार लॉर्ड लेफ्टेनेंट यास देण्यांत आला होता ही गोष्ट वाचकांच्या स्मरणांतून गेली नसेलच. असो; ' मित्रसमाज ' नांवाची सभा मोडून टाकल्यावर ओकोनेल्नें तीच सभा, पण दुसरें नांव[१२] देऊन, पुनः भरविली. लॉर्ड लेफ्टनेंट या वेळेस इंग्लंडांत होता. ह्मणून त्याच्या पश्चात् चीफ् ( मुख्य ) सेक्रेटरी हार्डिज यानें ती सभा बेकायदेशीर असल्याबद्दल आपल्या सहीचा एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. दुसऱ्याच दिवशीं ओकोनेल्नें पुनः आणखी एक नवीन सभा स्थापन करावी अशी सूचना आणली. ती सूचना पसंत होऊन

---

( मागील पृष्ठावरून. )
आह्मालाच वाटत नाहीं. परतु तूर्त त्यांच्यावरच निर्वाह करून घेणें भाग आहे. आमच्या वाचकांपैकीं कोणी आह्मांस योग्य प्रतिशब्द सुचविले तर आह्मीं त्यांचे फार आभारी होऊं.

११ या सभेचें नांव ' The friends of Ireland of all religious pursuasions ' असें होतें.

१२ हें नांव ' Anti--union Association ' ह्मणजे ' ऐक्यविघातिनी-सभा ' असें होतें.

आणखीं एक नवीन सभा[13] स्थापन झाली. परंतु तिचीही दशा पूर्वींच्या सभांप्रमाणेंच झाली. याप्रमाणें एका अंगाला आयरिश् सरकार व दुसऱ्या अंगाला ओकोनेल्, असे आयर्लंडांत दोन पक्ष होऊन एकमेकांत भांडणें सुरूं झालीं. ओकोनेल् एकदां आपल्या प्रतिपक्षासंबंधानें बोलूं लागला, ह्मणजे तो आपल्या जिभेला वाटेल तशी नाचूं देत होता व कोणाला काय बोलावें यासंबंधानें तो मुळींच विचार करीत नव्हता. आपण भरविलेल्या सभा बेकायदेशीर आहेत असें हार्डिंजनें ठरविलें, त्याबद्दल त्याच्यावर नेहमींच्या स्वभावाला अनुसरून त्यानें यथेच्छ तोंडसुख घेतलें, व नाहीं नाहीं त्या कुशब्दांचा त्याच्यावर प्रहार केला. या प्रसंगीं त्यानें वापरलेल्या भाषेसंबंधानें वॉलपोलनें आपल्या इतिहासांत पुढें लिहिल्याप्रमाणें उद्गार काढिले आहेत:— 'अशी ही उन्मत्तपणाची भाषा शहाण्या मुत्सद्याच्या तोंडांतून येण्यापेक्षां एखादे मासेविक्या बाईच्या तोंडांतून येणें जास्त स्वाभाविक आहे. ज्याच्यासंबंधानें अशी भाषा वापरली जाते त्यांत त्याचें कोणच्याही प्रकारचें नुकसान न होतां उलट तशी भाषा वापरणाराचाच उपहास होतो.'[14] असो. ओकोनेल्नें आपल्यावर विनाकारण तोंड टाकलें ह्मणून हार्डिंजला फार राग आला व ह्मणून त्यानें त्यास द्वंद्वयुद्ध करण्याबद्दल आव्हान केलें. परंतु दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें द्वंद्वयुद्ध न करण्याचा ओकोनेल्नें निश्चय केला होता ह्मणून त्यानें हार्डिंजचें ह्मणणें नाकारलें. द्वंद्वयुद्ध खेळण्याचें नाकारणें हें त्या वेळेस भित्रेपणाचें दर्शक असें समजलें जात होतें. यामुळें इंग्लिश लोकांच्या मनांत ओकोनेल्विषयीं बराच तिरस्कार उत्पन्न झाला. पार्लमेंट उघडण्याच्या सुमाराला तो जेव्हां पुनः लंडनास गेला, तेव्हां लोकांनीं त्याला पाहिलें ह्मणजे ते त्याच्याकडे पाठ फिरवून उभे राहूं लागले. ओकोनेल्ला हा

---

१३, 'Association of Irish volunteer's' ह्मणजे आयर्लंडांतील स्वयंसेवकांची सभा असें या सभेचें नांव होतें.

१४. See Walpole's History of England Vol. III, P. 332.

प्रकार सहन झाला नाहीं, व त्यामुळें इंग्लिश लोकांचा सूड घेण्याचा याच्यापूर्वींच त्याचा जो निश्चय झाला होता तो या गोष्टीनें विशेष दृढ झाला.

इतक्या अवकाशांत पार्लमेंटमध्यें बऱ्याच उलाढाली झाल्या होत्या. टोरी पक्षाचे लोक नुकत्याच झालेल्या निवडणुकीच्या वेळेस यावे तितके निवडून न आल्यामुळें ड्यूक ऑफ् वेलिंगटनप्रभृति प्रधानमंडळीला आपल्या कामाचा राजीनामा द्यावा लागला व त्याच्या पश्चात् विग् पक्षाचे लॉर्ड ग्रे व त्याचे अनुयायी हे अधिकारारूढ झाले. या पक्षांतिल लोकांचें नेहमींचें हें तत्व होतें कीं, हरप्रयत्न करून ओको-नेल्ची मर्जी संपादन करावयाची. ही गोष्ट ओकोनेल् जाणून होता आणि ह्मणून विग् पक्षाकडून आयरिश लोकांचें कल्याण झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशी त्याची अटकळ होती. शिवाय नुकत्याच झालेल्या निवडणुकींत आयरिश सभासद लॉर्ड ग्रेच्या बाजूला होते. ह्मणून त्याला ड्यूक आफ् वेलिंगटनचा पराभव करतां आला; नाहींतर कधींही करतां आला नसता, या गोष्टीवर ओकोनेल्ची फार मोठी मदार होती. आपण केलेला हा उपकार स्मरून लॉर्ड ग्रे क्याबिनेटमधल्या एखाद्या मंत्र्याची व तें न साधलेंच तर एखाद्या न्याया-धीशाची तरी जागा आपल्याला देईल अशी ओकोनेल्च्या मनांत बरीच आशा उत्पन्न झाली होती. त्याचा ब्यारिस्टरचा धंदा मागें सांगितल्या-प्रमाणें फार झपाट्यानें चालला असतांना त्यानें नोकरीची इच्छा मनांत बाळगणें सकृद्दर्शनीं वाचकांना चमत्कारिक वाटेल; परंतु खरें ह्मटलें तर त्यांत चमत्कार वाटण्याजोगें कांहीं नाहीं. कारण ओकोनेल्ला आपल्या धंद्यांत जरी पुष्कळ पैसा मिळत होता, तरी त्याचा खर्च फार मोठा असल्यानें तो पैसा त्याच्या मुळींच वांट्याला येत नव्हता, उलट त्याला कर्ज होतें. डब्लीन शहर सोडून पार्लमेंटांत हजर रहावें लागे, यामुळें त्याच्याकडे आलेलीं कामें त्याला सोडून द्यावीं लागत व त्यायोगानें पैशाच्या मानानें त्याचें फारच नुकसान होत असे. हें नुकसान अंशतः भरून काढण्याच्या हेतूनें सरकारी नोकरी मिळाली तर बरें असें त्याला

वाटूं लागलें होतें. शिवाय त्याचें आणखी असें ह्मणणें होतें कीं, क्याथलिक लोकांचीं राजकीय बंधनें दूर करण्यापासून जर त्यांचा कांहीं खरा उपयोग व्हावयाचा असेल तर तो सरकाराकडून त्यांना मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळविणें हा आहे. तसा उपयोग जर झाला नाहीं तर निरनिराळ्या बंधनापासून झालेली सुटका ही निव्वळ आयरिश लोकांची थट्टा आहे, असेंच समजलें पाहिजे. ती तशी थट्टाच आहे किंवा नाहीं हें पाहण्याचा, त्याचप्रमाणें आयरिश लोकांनीं आपल्यावर केलेले उपकार विग् पक्षाचे लोक स्मरतात किंवा नाहीं हेंही पहाण्याचा प्रसंग आतां अगदीं नजीक येऊन ठेपला होता. घोडा व मैदान जवळच होतें. कारण आलर्यंडांत मोठ्या महत्वाच्या अशा दोन तीन जागा खालीं झाल्या होत्या व त्या क्याथलिक लोकांना मिळाल्या पाहिजेत असें ओकोनेलचें ह्मणणें होतें.

लॉर्ड ग्रेनें मार्किस आफ् अँगलसीची पुन: आयर्लंडांतील लॉर्ड लेफ्टेनेंटच्या जागीं नेमणूक केली. अँगलसीनें नेमणुकीच्या जागेवर जाण्याचे अगोदर ओकोनेल्ला मुद्दाम बोलावणें पाठवून त्याची भेट घेतली. त्या भेटींत पुष्कळ महत्वाच्या गोष्टींची वाटाघाट झाली. पण शेवटीं अँगलसीनें त्याला असें सांगितलें कीं, आटर्नी जनरल व सॉलिसिटर जनरल या दोन जागेवर हल्लींचे जे इसम आहेत त्यांना काढण्याची माझी कांहीं इच्छा नाहीं. ओकोनेल्ला ही गोष्ट अर्थात् पसंत पडली नाहीं. या बाबतींत आपलें काय ह्मणणें होतें तें त्यानें अँगलसीला कळविलें व हल्लीं त्या जागेवर असलेले टोरी पक्षाचे लोक काढून टाकावे व त्या जागा क्याथलिक लोकांना द्याव्या असें त्यानें त्याला सुचविलें. परंतु आपल्या ह्मणण्याप्रमाणें कांहीं घडून येत नाहीं, असें जेव्हां त्याला दिसून आलें तेव्हां त्यानें अँगलसीला असा जबाब दिला कीं, क्याथलिक लोकांची मुक्तता झाली तरीदेखील राज्यकारभाराच्या कामांत त्यांचा जर उपयोग करून घ्यावयाचा नाहीं, व त्यांची योग्य संभावना करावयाची नाहीं, तर मग इंग्लंड व आयर्लंड या दोन देशांत झालेलें ऐक्य नाहींसें करण्याची खटपट करणें मला भाग आहे. "असेंच जर आहे तर

त्या खटपटीला यश येऊं न देण्याच्या उद्योगाला लागणें मला भाग आहे." याप्रमाणें अँगलसीनें ओकोनेल्ला प्रत्युत्तर दिलें.

याप्रमाणें दोघांच्या भेटीपासून जो चांगला परिणाम व्हावयाचा तो न होतां उलट वाईटच परिणाम झाला. परंतु आतांपर्यंत झालें हें कांहींच नाहीं, याच्याहीपेक्षां वाईट असे प्रकार अजून याच्यापुढेंच आहेत.

अँगलसी आयर्लंड येथें जाऊन काम पाहूं लागल्यावर न्यायखात्यांतील बऱ्याच महत्वाच्या जागा खालीं झाल्या. परंतु त्यांतून एकही क्याथलिक लोकांच्या वांट्याला आली नाहीं. या गोष्टीला बरेच दिवस लोटल्यावर पुढें कांहीं कारणानें वर सांगितलेल्या सॉलिसिटर जनरलची व अटर्नी जनरलची अशा दोन जागा देखील खालीं झाल्या, व त्या दोहोंपैकीं सॉलिसिटर जनरलची जागा आपल्याला मिळावी अशी ओकोनेल्च्या मनांत फार इच्छा उत्पन्न झाली. पण ती जागा त्याला न मिळतां शेवटीं एका विग् पक्षाकडील माणसास मिळाली व दुसरी जागा तर टोरी पक्षाकडील माणसाला मिळाली.

विग् पक्षाच्या लोकांचें हें अनुदार वर्तन पाहून ओकोनेल् अगदीं निराश झाला. विग् पक्ष अधिकारारूढ असो, किंवा टोरी पक्ष अधिकारारूढ असो, इंग्लिश लोकांच्या हातून आयर्लंडाला न्याय मिळावयाचा नाहीं, अशी त्याची पक्की खात्री झाली; व त्याप्रमाणें तो प्रसिद्ध रीतीनें बोलूंही लागला. विग् पक्षाकडून झालेल्या या अनुदार वर्तनाबद्दल मि. वालपोल यांनीं आपल्या इंग्लंडच्या इतिहासांत पुढें लिहिल्याप्रमाणें उद्गार काढले आहेत:—" आयर्लंडांतील ब्यारिस्टर मंडळींत अतिशय हुषार ह्मणून नांवाजलेले कांहीं ब्यारिस्टर होते. त्यांच्या हक्कांची प्रधानमंडळीनें जाणूनबुजून पायमल्ली केली, व ही पायमल्ली करण्याला त्यांचीं राजकीय व धार्मिक मतें हींच दोन मुख्य कारणें होतीं, असें मानण्याला बराच आधार होता. अधिकारारूढ असणाऱ्या विग् पक्षाच्या प्रधानमंडळीच्या हातून झालेल्या या अन्या-

---

१५. See Vol. III, P. 335.

याच्या वागणुकीनें, ऐक्य नाहींसें करण्याच्या चळवळीला विशेष जोर मिळाला. ब्रिटिश सरकाच्या हातून तुमचें कल्याण होण्याची आशा नाहीं, असें उघड उघड प्रत्येक रोमन क्याथलिक मनुष्याला सांगण्याला या वर्तनानें चांगली सवड मिळाली. त्याचप्रमाणें दोन देशामध्यें जोंपर्यंत ऐक्य आहे तोंपर्यंत तुमच्या कल्याणाकडे कोणीही ढुंकून पाहणार नाहीं, असें आयर्लंडांतील सदरहू ऐक्य नाहींसें करून टाकण्याची खटपट करणाऱ्या प्रत्येक रोमन क्याथलिकास स्पष्ट रीतीनें सांगण्यालाही हें एक योग्य कारण झालें."

ऐक्य नाहींसें करण्याचा विचार ओकोनेल्च्या मनांत कायम झाल्याबरोबर तो त्या उद्योगास लागला व त्यानें स्थापन केलेल्या निरनिराळ्या सभा मोडून टाकल्या वगैरे हकीगत आह्मीं मागें सांगितली आहेच. मध्यंतरीं नवीन पार्लमेंट सुरू झालें तेव्हां त्याला इंग्लंडांत जावें लागलें, व त्यामुळें त्यानें आरंभिलेला उद्योग बराच शिथिल पडला. पार्लमेंटाची बैठक संपल्यानंतर तो उद्योग पुनः चालू करण्याच्या उद्देशानें तो १८३०च्या डिसेंबर महिन्यांत आयर्लंडाकडे परत फिरला. परत येतां येतां वाटेंत बऱ्याच ठिकाणच्या लोकांनीं त्याचा फार मोठा गौरव केला. पुढें थोड्याच दिवसांनीं, ह्मणजे १८३१ सालाला आरंभ झाल्याबरोबर ऐक्याच्या उलट खटपट करण्याचा उपक्रम त्यानें पुनः सुरू केला. आरंभाला सर्व लोकांना उद्देशून असें एक पत्र त्यानें छापून प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें असें ह्मटलें होतें कीं, "यत्किंचित्‌ही रक्तपात न करतां व कोणच्याही प्रकारचा काळिमा लावून न घेतां आयरिश लोकांना आणखी एक गोष्ट साध्य करून घ्यावयाची आहे. ती ही कीं, इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य मोडून टाकून आपल्या देशाकरतां आपलें स्वतःचें आणि (इंग्लिश पार्लमेंटापेक्षांही) जास्त सुधारलेलें असें पार्लमेंट स्थापन करावयाचें. स्वस्थतेचा भंग न करतां कायदेशीर व व्यवस्थित मार्गाचें जर आपण अवलंबन केलें, तर ही गोष्ट साध्य करून घेणें आपल्याला फारसें कठीण नाहीं. तुह्मीं सर्व माझ्या सांगण्याप्रमाणें

जर वागाल तर हें ऐक्य आणखी दोन वर्षें जास्त टिकणार नाहीं हें मी खात्रीनें सांगतों."

पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें आणखी एक नवीन सभा स्थापन केली. पण सरकारी अधिकाऱ्यांनीं तीही बेकायदेशीर आहे असें ठरविलें. त्यानंतर सरकारी अधिकारी व त्यांचा कायदा दोहोंचाही जिच्यावर कांहीं प्रभाव चालणार नाहीं, अशी एक त्यानें शक्कल काढली. त्यानें आपल्या एकट्यालाच 'रिपील असोसिएशन' (Repeal association) ह्मणजे रद्द करण्याची सभा असें नांव घेतलें. एकट्योच मनुष्यानें आपल्याला सभा असें ह्मणवून घेतल्यानंतर तेथें कायदा मग काय करणार? परंतु पुढील वाक्यांत सांगितल्या प्रकारची सरकारी अधिकाऱ्यांना बोट शिरकविण्याला त्यांतल्या त्यांत थोडीशी जागा होती व तिचा त्यांनीं उपयोग करून घेतला. ओकोनेलनें असें ठरविलें होतें कीं, रिपील असोसिएशननें वर्गणी गोळा करावी, तिला मदत करण्याकरितां एक क्लब स्थापन करावा व त्या क्लबाच्या आश्रयाखालीं होम्स हॉटेल (Home's Hotel) नांवाच्या जागीं लोकांनीं जेवणाकरितां एके ठिकाणीं जमावें आणि तेथें सार्वजनिक विषयांची चर्चा करावी. अशा प्रकारची चर्चा बंद करण्याच्या हेतूनें लॉर्ड अँगल्सी यानें जाहिरनामा काढिला. बेकायदेशीर वर्तन केव्हांही करावयाचें नाहीं, असा ओकोनेलचा नेहमींचा बाणा होता. ह्मणून हा जाहिरनामा लोकांनीं मान्य करावा असा त्यानें एकदम लेखी हुकूम सोडला. पण त्या हुकुमांतच जाहिरनामा काढल्याबद्दल खालीं लिहिल्याप्रमाणें अँगल्सीची त्यानें मोठ्या शिताफीनें फजिती उडविली. त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, "प्रत्यक्ष न्यायदेवतेचा अवतार[१६] जे लॉर्ड अँगल्सी यानें एक नवीन जाहिरनामा काढला आहे. त्या जाहिरनाम्याप्रमाणें वागण्यास आपण एकदम सुरवात करावी करावी, व त्याप्रमाणें होम्सच्या येथे कोणीही जमूं नये............पण सकाळच्या व संध्याकाळच्या जे-

१६. See Walpole's History of England Vol. III, P. 337.

वणाच्या वेळेस प्रत्येक आयरिश मनुष्यानें नेहमीं हें मनांत आणावें कीं, आपण ज्या देशांत रहात आहों त्या देशांत इंग्लंडांत जन्म पावलेल्या एका व्यक्तीची इच्छा ह्मणजेच कायदा, अशी स्थिति होऊन बसली आहे." यापुढें देखील ओकोनेलनें नव्या नव्या सभा स्थापन कराव्या व त्या लॉर्ड अँगलसीनें मोडून टाकाव्या, असा क्रम बराच वेळ चालू होता. शेवटीं तो उभय पक्षालाही मोठा त्रासदायक व कंटाळवाणा वाटून पुढें थोड्या दिवसांतच कांहीं काळपावेतों बंद पडला. लॉर्ड अँगलसीनें आपल्या बायकोला एका पत्रांत लिहिल्याप्रमाणेंच आयर्लंडाची स्थिति यावेळेस झाली होती खरी. त्या पत्रांत तो ह्मणतो "या गोष्टी आतां इतक्या थराला येऊन पोंचल्या आहेत कीं, आयर्लंडांत माझी सत्ता चालावयाची किंवा त्याची ( ओकोनेलची ) चालावयाची हाच कायतो प्रश्न आहे.

सन १८३१ चा जानेवारी महिना जसा आला तशी सरकारी अधिकाऱ्यांना व त्याबरोबर ओकोनेलला पुनः उसळी आली. त्या महिन्याच्या १३ तारखेला सरकारानें एक जाहिरनामा काढला व त्यांत असें फर्माविलें कीं, यापुढें कोणच्याही नांवाची व कोणच्याही स्वरूपाची सभा कोणीही भरवूं नये. या जाहिरनाम्याला उत्तरादाखल ह्मणून सुमारें ३५० लोक ओकोनेलनें आपल्या घरीं जेवणाकरितां ह्मणून बोलाविलें; व दुसऱ्या दिवशीं त्यांपैकींच ३१ असामींची एक कमेटी डॉसन स्ट्रीट नांवाच्या रस्त्यावर भरविली. ती कमेटी भरली असतां दोन माजिस्ट्रेट तेथें आले व त्यांनीं ती तात्काळीच मोडून टाकिली. पुढें ह्मणजे ता० १९ जानेवारी रोजीं सकाळीं १० वाजतां ओकोनेलला त्याच्याच घरीं जाहिरनाम्याविरुद्ध वर्तन केल्याबद्दल पकडण्यांत आलें. ता० २४ रोजीं त्याच्यावर खटला सुरू झाला. सन १८२९ च्या आक्टाविरुद्ध चौदा गुन्हे, व आयर्लंडांतील अपराध्यांस शिक्षा करण्याचा जो दुसरा एक कायदा होता त्या कायद्याप्रमाणें बंड केल्याबद्दल सत्रा गुन्हे, याप्रमाणें एकंदर ३१ गुन्हे केल्याचा त्याच्यावर आरोप ठेविला. चौकशीची तारीख १४

फेब्रुवारी रोजीं नेमिली. परंतु तो दिवस येण्याच्या अगोदरच ओकोनेल् अगदीं घाबरून गेला. त्यानें सरकारी वकिलाला असें कळविलें कीं, दुसरे सत्रा आरोप तुह्मी जर काढून घेत असाल तर मी पहिल्या १४ आरोपांच्या चौकशीच्या दिवशीं कोर्टांत गैरहजर राहून माझ्या विरुद्ध निकाल मिळवून घेतों. सरकारी वकिलानें हें ह्मणणें मान्य केलें व १७ आरोप काढून घेतले. व बाकी राहिलेल्या १४ आरोपांची चौकशीची तारीख एप्रिल महिन्याच्या पांच सहा तारखेपर्यंत पुढें ढकलली. कांहीं ग्रंथकारांचें असें ह्मणणें आहे कीं, या वेळेस ओकोनेल्नें चीफ् सेक्रेटरी स्टेनले याला एक पत्र पाठविलें. त्यांत असें लिहिलें कीं, सरकारानें माझ्यावर हल्लीं सुरू असलेला खटला जर काढून घेतला तर मी ऐक्य नाहींसें करण्याबद्दलची खटपट करण्याचें सोडून देईन. हें जर खरें असेल तर ह्यापेक्षां तो ओकोनेल्चा आणखी कोणचा पाणउतारा व्हावयास पाहिजे होता? त्यानें मागें अनेक प्रसंगीं सरकाराला अगदीं जेरीला आणिलें होतें, पण या प्रसंगीं सरकारानें त्याची चांगलीच रग जिरविली! वर सांगितलेला मजकूर आपण स्टॅनलेला पत्र पाठविलें होतें त्यांत लिहिला नव्हता असें त्यानें कॉमन्ससभेंत सांगितलें; पण त्याच्या मित्रमंडळीला देखील त्याचें तें सांगणें खरें वाटेना. शील तर असें ह्मणाला कीं, "तुरुंगाच्या भीतीनें त्याचें सर्व धैर्य या प्रसंगीं नाहींसें झालें." ओकोनेल् शरण आल्यावर--सरकारपक्षाची मंडळी आनंदसमुद्रांत गटंगळ्या खाऊं लागली. खटल्याचा निकाल होण्यापूर्वीं अशी एक गप्प उठली कीं, अधिकारारूढ असणाऱ्या पक्षाला ओकोनेल्च्या मताचें साहाय्य पाहिजे आहे. ह्मणून त्याच्यावर मेहरनजर करण्याचा व त्याजवरील खटला काढून घेण्याचा सरकारचा विचार आहे, व अखेरीस तीच गप्प खरी ठरली. पार्लमेंटाची सुधारणा करण्याचें बिल्, ज्याला इंग्रजींत रिफार्म बिल् ( Reform Bill ) असें ह्मणतात, तें मार्च महिन्याच्या दुसऱ्या तारखेला कॉमन्ससभेपुढें आलें. त्या बिलावर ओकोनेल्नें फारच

उत्कृष्ट भाषण केलें. इतक्यांत त्याच्या खटल्याचा निकाल सांगण्याची तारीख तिकडे जवळ आली. पण हें बिल् कॉमन्ससभेंतून निभावून जाईपर्यंत पार्लमेंटमध्यें तो हजर असणें अगदीं जरूर होतें. कारण तो व त्याचे सर्व अनुयायी या बिलाला अनुकूल मत देणार होते. तेव्हां अर्थातच निकालाची तारीख पुढें मे महिन्यापर्यंत लांबविली. मे महिन्यांत देखील निकाल देण्याचा प्रसंगच आला नाहीं. कारण मे महिन्याला आरंभ होण्याच्या अगोदरच आठ दिवस पार्लमेंट बरखास्त झालें व त्याबरोबर १८२९चा आक्टही नाहींसा झाला. ज्या आक्टाविरुद्ध ओकोनेल्नें गुन्हा केला होता, तो आक्टच नाहींसा झाल्यानंतर त्या आक्टाखालीं शिक्षा देतां येणार नाहीं, अशी त्याच्या तर्फेनें जेव्हां अडचण पुढें करण्यांत आली, तेव्हां ती सरकारालाही योग्य अशी वाटली व त्यामुळें ओकोनेल् त्यांच्या तावडींतून सुटून पूर्वीप्रमाणें पुनः मोकळा झाला.

पार्लमेंटाची सुधारणा करण्याच्या प्रश्नाचा अगदीं शेवटचा निकाल होईपर्यंत ओकोनेल् विग् पक्षाच्या बाजूचेंच नेहमीं मत देत होता. पण १८२९ सालीं, दरसाल चाळीस शिलिंग उत्पन्नाच्या कुळांचें जें नुकसान झालें होतें तें विग् लोकांच्या अमदानींत भरून काढण्याचा त्यानें पुष्कळ यत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. त्यानें असें सिद्ध करून दाखविलें कीं, आयर्लंड व इंग्लंड या दोन देशांच्या सांपत्तिक स्थितीची तुलना केली असतां आयर्लंडांत पौरजनाधिकारां ( Franchise )ची इयत्ता १० पौंड ठरविली ह्मणजे ती इंग्लंडांतील २० पौंडांच्या इयत्तेच्या बरोबरीला येते. याशिवाय मतदारांच्या संख्येसंबंधानें, निवडणुकीच्या वेळेस लागणारा खर्च कमी करण्यासंबंधानें, व आणखी इतर गोष्टीसंबंधानें त्यानें पुष्कळ तकरारी केल्या, पण त्यांना कांहीं उपयोग झाला नाहीं. चाळीस शिलिंग उत्पन्नवाल्या लोकांना पौरजनांचा अधिकार मिळणार नाहीं असें स्टॅनलेनें साफ सांगितलें. तथापि ओकोनेल्सारख्या हरएक प्रसंगीं उपयोगी पड-

णाऱ्या मित्राला अगदींच नाखुष करणें विग्पक्षाच्या लोकांना पसंत पडलें नाहीं. सबब त्याला खुष करण्याकरतां व कांहीं अंशानें रूपेरी बेडी त्याच्या पायांत ठोकण्याकरतां ह्मणून मोठ्या अधिकाराची एक जागा त्याला देण्याचा त्यांनीं विचार केला. पण ही जागा देण्याचा काय हेतु होता तो ओकोनेलनें अगोदरच ताडल्यामुळें त्यानें ती जागा नाकबूल केली. याप्रमाणें विग् लोकांच्या अमदानींत आपल्याला जरी नोकरी पतकरतां आली नाहीं, तरी पण विग् लोकांना हरएक प्रसंगीं आपण इतकी कांहीं उत्तम मदत केली आहे कीं, आपल्या नाहीं ह्मणण्यावरच त्यांनीं स्वस्थ न बसतां, दुसऱ्या कांहीं उपायानें आपलें उतराई झालें पाहिजे, असें ओकोनेलला वाटत होतें. शेवटीं ज्या पार्लमेंटांत रिफार्म बिल पास झालें तें ज्या दिवशीं बरखास्त झालें, त्या दिवशीं आयर्लंडचा उदयकाळ आतां जवळ आला असें ओकोनेलला वाटूं लागलें. पण त्या वेळेस तसें वाटणें किती चुकीचें होतें, याचा शेवटीं त्याला चांगलाच अनुभव आला.

# ड्यानियल ओकोनेलचें चरित्र.

## भाग ६वा.

### सुधारलेलें पार्लमेंट.

१८३३ ते १८३५.

मागच्या भागांत सांगितल्याप्रमाणें क्याथलिक लोकांची राजकीय बंधनांपासून मुक्तता झाली न झाली, तोंच परमेश्वराचा पुनः त्यांच्यावर कोप झाला. १८३० सालापासून विपत्ति आणि गुन्हे या ढगांचें आयर्लंड देशावर एकसारखें काहूर सुरू झालें होतें. चाळीस शिलिंग उत्पन्नाच्या कुळांची जी दशा झाली होती तिचें वर्णन करतां येणेंच कठिण आहे. मत देण्याचा त्यांचा अधिकार नाहींसा झाल्यामुळें, जमिनदार लोक त्यांच्याकडच्या जमिनी भराभर काढून घेऊं लागले. त्यामुळें ते अन्नाला केवळ मोताद होऊन बसले. बाजारांतील प्रत्येक जिनसांच्या किंमती कमी झाल्या व मजूरदारांना पुरे इतका रोजमुरा मिळेनासा झाला. कामाची जिकडे तिकडे चणचण उडाली. दक्षिणेकडच्या प्रांतांत एका आठवड्याला पांच शिलिंग इतकादेखील रोजमुरा एका मजूरदाराला पडत नव्हता. त्यांत आणखी विशेष हें होतें कीं, इतके कमी पैसे घेऊनदेखील मिळावें तितकें काम लोकांना मिळत नव्हतें. १८३०च्या पावसाळ्यांत बटाट्याचें पीक सफई बुडालें, व हिंवाळ्यांत दक्षिणेकडील व पश्चिमेकडील प्रांतांत दुष्काळ महाराजांची स्वारी प्रकट झाली. इंग्लंडांतील गरीब लोकांना मदत देण्याच्या हेतूनें 'पुअर लॉ' नांवाचा कायदा तिकडे जसा अमलांत होता, तसा आयर्लंडांत नव्हता. यामुळें अन्नावांचून मरणाऱ्या लोकांची कायद्याच्या द्वारानें कांहीं तरी

सोय करण्याला मार्गच नव्हता. हजारो लोक केवळ भिक्षा मागून कसा तरी आपल्या पोटाचा दीड वीत खळगा भरीत होते. क्याथलिक धर्मानुयायी मंडळींना विशेष चीड आणणाऱ्या अशा कराच्या दोन बाबी होत्या. त्या बाबी देतां देतां त्यांच्या नाकींनऊ येऊं लागले. त्या बाबी कोणच्या तर प्रॉटेस्टंट धर्माच्या लोकांकरितां आयर्लंडांत स्थापन केलेली धर्मसंस्था व त्या धर्मसंस्थेच्या आश्रयाखालीं असणारे त्याच धर्मामधील उपाध्याय, या दोघांचा खर्च भागविण्याकरितां प्रत्येक इसमाला दरसाल आपल्या प्राप्तीचा दहावा भाग द्यावा लागत होता. ही पहिली बाब. अशा प्रकारानें द्यावा लागणाऱ्या ‘ दहाव्या भागाला ’ इंग्रजींत ‘ टाइथ ’ [ Tithe ] ह्मणजे दशम विभाग, अशी संज्ञा दिली आहे. दुसरी बाब अशी होती कीं, क्याथलिक लोकांचा ज्यांत कांहीं संबंध नाहीं अशा, ह्मणजे केवळ प्रॉटेस्टंट धर्मामधील लोकांना उपयोगी पडणाऱ्या इमारती बांधण्याकरितां व त्या दुरुस्त राखण्याकरितां ‘ चर्च सेस् ’ [ Church-cess ] ह्मणजे ‘ धर्मसंस्थेकरतां बसविलेली पट्टी ’ या नांवाचा एक कर द्यावा लागत होता. हे दोन कर वसूल करण्याच्या कामांत लोकांवर अतिशय जुलूम होत होता, व त्यामुळें, त्यांना त्रासही फार भोगावा लागत होता. ‘ टाइथ ’चा बोजा जाणूनबुजून क्याथलिक लोकांवर ठेविलेला होता. पुष्कळ प्रसंगीं असें होत होतें कीं, ‘ टाइथ ’नें वसूल करण्याची रकम एकदां ठरवावयाची आणि मग मक्तेदारांना त्या रकमेचा मक्ता देऊन टाकावयाचा. मक्त्यानें ठरलेली रकम वसूल करून घेण्याकरतां वाटेल त्या उपायांची योजना करण्याचा अधिकार मक्तेदार लोकांना देण्यांत आला होता. त्यांच्या हातांत याप्रमाणें सत्ता आल्या-वर त्यांनीं रयतेवर अनन्वित जुलूम करून आपले खिसे भरून घेण्याकडे सर्व नजर दिली. जेथें हें काम मक्तेदार लोकांकडे न सोंपविल्यामुळें उपाध्येबोवांनाच करावें लागत होतें, तेथेंदेखील लोकांना पीडा झाल्या-वांचून रहात नव्हती. ज्या धर्मसंस्थेवर आमचा मुळींच विश्वास नाहीं, ज्या संस्थेच्या गार सावलींत आह्मीं कधींही उपासना करीत नाहीं, त्या संस्थेच्या खर्चाकरितां आह्मीं आपल्या पोटावर निख्याच्या फुल्या घालून

पैसे कां द्यावेत, असें क्याथलिक लोक विचारूं लागले. सिडने स्मिथ् नांवाच्या ग्रंथकारानें याच अर्थाचे उद्गार आपल्या एका लेखांत काढले आहेत, ते असे :—' आयर्लंडाच्या प्रत्येक भागांत एका सुंदरशा प्रार्थना मंदिरांत दर रविवारीं घाट वाजत असते; पण तो घाटेचा मधुर ध्वनि ऐकून स्वतः प्रार्थना सांगणारा एक उपाध्याय आणखी दोघे चौघे गृहस्थ इतकेच लोक काय ते त्या मंदिरांत जमतात; पण त्याच्याच पलीकडे सरासरी दोनशें यार्ड अंतरावर आपण नजर फेंकली तर आपल्याला असें दिसून येईल कीं, एका घाणेरड्या व पडक्या इमारतींत, वरून पाऊस पडत आहे, चोहोंकडून भणभण वारा वहात आहे, अशा स्थितींत हजारों क्याथलिक लोक ( प्रार्थना करण्याकरितां ) अगदीं एकाला एक असे चिकटून बसले आहेत.' इतकेंही असून लोकांनीं टाइथकर आनंदानें दिला असता; परंतु तो वसूल करण्याच्या कामांत लोकांवर जो अनन्वित जुलूम होत होता त्याचें वर्णन करणें कठिण आहे. वर सांगितलेला ग्रंथकारच यासंबंधानें असें ह्मणतो कीं, ' आयर्लंडांत या कराचा वसूल करण्याच्या कामीं आजपर्यंत सरासरी एक लक्ष मनुष्यें प्राणास मुकलीं असतील. या जुलमामुळेंच छोटेसें यादवी युद्ध होण्याचे अनेक वर्षांपासून धुमसत होतें; अनेक प्रसंगीं प्रॉटेस्टंट उपाध्येबोवांची दक्षिणा वसूल करण्याकरितां संगिनींचा व बंदुकींच्या गोळ्यांचा उपयोग करावा लागत होता; जागोजाग दंगे होत होते, व उभयपक्षांकडीलही मंडळी प्राणास मुकत होती. इतकेंही करून ज्या कामाकरितां गरीब लोकांकडून पैसा वसूल करण्यांत येत होता, त्याचा त्याच कामाकडे खर्च न होतां भलत्याच कामाकडे होत होता. उपाध्ये मंडळींचीं खाजगीं घरें बांधण्याकडेदेखील याच पैशाचा उपयोग करावयाचा! कोण हा जुलूम आणि काय ही अंदाधुंदी! शेवटीं शेवटीं ह्या जुलमाचा इतका कांहीं कळस झाला, कीं, यापुढें तो सहन न करतां त्याचा कांहीं तरी प्रतिकार करणें अगदीं अवश्य आहे; असें क्याथलिक लोकांना वाटूं लागलें व त्याप्रमाणें ते लवकरच त्या मार्गाला लागले. मुक्तता करून घेण्याच्या कामांत यश आल्यामुळें आपल्या अंगांत कांहीं तरी तेज आहे, अशी क्याथलिक लोकांची पक्की

खात्री झाली होती, व त्यामुळें आपण आरंभिलेल्या उद्योगांत आपल्याला निस्संशय यश येईल असा त्यांना भरंवसा होता व ह्मणून त्यांनीं आरंभिलेला उद्योग फलद्रूप होण्याचा बराच संभव होता. असो.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें ‘ इम्यान्सिपेशन आक्ट ’ पास झाल्यानंतर देखील क्याथलिक लोकांच्या हक्कांकडे राज्यकर्त्यांकडून दुर्लक्ष केलें जातें असें जेव्हां ओकोनेल्च्या लक्षांत आलें, तेव्हां इंग्लिश लोकांचा याबद्दल सूड घेतल्याशिवाय मी कधींही राहणार नाहीं, अशी प्रतिज्ञा करून तो आयर्लंडला परत गेला ही गोष्ट वाचकांच्या स्मरणांत असेलच. तेथें गेल्यावर प्रत्यक्ष इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य नाहींसें करण्याचाच त्याचा जरी हेतु नव्हता, तरी त्यानें जो उद्योग सुरू केला होता तो कांहीं अंशीं त्याच धोरणावर होता. यामुळें वरच्या पारिग्राफांत सांगितल्याप्रमाणें क्याथलिक लोकांचा निश्चय झालेला पाहून त्याला फारच आनंद वाटला व आपणही त्यांना जाऊन मिळाला. ओकोनेल्ची मदत मिळाल्यानंतर क्याथलिक लोकांच्या अंगांत जास्त पाणी चमकूं लागलें व त्यांनीं आपला उद्योगही मोठ्या उत्साहानें चालू ठेविला. सरकारानें हा उद्योग हाणून पाडण्याचा क्रम एकसारखा सुरू ठेविला होता, व त्यांत त्यांना यश येण्याचीं चिन्हेंही दिसूं लागलीं होतीं. परंतु ओकोनेल् हा येवढ्यानेंच डगमगणारा मनुष्य नव्हता. पहिल्यापेक्षांही अधिक उत्साहानें हातीं धरलेला उद्योग मध्येंच सोडून न देण्याविषयीं तो लोकांस उपदेश करूं लागला. या उद्योगांत यश आल्यानंतर पुढें आपल्याला कोणकोणच्या गोष्टी साध्य करून घ्यावयाच्या, याबद्दल त्यानें एक पत्र छापून प्रसिद्ध केलें व तद्वारा क्याथलिक लोकांच्या अंगांत त्यानें जास्त उत्साह आणिला. आपल्या स्वतःविषयीं एके ठिकाणीं त्यानें पुढें दिलेले उद्गार काढिले—‘ माझा पहिला निश्चय हा आहे कीं, आपण होऊन खुषीनें टाइथ कर कधींही द्यावयाचा नाहीं, दुसरा निश्चय हा आहे कीं, धर्मसंस्थेकरितां बसविलेली पट्टी आपण होऊन खुषीनें केव्हांही द्यावयाची नाहीं, व तिसरा निश्चय हा आहे

कीं, टाइथ किंवा आतांच सांगितलेली पट्टी वसूल करण्याकरितां विकला जाणारा एकही जिन्नस स्वतःकरतां विकत घ्यावयाचा नाहीं.'

त्याच्या उपदेशाचा आयरिश लोकांवर योग्य तो परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं, व दोन्हीही कर न देण्याचा आयर्लंडांतील सर्व लोकांचा निश्चय झाला. या गोष्टीला वर्ष सहा महिने झाले नाहींत तोंच, ह्मणजे १८३१ सालाच्या अखेरीस, लोकांकडे या कराची बरीच बाकी थकली व ती सर्व वसूल करणें पुरोहित लोकांच्या अवांक्याबाहेर गेलें. त्यांचा सर्व चरितार्थ चालावयाचा याच उत्पन्नावर. यामुळें शेंकडों मंडळींची उपासमार होऊं लागली. ही त्यांची शोचनीय स्थिति पाहून पार्लमेंटामधील सभासदांच्या मनांत त्यांच्याविषयीं कळवळा उत्पन्न झाला. परंतु चमत्कार हा कीं, या कराकरितां पिळून निघणाऱ्या रयतेची स्थिति पाहून त्यांच्या मनांत कांहींच कळवळा उत्पन्न झाला नाहीं! या प्रश्नाचा विचार करण्याकरितां पार्लमेंटच्या दोन्ही सभांनीं वेगवेगळ्या कमेट्या नेमिल्या. या दोन्ही कमेट्यांत एकादेखील क्याथलिक मनुष्याची योजना केली नाहीं हें पाहून ओकोनेल्ला अतिशय संताप आला व त्यानें ती गोष्ट लोकांच्या नजरेस आणून दिली. तो ह्मणाला कीं 'टाइथ मागितल्याबरोबर क्याथलिक लोकांनीं तो द्यावयाचा यापलीकडे त्यांचा त्यांत कांहीं संबंध नाहीं.' टाइथ माफ करण्याचा प्रश्न एकीकडेच ठेवून उलट तो कर कसा गोळा करावा याच प्रश्नाचा विचार करून दोन्ही कमेट्यांमधील मंडळी स्वस्थ बसली. त्यांनीं दिलेल्या अभिप्रायाप्रमाणें, ओकोनेल्नें कितीही जरी कंठशोष केला, तरी पार्लमेंटानें एक ठराव पास केला व त्यांत असें ठरविलें कीं, पुरोहित लोकांची सद्यःस्थिति दूर होण्याकरितां सरकारानें त्यांस ६०,००० पौंड आगाऊ द्यावे व लोकांकडे थकलेली बाकी वसूल करण्याचें काम सरकारानें आपल्या हातांत घ्यावें. या ठरावाप्रमाणें हें काम सरकारानें जरी आपल्या हातांत घेतलें तरी त्यांनादेखील पुरोहित व मक्तेदार यांच्यापेक्षां अधिक यश आलें नाहीं. पुष्कळ ठिकाणीं हाणामाऱ्या व रक्तपात झाल्यावर

सगळ्या बाकीपैकीं १२,००० पौंड इतकी रकम कायती वसूल झाली, आणि इतका वसूल होण्याला खर्च लागला १४,००० पौंड! लोक जेव्हां वसूल देईनासे झाले तेव्हां सरकारानें त्यांचा माल जप्त करण्याची सुरुवात केली. प्रांताधिकारी [ शेरिफ ] बरोबर लष्करी शिपाई घेऊन गरीब रयतेच्या गाई धरून धरून नेऊं लागला. त्या गाई प्रथमत: त्यांच्या मागें व पुढें शिपाई अशा थाटानें साऱ्या गांवभर हिंडवीत हिंडवीत मग बाजारांत नेऊन उभ्या करावयाच्या. याप्रमाणें बाजारांत गाई आलेल्या पाहिल्या कीं, गांवांतल्या सर्व लोकांनीं आपलें कामकाज सोडलें ह्मणून समजावेंच! प्लेग झालेल्या मनुष्याजवळ दुसरा मनुष्य जाण्यास जसा कचरतो व त्याच्यापासून होतां होईल तितका दूर राहतो, त्याप्रमाणें एकही मनुष्य त्या गाई विकत घेण्याकरतां जवळ नव्हता, त्यांच्यापासून दूरदूरच उभा रहात होता. शेवटीं त्या गाईंना एकही गिऱ्हाईक मिळालें नाहीं ह्मणजे ते लष्करी लोक व त्या गाई असे सगळेंच्या सगळें लटांबर परत जावयाचें. याप्रमाणें न्यायाचें ह्मणून सरकारानें जें कृत्य आरंभिलें, त्याची लोकांनीं अशी थट्टा करावयाची सुरुवात केली. सरकार तरी लोकांपुढें काय करणार? आणि त्यांतून या वेळेला त्यांनींही एक विशेष खबरदारी घेतली होती कीं, सरकाराच्या अधिकाऱ्यांशीं हात घाईचा प्रसंग कधींही आणावयाचा नाहीं, व कदाचित् तशी वेळ आली तर त्यावेळेस गय खाल्ल्यासारखें करून पडती बाजू घ्यावयाची. पण ती वेळ एकदां कां निघून गेली, ह्मणजे पुन: सरकारच्या उलट लोकांचीं मनें चिथरिवण्याचा क्रम सुरू करावयाचाच! म्याकार्थीनें[१] एके ठिकाणीं जें ह्मटलें आहे तें अगदीं बरोबर आहे. तो ह्मणतो:—“ राजसत्ता झुगारून देण्याकरतां लोक उघडाउघड बंड करूं लागले ह्मणजे तें बंड, राज्याचें-सामर्थ्य कितीही कमी असलें तरी, मोडणें कठीण जात नाहीं. परंतु बसल्या ठिकाणाहूनच दृढ निश्चयानें व व्यवस्थित रीतीनें सरकाराच्या कामाला व्यत्यय आणावयाचा असा एकदां कां लोकांनीं निश्चय केला ह्मणजे मोठे मी मी ह्मणणाऱ्या राष्ट्राची देखील

---

१. पहा Mc Carthy's Epoch of Reform P. 100.

तेथें कांहीं मात्रा चालत नाहीं. याचें कारण असे असतें कीं, सरकाराची इकडे जरा उचल दिसली कीं तिकडे पडती बाजू घ्यावयाचीच व ती उचल नाहींशीं झाली कीं पुनः पूर्वस्थिति कायम, असा या लोकांचा क्रम अगदीं ठरलेला असतो."

पण हा क्रम स्वीकारल्यामुळेंच आयरिश लोकांचें फार नुकसान झालें. १८३२ सालच्या हिंवाळ्यांत जितके गुन्हे व जितकी अव्यवस्था झाली तितकी पूर्वीं कधींच झाली नव्हती. अनेक नवीन गुप्त मंडळ्या अस्तित्वांत आल्या; गुरेंढोरें छिन्नविच्छिन्न करण्यांत आलीं. टाइथ गोळा करण्याकडे नेमलेल्या कामगारांचे खून झाले. १८३२ त राजकीय स्वरूपाचे असे एकंदर ९००० गुन्हे झाले. त्यांपैकीं २०० गुन्हे खुनाचे होते. कांहीं कौंटीमधील हकीगत तर फारच भयंकर होती. किल्केनी नांवाच्या परगण्यांत बारा महिन्याच्या मुदतींत एकंदर ३४ घरें जळालीं, ९१९ चोऱ्या झाल्या व ३२ खून झाले. इतके गुन्हे होत तरी त्यांत पुरावा मिळण्याची फार पंचाईत पडे. [२] पुरावा मिळालाच तर जूरीनें निरपराधी असा आपला अभिप्राय द्यावयाचा. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, हल्लींचे कायदे आहेत त्याच्यापेक्षां जास्त कडक कायदे पाहिजेत, असें प्रधानमंडळीला वाटूं लागलें.

अधिकारारूढ असणारा पक्ष पहिल्या सुधारलेल्या पार्लमेंटांत फारच बलवान् होता. १८३१ सालीं कॉमन्स सभेंतील सभासदांची निवडणूक झाली त्यावेळेस होतां होईल तितके सुधारणेला अनुकूल असे उमेदवार निवडून येणें अवश्य होतें, म्हणून ऐक्य नाहींसें करण्याचा प्रश्न ओकोनेल्नें पुढें आणिलाच नाहीं. परंतु १८३२ सालीं पार्लमेंट सुधारण्याचा कायदा ( रिफॉर्म आक्ट ) पास झाल्या नंतर ऐक्याला प्रतिकूल असतील तेवढेच उमेदवार निवडून देण्याविषयीं मतदार लोकांस त्यानें आग्रहपूर्वक सांगितलें. आयर्लंडाच्या तर्फेनें जेवढे सभासद निवडून आले, त्यांपैकीं

२. पहा Walpole's History of England Vol. III, P. 141—148.

सरासरी निम्मे सभासद त्यानें सांगितल्यामुळें निवडून आले होते. एकंदर १०५ सभासदांपैकीं फक्त २३ जण कायते टोरी पक्षाचे होते. बाकीचे ८२ लिबरल पक्षाचे होते, व त्यांपैकीं ४५ ऐक्याला प्रतिकूल असे होते. विग् पक्षानें पुढें आणिलेल्या....रिफार्म बिलाचा विचार चालू असतांना आयरिश सभासदांनीं त्या बिलाला अनुकूल अशीं मतें दिलीं नसतीं, तर तें केव्हांही पास झालें नसतें. यामुळें त्या पक्षांतील लोकांवर आयरिश लोकांचे एक प्रकारचे उपकार झाले होते, ते उपकार फेडण्याची हल्लींच्या नवीन पार्लमेंटांत विग् लोकांना चांगली संधि आली होती. कारण त्यांच्या बाजूचे लोकांचा त्यांत फारच मोठा भरणा होता, यामुळें आयर्लंडाच्या कल्याणाचा एखादा कायदा पास करून घेणें त्यांना मुळींच अवघड गेलें नसतें.

परंतु प्रधानमंडळीनें आयरिश लोकांचे उपकार फेडण्याचा निराळाच एक मार्ग शोधून काढिला. ऐक्याचा कायदा पास झाल्यापासून जेवढे ह्मणून नियामक कायदे झाले त्या सर्वांवर ताण करणारा कोअर्शन आक्ट ( Coercion Act ) या नांवाचा एक कायदा त्यांनीं कॉमन्स-सभेपुढें सादर केला. मुख्य प्रधान लार्ड ग्रे याच्यावर स्टॅनलेचें फार वजन होतें व तो आयरिश लोकांनीं व विशेषत: ओकोनेलला अगदीं पाण्यांत पहात होता. त्यानेंच भर दिल्यामुळें मेल्बोर्न, अल्थॉर्प वगैरे मुत्सद्यांनीं आपली असंमति दर्शविली असतां तिच्याकडे दुर्लक्ष करून लॉर्ड ग्रेनें वर सांगितलेलें बिल सभेपुढें ठेविलें. आपल्यावर फार मोठें संकट चालून येत आहे असें ओकोनेलनें पाहतांक्षणींच प्रधान मंडळीनें आरंभिलेल्या राज्यरीतीवर त्यानें मोठ्या धैर्यानें, उत्साहानें आणि निर्भर्त्सनापूर्वक अशी वेळेवरच टीका करण्यास सुरुवात केली. पार्लमेंट सुरू होतांक्षणींच आरंभीं होणाऱ्या राजाच्या भाषणावर त्यानें जो वाद-विवाद सुरू केला तो एकसारखा तीन रात्रीं चालला होता. ओकोनेलनें आपल्या स्वत:च्या भाषणांत प्रधान मंडळीला ‘ क्रूर व निर्दय ’ अशीं विशेषणें दिलीं व तीं इतक्या वेळा कीं, त्याबद्दल स्पीकरला—अध्यक्षाला—त्याची कानउघाडणी करणें भाग पडलें. शेवटीं त्यानें असें

सांगितलें कीं, ‘ क्याथलिक लोकांची स्थिति सुधारण्याविषयीं पार्लमेंटानें कायदा केला खरा; परंतु अम्मलबजावणी करणाऱ्या अम्मलदारांच्या अरेरावी वर्तनामुळें तो कायदा पास होऊन न होऊन सारखाच आहे. तो कायदा पास झाल्याला आज सरासरी चार वर्षे झालीं. परंतु तितक्या अवधींत एकाही क्याथलिक मनुष्याची न्यायासनावर योजना झाली नाहीं. न्यायखात्याची ही गोष्ट झाली. इतर खात्यांत क्याथलिक लोकांना त्यांच्या हक्काप्रमाणें नोकऱ्या किंवा सरकारी जागा मिळाल्या असतील ह्मणावें तर तेंही नाहीं. मिळून सर्वत्र त्यांच्या हक्कांची पायमल्लीच होत आहे. ओकोनेलच्या या भाषणाचा कांहीं एक उपयोग न होतां बहुमतानें राजाचें भाषण पसंत ठरलें.

यानंतर जसाजसा प्रसंग येईल तसातसा आपल्या बाजूनें त्याचा उपयोग करून घेण्याचा क्रम ओकोनेलनें सुरू ठेविला. एकेवेळीं त्यानें उघड रीतीनें असें सांगितलें कीं, प्रधान मंडळीनें आयर्लंडाकरितां जो नवीन कायदा करण्याचें मनांत आणिलें आहे, तो कायदा पास झाला ह्मणजे, मी चालविलेल्या ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला जितकें लवकर यश येणें शक्य आहे, त्याच्यापेक्षां जास्त लवकर या कायद्यानें येईल. फेब्रुवारी महिन्याच्या २७ तारखेला (१८३२) आयर्लंडांतील दंगे मोडण्याकरितां तयार केलेलें बिल कॉमन्स सभेंत लॉर्ड आलथ्रापनें पहिल्यानें वाचून दाखविलें. त्याच्या मर्जीविरुद्ध हें काम त्याला मुख्य प्रधानानें करावयास सांगितलें होतें, ह्मणून सभेपुढें ठेविलेल्या बिलाचें त्याच्या हातून व्हावें तसें समर्थन झालें नाहीं इतकेंच नाहीं, तर त्याच्या बोलण्यापासून सभासदांच्या मनावर उलटाच परिणाम होऊं लागला व त्यामुळें कोअरशन बिलरूपी नवीन अर्भक जन्मताक्षणींच मरतें कीं काय अशी प्रधान मंडळीच्या पोटांत भीति उत्पन्न झाली. आपली बाजू अशा रीतीनें घसरूं लागली आहे, ती सांवरून धरण्याची कांहींतरी खटपट केली पाहिजे अशा अर्थाचे निरोपावर निरोप लॉर्ड ग्रे मुख्य प्रधान याजकडे जाऊं लागले. त्यानें ऑलथ्रापची कागदाची पेटी स्टॅनलेकडे पाठ-

विली. ती पेटी घेऊन तो माडीवरील एका खोलींत गेला आणि खोलीचीं दारें लाऊन आंत पेटींतील कागद वाचीत बसला[३]. दोन तासांत बिलावर भाषण करण्याची त्याची जय्यत तयारी झाली. मध्यरात्र झाल्यानंतर स्टॅनले बोलावयास उभा राहिला. त्यावेळचें त्याचें भाषण इतकें उत्तम व जोरदार झालें कीं, कॉमन्ससभेच्या आजपर्यंतच्या इतिहासांत त्याच्या तोडीचें भाषण झालेलें कोणाला माहीत नव्हतें. आलथॉपच्या भाषणानें बिलाला प्रतिकूल असा जो सभासदांचा ग्रह झाला होता तो या भाषणानें नाहींसा होऊन बहुतेक सर्व सभासदांनीं अनुकूल असा आपला अभिप्राय दिला. आयर्लंडांत घडलेल्या गुन्ह्यांची हकीगत स्टॅनलेनें सभासदांपुढें अशी कांहीं संविधानपूर्वक ठेविली कीं ती त्यांच्या मनावर चांगली ठसली. बोलतां बोलतां तो ओकोनेल्वर इतका तुटून पडला कीं, त्याच्यायोगानें त्याचा चेहरा "शिक्षा झालेल्या एखाद्या गुन्हेगाराप्रमाणें काळा ठिक्कर पडला" असें एका तत्पक्षीय गृहस्थानें लिहून ठेविलें आहे. तो आणखीं असेंही ह्मणाला कीं, आयर्लंडांत जे गुन्हे होत आहेत व ज्यांच्याबद्दल तेथल्या लोकांना प्रायश्चित भोगावें लागत आहे. तें सर्व ओकोनेल्नें सुरू केलेल्या चळवळीचें फळ होय. त्यावर ओकोनेलनें उत्तरादाखल भाषण करून त्याचे बरेच मुद्दे खोडून काढले. परंतु त्याच्या भाषणाचा सभासदांच्या मनावर परिणाम झाल्याचें कांहींच चिन्ह दिसलें नाहीं. परंतु एवढ्यानेंच तो निराश झाला नाहीं. बिलाचें दुसरें वाचन होण्याच्यावेळीं प्रधान मंडळीचा पराभव करण्याच्या इराद्यानें तो उद्योगाला लागला. आयरिश प्रश्नासंबंधानें मनाची समता ढळूं न देतां मोठ्या युक्तीनें व प्रमाणाला धरून आपणांस प्रतिकूळ असणाऱ्या लोकांबरोबर वादविवाद करण्यास सुरवात केली व शेवटीं प्रधान मंडळीच्या पक्षपाती सभासदांवर त्यानें आपली बरीच छाप बसविली. दुसरे सभासद विचारतील ती माहिती त्यांना मोकळ्या मनानें देऊन व त्यांच्याशीं सौम्यपणानें व विनयानें

---

३. पहा Walpole's History of England Vol. III, PP. 379/380.

लागून सदरहू बिल कमेटीपुढें असतां, आपली घसरलेली बाजू सुधारण्याचे त्याला जेवढे जेवढे प्रसंग आले तेवढे तेवढें त्यानें वाया जाऊं दिले नाहींत. कमेटींतें बिलाचें काम चालू असतां आपला प्रतिस्पर्धी किती उद्योगी आणि प्रबल आहे याची स्टॅनलेला चांगलीच प्रतीति आली. परंतु कॉमन्ससभेंत आयरिश सभासदांची संख्या फार थोडी होती, यामुळें ओकोनेल्च्या श्रमाचें चीज झालें नाहीं. बिलाचें दुसरें वाचन ज्यावेळेस झालें, त्यावेळेस ८४ सभासदांनीं कायतीं आपलीं उलट मतें दिलीं. एखाद्या बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळेसच तें पास व्हावयाचें किंवा नाहीं हें बहुतकरून ठरत असतें. दोनदां पास झालेलें बिल तिसऱ्या वाचनाच्या वेळेस नापास झाल्याचीं उदाहरणें इंग्लंडच्या इतिहासांत फारच क्वचित् प्रायः नाहींतच असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अर्थात् दुसरे वाचनाच्यावेळीं प्रधान मंडळीनें पुढें आणिलेलें बिल पास झाल्यावर ओकोनेल्च्या मनांत जो आशातंतु होता तो तुटून गेला. तें बिल फार मोठ्या मताधिक्यानें पास झालें. सबंध डिस्ट्रिक्टच्याडिस्ट्रिक्ट ( जिल्हे, प्रांत ) कायद्यानें होणाऱ्या रक्ष-

---

४. एखादा कायदा पार्लमेंट सभेंत पास होण्याचा क्रम पुढें लिहिल्याप्रमाणें असतो:— जो कायदा हवा असेल तो प्रथम बिलाच्या रूपानें कॉमन्स किंवा लार्डस्च्या सभेंत येतो. त्या बिलाचें **पहिलें वाचन** उलट पक्षानें हरकत घेतल्यावांचून होतें. तें बिल मग छापून काढतात आणि त्याचें **दुसरें वाचन** करण्याकरतां एक दिवस नेमितात. दुसऱ्या वाचनाच्या वेळीं तें जर पास झालें तर 'कमेटींत' (in committee) बिलांतील प्रत्येक कलमांवर सभा आपलें मत देतें. कमेटींतून बिल निघालें ह्मणजे त्यांत ज्या काय दुरस्त्या झाल्या असतील त्यासह तें बिल सभेकडे 'रिपोर्ट होतें' व **तिसऱ्या वाचना**करतां तें तयार होतें. तिसऱ्या वाचनाच्या वेळीं जर पास झालें तर तें दुसऱ्या सभेकडे जातें. तेथें त्याची वर सांगितल्याप्रमाणेंच व्यवस्था होतें. दोन्ही सभांतून बिनहरकत बिल पास झाल्यावर त्याला कायद्याचें स्वरूप येण्याच्या पूर्वी राजाचें संमत घ्यावें लागतें. कमेटींत बिलाचा विचार होतेवेळेस स्पीकर हजर असत नाहीं, व वादविवादाचे नेहमीचे जे नियम असतात ते पाळले जात नाहींत.

णाच्या बाह्य आहे असें प्रसिद्ध करणें, सभा भरूं न देणें, रात्र झाल्यावर आपल्या घराबाहेर पडण्याचा लोकांना प्रतिबंध करणें, लष्करीकायदा सुरू करणें, हत्याराकरतां झाडा घेणें, आरोपाची चवकशी होण्यासाठीं मला न्यायासनासमोर न्या व तेथें कायतो निर्णय होऊंद्या असें ह्मणण्याचा ज्या कायद्यानें आरोपीस हक्क दिला आहे, तो कायदा तेवढ्या वेळेपुरता रद्द करणें, लष्करी कोर्टापुढें कैद्याची चवकशी करणें, हे सर्व अधिकार हें बिल पास झाल्यापासून सरकाराला मिळाले. ओकोनेल्नें स्थापन केलेली 'सोसाइटी ऑफ्व्हालंटिअर्स' ( Society of volunteers ) नांवाची सभा, या नवीन बिलाच्या आधारानें सरकारानें बंद पाडण्याच्यापूर्वी आपण होऊनच सभासदांनी बंद पाडली.

इतकें झालें तरी आयरिश लोकांचें दुःख निवारण करण्याची विग् लोकांची मनापासूनची इच्छा होती. त्याप्रमाणें क्याथलिक लोकांना, धर्माच्या बाबतींत कांहीं सवलती देण्याच्या हेतूनें त्यांनीं एक बिलें[१] पार्लमेंटापुढें आणिलें व पास करून घेतलें; परंतु त्यापासून त्यांना व्हावा तसा फायदा झाला नाहीं. त्यानंतर पार्लमेंटाला सुट्टी झाली. त्या सुट्टींत प्रधान मंडळींत बरीच अदलाबदल झाली. ओकोनेल्चें मन वळवून घेण्याची त्यांच्यापैकीं बऱ्याच मंडळींनीं खटपट केली. रोमन क्याथलिक लोकांचा पुढारी मंत्रिमंडळींच्या घरीं जाऊन त्यांच्या पंक्तीला जेवावयास बसतो हें पाहून, प्रॉटेस्टंट लोकांची तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोहोंचूं लागली. पण त्यांच्या नशिबानें त्याला एकाद्या अधिकाराच्या जागेवर पहाण्याचा त्यांना प्रसंग आला नाहीं. ओकोनेल् आपल्या एका मित्राला असें लिहितो कीं :—"प्रधान मंडळीनें मला आजपर्यंत बऱ्याच जागा देण्याचें कबूल केलें व अजूनही ते देण्याला कबूल आहेत....पण त्याचा माझ्यावर कांहींएक परिणाम होत नाहीं. मी उभा राहिल्या ठिकाणाहून एक गहूंभरदेखील मागें सरत

---

१. या बिलाचें नांव ( 'Church temporaties Bill' ) असें होतें.

नाहीं.' जर मी त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें एखादी जागा पतकरीन, तर मी त्यांचा गुलाम होऊन राहीन. जागा न पतकरतां जर मी राहिलों तर मी त्यांचा बऱ्याच अंशानें धनी होईन."

तीन वर्षांहून अधिक दिवसपर्यंत लेखनद्वारें व भाषणद्वारें आयरिश लोकांना ओकोनेल् असा उपदेश करीत होता कीं, सर्व वर्गाच्या व सर्व धर्माच्या लोकांनीं एकादिलानें ऐक्य नाहींसें करण्याची खटपट सुरू केली पाहिजे. क्लेअरतर्फे निवडून येण्याकरितां उमेदवार ह्मणून तो उभा राहिला असतां त्यानें जें भाषण केलें होतें त्यांतच त्यानें या विषयाचें सूतउवाच करून ठेविलें होतें. १८३१ सालच्या पावसाळ्यांत दक्षिणेकडील प्रांतांत त्यानें या विषयावर अनेक भाषणें केलीं व लेख लिहिले व त्यांच्यायोगानें लोकांच्या मनावर परिणामही चांगला झालेला दिसला व त्यावरून आपण मनांत आणिलेला विचार लवकरच चांगला रेखारूपाला येईल अशी त्याच्या मनांत प्रबळ आशा उत्पन्न झाली. १८३१ मध्यें त्याजवर चाललेला खटला काढून घेण्याविषयीं स्टॅनलेपाशीं त्यानें बोलणें सुरू केलें होतें, व त्यांत त्यानें एकी नाहींशी करण्याचा यापुढें आपण उद्योग करणार नाहीं असें त्याला अभिवचन दिलें होतें; त्यांत त्यानें आपल्या मनाशीं असा विचार केला असावा कीं, इष्ट हेतु साध्य करून घेण्याचा आयरिश पार्लमेंट हा एक उपाय आहे इतकेंच; आणि त्यांतून आयरिश लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचें इंग्लिश पार्लमेंटानेंच जर मनावर घेतलें, तर झालेलें आहे तें ऐक्य नाहींसें करण्याचें मुळीं प्रयोजनच रहात नाहीं. याच अर्थाचे १८३३ सालीं त्यानें कॉमन्स सभेंत एकदां उद्गार काढिले होते. तो ह्मणाला "हल्लींचें सरकार माझ्या देशाशीं अन्यायानें वागत आहे ह्मणून मी एकीच्या विरुद्ध खटपट करण्यास तयार झालों आहें. अशी जर माझी एकदां खात्री झाली कीं, हल्लींच्या व्यवस्थेनेंच आयर्लंडाचें कल्याण होण्याचा संभव आहे, तर मग ती व्यवस्थाच कायम राखण्याकरितां मी जितका यत्न करीन तितका दुसरा कोणाच्याही हातून होणें नाहीं. १८३१

सालांतील निवडणुकीच्या प्रसंगीं दुसऱ्या कांहीं कारणामुळें हा प्रश्न त्यानें जरा मागें टाकिला होता; परंतु तो पुनः लागलीच हातांत धरिला हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. तोच प्रश्न, आतां कोअरशन बिल पास झाल्यामुळें, लोकांच्या विचाराकरितां पुनः पुनः त्यांच्यापुढें मांडणें फार जरूर आहे असें त्याला वाटूं लागलें आहे.

तथापि एक गोष्ट ओकोनेलच्या मनांत पक्की बिंबली होती ती ही कीं, आयर्लंडांत या चळवळीला चांगलें स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय कॉमन्ससभेंत त्यासंबंधाची सूचना करणें व्यर्थ आहे. इतकें त्याला समजत असून १८३४ त त्यानें तो प्रश्न पार्लमेंटपुढें काढला. ऐक्य झाल्यापासून आयर्लंडतर्फे जे सभासद निवडून येत होते, त्यांच्यांत इंग्लंडांतील सभासदाप्रमाणेंच आजपर्यंत विग् व टोरी असे दोन पक्ष होते. 'आयरिश पार्टी (पक्ष)' ह्मणून अगदीं निराळा असा पक्ष नव्हता. परंतु पहिल्या सुधारलेल्या पार्लमेंटांत ऐक्याला प्रतिकूल असणाऱ्या लोकांचा जेव्हां विशेष भरणा झाला, तेव्हां ओकोनेलच्या देखरेखीखालीं काम करणारा हा तिसरा पक्ष अस्तित्वांत आला. यावेळेस हा जो पक्ष अस्तित्वांत आला तो आजपर्यंत तसाच कायम आहे व त्याच्या अंगीं आजमितीला फार मोठें सामर्थ्य आलें आहे. अधिकारारूढ असणाऱ्या प्रधान मंडळीच्याच हातांत सत्ता राहूं द्यावयाची किंवा ती हिरावून घ्यावयाची, पार्लमेंटांत कोणच्या राजकीय पक्षाची सरशी होऊं द्यावयाची किंवा कोणच्या पक्षाचा पाडाव करावयाचा या प्रश्नांचा निकाल सर्वस्वी या तिसऱ्या पक्षाच्या मर्जीवर अवलंबून आहे. असो. १८३३ सालीं शेवटची निवडणूक झाल्यापासून पार्लमेंट खुलें होईपर्यंत मध्यें जो अवकाश सांपडला, तेवढ्यांत आपल्या पक्षाच्या मंडळीनें कसें वागावें यासंबंधानें त्यांना कांहीं सूचना करण्याचा ओकोनेलचा विचार होता. परंतु त्याला मिळावा तितका वेळ न मिळाल्यामुळें डब्लीन येथें त्याची एक सभा भरविण्यापेक्षां त्याला जास्त कांहीं करतां आलें नाहीं. तथापि आपल्या अंगांत जें सामर्थ्य आलें आहे, त्याचा चांगला

उपयोग करून आपली अनुयायी मंडळी आपल्या अगदीं अध्यां वचनांत राहील असें करण्याचा त्याचा इरादा होता. फरगस ओकोनेर नांवाचा एक सभासद होता तो फार दुराग्रही मनुष्य होता. ओको-नेल्नें आपल्यावर सत्ता चालवावी हें त्याला पसंत नव्हतें. ऐक्य नाहींसें करण्याबद्दलचा वादविवाद चालू ह्मणजे १८३३ सालींच सुरू केला पाहिजे असा त्यानें आग्रह धरिला. ओकोनेल्नें त्याचें मन वळ-विण्याचा यत्न केला, पण तो आपला आग्रह कांहीं केल्या सोडीना. शेवटीं ओकोनेलला तो असें ह्मणाला कीं, हा वादविवाद तुह्मी जर सुरू करणार नाहीं, तर मी तो स्वत: सुरू करीन. इतक्या थरावर जेव्हां गोष्ट येऊन पोंहोंचली, तेव्हां हें नाजुक काम दुसऱ्याच्या हातांत देण्या-पेक्षां आपल्याच हातीं घेणें चांगलें, असा विचार करून पार्लमेंटांत तो प्रश्न काढण्याचें त्यानें ठरविलें. हें काम करण्याचें त्यानें किती नाखु-षीनें पतकरिलें, हें त्यानें आपल्या एका मित्राला त्या वेळेस जें पत्र लिहिलें आहे त्यावरून स्पष्ट होतें.

आपल्या हाताखालच्या लोकांना आपल्या ताब्यांत ठेवण्यासंबंधाचा दुसरा एक प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळेस आतां सांगितल्याप्रमाणें गय न खातां कायमचा निकाल लावणें ओकोनेलला अवश्य वाटलें. हल्-तर्फेचा सभासद मि० हिल् यानें आपल्या मतदार लोकांच्या सभेपुढें एकदां असें सांगितलें कीं, 'कोअरशन बिल' ज्या वेळेस पार्लमेंटपुढें होतें, त्यावेळेस आयरिश सभासद बाहेरून जरी त्या बिलाच्या विरुद्ध मत देत होते, तरी आंतून तें पास करण्याविषयीं प्रधान मंडळीला विनवीत होते. हा आरोप जर खरा ठरला, तर मग आयरिश सभा-सदांवर ओकोनेलचें वर्चस्व तें काय राहिलें? तें वर्चस्व जर खरोखर कायम राखावयाचें असेल, तर दोहोंपैकीं कोणचा तरी एक मार्ग स्वीका-रला पाहिजे. तो आरोप खोटा आहे असें शाबीत करून दाखविलें पाहिजे हा पहिला, किंवा असें विश्वासघातकी कृत्य करणाऱ्या मनुष्यास हुडकून काढून त्याला आपल्या मंडळींतून घालवून दिलें पाहिजे हा

दुसरा. या दोहोंपैकीं दुसरा मार्गच स्वीकारणें बरें असें ओकोनेल्ला वाटलें व त्याप्रमाणें त्यानें पार्लमेंटांत आलथार्पला असा प्रश्न केला कीं, हिलनें वरील आशयाचें जें भाषण केलें त्याबद्दल तुह्मांला कांहीं माहिती आहे किंवा नाहीं? त्यावर आलथॉर्पनें असा जबाब दिला कीं, हिलच्या ह्मणण्याप्रमाणें आयरिश सभासदांनीं प्रधान मंडळीकडे 'कोअरशन बिला' ला आपली संमति असल्याविषयीं लेखी कांहीं कळविलें नाहीं. परंतु सभेमध्यें त्याच्या उलट बोलावयाचें व खाजगी संभाषणांत त्याला आपली अनुकूलता दाखवावयाची, असें वर्तन बऱ्याच आयरिश सभासदांनीं केल्याचें मला माहीत आहे." आलथार्पनें असें उत्तर दिल्याबरोबर आयरिश सभासदांत एकच घोंटाळा उडून राहिला. ओकोनेल् उठून उभा राहिला व त्याच्या मागोमाग सगळे सभासद उठून उभे राहिले. प्रत्येकजण 'मी असें बोललों काय' असें विचारूं लागला. तेव्हां आलथार्प प्रत्येकाला 'नाहीं, तुह्मीं नाहीं' असें ह्मणत होता. स्पीकरनें ( अध्यक्षानें ) हें मांडण विकोपाला जाऊं नये ह्मणून बराच यत्न केला; परंतु ओकोनेल्ला तें पसंत पडलें नाहीं. या वादाची शहानिशा करण्याचा पक्का निश्चय झाला होता. शेवटीं मी असें बोललों कीं काय' असें विचारण्याकरितां शील उठून उभा राहिला. त्यावर आलथार्प ह्मणाला 'होय तुह्मींच असें बोलला.' मग शीलनें परमेश्वराची शपथ घेतली व असें सांगितलें कीं, माझ्या हातून विश्वासघातकीपणाचें वर्तन झालेलें नाहीं. असा प्रकार झाल्यानंतर आलथार्प व शील या दोघांपैकीं कोणाची अब्रू मळीण झाली व द्वंद्वयुद्धाकरितां प्रथम आव्हान कोणी करावें यासंबंधानें बराच वादविवाद झाला. स्पीकरनें मध्यस्थी करून आलथार्पकडून असें सांगविलें कीं, हें प्रकरण जास्त वाढविण्याची माझी इच्छा नाहीं. त्यावर शील कांहीं एक न बोलतां स्तब्ध बसला. स्पीकरनें पुन: आलथार्पकडे वळून पाहिलें, तेव्हां त्यानें आपला पूर्वींचा निश्चय कायम आहे असें पुन: सांगितलें. त्यावर या प्रकरणाचा येथेंच निकाल लावावा हें बरें असें अध्यक्षानें आपलें मत दिलें परंतु ओकोनेल् हा विशेष चतुर होता. त्यानें

असा मुद्दा काढला कीं, आपण आव्हान करणार नाहीं असें आलथार्पनें सांगितलें आहे. पण दुसऱ्यानें आव्हान केलें असतां आपण तें स्वीकारणार नाहीं असें त्यानें कोठें सांगितलें आहे? त्यावर स्पीकरनें आलथार्प यास सांगितलें कीं, मी स्वतः आव्हान करणार नाहीं व दुसऱ्यानें केलें असतां तें स्वीकारणार नाहीं, अशी दोन्ही प्रकारची तुह्मीं हमी घ्यावी. अशी हमी घेण्यास आपण तयार नाहीं, असा त्यानें जबाब दिल्यावर, बरडेटनें सूचना केल्याप्रमाणें आलथार्प व शील या दोघांस सारजंट–ॲट–आर्म्सच्या स्वाधीन केलें व त्या दोघांनाही सभेंतून बाहेर घालवून दिलें.

प्रधानमंडळीला ही गोष्ट इतक्या थरावर येणें इष्ट नव्हतें पण एवढ्यानेंच कोठें पूर्तता होत होती? यासारखाच दुसरा आणखी एक प्रसंग चालून येत होता. बॅरनस्मिथ नांवाचा एक न्यायाधीश कोर्टांत वेळेवर येत-नाहीं, कोर्टाचें काम तो रात्रीं करतो व साक्षिदार व वादीप्रतिवादी यांस पहाटपर्यंत तांगडून ठेवतो, सबब त्याला काढून टाकलें पाहिजे, अशी सूचना सभेपुढें आणण्याबद्दल ओकोनेलनें नोटीस दिली होती. ती सूचना हाणून पाडण्याचा प्रधानमंडळीनें निश्चय केला होता. ओकोनेलनें आपली सूचना एकदम फिरविली व आपल्याला सिलेक्ट कमेटी पाहिजे अशी नवीन सूचना केली. ती सूचना बहुमतानें पसंत झाली. आलथार्प व लिटलटन् यांनींही या सूचनेला अनुमोदन दिलें; पण पुढें थोडासा विचार केल्यावर, होत असलेला हा प्रकार गैर आहे असें त्यांना वाटूं लागलें. कमेटी नेमणें अगदीं निरुपयोगी होतें. कॉमन्स सभेनें त्या बॅरनवर लार्ड्सच्या सभेच्या न्यायासनासमोर खटला सुरू करावा, किंवा राजाकडून त्याला काढून टाकावें, किंवा त्याला होता तसाच स्वस्थ राहूं द्यावा, असे एकंदर तीन मार्ग होते. त्यांपैकीं शेवटच्याच मार्गाचें अवलंबन करणें सोईचें होतें. असा हा घोंटाळा झालेला पाहून, एका टोरी सभासदानें अशी सूचना पुढें आणिली कीं, पूर्वी पास झालेली सूचना रद्द करावी. ती सुदैवानें पास झाली ह्मणून मग कांहींच पंचाईत उरली नाहीं.

प्रधानमंडळीशीं याप्रमाणें दोन चकमकी झाल्यानंतर ओकोनेल्नें आपल्या पक्षाचें सामर्थ्य किती आहे हें एकदां अजमावून पाहण्याचा निश्चय केला. ऐक्य नाहींसें करण्याबद्दल सुरू झालेल्या चळवळीसंबंधानें राजानें आपल्या भाषणांत पुढें लिहिलेले उद्गार काढिले होते:— ‘ परमेश्वरकृपेनें माझ्या हातांत जेवढें सामर्थ्य आहे, त्या सामर्थ्याचा उपयोग करून आपल्या या दोन राष्ट्रांत जें ऐक्य झालें आहे व ज्याच्यायोगानें उभय राष्ट्रांत एक प्रकारचें सामर्थ्य आलें आहे, तें कायम राखण्याकरितां माझ्या हातून होईल तितका यत्न मी करीन. ’ अवतरणांत दिलेले शब्द गाळून टाकण्याविषयीं ओकोनेल्नें सूचना केली होती; पण १८९ ला २३ अशीं मतें पडून ती सूचना नापसंत झाली होती. याप्रमाणें आशा करण्याला कोठेंच जागा उरली नव्हती; तरी पण पुनः एकदां यत्न करून पाहण्याचा त्यानें निश्चय केला व त्याप्रमाणें ऐक्य स्थापन करणाऱ्या कायद्याचा अम्मल कसा काय झाला आहे याची चौकशी करण्याकरितां एक कमेटी नेमावी, अशी सूचना करण्याची त्यानें नोटीस दिली. कॉमन्स सभेपुढें ती सूचना ता० २२ एप्रिल रोजीं संध्याकाळीं पांच वाजतां विचाराकरितां निघाली. त्यावेळेस ओकोनेलचें भाषण एकंदर सात तासपर्यंत चाललें होतें. त्याच्या त्या भाषणांतील तात्पर्य खालीं लिहिल्याप्रमाणें होतें.

“ जन्मतः प्राप्त होणारे हक्क गमविण्यास किंवा आपलें अस्तित्त्व नाहींसें करून टाकण्यास आयरिश पार्लमेंटाला अधिकार नव्हता, आणि ह्मणून ऐक्य स्थापन करणाऱ्या कायद्यानें, आयरिशलोक बांधले जात नाहींत. निंद्य उपायाची योजना करून तो कायदा पसार झाला असल्यामुळें नीतिदृष्ट्या देखील त्या कायद्याला मान देणें अवश्य नाहीं. इंग्लंडबरोबर ऐक्य करण्यांत आयर्लंडचा फार फायदा आहे असें सिद्धकरून दाखविण्याकरितां त्यावेळेस आयर्लंडांत जीं बंडें झालीं, त्यांच्याकडे सरकारानें कानाडोळा केला. इतकेंच नाहीं तर १७९८ सालीं जें बंड झालें, त्यांतील लोकांना सरकारानें उलट उत्तेजन दिलें. ज्या

शर्थीवर ऐक्य करण्यांत आलें आहे त्या शर्थीदेखील आयर्लंडाच्या तोट्याच्याच आहेत. अपिलें ऐकण्याचा अधिकार लार्ड्सच्या सभेनें आपल्याकडे जो अन्यायानें घेतला आहे, त्याचाच नुसता विचार केला तर झालेलें ऐक्य नाहींसें करून टाकिलें पाहिजे, असें कोणालाही वाटेल. सार्वभौम कामाकरतां लागणाऱ्या खर्चाचा बराच मोठा बोजा आयर्लंडाच्या डोक्यावर लादला आहे. त्याच्यायोगानें लोकांवर त्रासदायक कर बसविणें भाग पडलें आहे. एकंदर लोकसंख्येच्या मानानें पाहूं गेलें असतां, आयर्लंडतर्फे पार्लमेंटांत २०२ सभासद पाहिजे आहेत, असें असतां फक्त १०५ च आहेत. ऐक्य झाल्यापासून आयर्लंडचा एकसारखा ऱ्हास होत आहे. आयर्लंडाला दरिद्र येत चाललें आहे. गेल्या चवतीस वर्षांत इंग्लंडची लोकसंख्या फारच झपाट्यानें वाढली. आयर्लंडांत उलट ती कमी झाली. आजपर्यंत आयर्लंड देशाची स्थिति कशी आहे, याची चवकशी करण्या करितां अनेक वेळां कमेट्या नेमल्या व कमिशनें नेमिलीं, परंतु त्यांपासून कांहीं उपयोग झाला नाहीं."

याप्रमाणें ओकोनेलचें भाषण झाल्यावर सभा बरखास्त झाली. ओकोनेलच्या भाषणाचें फारच थोड्या सभासदांवर वजन पडलें. तरी पण या विषयावर एकंदर सहा रात्रीं सभेंत वादविवाद चालला होता. ओकोनेलला उत्तर देण्याचें काम प्रिंगराइस नांवाच्या मनुष्यावर सोंपविलें होतें व त्यानें तें चांगल्या रीतीनें पार पाडलें. सरकारपक्षानें उलट अशी सूचना आणली कीं, राजाला एक मानपत्र द्यावें व त्यांत ऐक्य कायम ठेविण्याविषयीं व आयर्लंडाच्या ज्या खऱ्या अडचणी असतील त्या दूर करण्याविषयीं राजास विनंति करावी. या सूचनेवर आणखी तीन दिवस वादविवाद झाला. डोंगर पोंखरून उंदीर काढावयाचा या ह्मणीप्रमाणें नऊ दिवस एकसारखी उरस्फोड चालू होती, तरी ओकोनेलची सूचना ५२३ ला ३८ इतक्या मतांनीं नापसंत झाली. ओकोनेलतर्फे मत देणाऱ्या ३८ असामींत इंग्लिश सभासद

एक होता व उलट मत देणाऱ्या ९२३ असामींत ९७ आयरिश सभासद होते! याप्रमाणें आपल्या अनुयायी मंडळींत किती दम आहे हें ओकोनेलच्या चांगलें नजरेस आलें, व त्यामुळें ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला कॉमन्ससभेंत आणखी बरींच वर्षें यश येण्याचा संभव नाहीं अशी त्याची खात्री झाली.

प्रधानमंडळीचा याप्रमाणें जरी पूर्ण जय झाला, तरी आयरिश लोकांना विग्‌लोकांनीं जीं वचनें दिलीं होतीं, तीं ते विसरले नव्हते. लिटलटन नांवाच्या एका सभासदानें 'टाइथबिल' नांवाचें बिल्, स्टॅनलेच्या मर्जीविरुद्ध, सभेपुढें आणलें व त्यांत त्यानें असें सुचविलें कीं, यापुढें जमिनीवरील कराच्या रूपानें 'टाइथ' कर वसूल करावा. प्रथम तें बिल सभेपुढें ता. २० फेब्रुवारी रोजीं आलें व ता. २ मे रोजीं त्याचें दुसरें वाचन झालें. परंतु प्रधानमंडळींत यावेळेस बराच घोंटाळा उत्पन्न झाला होता. आलथॉर्प आणि लिटलटन यांचें असें मत होतें कीं, आयर्लंडांत आस्ते आस्ते कां होईना पण कांहीं तरी सुधारणा केली पाहिजे. ग्रे आणि स्टॅनले यांचें असें मत होतें कीं, आयर्लंडचें राज्य तरवारीच्या जोरावरच केलें पाहिजे. ब्रोगह्याम हा विश्वासघातकी मनुष्य होता व त्याला मध्यें लुडबुड करण्याची फार संवय होती व ग्रेह्यामच्या मतांत कोणच्याच प्रकारची शाश्वती नव्हती, एकदां एक तर दुसऱ्यांदा दुसरें असा नेहमीं प्रकार होता. मे महिन्यांत प्रधान मंडळीवर अगदीं आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपला. वॉर्ड नांवाच्या एका मुत्सद्यानें अशी सूचना आणिली कीं, धर्मसंस्थेच्या उत्पन्नांतून खर्च न होतां जो भाग शिल्लक राहील त्याचा सार्वजनिक कामाकरितां उपयोग करावा. या सूचनेला क्याबिनेटमधले बरेच मुत्सद्दी अनुकूल होते व त्यामुळें ही सूचना सभेपुढें आली ह्मणजे आयर्लंडांतील धर्मसंस्थेसंबंधानें चवकशी करण्याचें वचन देण्याचा प्रधानमंडळीनें निश्चय केला. त्याबरोबर स्टॅनलेप्रभृति चारपांच मंडळींनीं आपल्या कामाचे राजिनामे दिले. याप्रमाणें आपापसांत मतभेद झाल्यामुळें, टोरी पक्षाला लिटलटनचें

टाइथबिल संमत नव्हतें ह्मणून आयरिश् सभासद आपल्या बाजूला वळवून घेण्याची प्रधानमंडळीनें सुरवात केली. परंतु त्या सभासदांत ऐक्याला जेवढे सभासद प्रतिकूळ होते, ते सर्व गेल्या वर्षी जें ' कोअरशन ' बिल पास झालें होतें त्याच्यायोगानें अगदीं बिथरून गेले होते. त्यांतून आयर्लंडाची स्थितीही प्रधानमंडळीच्या दुर्दैवानें अशी होती कीं, चालू सालांतही त्याच बिलाचा पुन: अम्मल सुरू करण्यावांचून त्यांना तरणोपाय नव्हता. आयर्लंडांत अजून असावी तितकी स्वस्थता नव्हती हें ओकोनेल् जाणून होता. ह्मणून सभा मोडून टाकण्याविषयींचें जें कलम होतें तें खेरीजकरून तो आक्ट सुरू करण्यास कांहीं हरकत नाहीं, इतकें विग् लोकांनीं त्याचें मन वळविलें होतें. लिटल्टनही हें जाणून होता कीं, आपलें टाइथ बिल व आतां सांगितलेलें सभा भरविण्याच्या विरुद्ध असणारें कलम हीं दोन्हींही एकदम पास होणें शक्य नाहीं. आयर्लंडाचा लॉर्ड लेफ्टनेंट, लॉर्ड वेलस्ली हा प्रधानमंडळीला आतांपर्यंत सरकारी रीतीनें असें कळवीत होता कीं, लष्करी कोर्टामार्फत अपराध्यांची चवकशी करण्याचें कलम खेरीजकरून बाकीचा सर्व आक्ट पुन: अमलांत आणावा. इकडे ब्रोगह्यामनें लिटलटनला बोलावून आणिलें व त्यास असें सांगितलें कीं, जाहीरसभांविरुद्ध असणारें कलम गाळून टाकलें असतां हरकत नाहीं, असें अर्ल ग्रेला लिहून पाठविण्याविषयीं लॉर्ड वेलस्लीला तूं पत्र लिही. त्याच्या सांगण्याप्रमाणें लिटलटननें वेलस्लीला पत्र लिहिलें व त्यांत प्रधानमंडळीला ओकोनेल्चा आधार असणें किती जरूर आहे, टाइथबिल् पास झालें असतां जाहीरसभांविरुद्ध असणाऱ्या कलमाचा उपयोग करण्याचें कारणच पडणार नाहीं, वगैरे गोष्टींचा उल्लेख केला. लिटलटनचें लिहून आल्यावरून वेलस्लीनें तशा मजकुराचें एक खाजगी पत्र लॉर्ड ग्रेला लिहिलें. लिटलटननें मेल्बोर्न व आल्थॉर्प यांचीही गांठ घेतली. त्या उभयतांचें मत त्याला अनुकूल असेंच पडलें. जाहीरसभेविरुद्ध असणारें कलम पुढें येणार नाहीं अशी त्याची खात्री झाल्यावर लिटलटन्नें आल्थार्प यास असें सुचविलें कीं, आपण ओकोनेल्ला बोलावून आणू आणि

आपला काय विचार ठरला आहे हें त्यास सांगून प्रधानमंडळीच्या-विरुद्ध खटपट न करण्याविषयीं त्यास सूचना करू. त्यांनीं लिटल्टनचें हेंही ह्मणणें कबूल केलें; परंतु ओकोनेल्शीं सावधगिरीनें वागलें पाहिजे असें त्यांनीं त्याला सुचविलें. इकडे ओकोनेल् कोअरशन बिलाविरुद्ध नवीन चळवळ सुरू करण्याच्या विचारांत होता. वेक्सफर्ड परगण्याच्या-तर्फेच्या सभासदाची जागा रिकामी झाली होती. त्या जागेकरतां विग् पक्षाचा एक उमेदवार उभा राहिला होता. ओकोनेल्नें त्याच्या उलट ऐक्याला प्रतिकूल असणारा आपल्यातर्फेचा एक सभासद उभा केला. इतक्यांत त्याला लिटलटनकडचें बोलावणें आलें. त्याप्रमाणें तो आयरिश आफिसमध्यें गेला. तेथें गेल्यावर तेथील मंडळीनीं त्याला असें सांगितलें कीं, कोअरशन बिलाचा अम्मल फार दिवस चालविण्याचा या खेपेला सरकारचा हेतु नाहीं. जमिनीबद्दल तंटे होऊं नयेत याच उद्देशानें तें पुन: सुरू करण्याचा विचार आहे. करितां तुह्मी नवीन आरंभिलेली चळवळ बंद ठेवावी व तुमच्या आमच्यामध्यें जें हें बोलणें झालें आहे तें तुह्मी गुप्त ठेवावें असेंही त्यांस सांगितलें. ओकोनेल्नें हें ह्मणणें कबूल केलें व त्याप्रमाणें त्यानें विग् उमेदवाराविरुद्ध आपला जो उमेदवार उभा केला होता त्याला परत बोलाविला. ता. २९ जून रोजीं क्याबिनेटची सभा भरली. त्यावेळेस मागें सांगितलेल्या मजकुराचें वेलस्लीनें लॉर्ड ग्रेला जें पत्र पाठविलें होतें, तें त्या सभेंत त्यानें वाचून दाखविलें. तरी पण कोअर्शन आक्ट संबंधच्या सबंध पुनः सुरू करावा असा जो त्याचा मुद्दा होता तो त्यानें त्या सभेंत पास करून घेतला. परंतु पुढें एकदोन दिवसांनींच सदरहू बिल ज्यावेळेस त्यानें लॉर्ड्सच्या सभेंत सादर केलें, त्यावेळेस जाहिरसभेविरुद्ध असणारें कलम गाळून टाकावें, असें सुचविण्याकरितां वेलस्लीचें आपल्याला पत्र आलें आहे ही गोष्ट त्यानें मुद्दाम बोलून दाखविली नाहीं. आयरिश

---

६. पहा Walpole's History of England Vol. III, PP. 463/464.

सभासदांबरोबर सरकारी पक्षाकडून कांहीं बोलणें सुरू आहे, ही गोष्ट ओकोनेलच्या तोंडून फुटली होती ह्मणून ती लोकांना अगोदरच ठाऊक झाली होती. बिलावर जेव्हां वादविवाद सुरू झाला, तेव्हां अनेक वेळां या गोष्टीचा उल्लेख करण्यांत आला; परंतु तें सर्व खोटें आहे असें लॉर्ड ग्रेनें सांगितलें. ओकोनेल्नें जेव्हां हा घरसोडीचा प्रकार पाहिला, तेव्हां त्याला अतिशय संताप आला व त्यानें त्याबद्दल विग् पक्षाच्या मुत्सद्यांचा सूड घेण्याचा निश्चय केला. लिटल्टन्नें आपल्याला निव्वळ फसविलें व आपली केवळ थट्टा केली असें त्याला वाटूं लागलें. अशा रीतीनें आपल्याला फसविल्यानंतर चीफ् सेक्रेटरी लिटलटनमध्यें व आपणांमध्यें झालेलें बोलणें गुप्त राखण्याबद्दल दिलेलें वचन पाळण्याचें आतां कांहीं आपल्याला भाग नाहीं असें त्याला वाटून त्यानें भर सभेंत त्याची फजिती केली. एक दोन किरकोळ गोष्टी खेरीज-करून ओकोनेल्चें ह्मणणें खोटें आहे असें ह्मणण्याला चीफ् सेक्रेटरीला जागाच नव्हती; परंतु तो शेवटीं हेंच घेऊन बसला कीं, कांहीं झालें तरी आह्मां उभयतांमध्यें झालेला गुप्त व्यवहार ओकोनेल्ला बाहेर फोड-ण्याचें कारण नव्हतें. या कामांत ओकोनेल्च्या हातून थोडीशी बाजू घसरली होती यांत शंका नाहीं, व त्यामुळें त्याची मित्रमंडळीदेखील त्याच्यावर थोडीशी रागावली होती. कांहीं झालें तरी लिटलटन्चें वर्तन लोकांच्या नजरेसमोर आलें व त्यामुळें त्याला राजीनामा देणें भाग पडलें, व त्याप्रमाणें त्यानें राजीनामा दिला; परंतु तो मंजूर झाला नाहीं. आलथॉर्पनेंही पुढें थोड्याच दिवसांनीं कांहीं कारणाबद्दल राजीनामा दिला. आलथॉर्पच्या मदतीशिवाय राज्यकारभार चालविणें अगदीं अशक्य आहे असें लॉर्ड ग्रेला वाटत होतें. यामुळें आलथॉर्पचा राजीनामा जेव्हां त्यानें राजाकडे पाठविला, तेव्हां त्यानें आपलाही त्याच्याचबरोबर पाठविला. कोअरशन बिलावरचा वादविवाद त्यानें एक दिवस बंद ठेवला. दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ९ जुलई १८३४ रोजीं आपल्याला राजीनामा देणें कां भाग पडलें, याबद्दल त्यानें फार कळवळ्याचें भाषण केलें. अर्थात् त्या दिवसापासून राज्यकारभाराचें जड जूं आपल्या मानेवरून उतरून तो

स्वस्थ बसला हें निराळें सांगणें नकोच. यांप्रमाणें पार्लमेंट सुधारण्याचा कायदा पास झाल्यापासून दोन वर्षांचे आंतच ओकोनेल् व त्याच्या पाठीशीं असणारे आयरिश लोक यांनीं सुधारणेला अनुकूल अशा एका मोठ्या मुत्सद्याचा पाडाव केला.

लॉर्ड ग्रेच्या पश्चात् राज्याचीं सूत्रें मेल्बोर्न नांवाच्या मुत्सद्याच्या हातांत आलीं. मेल्बोर्ननें अधिकारारूढ होताक्षणींच कोअरशन बिल् पास करून घेतलें व जीं दोन कलमें ओकोनेलला नको होतीं तीं त्यानें त्यांतून गाळून टाकिलीं. गाळून टाकिलेलीं कलमें पुनः बिलांत घुसडून देण्याचा लॉर्ड्सच्या सभेंत कांहीं मंडळींनीं उद्योग केला, परंतु तो सिद्धीस न जातां तें बिल त्या सभेंतही पास झालें. याप्रमाणें कोअरशन बिल पास झाल्यानें प्रधानमंडळीची एक अडचण दूर झाली, व त्यांना असें वाटलें कीं, ओकोनेलला ज्याअर्थीं आपण कुरकुर करण्यास जागा ठेविली नाहीं, त्या अर्थीं तो 'टाइथ बिलाला' आतां आपली संमति देईल. पण जेव्हां तें बिल सभेपुढें निघालें, तेव्हां त्यानें तूर्त कांहीं दिवस या बिलाचा विचार होऊं नये, अशी सूचना पुढें आणिली. पण ती बहुमतानें नापसंत झाली. तरी पण तेवढ्यानेंच न डगमगतां त्यानें अशी एक प्रतिसूचना आणिली कीं, टाइथची जी बाकी राहिली आहे ती वसूल न करितां लिटलटननें सुचविलेली व्यवस्था एकदम अमलांत आणावी. ही प्रतिसूचना बऱ्याच मताधिक्यानें पास झाली. परंतु टाइथच्या कामांत आयरिश लोकांना कोणच्याच प्रकारची सवलत देणें अवश्य नाहीं, असें सगळ्या लार्डांचें मत होतें, यामुळें त्यांच्या सभेपुढें जेव्हां तें बिल आलें तेव्हां त्यांनीं तें नामंजूर करून टाकिलें व टाइथसंबंधीं प्रश्नाचा कांहीं तरी लोकमताला अनुकूल असा निकाल होईल अशी जी आयरिश लोकांत आशा उत्पन्न झाली होती, ती सफल होण्याची वेळ बरीच लांबणीवर टाकली.

७. पहा. Walpole's History of England Vol. III, P. 465.

नंतर मेलबोर्नचें प्रधानमंडळ फार दिवस अधिकारावर राहिलें नाहीं. राजानें त्यांना लवकरच कामावरून दूर केलें व मुख्य प्रधानाचें काम पीलच्या हातांत देण्याकरतां त्याला रोमशहरीं बोलावणें पाठविलें. टोरी पक्षांतील लोकांच्या हातांत सत्ता जाणें ओकोनेल्ला केव्हांच प्रिय नव्हतें. पण त्यांतल्या त्यांत लॉर्ड ग्रेच्या हातांतील अधिकार नाहींसा झाला याबद्दल त्याला आनंद वाटला. विग्पक्षाला मदत करण्याच्या कामांत आपण केव्हांही मागें पुढें पाहिलें नाहीं, असें असतां आयर्लंडाच्या फायद्याची एकही गोष्ट लॉर्ड ग्रे किंवा मेलबोर्न यांच्या हातून झाली नाहीं, याबद्दल त्याला फार वाईट वाटलें. लॉर्ड डंक्यानन नांवाच्या विग् मुत्सद्याला लार्ड ग्रेनें आपली किती निराशा केली याबद्दल बरींच पत्रें या सुमाराला त्यानें पाठविलीं. त्यापैकीं एका पत्रांत त्यानें असें लिहिलें आहे कीं, 'तुह्मीं मला फसविलें आहे, व आयर्लंडालाही मोठ्या निष्ठुरतेनें व क्रूरपणानें फसविलें आहे. आह्मीं तुह्मांला अगोदरच चांगलें ओळखावयास पाहिजे होतें. तुह्मी विग् पक्षाचे आहां आणि चार वर्षेंपर्यंत आमचीं हाडेंनूहाडें मोकळीं करण्याच्या कामांत तुह्मीं जो अनुभव आह्मांला दिला, त्यावरून आयरिश लोकांना तुमच्याकडून अवहेलना, तिरस्कार, वैर याच गोष्टी कायत्या प्राप्त होणार असें आह्मांला अगोदरच कळावयास पाहिजे होतें.[८]' याप्रमाणें लॉर्ड ग्रेच्या कामाबद्दल आपली असंमति दाखवून टोरी पक्षाचा पाडाव करण्याचा उद्योग त्यानें आरंभिला व त्याप्रमाणें त्यानें 'अँटी टोरी असोसिएशन' Anti Tory Association ह्मणजे टोरी लोकांना प्रतिकूल अशी एक सभा स्थापन केली. ऐक्य नाहींसें करण्याचा प्रश्नदेखील त्यानें, हाच उद्योग नेटानें चालावा ह्मणून क्षणभर बाजूला ठेविला. पीलनें पार्लमेंट बरखास्त केलें. आयर्लंडांत टोरीपक्षाचे लोक निवडून यावेत ह्मणून त्यानें खटपट केली; पण त्यांत त्याला त्याच्या मनाप्रमाणें यश आलें नाहीं. विग् पक्षाच्या मंडळीनें ओकोनेल्ला पाठीशीं घेऊन टोरी पक्ष हाणून

८. पहा. Walpole's History of England Vol. III, P. 475.

पाडण्याचा क्रम सुरू केला. पार्लमेंट सुरू झाल्यावर शिरस्त्याप्रमाणें राजाचें भाषण वाचून झाल्यावर लॉर्ड मॉरपेथनें त्या भाषणाला एक प्रति- सूचना आणिली व त्यांत पीलनें पार्लमेंट विनाकारण बरखास्त केलें असा त्याच्यावर दोष आणिला. त्या सूचनेचा वादविवाद सुरू झाल्यावेळीं ओकोनेलनें आपली संधि साधून घेतली व असें बोलून दाखविलें कीं, ऐक्य नाहींसें करण्याचा उद्योग आयरिश लोकांनीं कांहीं वेळपर्यंत बाजूला ठेविला आहे; पण त्याबद्दल त्यांना पुढें दिलेल्या गोष्टी मिळाल्या पाहिजेत. त्या गोष्टी ह्या:—आयरिश रिफार्म आक्टाची सुधारणा, आयरिश धर्मसंस्थेकडील जास्ती उत्पन्नाचा सार्वजनिक कामाकडे उपयोग व आयरिश कॉरपोरेशनची सुधारणा. पीलनें टाइथबिल सभेपुढें सादर केलें. गेल्या वर्षीं विग् लोकांनीं जें बिल आणिलें होतें त्याच्यांत व या बिलांत ह्मणण्यासारखा फरक नव्हता. आयरिश धर्मसंस्थेचें जादा उत्पन्न शिक्षणाच्या कामीं लावावें, अशी रसेलनें प्रति सूचना आणिली, व ती ओकोनेलच्या साहाय्यानें ३९ मतांच्या मताधिक्यानें पास करून घेतली. त्यावर पीलनें आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्याच्या पश्चात् लार्ड मेल्बोर्न यांस नवीन प्रधानमंडळी नेमण्याविषयीं राजानें आज्ञा दिली. (तारीख ९ एप्रिल १८३९.)

---

# ड्यानियल ओकोनेलचें

## चरित्र.

---

# भाग ७ वा.

## विग् लोकांबरोबर सख्य.

१८३५ ते १८४०.

विग् लोकांबरोबर मैत्री केल्यानें आपले हेतु सफल होतील अशी जी ओकोनेल्ला आशा होती, ती सफल होऊं नये असाच परमेश्वरी संकेत होता. विग् लोकांच्या कारकीर्दींत आपल्याला बऱ्याच मोठ्या अधिकाराची जागा मिळेल अशी त्याची कल्पना होती, व त्याचप्रमाणें लोकांतही यावेळेस अशी गप्प पिकली कीं, आयर्लंडांतील लॉर्ड लेफ्टनेंटच्या मनांत ओकोनेल्ला आटरनी जनरलची जागा देण्याचा विचार आहे. स्वतः ओकोनेल्लादेखील ही गप्प विश्वसनीय अशी वाटली व आजपर्यंत आयरिश लोकांना मोठमोठ्या नोकऱ्या देण्याच्या कामांत इंग्लिश अधिकारी जसे वगळीत होते, तसे यापुढें वगळणार नाहींत अशी त्याला प्रबळ आशा उत्पन्न झाली. हळूहळू ही गप्प राजाच्या कानावर गेली. ती त्याच्या कानावर जातांच त्याच्या पायाच्या तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोहोंचली. कारण त्याचें व ओकोनेल्चें सख्यच तितकें होतें. त्यानें मेलबोर्नेला असें पत्र पाठविलें कीं, ओकोनेल्ला जागा देण्याचा जो बेत केला आहे तो रहित करावा. राजानें मुख्य प्रधानास अशा तऱ्हेचें पत्र पाठविणें हें नियमाविरुद्ध आहे ही गोष्टदेखील रागाच्या आवेशांत वुइलिमच्या लक्षांत आली नाहीं. परंतु लार्ड मेल्बोर्न हा पाणीदार मनुष्य होता. अशा तऱ्हेचे बाबतींत प्रधान मंडळीला हुकूम करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं, असें त्यानें त्याला उलट

पत्र पाठवून कळविलें. पण त्यांत त्यानें राजाला असेंही कळविलें कीं, प्रजाशासनाच्या कामीं ओकोनेल्चा उपयोग करून घेण्याची माझी इच्छा नाहीं व त्याप्रमाणें माझा इरादाही नाहीं. या कामांत विग् लोक जरा कचाट्यांत सांपडल्यासारखेच होते.. हातांत अधिकार राहण्याकरितां कोणच्या तरी उपायानें ओकोनेल्ची मर्जी प्रसन्न करणें जरूर होतें. पण त्याच्याशीं अति संघट्टन करणें हें त्यांना फायद्याचें नव्हतें. कारण त्यायोगानें त्यांच्या त्यांच्या मंडळींतच फाटाफूट होण्याचा संभव होता. करितां त्याला दूर राखूनच तेथून त्याचा उपयोग करून घेण्याचा लार्ड मेल्बोर्ननें निश्चय केला, व त्याप्रमाणें त्यानें ओकोनेल्ला असें सांगून पाठविलें कीं, आम्हीं पुष्कळ खटपट केली तरी तुमच्याकरितां कांहीं सवड निघत नाहीं. या निरोपासरशीं ओकोनेल्ची फार निराशा झाली व त्याला फार वाईट वाटलें. स्वतःला मोठ्या दरजाची जागा मिळाली नाहीं म्हणून त्याला वाईट वाटलें नाहीं, तर आपल्या सर्व देशबांधवांकरतां वाईट वाटलें. त्याला वर सांगितलेली जागा मिळाली असती तर त्याचें बरेंच नुकसान झालें असतें. लोककल्याणाकरितां पैशाच्या नुकसानाकडे लक्ष न देतां त्यानें आपला बॅरिस्टरीचा धंदा सोडून दिला होता, म्हणून दरसाल लोक आपापल्यांत वर्गणी देऊन त्याला कांहीं रकम पोंचवीत असत. १८३३ सालीं ती रकम १३, ९०० पौंडांपर्यंत येऊन पोंचली होती. १८३४ तदेखील सरासरी इतकीच रकम त्याला मिळाली होती. नोकरी मिळाली असती तर या सर्वांवर त्याला पाणी सोडावें लागलें असतें. नोकरी पतकरली असती तर सरकारच्या गुलामगिरींत त्याला दिवस घालावे लागले असते व त्यामुळें आजपर्यंत त्यानें संपादन केलेल्या लोकप्रियतेला तो मुकला असता. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां झालें हेंच बरें झालें असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें; पण त्यांतल्यात्यांत हा एक विचार त्याच्या मनांत नेहमीं येत असे कीं, झाली ही गोष्ट एकंदर देशाच्या मानानें पाहूं गेलें असतां वाईट झाली. कारण सरकारानें ती जागा जर आपल्याला दिली असती, तर त्यांत सर्व आयरिश लोकांचा संतोष झाला

असता व त्यांच्यायोगानें इंग्लिशांच्या मागची नेहमींची एक कटकट बरीच नाहींशी झाली असती व आयरिशलोकही समाधानवृत्तीनें राहिले असते.

याप्रमाणें त्याच्या हक्काची पायमल्ली झाली, तरी त्यानें त्याबद्दल फारशी पर्वा केली नाहीं. ज्या पांच वर्षांचा इतिहास आम्हीं या भागांत देणार आहोंत, त्या पांच वर्षांच्या अवकाशांत त्यानें विग् पक्षाच्या लोकांनां फार मोठी व बिनमोल अशी मदत केली. या पांच वर्षांत घडून आलेल्या हकीकतीचा ओकोनेल्च्या चरित्राशीं जितका संबंध आहे, त्याच्यापेक्षां लॉर्ड मेल्बोर्नच्या चरित्राशींच विशेष आहे असें ह्मटलें असतां शोभण्यासारखें आहे; आणि ह्मणून ती आम्हीं होतां होईल तितक्या संक्षिप्त रीतीनें देण्याचा विचार केला आहे.

लॉर्ड मेल्बोर्न जेव्हां अधिकारारूढ होता, तेव्हां आयर्लंडसंबंधानें जे जे प्रश्न क्याबिनेटपुढें येत होते, त्या सर्वांत तो ओकोनेल्चा सल्ला घेत होता. आयरिश लोकांना राजाकडून पदव्या देणें, किंवा इनामें देणें, किंवा देणग्या देणें हीं सर्व कामें बहुतेक त्याच्याच सांगण्याप्रमाणें होत होतीं. परंतु विशेष जबाबदारीचें असें कोणचेंच काम त्यानें त्याच्याकडे सोंपविलें नव्हतें; किंवा आयर्लंडाचा राज्यकारभार कोणच्या धोरणावर चालविला असतां तेथील प्रजेला सुख होईल, या प्रश्नावरदेखील त्यानें त्याचें मत कधीं विचारलें नाहीं. असो.

पार्लमेंटच्या बैठकींत सांगण्यासारखी कांहीं हकीकत झाली नाहीं; परंतु पुढें सुट्टी झाल्यानंतर थोड्याच दिवसांत ओकोनेल्ची धांदल उडून जाण्याजोगे प्रसंग लवकरच आले. आयर्लंडचा चीफ् सेक्रेटरी आणि अण्डर सेक्रेटरी या दोन जागांवर मॉरपेथ् आणि ड्रमंड या नांवाचे दोघे गृहस्थ होते. त्यांनीं त्या देशाचा राज्यकारभार इतक्या नेकीनें व निःपक्षपातपणानें चालविला होता कीं सर्व लोक त्यांची अगदीं वाहवा करीत होते. आजपर्यंत असे अधिकारी आपल्याला कधींही मिळाले नाहींत, असे लोकांच्या तोंडचे उद्गार वारंवार ऐकावयाला सांपडत असत.

टाइथबिल आणि म्युनिसिपल कारपोरेशनबिल अशीं दोन बिलें कामन्स-सभेपुढें येऊन तेथें पास झालीं होतीं. पण त्या दोहोंनाही लार्ड्सच्या सभेंत थपडा बसल्या. परंतु याबद्दल ओकोनेल्ला फारसें वाईट वाटलें नाहीं असें दिसतें. कारण लार्ड्सच्या सभेंत हा प्रकार झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो असें सांगूं लागला कीं, प्रस्तुतच्या प्रधान मंडळीच्या हातून कांहीं थोड्या चुका झाल्या तर तिकडे दुर्लक्ष करून माझ्या हातून होईल तितकें मी त्यांना साहाय्य करण्याचाच निश्चय केला, आहे. आयरिश् लोकांना उद्देशून त्यानें जो एक लेख प्रसिद्ध केला त्यांत त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें उद्गार काढिले:—

"हल्लींच्या राजकर्त्यांना मदत करण्याविषयीं मी शपथ घेतली आहे असें मी तुह्मां सर्व लोकांना सांगतों. आयर्लंडाला न्याय देण्याच्या कामांत एक वर्षभर जर प्रधान मंडळीनें औदासिन्य दाखविलें तर मग पुनः मी एकदां त्यांना संधि देईन. दुसऱ्याही खेपेला जर त्यांनीं आपल्याला फसविलें तर मग मात्र ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला लागल्याशिवाय आपल्याला दुसरा तरणोपाय नाहीं.

या वेळेस लार्डस्च्या सभेंत विग् लोकांचे प्रतिस्पर्धी जे टोरी त्यांचाच फार मोठा भरणा होता. सबब त्यांचें तेथें असलेलें प्राबल्य कमी करण्याकरतां ओकोनेल्नें विग् पक्षाचा स्नेही या नात्यानें आपला मोर्चा त्यांच्यावर फिरविला. पार्लमेंटला सुट्टी झाल्यावर तो उत्तरेकडे ह्मणजे स्काटलंड देशांत गेला. तिकडे जातांना वाटेंत तो म्यांचेस्टर शहरीं गेला व तेथें त्यानें एक सभा भरवून त्या सभेंत फार मोठें भाषण केलें. न्युकासल नांवाच्या शहरांतही त्याचें एक भाषण झालें. तो जेथें जेथें गेला तेथें तेथें लोकांनीं मोठ्या आनंदानें व हौसेनें त्याचा फार मोठा सन्मान केला. तो एखाद्या गांवांत जाऊन उतरला ह्मणजे त्याला पाहण्याकरतां तेथील लोक मोठ्या उत्सुकतेनें त्याच्या भोंवतीं जमत असत. एडिंबरो येथें जाऊन पोंचल्यावर त्यानें मोठमोठ्या सभा भरवून तेथें भाषणें केलीं. एडिंबरो येथून निघून तो ग्लासगो शहरीं आला. तेथें आल्यावर

एका दिवसांत त्यानें सहादां भाषणें केलीं, असें त्या वेळच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. या सर्व भाषणांत लार्ड्सच्या सभेवर त्याचे एकसारखे हल्ले सुरू होते. लार्ड्सच्या सभेंत सुधारणा झाल्याशिवाय देशांत कोणची राजकीय सुधारणा व्हावयाची नाहीं असें त्याचें मत होतें व त्याप्रमाणें तो निर्भीड रीतीनें प्रतिपादनही करीत होता. याप्रमाणें स्कॉटलंड देशांत प्रवास केल्यानंतर बेल्फास्टच्या मार्गानें तो परत आयर्लंडांत आला. परत आल्यावर डब्लीन येथील व्यापारी लोकांनीं त्याचा फार मोठा सत्कार केला. नंतर कांहीं दिवस विश्रांति घेण्याकरितां ह्मणून तो डरीनेन येथें गेला. तेथें बसल्या बसल्या लार्ड्सच्या सभेची सुधारणा कशी करावी याबद्दल त्यानें एक युक्ति योजिली व ती त्यानें वर्तमानपत्राच्या द्वारानें लोकांपुढें मांडली; परंतु ती लोकांना फारशी पसंत पडली नाहीं. यामुळें लार्ड्सच्या सभेची सुधारणा करण्याचा त्याचा जो विचार होता, तो कॉमन्स सभेपुढें काढण्या इतका त्याच्या मनाला हुरूप राहिला नाहीं.

आक्टोबर महिन्यांत कार्लो येथील निवडणुकीसंबंधानें तो बऱ्याच घोंटाळ्यांत सांपडला. टोरी सभासदांची त्या ठिकाणची निवडणूक होऊं नये ह्मणून त्यानें आपल्यातर्फेचा एक सभासद उभा केला. हें पाहतांच टोरी पक्षाची मंडळी बरीच चिडली व त्यांनीं ओकोनेल्संबंधानें अशी बातमी उठविली कीं, त्यानें या नवीन पुढें आलेल्या सभासदाकडून प्रथम कांहीं पैसे घेतले आणि नंतर तुझ्या तर्फेनें मतें मिळवून देण्याची मी खटपट करतों असें त्याला वचन दिलें. ओकोनेल्वर त्याच्या प्रतिपक्षानें घेतलेल्या या आक्षेपाची त्याच्या मित्रमंडळीनें चवकशी केली. चवकशीअंतीं हा आक्षेप अगदीं निराधार असल्याविषयीं त्यांची खात्री झाली व त्याप्रमाणें त्यांनीं आपलें मत उघड रीतीनें प्रसिद्ध केलें. याप्रमाणें प्रतिपक्षानें त्याच्या आंगावर उडविलेल्या शिंतोड्यानें जरी क्षालन झालें, तरी त्या कामांत त्याला बराच त्रास, सोसावा लागला व आपल्यावर

घेतलेला आक्षेप खोटा आहे हें सिद्धकरून दाखविण्यालाही त्याला बरेच आयास पडले.

मल्ग्रेव्ह आणि ड्रमंड यांच्या अमदानींत आयर्लंडचा राज्यकारभार फार सुरळीत रीतीनें चालला होता असें मागें एकदां सांगितलें आहे, व त्याप्रमाणेंच तो हल्लींही चालू होता; आणि दिवसानुदिवस लोकांनाही त्याचा अनुभव येत चालला होता. ओकोनेल्लादेखील त्यांचें तें न्यायी व सरळपणाचें वर्तन पाहून ऐक्य नाहींसें करण्याबद्दलचा उद्योग पूर्वीं वचनें दिल्याप्रमाणें यापुढें बंद ठेवणें त्याला भाग पडलें. आतां तो बराच वृद्ध झाला होता, परंतु १८३९ त पार्लमेंट सुरू होण्याच्या अगोदर या कामांत आपल्या अनुयायी मंडळींचें मत काय आहे हें पाहण्याकरितां तो चोहोंकडे फिरत होता. जर हल्लींच्या अधिकाऱ्यांच्या हातून आयरिश लोकांना न्याय मिळत आहे, तर ऐक्य कायम राखण्याविषयींच आपण खटपट करावी हें बरें, असा तो सर्वांना उपदेश करीत होता. डब्लीन येथें तो एकदां पुढें लिहिल्याप्रमाणें बोललाः—

आपल्या लोकांचीं बंधनें दूर झाल्यानंतर झालेलें ऐक्य नाहींसें करण्याच्या खटपटीला मी लागलों. कारण मला असें दिसून आलें कीं, आयर्लंडच्या कामाकडे व स्थितीकडे सार्वभौम पार्लमेंट जितकें लक्ष पोंचवावें तितकें पोंचवीत नाहीं. खुद्द सर रॉबर्ट पीलनेंदेखील एकदां असें कबूल केलें कीं, आयर्लंडासंबंधाचा प्रश्न पुढें आला कीं, त्यासंबंधानें विचार करण्याकरितां फार तर काय चाळीस सभासददेखील एकत्र जमणें कठीण पडतें. तथापि मी जो ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला लागलों व एकसारखा इंग्लिश लोकांच्या कानींकपाळीं ओरडूं लागलों त्याचा योग्य परिणाम झाला. प्रधान मंडळीचें सर्व लक्ष आतां आयर्लंडांतील कामाकडे एकसारखें वेधून गेलें आहे........ मी आपल्या हातांत कोणचा उद्योग धरला आहे हें पार्लमेंटनें पाहिल्यावर दोन्ही सभांमधील सभासदांकडून मला अशीं वचनांवर वचनें येऊं लागलीं कीं, हा उद्योग जर तुह्मीं सोडून द्याल तर ज्या ज्या उपायांनीं आयर्लंडाचें

कल्याण होईल, ते ते उपाय अमलांत आणण्यास आह्मीं कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं. हें ह्मणणें ओठांतल्या ओठांतच आहे किंवा अंतःकरणपूर्वक आहे याची आपल्याला प्रतीति आणून देण्याची त्यांना एकदां संधि द्यावी असा माझा विचार आहे............ तुह्मीं आह्मांला अगदीं बरोबरीनें वागवा आणि मग ऐक्य कायम ठेवण्याची गोष्ट तुह्मीं माझ्यापुढें काढा. आणि मगच मी तुह्मांला सर्व आयरिश लोकांच्या वतीनें सांगेन कीं, यापुढें ऐक्य नाहींसें करण्याची खटपट करण्याचें मी सोडून दिलें आहे; परंतु तुह्मीं जर तसें करणार नाहीं, तर परमेश्वर स्मरण करून मी तुह्मांला असें सांगतों कीं, आह्मीं सत्तर लक्ष लोक ऐक्य हाणून पाडण्याचा उद्योगाला लागल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. इंग्लिश राष्ट्राची प्रजा असें ह्मणवून घेण्यास आयरिश लोक अगदीं तयार आहेत. पण तें कशाकरतां तर इंग्लिश लोकांप्रमाणें सर्व हक्क आपल्याला संपादन करून घेण्याकरतां, एरव्हीं नाहीं. वेस्ट ब्रिटन्स हें नांव देखील घेण्याला आह्मी तयार आहोंत. पण ब्रिटनलोकांप्रमाणें आह्मांला न्याय मिळाला पाहिजे व त्यांना जे फायदे मिळतात ते आह्मांला मिळाले पाहिजेत. ते जर आह्मांला मिळाले नाहींत. तर ब्रिटन्स हें नांव झुगारून देऊन आयरिशलोकच्या आयरिशलोकच आह्मी कायम राहूं."

पार्लमेंटाच्या पूर्वींच्या बैठकींत ओकोनेल्च्या डब्लीनतर्फे झालेल्या निवडणुकीविरुद्ध तकरारीअर्ज आला होता. त्या अर्जाची चवकशी करण्याकरितां एका कमेटीची नेमणूक झाली होती. त्या कमेटीनें डब्लीन येथें जाऊन जागच्याजागीं अर्जांत लिहिलेल्या गोष्टीसंबंधानें माहिती मिळविण्याचें काम तिघा ब्यारिस्टरांवर सोंपविलें. त्यांच्याकडून माहिती आल्याबरोबर कमेटीनें आपल्या कामास सुरुवात केली. ओकोनेलविरुद्ध अर्जदारांच्या अशा तकरारी होत्या कीं, लोकांना धाक दाखवून व माझ्याविरुद्ध कोणी मत दिलें तर त्याचें नुकसान झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशी त्यांना भीति दाखवून त्यांच्याकडून त्यानें मतें गोळा केलीं होतीं. कमेटीला या तकरारी अंशतः

खऱ्या आहेत असें चौकशीअंतीं दिसून आलें व त्यामुळें त्यांनीं ओकोनेल्विरुद्ध अर्जाचा निकाल दिला. ओकोनेल्नें आपणाविरुद्ध केलेल्या तक्रारी निराधार आहेत असें दाखविण्याकरितां पुष्कळ खटपट केली, पदरचा पैसाही पुष्कळ खर्च केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां अर्थातच डब्लीनतर्फेच्या सभासदाची जागा त्याला खालीं करून द्यावी लागली. ओकोनेल् पार्लमेंटांतून गेल्यामुळें प्रधान मंडळीही बरीच घोंटाळ्यांत पडली. कारण पार्लमेंटांत त्यांना त्याची मदत अवश्य पाहिजे होती. पण इतक्यांत दुसऱ्या एका आयरिश सभासदाची जागा कांहीं कारणामुळें रिकामी झाली व ओकोनेल् त्या जागेवर निवडून आला, यामुळें अनायासानेंच सर्व काळजी दूर झाली.

टाइथ कर नाहींसा करण्याबद्दलची चळवळ अजूनपर्यंत चालू होतीच. ओकोनेल् व शील या दोघांनीं आह्मी तो कर देत नाहीं असें सांगितलें. यामुळें ओकोनेल् हा न्यायरक्षणबाह्य ( Out-lawed ) आहे असें कोर्टानें बहुतेक ठरविल्यासारखेंच होतें. गेल्या वर्षीं जें टाइथ बिल् आणिलें होतें, त्याच्याच धोरणावर प्रधान मंडळीनें आणखी एक बिल पुढें आणलें. त्याचप्रमाणें आयर्लंडांतील सरासरी ६० कॉरपोरेशनें बंद करण्याकरतां ' म्युनिसिपल् कॉरपोरेशन ' नांवाचें आणखीं एक बिल त्यांनीं कॉमन्स सभेपुढें सादर केलें. सर राबर्ट पीलनें या बिलाला आपली असंमति दर्शविली. त्याचें ह्मणणें असें होतें कीं, नुसत्या ६० कॉरपोरेशन्स बंद न करतां सगळ्याच्या सगळ्याच बंद कराव्या. कॉमन्स सभेंत हें त्याचें ह्मणणें मान्य न झाल्यामुळें तें बिल तेथें पास झालें. परंतु लॉर्डस्च्या सभेंत पीलच्या मताची बरीच मंडळी होती ह्मणून तें तेथें नापास झालें. टाइथ बिलाचाही निकाल असाच लागला. वरील दोन्ही बाबतींत चळवळ सुरू करण्याकरतां क्याथलिक असोसिएशनच जरा मोठ्या प्रमाणावर पुन : स्थापन करण्याचा ओकोनेल्नें विचार केला. त्याप्रमाणें त्यानें एक सभा स्थापन केली, आणि तिला 'जनरल असेम्ब्ली' ( General assembly ) ह्मणजे ' सार्वजनिक सभा ' असें नांव दिलें.

तिच्या सभा दर आठवड्यांतून दोनदां भरूं लागल्या. तिच्या खर्चा-करतां ' क्याथलिक रेन्ट ' प्रमाणेंच लोकांवर ' जस्टिस रेंट ' बसविला. तिचें उत्पन्नही दिवसानुदिवस वाढूं लागलें. सारांश सरकारी अधिकाऱ्यांना दहशत बसण्याजोगी तिला लवकरच स्थिति प्राप्त झाली. पूर्वीप्रमाणें आणखी एक नवीन चळवळ आयर्लंडांत सुरू होण्याचा रंग दिसूं लागला. इंग्लंडामध्यें ओकोनेल्च्या उलट जी मंडळी होती ती आतां त्याचा अधिकच द्वेष करूं लागली. इंग्लंडांत कारखान्यांत काम करीत असलेल्या मजुरदारांची स्थिति फार शोचनीय होती. ती सुधारण्याकरतां व त्यांतूनही विशेषेंकरून कामावर असलेल्या मुलांचा कामाचा दिवस कमी तासांचा करण्याचा कांहीं उदार अंतःकरणाच्या इंग्लिश गृहस्थांनीं उद्योग सुरू केला होता. त्या उद्योगाला आपल्या हातून होईल तितकें मी सांहाय्य करीन असें ओकोनेल्नें त्यांना आश्वासन दिलें होतें. परंतु हा उद्देश सिद्धीस नेण्याकरतां कॉमन्स सभेपुढें जेव्हां दोन बिलें आलीं तेव्हां त्यानें त्यांच्या उलट मत दिलें व त्यावेळेस आपल्या मनाच्या समर्थनार्थ त्यानें आणखी असें बोलून दाखविलें कीं, कामाचा दिवस कमी तासांचा केल्यापासून कारखानदार लोकांचा फार मोठा तोटा होईल असें आतांपर्यंत झालेल्या वादविवादावरून मला वाटूं लागलें आहे, व त्यामुळें मी हें असें मत देत आहें. ज्यांनीं तें बिल पुढें आणिलें होतें, त्यांना ओकोनेल्चा " मनस्येकं वचस्येकं " हा प्रकार पाहून फार वाईट वाटलें व ते त्याचा उघड रीतीनें निषेध करूं लागले. टोरी लोकांनीं, आपला शत्रू आतां चांगला कचाट्यांत सांपडला आहे असें पाहून, लोकांत त्याची चांगली फजिती करण्याचा प्रारंभ केला. त्यांच्या तर्फेचीं जीं वर्तमानपत्रें होतीं, त्यांतून ओकोनेल्ची नालस्ती होण्याजोगा मजकूर प्रसिद्ध होऊं लागला. ' मर्क्यूरी ' ( Mercury ) नांवाच्या वर्तमानपत्रांत असा मजकूर प्रसिद्ध झाला कीं, पॉटर नांवाच्या एका म्यांचेस्टर येथील व्यापाऱ्यानें बिलाला प्रतिकूल मत देण्याबद्दल ओकोनेल्ला एक हजार पौंड देऊं केले होते. हा मजकूर प्रसिद्ध झाल्याबरोबर पॉटरनें त्या पत्रांत आपल्या सहीचें

एक पत्र छापून प्रसिद्ध केलें व त्यांत पत्रकर्त्यानें ओकोनेल्विरुद्ध छापलेला मजकूर सर्वथैव खोटा आहे असें लिहिलें. यावरून टोरी-पक्षाच्या वर्तमानपत्रांनीं प्रसिद्ध केलेल्या कंड्या साधार होत्या किंवा निराधार होत्या, याचा निर्णय करण्यास वाचकांस बरेंच सोपें जाईल असें आह्मांला वाटतें. ओकोनेल्ला यावेळेला लोकांचें देणें बरेंच होतें, शिवाय मागें सांगितलेल्या निवडणुकीच्या अर्जाच्या कामांत त्याचा बराच पैसा खर्च झाला होता. हें पाहून त्याच्या प्रतिपक्षाच्या मंडळींनें अशा खोट्यानाट्या कंड्या त्याच्यासंबंधानें पिकविल्या असाव्या, असा आमचा अदमास आहे. आमचा हा अदमास बरोबर असो किंवा चुकीचा असो. टोरी मंडळी ओकोनेल्चा मनापासून कसा द्वेष करीत होती हें यावरून स्पष्टपणें दिसून येतें.

सन १८३७ च्या बैठकींत प्रधान मंडळींनें आयरिश म्युनिसिपल रिफॉर्मबिल् व पुअरलॉबिल् ह्मणजे आयर्लंडांतील म्युनिसिपालिट्या सुधारण्याबद्दलचें बिल् व गरीब लोकांना मदत करण्यासंबंधाचा इंग्लंडांत सुरू असलेला कायदा आयर्लंडांतही सुरू करण्याचें बिल्, अशीं दोन बिलें पुढें आणलीं. इंग्लंडांत गरीब लोकांसंबंधाचा सुरू असलेला कायदा आयर्लंडाला लागू करणें हितकारक नाहीं, असें ओकोनेल्चें पहिल्यापासून ठाम मत होतें. अलीकडे अलीकडे त्या कायद्याचें तत्व त्याला पसंत पडूं लागलें होतें. परंतु तो दुसऱ्या देशाला लागू करणें कठीण आहे असें त्याला अजूनदेखील वाटत होतें. फेब्रुवारी महिन्याच्या १२ व्या तारखेस आयर्लंडाकरितां गरीब लोकांचा कायदा सुरू करणें अवश्य आहे, असें जॉन रसेल्नें कॉमन्स सभेंत सांगितलें. आयर्लंडाला हा कायदा लागू केला असतां त्यापासून त्या देशाला फायदा व्हावयाचा नाहीं, असें ओकोनेल्नें आपलें मत दिलें. परंतु एकदां तो लागू करून नुस्ता अनुभवच घ्यावयाचा असेल तर त्याला आपली हरकत नाहीं असें त्यानें सांगितलें. परंतु त्या बिलाचें दुसरें वाचन होतेवेळेस पहिल्या खेपेला त्यानें जी कबूली दिली होती तीही परत घेतली व त्याच्या उलट मोठें कडाक्याचें भाषण केलें.

परंतु यावेळेला या प्रश्नाचा निकाल न लागतां तो तसाच लोंबत राहिला. जून महिन्यांत वुइलियम राजा मरण पावला. त्याच्या पश्चात् राणी व्हिक्टोरिया राज्यारूढ झाली. तिच्याविषयीं ओकोनेल्च्या मनांत फार पूज्यबुद्धि होती, आणि ह्मणून ती गादीवर बसल्यावर जेव्हां पार्लमेंटाची पुनः निवडणूक झाली, तेव्हां त्यानें आपल्या हातून होईल तितकी प्रधान-मंडळींना मदत केली. त्यावेळेस त्यानें आपला एक लेख छापून प्रसिद्ध केला व त्यांत असें ह्मटलें कीं, 'ब्रिटिश राष्ट्रांत सामील होण्याला आयर्लंड तयार आहे. इंग्लंड व आयर्लंड यांच्यामध्यें कोणच्याही प्रकारचा भेद न करतां यापुढें आयरिश लोकांना जर संतुष्ट ठेविलें तर त्यांत आमचें समाधान आहे.' निवडणुकीची धाम-धूम संपल्याबरोबर 'जनरल असेम्ब्ली' नांवाची नवीन स्थापन केलेली सभा त्यानें मोडून टाकली. इंग्लंडबरोबर झालेल्या ऐक्यापासून आय-र्लंडाचें कल्याण होईल किंवा नाहीं याची पुनः एकदां नवीन कारकीर्दींत परीक्षा पाहण्याचा त्यानें निश्चय केला. निवडणुकीचा निकाल असा लागला कीं, प्रधान मंडळीच्या बाजूचे पंचवीस सभासद कायते जास्त होते. ओकोनेल् आपल्या अनुयायांसह त्यांना जाऊन मिळाला. त्यानें तसें केलें नसतें तर प्रधान मंडळीचा पक्ष खचितच लंगडा पडला असता. याप्रमाणें ओकोनेल्नें लॉर्ड मेल्बोर्नच्या डोक्यावर आणखी एक उपका-राचें ओझें चढवून ठेविलें.

परंतु आतां झालेल्या निवडणुकीच्या निकालावरून मेल्बोर्नचे पाय जागेवर रहातात कीं नाहीं याविषयीं लोकांच्या मनांत बरीच शंका उत्पन्न झाली. इंग्लिश मुत्सद्यांच्या नादाला लागल्यामुळें ओकोनेल् आपल्या लोकांत जसा अप्रिय झाला होता, तसाच लॉर्ड मेल्बोर्नही ओकोनेल्च्या नादीं लागल्यामुळें आपल्या अनुयायी वर्गाला अप्रिय झाला होता. ओकोनेल्चा आधार असला तर विग् पक्ष अधिकारारूढ असणार असें सर्व लोकांना कळून चुकलें. ओकोनेल्ची मदत मिळवि-ण्याकरितां आयर्लंडांतील धर्मसंस्थेवर घाला घालण्याचा विग् लोकांचा

हेतु आहे असें त्यांचे प्रतिस्पर्धी ह्मणूं लागले. अशा वेळेस लॉर्ड मेल्बोर्नच्या अनुयायी मंडळींत जर एकवाक्यता असती तर त्यानें प्रतिपक्षाच्या हल्ल्याला इतकेसें जुमानलें नसतें; परंतु त्यांची स्थिति पहावी तों फारच चमत्कारिक. कांहींजणांचें तोंड पूर्वेकडे तर कांहींजणांचें पश्चिमेकडे. ओकोनेल्चा सबंधच्या सबंध पक्ष आपल्या मदतीला येईल अशी आशा बाळगावी तर तीही व्यर्थ. कारण आयरिश लोक अलीकडे त्याच्याविषयीं बरीच उदासीनता दाखवूं लागले होते. आयर्लंडाचें कल्याण करण्याचें सामर्थ्यही प्रधान मंडळीमध्यें बेताचेंच होतें. त्यांनीं त्या देशाचा राज्यकारभार मोठ्या सुव्यवस्थेनें चालविला होता. टाइथ कर हलका करण्याच्या व कॉरपोरेशनची स्थिति सुधारण्याच्या हेतूनें त्यांनीं वेळोवेळ बिलें पुढें आणिलीं, पण तीं लॉर्ड्सच्या सभेनें पास होऊं दिलीं नाहींत. आयर्लंडाला न्याय मिळेल या आशेनें लोकांची मर्जी जाईल किंवा नाहीं याविषयीं फारशी पर्वा न बाळगितां ओकोनेल् एकसारखा विग् लोकांच्या भजनीं लागला होता. त्यांच्यापासून इष्ट हेतु साध्य झाला नाहीं तो नाहींच. उलट दिवसानुदिवस तो आपल्या देशबांधवांना अप्रिय होऊं लागला. इतकेंही होऊन आयर्लंडाला न्याय मिळण्याचा दिवसही हळूहळू पुढेंच जाऊं लागला आहे असें त्याचें त्यालाही वाटूं लागलें.

सन १८३६ च्या पावसाळ्यांत 'आग्रीकलचरल बँक' (Agricultural Bank) ह्मणजे 'शेतकरी लोकांकरितां स्थापन केलेली पेढी' बुडाल्यामुळें व्यापारी लोकांत फार धांदल उडून गेली. इतर पेढ्यांचीही हीच दशा होईल कीं काय या भीतीनें जो तो आपआपल्या ठेवी काढून घेऊं लागला. याप्रमाणें नेहमींच्या वहिवाटीपेक्षां पैशाच्या जास्त मागण्या होऊं लागल्यामुळें आपलेंही दिवाळें निघतें किंवा काय अशी प्रत्येक पेढींतल्या लोकांना काळजी उत्पन्न झाली. ओकोनेल्नें स्थापन केलेली 'न्याशनल बँक' (National Bank) ह्मणजे 'राष्ट्रीय पेढी' त्याच्या एकट्याच्या जीवावर चालली होती. या वेळेस

त्या पेढीची पत राखतां राखतां ओकोनेल्च्या अगदीं नाकीं नव आले. त्या कामांत जरा थावराथावर होती न होती इतक्यांत शरमन क्राफर्ड व स्मिथ ओब्रायन यांच्याशीं कांहीं कारणामुळें त्याचें वैमनस्य आलें. पावसाळा लागल्यानंतर पुढें थोड्याच दिवसांनीं कारखानदार व मजूरदार यांच्यामध्यें पगारासंबंधानें वगैरे तंटा लागला. त्या सर्वांत जहाजांचे कारखानदार व त्यांच्या हाताखालचे कामकरी लोक यांच्या मधला तंटा बराच विकोपास गेला. ओकोनेल् एका प्रसंगीं भाषण करावयास उभा राहिला असतां त्यानें कारखानदारांची बाजू घेतली. कारखानदारांची बाजू आपण जी घेतली, ती कोणच्या तत्त्वांवर घेतली हें त्यानें मोठ्या धैर्यानें व त्याचें भाषण ऐकण्याकरितां जमलेल्या मजूरदारांना न डगमगतां सांगितलें, व ज्या मजूरदारांनीं संप करण्याचा निश्चय केला होता त्यांचा त्यानें निषेध केला; परंतु त्याचें हें करणें मजूरदारांना पसंत पडलें नाहीं. त्यांनीं त्याबद्दल त्याची फजीती करण्याचा आरंभ केला. तो रस्त्यांतून जाऊं लागला असतां त्याची हुर्यो करावयाची, त्याला शिव्या द्यावयाच्या, येथपर्यंत त्यांनीं मजल आणून पोंचविली. असभ्यपणाच्या मार्गाचें अवलंबन केल्यानें माझें ह्मणणें खोडलें जाईल असें जर कोणाला वाटत असेल तर तें व्यर्थ आहे, ज्यांची इच्छा असेल त्यांनीं माझ्याबरोबर वाद करण्यास तयार व्हावें, असा मजूरदारांचे जे पुढारी होते त्यांना त्यानें निरोप पाठविला; व त्याप्रमाणें त्यानें १८३८ च्या जानेवारी महिन्यांत वादविवाद करण्याच्या हेतूनें जागोजाग सभा भरविल्या. जेथें सभा भरली असेल तेथें दांडगाईनें प्रवेश करावयाचा व त्याला पुरतें बोलूं देखील द्यावयाचें नाहीं असा कामकरी लोकांनीं क्रम सुरू केला. एका सभेंत तर असा प्रकार झाला कीं तो सरासरी दोन तास भाषण करीत उभा होता; पण मजूरदार लोकांनीं त्याच्या भोंवतीं इतका दंगा व गोंगाट सुरू केला कीं पुरतीं दोन वाक्येंदेखील त्याला सरळपणानें कोणी बोलूं देईना. याप्रमाणें आयर्लंडांत त्यानें जी लोकप्रियता संपादन केली होती ती अगदीं नाहींशी होत चालली असें लोकांना वाटूं लागलें.

१८३८ मध्यें पार्लमेंटाची सभा पुनः भरली नाहीं. तोंच कॉमन्स-सभेशीं त्याचें भांडण सुरू झालें. निवडणुकीच्या बाबतींत केलेल्या अर्जांची चौकशी करण्याकरितां कमेट्या नेमीत असत; परंतु त्या कमेट्या आपल्याकडे सोंपविलेलें काम निःपक्षपातीपणानें न करितां पक्षाभिनिवेशानें करीत असत ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध होती. ओकोनेल्ला अशा कमेटीपुढें जाण्याचा नुक्ताच प्रसंग आला होता, व त्यामुळें लोकवार्ता खरी आहे किंवा खोटी आहे याचा निर्णय करण्याची त्याला चांगली संधि सांपडली होती. त्याच्या अनुभवास ज्या गोष्टी आल्या होत्या त्यावरून लोक-वार्ता खरी, असा त्याच्या मनाचा पूर्ण ग्रह झाला होता. आणि ह्मणून हा घडघडीत होणारा पक्षपात नाहींसा करण्याच्या हेतूनें कॉमन्ससभेपुढें १८३७च्या नोवेंबर महिन्यांत त्यानें अशी सूचना आणिली होती कीं, यापुढें निवडणुकीच्या अर्जांची चौकशी करण्याकरितां पूर्वींप्रमाणें कमेट्या न नेमतां तें काम न्यायाच्या कोर्टाकडे द्यावें; परंतु ती सूचना त्यावेळेस पास झाली नाहीं. पुढें १८३८ च्या फेब्रुवारी महिन्याच्या एकवि-साव्या तारखेस त्याचें व्याख्यान चालू असतां त्यानें या विषयाचा उल्लेख केला व तो उल्लेख करतांना त्यानें अशा प्रकारच्या कमेट्यांत काम कर-णाऱ्या टोरी लोकांच्या पक्षपातित्वाबद्दल त्यांचा उघड रीतीनें निषेध केला.

ओकोनेल्नें टोरी लोकांवर घेतलेला हा आक्षेप अक्षरशः खरा होता; परंतु त्यामुळें त्यांचा त्याच्यावर अतोनात राग झाला. लॉर्ड मेडस्टोन नांवाच्या टोरी सभासदानें २३ तारखेला ओकोनेल्चें वरील भाषण छापून प्रसिद्ध झालें होतें तें कॉमन्ससभेंत वाचून दाखविलें व 'आतां वाचून दाखविलें तसें भाषण तुह्मीं केलेंत किंवा नाहीं' असें त्यानें ओकोनेल्ला विचारलें. 'आतां वाचून दाखविल्याप्रमाणें मी भाषण केलें आहे, व त्यांतलें एकूणएक अक्षर अगदीं खरें आहे' असें त्यानें उत्तर दिलें; परंतु लॉर्ड मेडस्टोन या उत्तरानें दबला नाहीं. त्यानें ता० २६ रोजीं पुनः कॉमन्ससभेपुढें अशी सूचना केली कीं, 'ओकोनेल्नें केलेल्या या भाषणापासून कॉमन्ससभेची योग्यता कमी होण्याचा संभव आहे, करितां

त्या भाषणाबद्दल सभेनें त्याची कानउघाडणी करावी.' या सूचनेवर पुष्कळ वादविवाद झाला प्रधान मंडळी व त्याचे अनुयायी यानीं सूचनेविरुद्ध आपलीं मतें दिलीं, परंतु शेवटीं ती बहुमतानें पास झालीच. नंतर असें भाषण केल्याबद्दल ओकोनेल्ला एकदां समज द्यावी अशी सूचना केली, व ती पास झाल्यावर स्पीकरनें त्याला आपल्या जागेवर उठून उभें राहण्यास सांगितलें, व नंतर त्यानें त्याला उद्देशून निषेधपर असें भाषण केलें. त्या भाषणानें ओकोनेल्च्या मनाला यत्किंचित् देखील वाईट वाटल्याचें चिन्ह दिसलें नाहीं. हा सर्व विधि आटोपल्यानंतर एका क्षणाचीदेखील वाट न पाहतां फार तर काय, तो जो एकदां उठून उभा राहिला होता, तो खालीं देखील न बसतां, त्यानें सभेला अशी नोटीस दिली कीं, या सर्व प्रकरणाची चवकशी करण्याकरतां एक कमेटी नेमण्याची सूचना आणण्याचा माझा विचार आहे. ही नोटीस दिल्यानंतर शेवटीं तो असें बोलला "मला कशाबद्दलही पश्चाताप झालेला नाहीं. लोकांना झोंबेल अशी कटु भाषा वापरण्याची माझी इच्छा नाहीं. मी पूर्वी जें बोललों तें पुनः बोलण्याला मी तयार आहें. माझी एवढीच इच्छा आहे कीं, सौम्य आणि माझा अर्थभंग न करणारे असे शब्द मला इंग्रजी भाषेंत सांपडोत ह्मणजे झालें."

ओकोनेल्नें आपल्याला केलेल्या मदतीबद्दल त्याचे उतराई होण्यासाठीं प्रधान मंडळीनें याच्यापूर्वी एकदोनदां प्रयत्न केले होते. १८३७ सालीं आयर्लंडांतील आटर्नी जनरलची जागा ओकोनेल्ला देण्याचा त्यांचा बहुतेक विचार झालाच होता. १८३८ सालीं आणखी एक मोठी जागा खालीं झाली. ती जागा ओकोनेल्ला देण्याचा लॉर्ड मेलेबोर्नचा विचार होता; परंतु कांहीं कारणामुळें त्यानें तो विचार रहित केला व ती जागा दुसऱ्याच एका गृहस्थाला दिली. ओकोनेल्नें देखील सदरहू जागा आपल्याला नकोच असें मेलबोर्ननें विचारल्या वेळेस सांगितलें होतें. त्याचें कारण त्यानें एका प्रसंगीं असें सांगितलें कीं, पक्षकार लोकांशीं जितक्या निःपक्षपातीपणानें वागावयाला पाहिजे तितकें माझ्या हातून वागणें होणार नाहीं अशी माझी मलाच भीति होती

ह्मणून ती जागा मी नाकारली. त्यानें सांगितलें हें एक कदाचित् कारण असेल; परंतु मुख्य कारण हें होतें कीं, आतां लवकरच आयरिश लोकांना आपली जरूर लागेल असें एकंदर परिस्थितीवरून त्याला वाटूं लागलें होतें, व त्यामुळें सरकारी नोकरींत आपला पाय अडकवून न घेतां देशसेवेकरतां तो तसाच मोकळा राहिला.

१८३८ सालीं रसेलनें पुन: टाइथ बिल पुढें आणिलें. धर्मसंस्थेचा खर्च भागून जास्ती जी रक्कम राहील ती सार्वजनिक कामाकडे लावण्यांत यावी ह्मणून ओकोनेल्च्या सांगण्यावरून विग् मुत्सद्यांनीं जें कलम घातलें होतें, तें गेल्या वर्षीच्याच बिलांतून काढून टाकलें होतें व त्याच्या बदली शिक्षणखात्याकडे लावण्याकरितां पुरोहित मंडळींच्या उत्पन्नावर शेंकडा १० कर बसविण्याची व्यवस्था केली होती. परंतु या खेपेला तीही व्यवस्था केली नाहीं. आतांच्या बिलांत अशी सूचना केली होती कीं, टाइथनें उत्पन्न होणारी रक्कम धर्मादायाची बाब आहे असें न समजतां शिक्षणाची बाब आहे असें समजावें. परंतु ही व्यवस्था लाट मंडळींना पसंत नव्हती. सबब त्या बिलाची त्यांनीं इतकी कांहीं छाटाछाटी केली कीं, त्यामुळें या बिलांत व तीन वर्षांपूर्वी पीलनें आणलेल्या बिलांत कोणचाही फरक राहिला नाहीं. यावेळेस कोणच्याही प्रकारची उलट बाजू न घेतां ओकोनेल् स्वस्थ बसून राहिला. या बिलामुळें त्यांचा फार हिरमोड झाला. आपल्या देशाचें कांहीं तरी कल्याण होईल या आशेनें विग् लोकांशीं सख्य केलें; पण त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं, व यापुढेंही होणार नाहीं अशी ओकोनेल्ची पक्की खात्री झाली. तरी पण आयर्लंडाला न्याय मिळविण्याचा आणखी एकदां अगदीं शेवटचा उपाय योजून पाहण्याचा त्यानें निश्चय केला व त्याप्रमाणें त्यानें आपला उद्योग सुरू केला.

सन १८३८ च्या आगस्ट महिन्यांत 'प्रीकरसर सोसायटी' (Precursor Society) नांवाची एक संस्था त्यानें स्थापन केली. या सभेच्या नांवावरून ओकोनेल् आतां ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला लवकरच

आरंभ करणार अशी लोकांनीं अटकळ बांधली. वास्तविक पाहिलें असतां हा उद्देश मनांत आणून ओकोनेल्नें कांहीं या सभेला हें नांव दिलें नव्हतें. नवीन स्थापन केलेल्या सभांचीं नांवें तो जीं ठेवीत होता, तीं प्रायः असंबद्ध अशींच नेहमीं असत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पार्लमेंटमध्यें आयर्लंडातर्फे जास्त सभासद आणणें, धर्मसंस्थेकरतां लोकांपासून जुलमानें घेतला जाणारा कर नाहींसा करणें, कॉरपोरेशन्सूची सुधारणा करणें वगैरे गोष्टी साध्य करून घेण्याच्या इराद्यानें त्यानें ही सभा स्थापन केली, ऐक्य नाहींसें करण्याशीं तिचा कांहींएक संबंध नव्हता. तरी पण त्यानें नवीन सभेला वरील नांव दिलें! आयरिश लोकांना तर शेवटची गोष्ट खेरीजकरून वर सांगितलेल्या गोष्टींपैकीं एकही पसंत नव्हती. यामुळें या नवीन संस्थेंत जितक्या लोकांचा भरणा व्हावयाला पाहिजे होता तितका प्रथम झाला नाहीं. तरी पण प्रधान मंडळीच्या मनांत दहशत उत्पन्न होण्याजोगी स्थिति तिला लवकरच प्राप्त झाली. ती बंद करण्याच्या हेतूनें त्यांनीं ओकोनेल्ला दरडावणीचीं अनेक पत्रें लिहिलीं. परंतु तीं ओकोनेल्नें जुमानलीं नाहींत व त्यामुळें सभेला जास्त जोर येत चालला. ऐक्य नाहींसें करण्याची चळवळ अजून ओकोनेल्च्या भोंवतीं भोंवतीं असणाऱ्या मंडळींतच कायती दिसून येत होती व ती तरी त्यांनीं तोच विशिष्ट हेतु उघडपणें आपल्या नजरेसमोर ठेवून चालविली होती असेंही ह्मणतां येत नाहीं. तथापि ही चळवळ कोणच्या प्रकारची आहे हें लोकांच्या लक्षांत येण्यासारखें होतें यांत शंका नाहीं. याप्रमाणें स्वतः ओकोनेल्ला न कळतच आयरिश लोक ऐक्य नाहींसें करण्याचा उद्योग करण्याला बहुतेक उद्युक्त झाले होते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तो साध्य करून घेण्याकरतां थोडीच चळवळ चालली होती. इष्ट हेतु असो वा नसो, चळवळ मात्र चालू होती यांत शंका नाहीं. स्वतः ओकोनेल्लादेखील न कळतच आयर्लंड देश एकी नाहींशी करण्याबद्दल दीर्घ उद्योग करण्याच्या अगदीं बेताला आला होता.

यामकारें आयरिश लोकांच्या मनांत अतोनात चळवळ उडून गेली होती. त्यांचे खरे हितचिंतक आयरिश लोकांच्या हितासाठीं पार्लमेंटापुढें निरनिराळे प्रश्न पुढें यावे ह्मणून मोठी मेहनत करीत होते. अशी कष्टी मेहनत करूनसुद्धां आयर्लंडचें कल्याण झालें नाहीं. तेव्हां ज्या देशांतील लोक स्वतः मेहनत करण्यास तयार नाहींत, दुसऱ्यांनीं दूध पाजावें अशीच नेहमीं इच्छा करीत राहतात, त्यांनीं सुखाची आशा करणें व्यर्थ होय. आयर्लंडच्यातर्फे अशी मेहनत होत होती ह्मणून पार्लमेंटास तिकडे लक्ष दिल्याशिवाय चालेना. इतर महत्वाच्या प्रश्नापेक्षां आयर्लंडचेंच स्तोम माजविलें होतें असें एक इंग्रज इतिहासकार* ह्मणतो. ठीकच आहे. ज्याचीं दुःखें त्याला ठाऊक. आयरिश इतिहासकार असें लिहिता ना. सारांश, कधीं गम खाऊन, कधीं अकांडतांडव करून स्वदेशभक्त आपल्या देशहितासाठीं सदा झटत असतात. त्यांच्याविषयीं कांहीं कालपर्यंत गैरसमज झाला तरी त्याची फिकीर करीत नाहींत.

* In the meantime Irish tithes, Irish Corporation Reform, Irish Poor Laws and other Irish questions were occupying their *usual disproportionately large* share of the attention of the legislature. मोल्सवर्थ कृत इंग्लंडचा इतिहास १८३०—१८७४ भाग २ रा. पृष्ठ १८.

# ड्यानियल ओकोनेलचें चरित्र.

## भाग ८ वा.

### रिपील असोसिएशन.

१८४० ते १८४३.

मथळ्यावर सांगितलेली सभा ता. १९ एप्रिल १८४० रोजीं स्थापन झाली. त्या दिवसाच्या समारंभाला शंभर लोकदेखील हजर नव्हते. जे लोक जमा झाले होते त्यांनीं आणखी दुसरे लोक येण्याची बरीच वेळ वाट पाहिली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं जे कांहीं थोडे लोक जमले होते, त्यानांच ओकोनेलनें आपल्या मनांत काय विचार होता तो सांगितला. सभेला प्रथम 'न्याशनल सोसाइटी' ( National Society ) ह्मणजे 'राष्ट्रीय समाज' असें नांव दिलें व त्या बैठकीलाच सभेचें काम वगैरे कसें चालावयाचें यासंबंधानें नियम करण्यांत आले.

पहिल्या सभेला जितके लोक जमावयाला पाहिजे होते तितके जमले नाहींत, यामुळें ओकोनेलनें धीर सोडला नाहीं. क्याथलिक असोसिएशन जेव्हां प्रथम स्थापन झाली, तेव्हां आरंभाला कसा प्रकार झाला होता, हें त्याच्या पूर्णपणें लक्षांत होतें. इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य कायम राखण्यांत आयर्लंडचें कल्याण आहे, असें आजपर्यंत आपण प्रतिपादन करीत असतां आतांच त्याच्या उलट प्रतिपादन कां करूं लागलों, हें लोकांच्या पुरतेपणीं ध्यानांत येण्याला बराच अवकाश लागेल, असें त्याचें मत होतें. तो असें ह्मणत असे कीं, 'या उद्योगाला मी अगदीं

मनापासून लागलों आहें, असें लोकांच्या एकदां निदर्शनाला आलें, ह्मणजे ते आपोआप असोसिएशनभोंवतीं गोळा होऊं लागतील.' परंतु खरें ह्मटलें तर हा त्याचा अदमास बराच चुकीचा ठरला. आरंभाला कांहीं दिवस या नवीन समाजासंबंधानें डब्लिन येथील लोक अगदीं उदासीन होते. आयर्लंड देशांत सभा भरविण्याचा प्रकार जेव्हां अगदीं नवीनच सुरू झाला, तेव्हां आरंभाआरंभाला लोकांना त्यांत जी विशेष मौज वाटत होती, ती आतां वाटेनाशी झाली होती. त्यांतून लोकांच्या मनांत अशा प्रकारचें औदासिन्य प्राप्त होण्याला स्वतः ओकोनेलचेंच वर्तन बऱ्याच अंशानें कारणीभुत होतें यांत संशय नाहीं. ऐक्य नाहींसें करण्याचा विचार लोकांच्या मनांत फार दिवसांपासून घोळत होता; पण ओकोनेलला त्यावेळेस तो पसंत नव्हता. विग् पक्षाच्या मंत्रिवर्गाचें करणें लोकांना पसंत नव्हतें. असें असून तो त्यांना आपल्या हातून होईल तितकें साहाय्य करीत होता. निरनिराळ्या परगण्यांत जमिनदार लोकांची फार दिवसांपासून चालत आलेली सत्ता त्यानें नाहींशी केली होती, ह्मणून त्या लोकांच्या डोळ्यांत तो अगदीं सलत होता. 'टाइथ आक्ट' पास झाल्यानें आयर्लंडांतील धर्मसंस्थेचें प्रस्थ वाढल्याशिवाय राहणार नाहीं, हें त्याला पूर्णपणें अवगत असून त्यानें त्या कायद्याला आपली संमति दिली, याबद्दल पुरोहित लोकांचा त्याच्यावर रोष झाला होता. सहा वर्षें विग् पक्षाच्या लोकांबरोबर ओकोनेल सख्य करून राहिला होता, पण त्याचा मोबदला विग् लोकांनीं कोणचा दिला? तर गरीब रयतेविरुद्ध निरनिराळे जुलमी कायदे पास केले हा. यामुळें ओकोनेल जे जे उद्योग करितो ते ते आयर्लंडच्या कल्याणाचेच असें जें यापूर्वी शेतकऱ्यांना वाटत होतें तें अलीकडे वाटेनासें झालें होतें. सध्यांच्या प्रसंगीं त्याचे मदतनीस जे होते, त्यांची लोकांत असावी तितकी प्रतिष्ठा नव्हती व त्यांच्यांत अक्कलही थोडी कमीच होती. लोकांत त्याचा झालेला उत्कर्ष कांहीं लोकांना सहन न झाल्यामुळें त्याला बरेच शत्रु उत्पन्न झाले होते व त्यांनीं त्याच्यावर नानातऱ्हेचे आरोप आणण्यास सुरुवात केली होती. त्या आरोपांत सत्याचा भाग जरी

फारच थोडा होता, तरी अशीं प्रकारचीं खोटीं दूषणें देखील लोकांनीं देणें, यांतच अप्रूदार लोकांना फार कमीपणा येतो. ' प्रीकरसर सोसाइटी ' या नांवाची त्यानें जी एक सभा स्थापन केली होती, त्या सभेचा-खंड खजीनदाराच्या खात्याला जमा न करितां, तो आपल्या खात्याला व आपण स्थापन केलेल्या पेढीवरच जमा करावा, असा त्यानें आग्रह धरिला होता. आयर्लंडांत त्यानें जो लौकिक संपादन केला होता, त्याचा फायदा घेऊन त्यानें व्यापार आरंभिला होता व त्यांत त्यानें बराच पैसा मिळविला होता. त्यानें आपली स्वतःची अशी एक पेढी स्थापन केली होती. त्याचप्रमाणें त्याच्या मुलानें एक दारूचा कारखाना काढला होता. दुसऱ्या एका मुलाला व एका जांवयाला सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या होत्या. क्याथलिक लोकांचीं बंधनें त्यानें मोठा परिश्रम करून दूर केलीं होतीं हें खरें; पण ती गोष्ट आतां जुनी झाली होती. त्यावेळेस ज्या लोकांनीं अतोनात परिश्रम केले होते, त्यांपैकीं कांहीं ' दशनविहीनं जातं तुण्डं ' अशा स्थितीला येऊन पोहोंचले होते व कांहीं तर इहलोक सोडून परलोकाला गेले होते. नवे नवे लोक जे आतां पुढें सरसावले होते, त्यांना ओकोनेलनें बजाविलेली देशसेवा प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहाण्याचा प्रसंग आला नव्हता. पूर्वीच्या गोष्टी ऐकूनच त्याच्या कर्तबगारीची कल्पना करणें त्यांना भाग होतें. या गोष्टी ऐकून ' लोकनायक ' ही पदवी त्याला रास्त रीतीनें मिळाली होती, अशी त्यांची खात्री होत असे; पण त्याचबरोबर त्यांना असेंही वाटत असे कीं, पूर्वीची गोष्ट अगदीं निराळी होती, हल्लींच्या प्रसंगीं मात्र त्याला ही बहुमानाची पदवी देणें योग्य होणार नाहीं. कारण, हल्लीं त्याची अगदीं वृद्धावस्था झाली होती व जिकडे जावें तिकडे त्याला अपयशच येत होतें. यामुळें पूर्वीचा त्याच्या अंगांतील सर्व जोम नाहींसा झाला होता व कोणतेंही काम मोठ्या उत्साहानें करण्याची त्याच्या अंगांत ताकद राहिली नव्हती. पूर्वीप्रमाणें आयर्लंडांतील लोकांचें त्यानें नवीन आरंभिलेल्या उद्योगाला साहाय्य नव्हतें. खुद्द क्याथलिक लोकांपैकींच पुष्कळ लोक शिक्षणाकरितां

इंग्लंडांत जाऊन राहिले होते. यामुळें त्यांचें सर्व शिक्षण तिकडच्या पद्धतीवर झालें होतें. आणि त्यांच्या सर्व कल्पनाही इंग्लिश लोकांप्रमाणें झाल्या होत्या. व त्यांचा त्यांना मोठा अभिमान वाटत होता. त्यांच्यापैकीं बरेच लोक सरकारच्या देणगीची आशा धरून बसले होते. अर्थातच तें ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांत प्रथमपासून पराङ्मुख होते. क्याथलिक लोकांच्या चळवळीचे मुख्य आधारस्तंभ जे व्यापारी लोक ते अगदीं निष्कांचन होऊन बसले होते व राजकीय गोष्टींतून त्यांनीं आपलें मन यापूर्वीं केव्हांच काढून घेतलें होतें. राजकीय कामांत पहिल्या प्रतीचा पुढाकार घेऊन भांडणारे पुरोहित लोक, क्याथलिक लोकांचीं बंधनें नाहींशीं झाल्याबरोबर, संतुष्ट होऊन स्वस्थ बसले. ऐक्य नाहींसें करण्याच्या कामाकडे ते ढुंकूनदेखील पाहीनातसे झाले. अशा उदासीन वृत्तीनें राहणाऱ्या लोकांच्या मनांत हुरूप उत्पन्न करण्याचें व नवीन सभा स्थापन करून आपला हेतु साध्य करून घेण्याचें अतिशय बिकट काम करण्याचा बोजा ओकोनेलनें आपल्या वयाच्या पासष्टाव्या वर्षीं आपल्या शिरावर घेतला व तोदेखील इंग्लंडांत त्याला प्रतिकूल असणारा टोरीपक्ष अधिकारारूढ होण्याच्या बेतांत होता अशा वेळेस. हें त्यांत विशेष आहे.

इंग्लंडांत विग्पक्षाची सत्ता आतां डळमळूं लागली होती, त्यामळें त्यांच्या पश्चात् टोरीपक्ष लवकरच अधिकारारूढ होईल, अशी ओकोनेलच्या मनाची पक्की खात्री झाली होती. विग्पक्षाला आयर्लंडच्या कल्याणाची जी गोष्ट करतां आली नाहीं ती करण्याचा यत्न देखलि टोरीलोक करणार नाहींत; उलट विग् पक्षानें केलेल्या कांहीं चांगल्या गोष्टींचा टोरीपक्ष नाश करून टाकील असें त्याला वाटत होतें. पण तो पडला छातीचा माणूस! टोरीपक्ष अधिकारारूढ झाला तरी यत्किंचितही न डगमगतां एकंदर चार गोष्टी साध्य करून घेण्याचा त्याचा विचार होता. त्या चार गोष्टी येणेंप्रमाणें:—पहिली, सरकारच्या

१ पहा Mc Carthy's Outlines of Irish History pp. 86/87.

आश्रयाखालीं क्याथलिक लोकांची धर्मसंस्था स्थापन करणें; दुसरी कॉर्पोरेशनची सुधारणा करणें; तिसरी, पौरजनाधिकार देण्याच्या, कामीं दिसून येणारी असमता नाहींशी करणें; आणि चौथी, आयर्लंडच्या तर्फेनें जास्त लोकांचा पार्लमेंटांत प्रवेश करणें. या गोष्टी साध्य करण्याकरितां क्याथलिक असोसिएशननें ज्या मार्गांचें अवलंबन केलें होतें त्याच मार्गांचें पुनः अवलंबन करण्याचें ठरवून अगदीं गरीब लोकांपासून होता होईल तितकी थोडी वर्गणी गोळा करून सभेचें काम सुरू करण्याचा त्यानें विचार कायम केला.

सन १८४० सालच्या उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत डब्लीन, बेलफास्ट, कॉर्क, लीड्स वगैरे मोठमोठ्या शहरीं जाऊन त्यानें अनेक सभा भरविल्या व त्यांत भाषणें केलीं. त्याच वर्षाच्या अखेरीस आयर्लंडांतील कारखान्यांत तयार झालेला तेवढा माल लोकांनीं घ्यावा, इतर ठिकाणचा घेऊं नये, असें तो लोकांना सांगूं लागला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. देशी माल वापरण्याच्या कामांत आपल्या इकडे जो प्रकार नेहमीं आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो, तोच प्रकार तिकडेही सुरू झाला. श्रीमंत लोकांना देशांत उत्पन्न झालेला माल पसंत नव्हता ह्मणून तो ते घेईनासे झाले. त्या मालाची किंमत जरा भारी असल्यानें गरीब लोकांना तो विकत घेण्याची ऐपत नव्हती. यामुळें दुकानदार देशी माल आपल्या दुकानांत ठेवीनातसे झाले. ज्या लोकांनीं 'फयाशन' बाजूला ठेवून देशाभिमान बाळगला व देशी कपडे वापरण्याचा निश्चय केला, त्यांना विश्वासानें देशी माल कोठेंही मिळेनासा झाला. अशा लोकांना फसविण्याकरितां इंग्लंडांतला माल आणून त्याच्यावरच 'आयर्लंडांत केलेला' असा छाप मारून दुकानदार देशी ह्मणून परदेशांतीलच माल विकूं लागले. असो. रिपील असोसिएशन स्थापन झाल्यावर पुढें थोड्याच दिवसांनीं क्याथलिक असोसिएशनच्या थाटावर तिची व्यवस्था झाली. सन १७९३ च्या कायद्याचा अम्मल अजून चालू होताच. यामुळें या सभेला देखील

लोकांनीं निवडलेले प्रतिनिधि न येण्याची व्यवस्था केली. वर्गणीदारांचे एकंदर तीन वर्ग केले. सगळ्यांत कमी वर्गणी, दर वर्षाला एक शिलिंग इतकी ठेविली. कामाच्या व्यवस्थेकरितां निरनिराळ्या कमेट्या नेमल्या. वर्गणी गोळा करण्याकरितां चोहोंकडे लोक रवाना केले व त्यांच्यावर देखरेख करण्याकरितां इनस्पेक्टर लोकांची योजना केली. सारांश क्याथलिक असोसिएशनच्या वेळेस जशी व्यवस्था होती तशी व्यवस्था अगदीं हुबेहूब उठवून दिली. पूर्वींचे जे अनुभविलेले लोक होते त्यांपैकीं कांहीं मेले होते व कांहीं वृद्धावस्थेमुळें ही दगदग करण्याला नालायख झाले होते. यामुळें त्यांच्या जागीं नवीन मनुष्यांची योजना करणें भाग पडलें. नवीन नेमलेलीं माणसें या कामांत अगदीं अनभ्यस्त होतीं व सर्व माहिती करून घेण्याला त्यांना थोडासा अवकाश पाहिजे होता, ह्मणून आरंभाला सभेच्या कामाचा जसा जम बसावा तसा बसला नाहीं. परंतु या नवीन लोकांना दिवसानुदिवस जसजसा अनुभव येत चालला तसतसें सभेचें महत्व वाढत चाललें.

सन १८४३ सालीं विग्पक्षाचा पराभव झाला. त्यानंतर त्यां पार्लमेंट बरखास्त केलें; परंतु नवीन जी निवडणूक झाली तींत त्यांना चोंहोंकडे अपयश येत गेलें. ओकोनेल व त्याच्या पक्षाचे लोक यांची देखील बरीच फजीति झाली. खुद्द ओकोनेल डब्लीनतर्फेनें निवडून आला नाहीं ह्मणून त्याला कॉर्क परगण्यातर्फेनें उभें राहणें भाग पडलें. त्याच्या पक्षाचे बरेच लोकांचा पार्लमेंटांत प्रवेश न झाल्यामुळें तेथें त्याचा पक्ष बराच लंगडा पडला. त्याच्या उपयोगीं पडणारे असे दहा बारा लोकच कायते पार्लमेंटांत निवडून आले. रिपील असोसिएशनचें काम झपाट्यानें चालू झालें होतें असें ह्मणावें तर तेंही नाहीं. सर्व लोकांनीं या सभेला येऊन मिळावें या हेतूनें त्यानें सर्व देशभर प्रवास केला, व्याख्यानें दिलीं, सभेचें काम कसें चालत आहे, सभेच्या मनांत कोणचे हेतु साध्य करून घ्यावयाचे आहेत, यासंबं-

२. पहा Walpole's History of England Vol. V.

धानें वेळोवेळीं रिपोर्ट छापून प्रसिद्ध केले. परंतु त्यापासून लोकांच्या मनावर व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. उलट लोकांना हें त्याचें करणें पसंत नव्हतें असें दाखविणारींच अनेक उदाहरणें आहेत. बेलफास्ट येथील प्रॉटेस्टंट लोकांनीं त्याला असा धाक घातला कीं; तूं जर पुनः येथें येशील तर आह्मीं तुला चांगला खरपुस मार दिल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं लोकांनीं वाटेंतच त्याच्यावर हल्ला करण्याचा बेत केला होता. परंतु या हल्ल्याची बातमी त्याला आगाऊच लागली होती, ह्मणून प्रवासाला जाण्याची त्यानें आपली वेळ बदलली व त्यामुळें तो संकटांतून पार पडला. आपण योजिलेल्या उपायांनीं लोक आपल्याला वश होत नाहींत, असें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां त्यानें आपल्या उद्योगाची दिशा बदलली. लोकांचीं मनें वळविण्याचें काम त्यानें आतांपर्यंत आपल्या स्वतःकडे ठेविलें होतें पण १८४२ च्या पावसाळ्यांत तें काम त्यानें आपल्या एका मुलाकडे व आणखी आपल्या तीन विश्वासू मित्रांकडे सोंपविलें, पण ओकोनेलला ज्या कामांत यश आलें नाहीं त्या कामांत दुसऱ्याला यश कोठून येणार? मंडळीच्या प्रयत्नानें सभेकरतां जमणाऱ्या वर्गणींत थोडीशी भर पडली हें खरें; परंतु १८४२च्या अखेरीस व १८४३च्या आरंभास सभेच्या उत्पन्नांत जी एकदम मोठी भर पडली, त्याबद्दलचें श्रेय या मंडळीस देणें योग्य नाहीं. ती भर पडण्याला दोन मुख्य कारणें झालीं. एक 'नेशन' ( Nation ) ह्मणजे 'राष्ट्र' नांवाच्या एका वर्तमानपत्राचा उदय व दुसरें डब्लीन येथील कॉर्पोरेशननें आयर्लंडाला स्वराज्य देण्याविषयीं पार्लमेंटास अर्ज करण्याचा केलेला ठरावं, या दोन गोष्टी घडून आल्यानंतर ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला विलक्षण जोर आला; तो कसा हें खालील विवेचनावरून वाचकांचे ध्यानांत येईल.

रिपील असोसिएशनेचे हेतु काय आहेत, हें लोकांना नीटपणें समजून देण्याकरितां 'राष्ट्र' पत्राचा जन्म झाला. यावरून त्या

---

३. पहा Walpoles History of England vol. V p. 95.

पत्राच्या चालकांचें ओकोनेलला पूर्णपणें पाठबळ होतें हें अगदीं उघड आहे. डफी, डिलन आणि डेव्हिस हे तीन तरुण आणि होतकरू गृहस्थ या उद्योगांत प्रमुख होते. ते तिघेही फार मोठे विद्वान् होते. यामुळें फारच थोड्या अवकाशांत त्यांच्या पत्राची ख्याति झाली. त्या पत्रांत प्रसिद्ध होणारे राजकीय विषयावरचे लेख, वाचकांच्या मनाला चटका लावून सोडणाऱ्या निरनिराळ्या विषयांवर त्यांत येणाऱ्या कविता[४] व पोवाडे, निराश न होतां मोठ्या धैर्यानें उद्योग करण्याविषयीं आयरिश लोकांना त्यांत केलेला उपदेश, व लेखकांचें जागोजाग दिसून येणारें ऐतिहासिक अगाध ज्ञान, या सर्व कारणामुळें तें पत्र हजारों लोक घेऊं लागले. पत्र प्रसिद्ध होण्याच्या वेळेला छापखान्यापाशीं हजारो लोक जमत असत, व जो तो आपल्याला अगोदर पत्र मिळावें ह्मणून यत्न करी. त्यायोगानें केव्हां केव्हां छापखान्याच्या खिडक्या देखील मोडण्याचा प्रसंग येई. याप्रमाणें या नवीन पत्राचा चोंहोंकडे प्रसार झाल्यामुळें ओकोनेलला फारच हुरूप चढला. ऐक्य नाहींसें करण्याच्या चळवळीला अगदीं खालच्या वर्गांतील लोकांचा आधार मिळेल तितका चांगला, असें ओकोनेलचें मत होतें. 'राष्ट्र' पत्राचा खप श्रीमंत लोकांपासून तों गरीब लोकांपर्यंत एकसारखा होता व ओकोनेलच्या मतांचेच त्यांत प्रतिपादन होत होतें. यामुळें आतां सांगितलेला त्याच्या मनांतील हा हेतु चांगल्या प्रकारानें सफल होऊं लागला. तो आयरिश लोकांना असें सांगत असे कीं, इंग्लंडबरोबर आयर्लंडचें ऐक्य झाल्यापासून जें कर्ज केवळ इंग्लंडच्या गरजेकरितां काढिलें होतें, त्याचा बोजा आयर्लंडवर विनाकारण बसत आहे. ऐक्य झाल्यापासून आपल्या देशांत जे कारखाने आपण

---

४ या कवितांचा मासला ह्मणून खालील चार ओळी वाचकांकरितां दिल्या आहेत.
The work that should today be wrought defer not till tomorrow,
The help that should within be sought scorn from without to borrow.
Old Maxims these, yet stout and true, they speak in trumpet tone
To do at once what is to do and trust ourselves alone.
Walpole's History of England vol. V p. 95.

5. Justin McCarthy's Outlines of Irish History p. 91.

उत्पन्न केले होते ते पार बुडून गेले, कारागीर लोक धुळीला मिळाले, लोंकरीच्या व्यापारांतील कामकरी लोकांची किफायत बुडाली, असे एकनादोन हजारों तोटे झाले आहेत, व ते सर्व भरून काढण्याला, मजूरदार लोकांचें वेतन वाढविण्याला व करांचा बोजा हलका करण्याला, ऐक्य नाहींसें करण्यावांचून दुसरा कोणताही योग्य मार्ग नाहीं. डेव्हीस आणि डफी यांनीं लेखनाच्या व भाषणाच्या द्वारानें आपले उद्योग याच धोरणावर चालविले होते. इंग्लंडचें वर्चस्व नाहींसें करण्याकरितां परराष्ट्रांची मदत घ्यावी लागली, तर ती घेण्यास आपण मागेंपुढें पाहूं नये, असें ते गर्भित रीतीनें लोकांना बोलून दाखवीत. ओकोनेल तर उघड रीतीनें असें बोलून दाखवी कीं, 'फ्रान्सनें इंग्लंडला पेचांत आणिलें व इंग्लंडवर मोर्चा फिरवून इंग्लिश चॅनेलच्या कांठावर पहिली तोफ डागली कीं, आयर्लंडची सर्व सत्ता मी आपल्या हातांत घेतली ह्मणून समजावेंच.' 'इंग्लंड संकटांत सांपडलें ह्मणजे आयर्लंडनें आपली संधि साधून घेतली पाहिजे' हें तत्व ओकोनेल व **राष्ट्र** पत्राचे चालक उभयतांही प्रसिद्ध रीतीनें प्रतिपादन करीत होते.

आयरिश् म्युनिसिपल रिफॉर्म आक्ट (Irish Municipal Reform Act.) ह्मणजे 'आयर्लंडांतील म्युनिसिपालिट्यांची सुधारणा करण्याचा कायदा' नुकताच पास झालेला होता व त्या आक्टान्वयें १८४२ सालाकरितां ओकोनेलची 'ऑलडरमन' च्या बहुमानाच्या जागेवर नेमणूक झाली. या जागेवर रोमन क्याथलिक धर्मी मनुष्याची हीच पहिली नेमणूक होय. ओकोनेलनें त्यांतल्या त्यांत संधि साधून मोठ्या शिताफीनें आणखी असा एक ठराव पास करून घेतला कीं, यापुढें ही जागा प्राटेस्टंट व रोमन क्याथलिक यांना पाळीपाळीनें देण्यांत यावी. ओकोनेलसारख्या वृद्ध लोकनायकाला ऑलडरमनच्या जागेवर नेमिलेला पाहून, डब्लिन येथील लोक हर्षातिशयानें नाचूं लागले. रोमन क्याथलिक धर्मी मनुष्याला आजपर्यंत जो मान मिळाला

नाहीं तो आतां मिळाला हें पाहून एकप्रकारची नवीन उमेद त्यांच्या अंगांत दिसूं लागली. या नवीन पदवीचा ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांत उपयोग करून घेण्याचा ओकोनेलनें मनांत विचार आणला व त्याप्रमाणें त्यानें ता० २९ फेब्रुवारी १८४३ रोजीं तशा अर्थाची एक सूचना कार्पोरेशनपुढें आणिली. ओकोनेलचें त्या दिवशींचें भाषण ऐकण्याकरितां श्रोते लोक इतके जमले होते कीं, कार्पोरेशनच्या सभागृहांत एक इंचभर देखील जागा रिकामी राहिली नव्हती. इतकेंच नाहीं तर कार्पोरेशनच्या आसपासचे रस्ते देखील लोकांनीं गच्च भरून गेले होते. ओकोनेलचें त्या दिवशीं एकंदर चार तास भाषण झालें व तें भाषण इतकें चांगलें वठलें कीं, त्याच्या तोडीचें भाषण हा वेळपर्यंत किंवा त्याच्या पुढेंही केव्हांच झालें नाहीं. आपलें स्वतःचें पार्लमेंट असण्याइतकी आयरिश लोकांच्या अंगांत अक्कल आहे असें त्यानें त्यावेळेस सिद्ध करून दाखविलें. शिवाय त्यानें आणखी असेंही सांगितलें कीं, स्वतःचें पार्लमेंट असणें हा आयरिश लोकांचा फार दिवसांपासून चालत आलेला हक्क आहे. पण मध्यंतरीं पिट् व क्यासलरे यांनीं लोकांना लांच देऊन, त्यांना धमकी घालून, बलात्कारानें तो त्यांचा हक्क, आयरिश पार्लमेंटांत तशा अर्थाचा ठराव पास करून हिसकावून घेतला आहे. अशा प्रकारानें आपलें अस्तित्व नाहींसें करण्याचा ठराव पास करण्याचा आयरिश पार्लमेंटाला कोणच्याही प्रकारचा हक्क नव्हता. यामुळें लबाडीनें व धाकदपटशा दाखवून इंग्लंडबरोबर झालेलें आयर्लंडचें ऐक्य नीतिदृष्ट्या सर्वथैव त्याज्य आहे, असा त्याच्या बोलण्याचा रोख होता. याशिवाय इंग्लंडबरोबर ऐक्य झाल्यामुळें आयर्लंड देशाचा व्यापार कसा बुडाला, मजुरीवर निर्वाह करणाऱ्या लोकांची कशी निकृष्टावस्था झाली, हें त्यानें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें, व शेवटीं हें ऐक्य नाहींसें केल्यानें आणि आयर्लंडचें स्वतःचें पार्लमेंट स्थापन केल्यानें, देशांत संपत्ति व शांतता किती वाढेल, आणि लोकांना किती सुख प्राप्त होईल, याचें हुबेहुब चित्र काढून त्यानें श्रोते मंडळीला दाखविलें. ओकोनेलच्या बोलण्यावर आयझ्याक बट्ट या नांवाच्या एका हुषार ब्यारिस्टरानें

ओकोनेलच्या उलट बाजू घेऊन तिच्या समर्थनार्थ त्यानेंही मोठें अस्खलित भाषण केलें. याप्रमाणें पूर्वपक्ष उत्तरपक्ष झाल्यावर उभयतां-मध्यें वादविवाद सुरू झाला. तो वाद एकंदर तीन दिवस चालला होता. शेवटीं ओकोनेलचेंच ह्मणणें लोकांना मान्य झालें व कार्पोरेशन-पुढें ऐक्य नाहींसें करण्याच्या उपयुक्ततेबद्दल आणिलेली सूचना त्यांनीं बहुमतानें पास केली.

त्या दिवसापासून रिपील असोसिएशनच्या कामाला फारच झपा-ट्यानें सुरुवात झाली. पहिल्या एक दोन वर्षांत लोकांकडून वर्गणी व्हावी तशी जमा झाली नाहीं. परंतु १८४३ सालीं मात्र वर्षाची एकंदर वर्गणी ४८,००० पौंड एकदम जमा झाली. पुरोहित मंडळी हळूहळू असोसिएशनला येऊन मिळाली. '१८४३ सालीं इंग्लंड-बरोबर झालेलें ऐक्य नाहींसें होणार व झालेंच पाहिजे' असें जें ओको-नेलनें पूर्वी भविष्य केलें होतें, तें खरें होण्याचा आतां रंग दिसूं लागला. प्रत्येक परगण्यांत सभा भरविण्याची व्यवस्था सुरू केली. खुद्द असोसिएशनच्या सभा आठवड्यांतून दोनदां भरूं लागल्या. असोसिएशनकरितां प्रथम जी जागा घेतली होती ती पुरेनाशी झाल्या-मुळें असोसिएशनच्याच खर्चानें एक मोठा हॉल बांधला. सभेचें काम दिवसानुदिवस इतकें वाढत गेलें कीं, पहिल्यानें ह्मणजे १८४१ सालीं जेथें नऊ कारकून पुरत होते तेथें ४३ सालअखेर ४८ कारकून लागूं लागले. कागदपत्र जेथल्या तेथें ठेवणें, रोजच्या हिशेबाची वही लिहिणें, सभेच्या कामाची हकीगत लिहिणें, वर्गणीदारांकडून आलेली वर्गणी जमा करून घेणें व त्याबद्दल त्यांना पावत्या देणें, हीं व अशा-प्रकारचीं दुसरीं अनेक कामें इतकीं काळजीपूर्वक व व्यवस्थित रीतीनें चालत होतीं कीं, त्यांत दोष काढण्याला एवढीशी देखील कोठें जागा नव्हती. 'रिपील पोलीस' नांवाचें सभेच्या आश्रयाखालीं एक पोलीस खातें काढिलें व त्यावर टॉम स्टील नांवाच्या एका गृहस्थाला मुख्य कामगार नेमिलें. आयर्लंडच्या कोणत्याही भागांत दंगा झाला तर तो दंगा मोड-ण्याचें काम या पोलिसांवर सोंपविलें. लवाद कोर्टें स्थापन केलीं.

दिवाणी स्वरूपाचे सर्व कज्जे या कोर्टापुढें चालू लागले व यामुळें सरकारी कोर्टांत कांहीं काम नाहीं, अशी स्थिति झाली. या सर्व खटपटीला बळकटी आणण्याकरितां डफीचा आपल्या छापखान्याच्या द्वारानें दीर्घ उद्योग चालू होताच. त्यानें निरनिराळ्या विषयांवर साधारण लोकांना समजतील अशीं लहान लहान पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं व त्यांच्यायोगानें आयर्लंडाचा इतिहास, आयरिश कवींनीं रचलेल्या व ज्यांत देशाभिमान अगदीं ओथंबून भरला आहे अशा कविता, आणि आयरिश लोकांच्या अंगीं असलेलें कलाकौशल्य यांची वाचकांना उत्तम माहिती करून दिली. इकडे आपल्या वृद्धावस्थेकडे लक्ष न देतां ओकोनेलनें जे दीर्घ परिश्रम चालविले होते त्यांचें नुसतें वर्णन करणें देखील फार कठिण आहे. या सभेहून त्या सभेला व त्या सभेहून या सभेला, अशा खेपा घालण्याखालीं त्या सालांत सरासरी ५००० मैल लांबीचा प्रवास त्याला करावा लागला. असोसिएशनच्या जाहीरसभांमधून व कमेट्यांमधून अध्यक्षांचें काम करून शिवाय सहा महिन्याच्या अवकाशांत निरनिराळ्या ठिकाणीं भरलेल्या एकंदर तीस मोठ्या सभांना तो हजर होता व त्या प्रत्येक सभेंत त्यानें मोठमोठीं भाषणें केलीं. तो कोणच्याही सभेला जावो, तेथें त्याचें मोठें भाषण झाल्याशिवाय लोकांना समाधानच होत नसे. अशा या मोठमोठ्या ज्या सभा भरत असत, त्यांना 'टाइम्स' पत्रानें 'मॉनस्टर मीटिंग' ( Monster Meeting ) ह्मणजे 'राक्षसी किंवा प्रचंड सभा' अशी संज्ञा दिली. या सभांना किती लोक येत असत याचा नक्की आंकडा सांगणें फार कठिण आहे. त्यांचीं जीं वर्णनें उपलब्ध आहेत, तीं खरीं आहेत असें मानण्याला बऱ्याच अडचणी आहेत; कारण त्यांत परस्पर विरोधी असा मजकूर पुष्कळ आहे. उदाहरणार्थ १५ आगष्ट १८४३ रोजीं 'तारा' नांवाच्या गांवांत जी एक सभा भरली होती, त्या सभेला ७५०००० लोक जमले होते असें एकानें वर्णन केलें आहे. याच सभेसंबंधानें डॉट

---

6. McCarthy's History of Ourown Times Vol. I p. 210.

नांवाच्या ग्रंथकारानें जी हकीकत दिली आहे तींत तो असें ह्मणतो कीं, १२००००० लोक या सभेला हजर होते. हें जर खरें असेल तर आयर्लंडांत जाणत्या पुरुषांची जी एकंदर संख्या होती त्यापैकीं एकतृतीयांश लोक या सभेला हजर होते असें ह्मणणें भाग आहे. याप्रमाणें दोन्हां ग्रंथकारांच्या लिहिण्यांत फार मोठी तफावत दिसून येते. तात्पर्य हें कीं, यासंबंधाची खरी व विश्वसनीय माहिती देणें फार कठिण आहे. जी माहिती आहे ती सर्व अतिशयोक्तीनें भरलेली आहे. हा अतिशयोक्तीचा भाग तेवढा काढून टाकला तर या सभांना फारच मोठा लोकसमुदाय जमत होता असें विधान करण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं.

आयर्लंडमध्यें या नवीन सुरू झालेल्या चळवळीकडे पहिलीं एक दोन वर्षें सरकारानें फारसें लक्ष दिलें नाहीं. परंतु तिसऱ्या ह्मणजे १८४३ सालीं, जेव्हां जागोजाग प्रचंड सभा भरूं लागल्या, तेव्हां त्यांचें तिकडे लक्ष गेलें. लोकसमुदाय मोठा जमत होता हें कांहीं सरकाराला फारसें अनिष्ट वाटलें नाहीं. त्यांना अनिष्ट वाटलें तें हें कीं, इतका लोकांचा समुदाय जमत असतां तेथें दंगाधोपा किंवा बेकायदेशीर वर्तन कांहींएक होत नव्हतें व त्यामुळें त्यांना या सभा बंद करण्याची योग्य संधि मिळत नव्हती. या सभा नेहमीं उघड्या मैदानावर भरत होत्या, व त्यावेळेस लोकसमुदायही फार मोठा जमत होता. वक्त्याचा आवाज कितीही मोठा असला, तरी त्याचें भाषण सर्वांना ऐकूं जाणें अगदीं अशक्य होतें; जेवढे लोक त्याच्या जवळ असत तेवढ्यानांच तें ऐकूं जाई. अशी स्थिति होती, तरी तेथें होणारें भाषण ऐकण्याची लोकांमध्यें उत्सुकता कमी होत होती असें नाहीं! वक्त्याचें बोलणें जरी ऐकूं आलें नाहीं, तरी लोकांनीं वाजविलेल्या टाळ्या तरी ऐकूं येतील कीं नाहीं, त्यांतच आपण समाधान मानून घेऊं, असें ह्मणणाऱ्या श्रोत्यांची अगदीं रीघ उडून जात होती. केव्हां केव्हां ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत मोकळ्या जागेवर सभा भरण्याचा प्रसंग येई. अशा वेळेस एकीकडे डोक्याला उन्हाचा

चटका बसतो आहे, एकीकडे तापलेल्या फोपाट्यानें पाय भाजत आहेत, तहानेनें घसा कोरडा पडला आहे, अशा स्थितींत हजारों लोक तासांच्यातास तहानभूक व उभे राहण्याचे श्रम, यांची यत्किंचितही पर्वा न बाळगतां, शांतपणानें सभेचें काम कसें चाललें हें पाहत उभे रहात होते. या सर्व सभांत 'तारा' येथें भरलेल्या सभेचा देखावा मनाला विशेष पवित्र असा भासणारा होता. 'तारा' हें ऐरिश राजांना राज्याभिषेक करण्याचें पूर्वींचें स्थान होतें व ज्या दिवशीं सभा भरवावयाची तो दिवस ह्मणजे १९ आगष्ट फार पवित्र मानलेल्या अशा सणाचा होता. त्या गांवाला अगदीं लागूनच डोंगराच्या लहानलहान टेंकड्या आहेत. त्यांपैकीं एका टेंकडीवर सभा भरावयाची होती. ह्मणून आदल्या रात्रीपासूनच लोकांचे थवेच्याथवे तिकडे जाऊन बसूं लागले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सभेच्या ठिकाणीं इतकी कांहीं गर्दी जमली कीं, उंच अशा जागेवरून पाहिलें तरी, सगळा लोकसमूह नजरेस पडत नव्हता, इतका दूरवर तो पसरला होता. डब्लिन शहरांत एकही भाडोत्री गाडी त्या दिवशीं अड्ड्यावर शिल्लक राहिली नव्हती. तेथील बहुतेक लोक सभेला गेल्यामुळें तें शहर ओसाड पडल्यासारखें दिसत होतें! ज्या टेंकडीवर सभा भरली होती, त्या टेंकडीपासून सुमारें ४ मैल लांब इतकी गाड्यांची व घोड्यांची दुतर्फा रांग लागून गेली होती. घोडीं कदाचित् मस्ती करतील ह्मणून आपल्यापैकीं कांहीं थोडे लोक बंदोबस्ताकरितां ह्मणून ठेवून बाकीचे सर्व घोडेवाले व गाड्यावाले सभेंत काय चाललें आहे हें पाहण्यांत गुंतले होते. गाड्यांच्या रक्षणाकरितां अगदीं थोडे लोक होते तरी, त्यांतील एक सुतळीचा तोडा देखील चोरीस गेला नाहीं किंवा गाड्याघोड्यांना कोणी कोणच्याही प्रकारें इजा केली नाहीं. ही एवढी सभा भरविल्याबद्दल ओकोनेलला अभिमान वाटणें जसें साहजिक आहे, तसाच तो त्याचा साहाय्यकारी माथ्यू नांवाच्या एका तरुण धर्मोपदेशकाला वाटणेंही साहजिक आहे. सभेला जमलेल्या लोकांपैकीं तीनचतुर्थांश लोक त्यांचे अनुयायी होते व आपण मद्यप्राशन करणार

नाहीं अशा त्याच्या सांगण्यावरून त्यांनीं शपथा घेतल्या होत्या. सकाळ पासून तों दुपारपर्यंत एकंदर चाळीस ठिकाणीं प्रार्थना करण्याचें काम सुरूं होतें. प्रार्थना करण्याचें काम आटपतें न आटपतें इतक्यांत ओकोनेलची स्वारी १०००० घोडेस्वारांनिशीं सभेच्या ठिकाणीं येऊन थडकली. तो आल्याबरोबर आगमनसूचक ब्यांड वाजूं लागले. असे ब्यांड तेथें एकंदर बेचाळीस होते. तो आल्याबरोबर आपला जणूं तारणकर्ताच आला असें समजून लोकांनीं त्याच्या नांवाचा जयघोष केला. वाटेनें जाऊं लागला ह्मणजे त्याला लोक वाट करून देईत.

---

७ फादर मॅाथ्यू यानें मद्यप्राशनाचा प्रकार नाहींसा व्हावा ह्मणून कसे प्रयत्न केले व ते कसे फलद्रूप झाले, हें कळणें हल्लींच्या काळांत फार अवश्य आहे. ह्मणून खालील लांबलचक उतारा वॉलपोलच्या इतिहासांतून येथें दिला आहे. ( See Vol. V P. 96. ) तो ह्मणतो :—

Political asosciation had, moreover, been facilitated by the organisation of Ireland for a social object. A few years before 1842, a young Irish priest, Father Mathew, struck with the evils which habitual drunkenness was in flicting upon the people around him, preached the blessings of temperance in the south of Ireland. His mission succeeded; his gospel spread; and Father Mathew, leaving Munster where he had been born and worked proceeded as an apostle of temperance through out Ireland. Never did warlike conqueror achieve a success comparable with that of this humble priest. Public-houses were shut up breweries and distilleries thrown out of work, the consumption of whisky decreased by one half. Two millions in Ireland embraced his principles. Crime diminished with the decrease of drink, and even the Irish Government acknowledged the benefits which temperance had conferred on Ireland.

परंतु शेवटच्या मैलांत इतकी गर्दी झाली होती कीं, तितकें अंतर चालून जाण्याला त्याला दोन तास लागले. व्यासपीठावर जाऊन पोंचल्याबरोबर त्यानें भाषणास सुरवात केली. नेहमींप्रमाणें त्या वेळचें त्याचें भाषण मोठें जोरदार आणि आवेशयुक्त असें होतें. पण त्या दिवशीं त्याचा खरा प्रभाव त्याच्या भाषणावरून दिसून आला नाहीं. तर हजारों लोक लष्करी थाटानें आले होते तरी यत्किंचित्‌ही गडबड न करितां शांतपणानें सभेंत काय भाषण होत आहे हें ऐकत उभे होते व ओकोनेल सांगेल ती गोष्ट कितीही संकटें आलीं तरी केल्याशिवाय आह्मीं कधींही राहणार नाहीं, अशी जी एक त्यांच्या चेहऱ्यावर तरतरी दिसत होती, त्यांत त्याचा खरा प्रभाव दिसून आला. हा सर्व प्रकार पाहून 'अनभिषिक्त राजा' ओकोनेल यानें आपले संपूर्ण प्रजाजन एके ठिकाणीं जमा केले आहेत कीं काय असें वाटे.

ही चळवळ सुरू झाल्यापासून सुमारें पंधरा महिने तिच्या मार्गांत कोणच्याही प्रकारचा व्यत्यय आला नाहीं, पुढच्या सात महिन्यांत तर त्या चळवळीला भयंकर स्वरूप प्राप्त झालें. लष्करी थाटानें इकडून तिकडे तिकडून इकडे जाणाऱ्या लोकांचा समुदाय पाहून प्रधानमंडळींच्या मनांत दहशत उत्पन्न झाली व ती दहशत जास्त वाढण्याला 'राष्ट्र' पत्रांतील जोरदार भाषेंत लिहिलेले लेख विशेष कारणीभूत झाले. त्या पत्राच्या चालकांपैकीं डेव्हीसच्या अंगांत कवित्वशक्ति चांगली होती, व इंग्लिश लोकांविषयीं आयरिश लोकांच्या मनांत दुष्टभाव उत्पन्न करण्याच्या कामीं तो त्या शक्तीचा आपल्या वर्तमानपत्राच्या द्वारानें बराच उपयोग करीत होता. काव्य या नात्यानें पाहूं गेलें असतां डेव्हीसच्या कवितांची योग्यता कमी ठरते. परंतु त्यामध्यें जो एकप्रकारचा उत्साह भरलेला होता, तो कांहीं अवर्णनीय होता. स्वतंत्रता संपादन करण्याकरितां आपल्या हातून होईल तितका यत्न करणें, हें आयर्लंडांतील प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे, असें तो आपल्या कवितांत नेहमीं प्रतिपादन करीत होता. अशा तऱ्हेचें प्रतिपादन करणें ह्मणजे साम-

दामाने सर्व उपाय हरले असतां, दंडाची योजना करण्यास लोकांनीं मागें पुढें पाहूं नये, असेंच सांगण्यासारखें होतें. हा गूढ अर्थ मनांत धरून डेव्हीसनें कविता लिहिल्या नाहींत असें जर कोणी प्रतिपादन करील, तर त्याचें तें ह्मणणें भ्रांतिमूलक आहे, असें आह्मीं समजूं. कारण कवीच्या मनांत हा अर्थ जर नसतां तर त्यानें आपल्या कवितांत इतका आवेश व उत्साह कधींही घातला नसता. असो. डेव्हीस डफी, डिलन प्रभृति मंडळींचाया कामांत अनुवाद करणारे बरेच आयरिश लोक होते व त्या सर्वांना इंग्रजी ग्रंथांतून 'यंग आयर्लंड' ( Young Ireland ) ह्मणजे 'तरुण आयर्लंड' असें नांव दिलेलें आढळतें. आपली स्वतंत्रता हिरावून घेणाऱ्या लोकांना धाक किंवा दहशत घालून ती त्यांच्यापासून परत मिळविण्यांत फारसा पुरुषार्थ नाहीं, खरा पुरुषार्थ त्यांच्याबरोबर दोन हात करून ती परत मिळविण्यांत आहे, असें या नव्या मंडळींचें ठाम मत होतें. अशा अर्थाचे लेख लिहिणें किंवा भाषणें करणें हें राजद्रोहात्मक आहे व लोकांना बंड करण्याकरितां पर्यायानें उत्तेजन देण्यासारखें आहे, हें राणी सरकारच्या अधिकारी लोकांच्या ध्यानांत येऊन चुकलें होतें आणि त्याचा बंदोबस्त करण्याच्या विचारालाही ते लागले होते. खुद्द ओकोनेलची अशी स्थिति होती कीं, 'राष्ट्र' पत्राची चोंहोंकडे जी वाहवा होत होती, ती त्याला मनापासून आवडत नव्हती. पण चमत्कार हा कीं, सभांमधून भाषणें करते वेळेस लोकाराधन करण्याकरितां 'राष्ट्र' पत्रांतील भाषा आपण स्वतः वापरीत होता व त्यामुळें त्याच्या मनांतील हेतु जरी अगदीं निराळा होता, तरी त्या पत्रांतील लेखांना याची पूर्ण संमति आहे, असें लोकांना भासवीत होता.

---

8. पहा. Robinsons' History of Ireland for English readers Ch. 31.

९ 'नवी मंडळी' हा शब्द आह्मी 'यंग आयर्लंड' च्या ऐवजीं योजिला आहे. हें वाचक जाणतीलच.

आयर्लंडांत सुरू असलेला हा प्रकार बंद करण्याची प्रधान मंडळीनें काय तजवीज केली आहे, हें समजावून घेण्याकरितां इंग्लंडांतील लोक अतिशय उत्सुक झाले होते व त्यामुळें पार्लमेंटांत या विषयावर वरचेवर प्रश्न होऊं लागले. त्यावेळेचा मुख्य प्रधान पील यानें ही संधि साधून, उत्तर देतांना एकाप्रसंगीं अगदीं शेवटची प्रतिज्ञा आपण काय केली आहे हें कॉमन्स सभेंतील सभासदांना सांगितलें. तो ह्मणाला "लढाईचा मला मनापासून तिटकारा आहे, त्यांतूनही एकाच देशांतील लोकांत परस्परांमध्यें होणाऱ्या युद्धाचा तर अतिशयच आहे. देशांत लढाई सुरू होऊन रक्ताचे पाट वाहिले तरी चिंता नाहीं, पण इंग्लंडचें व आयर्लंडचें ऐक्य मात्र कांहीं केल्यानें नाहींसें होऊं देणार नाहीं, हें सर्वांनीं नीट लक्षांत ठेवावें."

वर सांगितलेले हे शब्द बरेच जड होते, व त्यांचा अर्थ काय आहे यासंबंधानें चुकी होण्याचा मुळींच संभव नव्हता. आपला आशावृक्ष मुळासकट उपटून टाकणारा हा एक झंझावातच सुटला कीं काय, असें कित्येक आयरिश लोकांस वाटलें, व कित्येकांना फार दिवसांपासून मोठ्या उत्सुकतेनें वाट पहात बसलेल्या युद्धास तयार होण्याकरितां दुंदुभीचा रव झाला असें वाटलें. ओकोनेलनें पीलच्या ह्मणण्याचा असा अर्थ केला कीं, राजकीय बाबतींत चालू केलेली चळवळ कितीही कायदेशीर व व्यवस्थित असो, लोकांची तिला कितीही मान्यता असो, तिला पीलच्या मतें यश ह्मणून कधींही यावयाचें नाहीं.

पीलनें आपण केलेली प्रतिज्ञा कॉमन्ससभेंत सांगितल्यानंतर थोड्याच दिवसांनीं इंग्लंडांतील प्रधान मंडळी आयर्लंडांत उत्पन्न झालेली अस्वस्थता मोडून टाकण्याच्या उद्योगाला लागली. सगूडेन या नांवाचा एक मुत्सद्दी आयर्लंडाच्या चान्सेलरच्या जागेवर होता. 'रिपील' सभांना जेनदे ह्मणून मॅजिस्ट्रेट जात असतील तेवढ्यांना कामावरून दूर करण्याचा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें त्यानें, लॉर्ड फ्रेंच नांवाच्या माजिस्ट्रेटाला, तो एका सभेला जाणार आहे असें कळल्याबरोबर, कामा-

वरून दूर करण्याचा हुकूम दिला. या अदूरदर्शीपणाच्या वर्तनानें सरकारी अधिकारी जास्तच घोंटाळ्यांत पडले. कारण विग् पक्षाचे जेवढे लोक सरकारी नोकरींत होते, तेवढ्यांनीं आपल्या जागेचे भराभर राजिनामे दिले. असोसिएशनची वर्गणी एका आठवड्यांत तिप्पट वाढली. त्याचप्रमाणें सभासदांचीही संख्या वाढली. याच वेळेस ओकोनेलनें सर्व देशभर लवादी कोर्टें स्थापन केलीं. आपल्या कृत्याचा परिणाम इतका लांबवर पोंचेल अशी सग्डेनची प्रथम कल्पना नव्हती. इंग्लंडांतील विग् पक्षाच्या लोकांनीं चॅन्सेलरच्या दांडगाईच्या वर्तनावर कडक टीका करण्यास सुरवात केली. लार्ड रसेल यानें तर आपलें असें मत प्रदर्शित केलें कीं, ऐक्य नाहींसें करणें हितावह आहे कीं नाहीं, या विषयाचा इतर विषयांप्रमाणें कायदेशीर व व्यवस्थित मार्गानें ऊहापोह करण्याला कोणच्याही प्रकारची हरकत नाहीं, व विग् पक्षाच्या कायदेपंडितांनीं असें मत प्रदर्शित केलें कीं, चान्सेलरचें हें करणें बेकायदेशीर आहे. याप्रमाणें चोहोंकडे प्रतिकूल असें लोकमत प्रकट होऊं लागलें, तरी सरकारानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. त्यांनीं आपला पूर्वीचा क्रम तसाच चालू ठेवला. आयर्लंडांत वरचेवर दंगेधोपे होत असत, ते नाहींसें करण्याकरितां गेल्या पन्नास वर्षांपासून 'हत्यारांचा कायदा' या नांवानें सरकार वेळोवेळ कायदे पास करीत असत. त्या कायद्यांच्यायोगानें परदेशांतून हत्यारें आणणें व तीं नोंदून घेणें यासंबंधानें बरेच निर्बंध करण्यांत आले होते. अशा प्रकारच्या अगदीं शेवटीं पास केलेल्या कायद्याची मुदत याच वेळेला संपत आली होती. तो कायदा पुनः पास करावा व त्यांत प्रतिबंधक अशीं आणखीं जास्त कलमें घालावीं अशी प्रधान मंडळीनें सूचना आणिली. ही सूचना हाणून पाडण्याकरितां विग्, रॅडिकल्स, आयरिश

१०. हा शेवटचा कायदा १८३८ सालीं पास झाला होता.

११. प्रजापक्षाला विग् लोकांपेक्षांही अतिशय अनुकूल असा जो इंग्लंडांत पक्ष आहे, त्याला रॅडिकल अशी संज्ञा आहे.

वगैरे राजकीय पक्षांतील सर्व लोक एकदिलानें झटूं लागले. प्रधानमंडळीनें पुढें आणिलेल्या बिलाला दरएक ओळीगणीक त्यांनीं हरकती घेतल्या. यामुळें तीन महिने कमेटीपुढें या बिलाचा विचार चालू होता. देशांतल्या देशांत आतां लढाई खास सुरू होणार, असें प्रधान मंडळीला वाटूं लागलें. आयरिश लोकांनीं तर लढाईची तयारी देखील सुरू केली. इंग्लंडची व आयर्लंडचीही अशीच स्थिति झाली. इतर देशांतूनसुद्धां यासंबंधानें मोठीच गडबड उडून राहिली होती. युनायटेडस्टेट्स ह्मणजे अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांचा अध्यक्ष मि० टायलर यानें ऐक्य नाहींसें करण्याच्या कामाला आपलें अनुकूल मत प्रदर्शित केलें. क्यानडा प्रांतांत देखील याच मताचा चोंहोंकडे फैलाव झाला होता. तो इतका कीं, आयर्लंडवर जर कांहीं एखादें संकट ओढवलें तर येथील लोक स्वस्थ बसणार नाहींत, देशांत जिकडे तिकडे अस्वस्थता उत्पन्न होईल, अशा अर्थाचा तेथील गव्हरनरानें विलायत सरकाराकडे रिपोर्ट केला. फ्रान्समधल्या कांहीं लोकांनीं प्रसंग पडलाच तर आयर्लंडाला शस्त्राअस्त्रांची व मनुष्यांची मदत करण्याचा निश्चय केला होता. लढाई कोणच्या रीतीनें चालविली ह्मणजे सोईचें होईल, यासंबंधाची चर्चा प्रसिद्धपणें होऊं लागली. एकदां एक सभा भरली असतां ओकोनेलनें आपल्या हजारों श्रोत्यांस असें स्पष्ट सांगितलें कीं, लढाईचा प्रसंग आल्यास सर्वांनीं हातांत शस्त्रें घेऊन खांद्याला खांदा लावून लढण्यास तयार असलें पाहिजे, व अशा रीतीनें सर्व लोक तयार झाले ह्मणजे ड्यूक ऑफ् वेलिंगटनच्या हाताखालीं नव्हतें एवढें मोठें सैन्य माझ्या हाताखालीं येईल. पुढें एकेवेळीं म्यालो ( Mallow ) येथें सभा भरली असतां ओकोनेलनें खालीं लिहिल्याप्रमाणें भाषण केलें.

" बडबड करण्याचा हल्लींच्या प्रसंगीं जितका मला कंटाळा आला आहे, तितका यापूर्वी कधींच आला नाहीं, हें मी तुह्मांला सांगतों. बडबड करण्याची सोडून देऊन हातानें कांहीं कृति करून दाखविण्याची आतां वेळ आली आहे. सभ्य गृहस्थ हो! आजन्म दास्यांत दिवस

घालविणें किंवा स्वातंत्र्य संपादन करण्याकरितां धारातीर्थीं पतन पावणें हे दोन मार्ग आपल्यापुढें खुले आहेत ........ देशांत या वेळेस चोहों-कडे शांतता वास करीत आहे. दंगाधोपा वगैरे कोठें कांहीं नाहीं. असें असतां सैन्य पाठवून सरकार कडेकोट बंदोबस्त करीत आहे. आज जी बातमी आपल्या इकडे आली आहे, ती ऐकल्यापासून माझ्या मनाचा जो एक भयंकर निश्चय झाला आहे, तो मनांत ठेवून आतां-पर्यंत मीं भाषण केलें, व तो निश्चय मनांत ठेवूनच यापुढचेंही भाषण मी करीत आहें, हें मी आपल्याला खात्रीनें सांगतों. ........ आयरिश लोक असे कोण आहेत कीं, त्यांना इंग्रज लोकांच्या बरोबरीनें हक्क देतां येत नाहींत? इंग्रज लोकांच्या अंगीं साधारणतः जें धैर्य असतें तें आह्मां लोकांत नाहीं कीं काय? लोकांनीं आह्मांला गुलामासारखें लेखावयाचें कीं काय? त्यांनीं आह्मांला पायांखालीं तुडवावयाचें कीं काय? निदान मी आपल्या स्वतःला तरी पायांखालीं तुडवून घेणार नाहीं हें खास. ते मला तुडवितील, नाहीं असें नाहीं, पण केव्हां, तर जेव्हां माझ्या कुडींतून प्राण निघून जाईल तेव्हां. माझ्या देहांत जीव आहे तोंपर्यंत माझ्या अंगाला स्पर्श करण्याची त्यांची छाती नाहीं. "

लोकांच्या अंगाचा भडका करून टाकणारें भाषण सौम्य शब्दांत कसें बोलावयाचें ही कला ओकोनेलला जितकी उत्तम साधली होती, तितकी दुसरी कोणालाच आजपर्यंत साधली नव्हती. साऱ्या देशां-तले लोक लढाई करण्याच्या कामीं इतके उत्सुक झाले असतां त्यांस पूर्णपणें आपल्या ताब्यांत ठेवून त्यांच्या हातून कायद्याच्या उलट यत्किंचित्ही वर्तन होऊं दिलें नाहीं, यांत ओकोनेलच्या अंगची अलौ-किक कर्तृत्वशक्ति फार चांगली व्यक्त होते. याप्रमाणें १८४३ सालीं आपल्या अंगीं सामर्थ्य किती आहे, हें त्यानें जगाला चांगल्या रीतीनें व्यक्त करून दाखविलें; पण त्याच्यायोगानें त्याच्या अंगांत थोडेसें गर्वाचें वारें शिरलें. अर्थात् त्याच्या बुद्धीला थोडासा भ्रम पडला, व तशा स्थितींत तो जरा वाजवीपेक्षां जास्त पुढें गेला. डेव्हीस प्रभृति

नव्या लोकांचें तर उघड रीतीनें असें ह्मणणें होतें कीं, प्रसंग पडल्यास आयरिश लोकांनीं लढाई करण्यास मागें पुढें पाहूं[१२] नये. आयरिश लोकांना नव्या लोकांचें हें ह्मणणें मान्य होतें; लढाई करण्याकरितां ते अगदीं एका पायावर तयार होते. शिवाय लढाई सुरू झाली असतां सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्यास आपण तयार आहों असा पील प्रभृति इंग्लिश मुत्सद्यांनीं ओकोनेलच्या बोलण्याचा जसा अर्थ केला होता, तसाच आयरिश लोकांनींही केला होता. ओकोनेलच्या भरंवशावर ते स्वस्थ होते. लढाईचा परिणाम अनुकूळ होईल किंवा प्रतिकूल होईल, याविषयीं ते अगदीं बेफिकीर होते. बहुतकरून इंग्लिश लोकांना आपण समुद्रांत पिटाळून देऊं असें त्यांना त्यावेळेस वाटलें असेल यांत शंका नाहीं.

इतक्या थराला गोष्ट येऊं देण्याजोगी ओकोनेलच्या मनाची तयारी झाली होती अशी कल्पना करणें चुकीचें आहे; आणि असें असूनही आपल्यासंबंधानें लोकांचा गैरसमज त्यानें कसा होऊं दिला हें सांगणें देखील फार कठिण आहे. लोकांना तो बोलून दाखवीत होता त्याचप्रमाणें जर त्याच्या मनांतले विचार असतील, तर बंड करण्याचा त्याचा हेतु होता असें ह्मटलें पाहिजे; जर खरोखर त्याच्या मनांत तसा कांहीं हेतु नव्हता, तर आपली जीभ वाटेल तशी सैल सोडण्यांत त्यानें

---

१२. या अर्थाच्याच खालीं लिहिलेल्या ओळी राष्ट्रपत्रांत प्रसिद्ध झाल्या होत्याः—

We must not fail, we must not fail, however force or fraud avail;

By honour, pride and policy, by heaven itself we must be free.

We promised loud, we boasted high to break 'our country's chains or die'

And should we quail, that country's name will be the synonym of shame.

फार मोठी चूक केली असें ह्मटलें पाहिजे. कारण संकटानें गांजलेल्या लोकांपुढें इतक्या आवेशाचीं भाषणें करणें ह्मणजे विस्तवाशीं खेळण्यासारखें होय. विस्तवाशीं खेळण्यानें आपल्या व आपल्या शेजारींपाजारीं बसणाऱ्या लोकांच्या जिवाला अपाय होण्याची जशी भीति आहे, तशीच उगीच बसल्या बसल्या अलंकारिक भाषणें करण्यापासून आपल्या देशबांधवांचें स्वातंत्र्य नष्ट होण्याची भीति आहे, हें त्याच्यासारख्या धूर्त मनुष्याच्या ध्यानांत येऊं नये हें फार आश्चर्य आहे. वर ज्या दोन कल्पना आह्मी केल्या आहेत, त्यांपैकीं एकही खरी नसून दोहोंच्यामध्यें असणारी तिसरीच कल्पना खरी असावी असें कांहीं इतिहासकारांचें मत आहे. उदाहरणार्थ म्याकार्थी आपल्या[13] इतिहासांत लिहितात. “ आपले हेतु साध्य करून घेण्याकरितां बलाचा उपयोग करून घेण्याचा ओकोनेलचा विचार नव्हता. असें आतां निर्विवाद रीतीनें शाबीत झालें आहे. परंतु एवढें मात्र खचित आहे कीं, आयर्लंडांतील असंख्य लोक अगदीं आज्ञेंत आहेत हें इंग्रज सरकाराला दाखविण्याचा व इंग्लंडाला कदाचित् परराष्ट्राबरोबर युद्ध करण्याचा प्रसंग आला तर ती संधि साधून इतक्या सर्व लोकांना बंड करण्यास प्रवृत्त करण्याचें आपले अंगीं सामर्थ्य आहे हें त्यांच्या मनांत पुरतपणीं बिंबवून देण्याचा त्याचा पूर्ण इरादा होता. ” म्याकार्थीचें हें ह्मणणें जर खरें असेल, तर ओकोनेलवर येणारा मूर्खपणाचा आरोप नाहींसा होतो ; पण गुन्हा केल्याचा आरोप कांहीं नाहींसा होत नाहीं. हल्लींचे त्याचे प्रतिस्पर्धी वेलिंगटन आणि पील हे १८२८ सालीं स्वतःच्या इच्छेविरुद्ध आपण केलेल्या कायदेशीर व व्यवस्थित चळवळीला कसे वचकले याची त्याला वरचेवर आठवण होत होती, व त्यामुळें आतांही आपण तसाच उद्योग सुरूं ठेविला तर यश आल्यावांचून राहणार नाहीं असें त्यास वाटत होतें. ऐक्य आहे तसेंच कायम राखण्याकरितां पील हवे ते उपाय योजील अशी त्याची कल्पना नव्हती. उलट

---

13 ‘History of Ourown Times’ Vol. I p. 210 पहा.

पील प्रभृति प्रधान मंडळी आपल्याला शरण येईल असा त्याचा अदमास होता.

पण हा त्याचा अदमास चुकीचा होता. पीलची पूर्वींची ह्मणजे १८२८ सालांतील स्थिति व हल्लींची स्थिति या दोहोंमध्यें जो महत्वाचा फरक पडला होता, तो ओकोनेल् व त्याचे अनुयायी यांच्या लक्षांत आला नाहीं असें वॉलपोलचें मत आहे. तो ह्मणतो " १८२९ सालीं रोमन क्याथलिक् लोकांच्या मुक्ततेला अनुकूळ अशा कॉमन्स सभेशीं पीलची गांठ पडली होती. १८४३ त वाटेल त्या उपायांनीं ऐक्य कायम राखिलें पाहिजे. असें ह्मणणाऱ्या कॉमन्स सभेचें त्याला पाठबळ होतें. १८४३ त क्याथलिक् लोकांना मुक्त केल्यावांचून त्यांच्याविरुद्ध नियामक असे कायदे पास करून घेण्याची त्याला मुळींच आशा नव्हती. १८४३ त क्याथलिक लोकांना मुळींच हार न जातां हवे तितके निग्रहात्मक कायदे त्यांच्याविरुद्ध पास करून घेण्याची त्याच्या अंगांत धमक होती. याप्रमाणें एका वर्षी निमुटपणें गय खावी असें दर्शविणारी कॉमन्स सभेची संस्थिति होती, व दुसऱ्या वर्षी नेटानें प्रतिबंध करावा असें दर्शविणारी कॉमन्स सभेची संस्थिति होती " ती लक्षांत घेऊन पील या वेळेला मागें घेणारा मनुष्य नव्हता. आयरिश लोक लढाईला आलेच तर त्यांना आठवण राहील असें शासन देण्याची त्याची पूर्ण तयारी होती व त्या तयारीचीं पूर्वचिन्हें तो आयरिश् लोकांना दाखवूं लागला होता. सुमारें ३९,००० घोडेस्वार यावेळेस आयर्लंडांत येऊन दाखल झाले. बराकी व किल्ले यांची दुरुस्ती होऊं लागली. लढाईचें सर्व सामान जहाजेंच्या जहाजें भरून येऊं लागलें. लढाऊ जहाजें ज्या त्या नदींत चमकूं लागलीं. याप्रमाणें युद्धाचा प्रसंग आलाच तर आपल्याकडून सरकार अगदीं तयार होऊन बसलें होतें.

---

14 History of England, Vol V. P 98 पहा.

आयर्लंडांतल्या लोकांचे इकडे निराळेच विचार चालू होते. प्रचंड सभा भरविण्यांत पहिल्या पहिल्यानें जी मजा वाटत होती ती आतां त्यास वाटत नाहींशी झाली आहे असें पाहून, तशा सभा यापुढें भरविण्याचें बंद करावें असें त्यांनीं योजिलें होतें. पण त्या बंद करण्याच्या अगोदर शेवटची ह्मणून एक सभा भरवावी व आजपर्यंत जेवढ्या सभा झाल्या तेवढ्या सर्वांवर या सभेची ताण करावी, असा कांहीं लोकांनीं बूट काढला व तो सर्वांना पसंत पडला, आणि त्याप्रमाणें डब्लिनपासून थोड्याच मैलांवर असणाऱ्या क्लॉनटार्फ नांवाच्या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं सभा भरविण्याचें ठरलें. त्या सभेला इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड यांच्या प्रत्येक भागांतून माणसें यावयाचीं होतीं. आयर्लंडांत जाणती पुरुष मंडळी जेवढी होती त्यांपैकीं नऊदशांश लोक ऐक्याला प्रतिकूल असे होते. त्या सर्वांनीं एकत्र जमून आयरिश लोकांत एकी किती आहे हें जगाला दाखवावयाचें होतें. सभेच्या कामाकरितां एक जंगी प्लॅटफार्म [ व्यासपीठ ] तयार केला होता. सभा भरण्याच्या पूर्वीं एक दोन दिवसच सभा भरविणारांच्या हातून एक चूक झाली. ती चूक नजरेस आल्याबरोबर दुरुस्त केली; पण एकदां जी बाजू घसरली ती घसरलीच! असो. ती चूक ह्मणजे अशी:—सभेच्या सेक्रेटरीपैकीं फ्रँक मॉरगन [ Frank Morgan ] नांवाचा एक सेक्रेटरी होता, त्यानें जिकडे तिकडे मोठमोठ्या जाहिराती लाविल्या व त्यांत रिपील क्याव्हलरी [ Repeal Cavalry ] ला ह्मणजे ऐक्य नाहींसें करण्याच्या कामाकरितां ठेवलेल्या घोडेस्वारांच्या पलटणीला, सभेला येण्याविषयीं पाचारण केलें. वस्तुतः घोड्यांची पलटण वगैरे कांहींएक नव्हतें. नेहमीं लोक सभेला लष्करी थाटांत येत असत, ह्मणून वर लिहिलेला शब्द त्यानें मूर्खपणानें वापरला, याशिवाय त्यांत जास्त कांहीं नव्हतें. हा मूर्खपणा पुढारी मंडळींच्या लक्षांत आल्याबरोबर ते जाहिरनामे त्यांनीं फाडून टाकले. घोडेस्वारांच्या पलटणीला पाचारण करणें ह्मणजे युद्धास सुरुवात करणें असा सरकारी अधिकाऱ्यांनीं त्या जाहिरनाम्याचा अर्थ केला; परंतु आपलें स्वरूप प्रकट करण्याची अद्यापि वेळ आली नाहीं, असा विचार करून ते स्वस्थ बसले.

पण तेवढ्यावरून सभेच्या चालकांना असें वाटलें कीं, आजपर्यंत झालेल्या सभांत सरकारानें जसा हात घातला नाहीं, तसा यावेळेसही घालणार नाहीं व त्यामुळें आपण योजिलेला सर्व बेत निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल.

क्लॉनटार्फ येथील सभा रविवार ता० ८ आक्टोबर रोजीं भरणार होती. त्या तारखेच्या अगोदरपासूनच लिव्हरपूल आणि ग्लॅसगो येथून सभेला जाणाऱ्या लोकांचीं जहाजेंच्या जहाजें भरून येऊं लागलीं. इतक्यांत शुक्रवारच्या 'डब्लिन मेल' [ Dublin Mail ] पत्रानें अशी बातमी प्रसिद्ध केली कीं, क्लॉनटार्फ येथील सभा भरूं द्यावयाची नाहीं असा सरकारचा विचार आहे. या बातमींत बरेंच तथ्य होतें. इंग्लंडाहून आयरिश प्रीव्हि कौन्सिलच्या नांवाचा एक खलिता आला होता व त्या खलित्याचा विचार करण्याकरितां प्रीव्हि कौन्सिलची सभा भरली होती, ही गोष्ट खरी आहे. तशांतून क्लॉनटार्फ गांवाजवळ सरकारी घोडेस्वार जमा होऊं लागले व डब्लिनच्या किल्ल्यावरही जास्त बंदोबस्त दिसूं लागला.

ही सर्व तयारी पाहून सभा भरविणारी मंडळी जरा घाबरली; पण त्यांनीं आपलें काम तसेंच नेटानें चालूं ठेविलें. शनिवार सकाळपासूनच सभेच्या ठिकाणीं लोकांची गर्दी होण्यास प्रारंभ झाला. दुपारच्या वेळेला पाऊल ठेवावयाला देखील रीघ नाहीं इतकी दाटी झाली. इतक्यांत साडेतीन वाजण्याच्या सुमारास एक जासूद छापखान्यांतून नुकताच छापून आणिलेला जाहिरनामा हातांत घेऊन आला. सभा भरवूं नये असें त्या जाहिरनाम्यांत सरकारानें फर्माविलें होतें. आतां पुढें काय करावें याचा विचार करण्याला वेळ नव्हता. संध्याकाळ होण्याला दोन तासाचा देखील अवकाश आतां राहिला नव्हता. क्लॉनटार्फ येथें अगोदरच लोक येऊन बसले होते. जाहिरनाम्यांत केलेला हुकूम पाळावयाचा किंवा नाहीं याचा विचार आतांच्या आतांच करणें अवश्य होतें. आजन्मांत कायद्याच्या विरुद्ध ओकोनेलच्या हातून वर्तन झालें नव्हतें, ह्मणून जाहिरनामा आपण मानला पाहिजे असें त्यानें ठरविलें.

परंतु असा ठराव करून स्वस्थ बसून काय उपयोग आहे? लोकांना वेळेवरच तो ठराव कळविणें अवश्य होतें. व सभा भरण्यास वेळ तर आतां अगदीं थोडा राहिला असें पाहून ती रहित करण्याच्या उद्योगाला तो एकदम लागला. सभेच्या कामाकरितां केलेला प्लॅटफॉर्म मोडून टाकण्याकरितां त्यानें एका मनुष्याला क्लॉनटार्फ येथें पाठवून दिला. पंधरावीस माणसें त्यानें लोकांना वर्दी देण्याकरितां पाठविलीं. आदितवारीं दिवस उजाडतांच क्लॉनटार्फच्या सभोंवतीं वीस मैलांच्या टापूंतील प्रत्येक खेड्यांत ओकोनेलच्या सहीचे जाहिरनामे चोहोंकडे लागले. आणि त्यांत सरकारानें काढलेला जाहिरनामा सर्वांनीं पाळला पाहिजे असें ओकोनेलनें सर्वांना सांगितलें. याप्रमाणें सभेचा बेत रहित होऊन सरकारचा पक्ष पूर्ण विजयी झाला. ही सभा भरविणें अगदीं कायदेशीर आहे असें त्याचें मत होतें. असें असूनही ओकोनेलनें माघार घेतली यांत त्यानें भित्रेपणा दाखविला असें ह्मणणें भाग आहे. वास्तविक भिण्याचें कांहीं कारण नसतां ओकोनेल आपल्या वचनाला जागला नाहीं, असेंच आयर्लंडांतील सर्व लोकांचें ठाम मत झालें, असा सर्व आयरिश लोकांचा त्याच्यासंबंधानें समज झाला व तसा त्यांचा समज झाला यांत त्यांना नांवें ठेवण्याला कोणाला जागा आहे, असें आह्मांस वाटत नाहीं.

परकीय राज्याखालीं असणाऱ्या प्रजेनें सरकारापासून न्याय मिळविण्याचा असल्यास जितक्या नेमस्तपणानें वागावयाचें, तितक्याच नेटानेंही वागलें पाहिजे. आपण निष्कलंकपणानें व सद्बुद्धीनें कोणतीही चळवळ करीत आहों, इतकी आपल्या मनाची खातरी असल्यावर कोणासही न भितां ती एकसारखी सुरू ठेवावी. पुढाकार घेऊन कोणतेंही कृत्य करावयास लागला व तें बहुजनसमाजाच्या साहाय्यानें रंगारूपास आलें ह्मणजे पुढारी जर मागेंपुढें करूं लागला ह्मणजे त्याच्या ठायीं असलेली लोकांची भक्ति शिथिल होते. बहुजनसमाजाची जागृति होणें हें महाकठिणकर्म आहे. मोठ्या खटपटीनें व दीर्घकालपर्यंत दिलेल्या राजकीय

शिक्षणानें एक वेळ लोकांस कोणत्याही कामास प्रवृत्त केलें, तर त्यांचा उपयोग करून घेण्यांत कसूर होतां कामा नये. हत्याराची धार एकदां परतली ह्मणजे जसा त्याचा उपयोग होत नाहीं, तशीच गोष्ट लोकमतबलाची आहे. यासाठीं प्रस्तुत प्रसंगीं ओकोनेलनें आपणच उत्पन्न केलेल्या केवढ्या प्रचंड शक्तीचा उपयोग करावयाचें सोडून दिलें व किती लोकांचा हिरमोड केला हें लक्ष्यांत आणिलें ह्मणजे त्याच्या हातून हा मोठाच प्रमाद घडला असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

# ड्यानियल ओकोनेलचें
## चरित्र.

---

## भाग ९.

### शेवटचे दिवस.*

१८४३ ते १८४७.

मागच्या भागांत सांगितल्याप्रमाणें सरकारानें लाविलेल्या जाहिरनाम्याअन्वयें सभा भरविण्याचा बेत रहित करणें याशिवाय ओकोनेल्ला दुसरा मार्गच उरला नव्हता. आणि त्या मार्गाचा त्यानें स्वीकार केला ह्मणून त्याच्या आंगचा सारासार विचार, आयरिश लोकांविषयींचें त्याचें प्रेम, आणि राणी सरकाराविषयींची त्याची स्वामिभक्ति, हे गुण लोकांच्या निदर्शनास पूर्णपणें आले. ओकोनेल्च्या अनुयायी मंडळीची इतकी जरी निराशा झाली होती, तरी त्याच्यावरचा त्यांचा विश्वास उडाला नाहीं, व याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे त्यांच्या मनांत ओकोनेलविषयीं असलेली दृढभक्ति हेंच होय. निरनिराळ्या स्वभावाच्या व निरनिराळ्या प्रकारच्या मंत्रिमंडळाबरोबर तो आज अनेक वर्षें वाद घालीत होता; सरकारानें नेमिलेल्या न्यायाधिकाऱ्यांची तो मात्रा चालूं देत नव्हता; कायद्यामागून कायदे पास झाले; पण तो त्यांच्या तडाक्यांत सांपडत नव्हता, व अम्मल बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना तो मोठ्या चतुरपणानें घुलवित होता; क्लाँटार्फ येथें भरणारी सभा अगदीं कायदेशीर आहे असें तो पूर्वींपासून ह्मणत होता असें नाहीं, तर अजून देखील त्याचें तेंच ह्मणणें होतें; लोकांच्या कायदेशीर हक्कांची सरकारानें

---

* या भागांतील बराच मजकूर म्याकार्थीच्या इतिहासां (History of our own times) तून घेतला आहे.

पायमल्ली केली तर त्याचा प्रतिकार करून आपलें खरें सामर्थ्य किती आहे, हें दाखविल्याशिवाय आह्मीं कधींही राहणार नाहीं, असें तो वरचेवर ह्मणत होता. पण तें सर्व एकीकडे जाऊन आयत्या वेळेस या कामांत तो सरकाराला हार गेला. ओकोनेलचें या वेळेचें वर्तन नवीन मंडळीस मुळींच पसंत पडलें नाहीं. ओकोनेल व त्याचे अनुयायी यांच्यांत व नवीन मंडळींत पहिल्यापासूनच असावें तितकें प्रेम नव्हतें. आतां तर त्यांना असें वाटूं लागलें कीं, 'साठी बुद्धि नाठी' अशी या वृद्ध लोकनायकाची स्थिति झाली आहे, व त्याच्यांत आतां अगदीं जोम राहिला नाहीं. नवीन मंडळीचें हें मत बऱ्याच अंशानें खरें होतें. ओकोनेलनें माघार घेतल्या वेळेपासून ऐक्य नाहींसें करण्याच्या हेतूनें सुरूं केलेल्या चळवळींतील खरें तेज नाहींसें झालें. सरकारानें जाहिरनामा जो काढला तो प्रथम भीतभीतच काढला होता; त्याच्यापासून आपल्याला इतका अनुकूल परिणाम होईल अशी त्यांची कल्पना देखील नव्हती. यावरून त्यांना नकळतच त्यांनीं ओकोनेलला माघार घ्यावयास भाग पाडलें असें ह्मणणें शोभण्यासारखें आहे. लढाईचा मार्ग स्वीकारण्याचा आपल्या मनांत केव्हांही विचार यावयाचा नाहीं, हें त्यानें याच्या पूर्वींच अनेकवेळां उघडपणें सांगितलें होतें, व वास्तविक पाहिलें तर तेव्हांपासूनच ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांत मनापासून झटणाऱ्या जुन्या व नव्या मंडळींमध्यें मतभेद उत्पन्न झाला होता. ओकोनेलच्या तरुण व तापट स्वभावाच्या अनुयायी मंडळीच्या मनांत या वेळेचा त्याचा भित्रेपणा पाहून त्या श्रेष्ठ लोकनायकाविषयीं अश्रद्धा उत्पन्न झाली. आयर्लंड देशाला त्यानें आज अनेक वर्षें जें एकसारखें ताणून धरिलें होतें, तें तसेंच पुढें फार दिवस ठेवणें केव्हांही काय अशक्यच झालें असतें. अशा रीतीनें दिलेला ताण झाला तर लवकरच फार बळकट होतो, किंवा अगदीं ढिला तरी पडतो. प्रस्तुत प्रसंगीं तो ताण अगदा ढिला पडला. शारीरिक बलाचा प्रभाव दाखविण्याचा येवढा जो त्यानें आव घातला होता, तो केवळ आवच आहे, त्यापासून तादृश उपयोग कांहीं करून घ्यावयाचा नाहीं, असें जेव्हां ठरलें तेव्हां त्यांतील

सर्व किंमत पार नाहींशी झाली. काउंट क्याव्हरनें एके ठिकाणीं ह्मटल्याप्रमाणें ' ओकोनेलची भावी स्थिति काय होणार, याचा या गोष्टीनें निकाल लाविला. त्याच्या शत्रूचें उग्र स्वरूप जेव्हां त्याच्या नजरेस पडलें तेव्हां तो पहिल्या सपाट्यासरशींच अगदीं भिऊन गेला, व त्यामुळें पहिल्यासारखी लोकांना त्याची भीति वाटेनाशी झाली. ' क्याव्हरनें काढिलेले हे उद्गार अगदीं बरोबर आहेत. क्लॉटार्फ येथील सभा बंद पाडण्याच्या अगोदर आयरिश लोकांत ओकोनेलनें जसा पराकाष्ठेचा उत्साह उत्पन्न केला होता, तसा उत्साह पुनः त्यांच्यांत उत्पन्न करणें यापुढें त्याला अगदीं अशक्य होतें. असो.

सरकारी जाहिरनाम्याप्रमाणें ओकोनेलनें सभा भरविण्याचा बेत रहित केला यामुळें सरकारावरील फार मोठा प्रसंग त्यानें टाळला यांत संशय नाहीं. ' जो मनुष्य गुन्हा करतो तो आपल्या शत्रूला जास्त सामर्थ्य आणतो. ' हें त्याचें नेहमींचें तत्व यावेळेसही ध्यानांत ठेवून यादवी[1] युद्धाचा ( Civil war ) प्रसंग त्यानें येऊं दिला नाहीं, यामुळें एकंदर राष्ट्राचें फार मोठें हित झालें असें कोण ह्मणणार नाहीं? ही जी आपण एकप्रकारें देशाची सेवा बजाविली, त्याबद्दल सरकारानें कृतज्ञतापूर्वक आपला गौरव केला पाहिजे, असें ओकोनेलला वाटत होतें. गौरव करण्याचें एकीकडेच राहिलें, पण उलट त्याचा छळ करण्याची मात्र त्यांनीं सुरुवात केली. एवढा मोठा जय आपण मिळविला असतां शत्रूची रग आपण जिरवूं नये, हें त्यांच्या कोत्या समजुतीला पसंत पडेना. यामुळें क्लॉटार्फ येथें भरणारी सभा रहित झाल्यापासून आठ दिवसांचे आंत त्यांनीं ओकोनेल् व त्याचे साथीदार यांस पकडून न्यायासनासमोर उभे केले. ओकोनेल्चे जे साथीदार पकडले त्या सर्वांत स्वतः त्याचा मुलगा जॉन, सर जॉन ग्रे, आणि सर चार्लस गेव्हन डफी, हे

---

१. ' Civil War ' या शब्दाऐवजीं ' यादवीयुद्ध ' हे शब्द आह्मीं वापरले आहेत. एका ग्रंथकारानें ' द्विपक्षयुद्ध ' हे प्रतिशब्द सुचविले आहेत. ' यादवीयुद्ध ' हेच शब्द आह्मी दुसऱ्या एका प्रसंगीं वापरले आहेत.

विशेप महत्वाचे होते. राणीसरकाराच्या प्रजेंत बेदिली उत्पन्न करण्याचा, त्याचप्रमाणें त्यांच्या विषयीं व त्यांनीं ठरविलेल्या राज्यपद्धतीविषयीं लोकांच्या मनांत द्वेष व तिरस्कार उत्पन्न करण्याचा, असे एकंदर तीन चार आरोप त्यांच्यावर ठेविले. खटला चालविण्याचा प्रकार पहिल्या-पासून तों शेवटपर्यंत न्यायासनाला कालिमा आणण्यासारखा होता. 'ओकोनेल्च्या खटल्याची हकिगत लिहिण्याचें काम एखाद्या इंग्लिश मनुष्यावर सोंपविलें तर तें त्याच्या हातून शेवटास कधींच जाणार नाहीं कारण त्याला त्याची ओकारीच येईल.' असें वॉलपोलनें यासंबंधाची हकीगत लिहित असतां उद्गार काढिले आहेत. क्याथलिक् ज्यूरर जेवढे जेवढे पुढें आले त्या सर्वांना सरकारी वकिलानें हरकत घेतली. ज्युरीची यादी करतेवेळेस शेरीफ्, ह्मणजे प्रांताधिकारी याच्या हातून थोडीशी चूक झाल्यामुळें जूरींत बसण्याचा ज्यांना अधिकार होता, असे बरेच क्याथलिक् लोक अगोदरच वगळले होते. यामुळें आयरिश् क्याथलिक् लोकांत सर्वांहून श्रेष्ठ, सर्व क्याथलिक् लोकांची मुक्तता करण्याच्या कामांत त्यांचा मुख्य साहाय्यकर्ता, असा जो ओकोनेल् त्याच्या खटल्याची चवकशी निव्वळ प्रॉटेस्टंट लोकांच्या जूरीपुढें करण्याचा दुर्दैवानें प्रसंग आला. हा सर्व प्रकार ज्या देशांत क्याथलिकांची संख्या, एकंदर लोकसंख्येच्या मानानें सरासरी पांचषष्ठांश आहे, अशा देशाच्या प्रत्यक्ष राजधानीच्या शहरांत चालू होता; व तोही अगदीं प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें, क्याथलिक लोकांची स्थिति व त्यांचे हक्क या प्रश्नासंबंधानें, हें त्यांत आणखी विशेष होतें. खटल्याची चवकशी पुष्कळ दिवस चालली होती. खटल्यांतील डिफेन्स[२] ओकोनेल्नें आपला आपण दिला. पूर्वीच्या काळीं लोकांचा डिफेन्स देत असतां न्याया-

---

१. History of England Vol. V, p. 108.

२. आरोपी स्वत: किंवा आपल्या वकिलाच्या तर्फे आपल्या वतीनें न्यायाधिशाला जी हकीगत कळवितो, तीस इंग्रजींत Defence असें ह्मणतात. हा शब्द मराठी भाषेंत हल्लीं बराच प्रचारांत आला असल्यामुळें तो जसाचा तसाच ठेविला आहे.

धीशाच्या व जूरीच्या मनावर त्याच्या भाषणाचा जसा परिणाम होत असे, तसा परिणाम यावेळेच्या त्याच्या भाषणापासून मुळींच झाला नाहीं असें सर्वांचें मत आहे. इंग्लंडबरोबर आयर्लंडाचें ऐक्य झाल्यानें त्या देशांचें कोणच्याहि प्रकारचें कल्याण न होतां उलट अकल्याण मात्र झालें आहे, असें दाखविण्याचा त्याच्या भाषणाचा रोंख होता. पण त्यांत चटकदारपणा किंवा मोहकपणा मुळींच नव्हता असें ह्मटलें असतां चालेल. ओकोनेल् व त्याच्या साथीदारांपैकीं बरेच साथीदार लोक अपराधीं आहेत, असा जूरीनें आपला अभिप्राय दिला. जूरीचा हाच अभिप्राय पडेल अशी लोकांनीं अगोदरच अटकळ केली होती. त्यासंबंधानें विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आणखी अशी एक गोष्ट होती कीं, जूरीचा अभिप्राय सरकार पक्षाला अगोदरच कळला होता, व त्यांनीं तो लंडन येथील 'टाइम्स' पत्राला मुद्दाम मनुष्य पाठवून कळविला होता. यामुळें इकडे डब्लिन शहरीं जूरी आपला अभिप्राय कोर्टाला सांगत आहे व तिकडे लंडन शहरांत तो वर्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध झाला आहे, असा विलक्षण प्रकार घडून आला! जूरीच्या अभिप्रायाप्रमाणें ओकोनेल् यास बारा महिन्यांची कैद आणि दोन हजार पौंड दंड अशी शिक्षा कोर्टानें दिली. बाकीच्या आरोपी लोकांना या मानानें बऱ्याच कमी शिक्षा देण्यांत आल्या. शिक्षा सांगितल्याबरोबर ओकोनेल् उठून उभा राहिला व या खटल्यांत न्याय बरोबर झाला नाहीं असें त्यानें थोडक्यांत सांगितलें. त्या भाषणांतील एक एक शब्द कोर्टांत जमलेले लोक मोठ्या उत्सुकतेनें ऐकत होते.

---

१. डॉक्टरानें किंवा वैद्यानें स्वतःचेंच औषध स्वतः करितां घेऊं नये, आणि ब्यारिस्टरानें किंवा वकिलानें स्वतःवर आलेला खटला स्वतः चालवूं नये, असें जें अनुभविक लोकांचें ह्मणणें आहे, तें बरोबर आहे. लोकांवर प्रसंग आला असतां, यांच्या हातून त्या लोकांचें काम जसें चांगलें होतें तसें स्वतःवर प्रसंग आला असतां स्वतःच्या हातून होत नाहीं. या नियमाला अनुसरून ओकोनेलच्या हातून प्रस्तुत प्रसंगीं चांगलें काम वठलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं.

शेवटीं त्याचें भाषण संपल्यावर जिकडे तिकडे कोर्टांत मोठा गलबला झाला, व जो तो आरोपींना शिक्षा देण्यांत न्याय झाला नाहीं असें ह्मणूं लागला. परंतु या ह्मणण्याचा अरण्यरुदनापेक्षां जास्त तो उपयोग कोणता व्हावयाचा? असो या शिक्षेविरुद्ध ओकोनेलनें लार्डसच्या सभेकडे अपील केलें. त्या अपिलाचा निकाल होण्याच्या अवधींत त्यानें एक जाहिरनामा काढला, व त्यांत त्यानें पुढील वाक्य लिहिलें होतें. जो मनुष्य स्वस्थतेचा, अगदीं थोडा कां होईना, पण भंग करील तो माझा व आयर्लंडाचा वैरी आहे असें मी समजेन.' कोणी दंगा वगैरे करूं नये असें जर स्वतः ओकोनेलचें ह्मणणें आहे, तर त्याच्या ह्मणण्याप्रमाणेंच कां होईना, असें ह्मणून सर्व लोक कांहीं एक हालचाल न करितां त्या वेळेस स्वस्थ बसले.

ओकोनेल व त्याचे साथीदार या सर्वांना डब्लिन येथील रिचमंड प्रिझन (Richmond prison) नांवाच्या तुरुंगांत नेऊन ठेविलें. तुरुंगांत असतांना तेथील अधिकाऱ्यांनीं त्यांची व्यवस्था चांगली ठेविली होती. शिवाय त्याच्याशीं त्यांची वर्तणूकही प्रेमळ अशी होती. तुह्मीं सांगाल त्या जागेंत तुह्माला नेऊन ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येईल, असें त्यांस खासगी रीतीनें अगोदर कळविण्यांत आलें होतें. आयर्लंडांत एकंदर जेवढे तुरुंग होते, त्या सर्वांत चांगला कोणचा हें काम फिट्झ प्याट्रिक् नांवाच्या मनुष्यानें आपल्याकडे घेतलें होतें. त्याप्रमाणें त्यानें सर्वांत सोइस्कर आणि राहण्याला वगैरे प्रशस्त असा रिचमंड प्रिझनच पसंत केला. या तुरुंगाच्या संबंधानें विशेष आणखी अशी एक गोष्ट होती कीं, डब्लिन येथील कॉरपोरेशनची त्याच्यावर देखरेख होती. कॉरपोरेशनमधील सर्व सभासद ओकोनेलच्या पक्षाचे होते. ह्मणून तो त्याच्या ताब्यांत दिला ह्मणजे ते त्याची एखाद्या पाहुण्याची व्यवस्था ठेवावी तशी त्याची ठेवतील, व इतर कैद्यांप्रमाणें त्याचे हाल होणार नाहींत, असा लोकांना पूर्ण भरंवसा होता.

शिक्षा झालेले सर्व कैदी गव्हरनर ऑफ दी जेल (Governor of the Jail.) ह्मणून तुरुंगावरचा जो मुख्य अधिकारी होता त्याच्या

स्वाधीन केले. रीतीप्रमाणें कैद्यांच्या रजिष्टरांत[1] त्यांचीं नांवें नोंदिलीं. हें सर्व कैदी ज्यावेळेस प्रथम तुरुंगांत आले, त्यावेळेस त्या तुरुंगावर देखरेख करण्याकरितां नेमलेल्या अधिकाऱ्यांची तेथें सभा भरली होती. ओकोनेल्ला पहातांक्षणींच सर्व सभासद मोठ्या आदरानें उठून उभे राहिले. यापेक्षां ओकोनेल्सारख्या मोठ्या मनुष्याचें तुरुंगांत तें आदरातिथ्य काय करावयाचें? त्यांच्या हातांत आतां एवढेंच होतें कीं, तुरुंगाच्या नियमाप्रमाणें होतां होईल तितकी या लोकांना सवलत द्यावयाची. त्याप्रमाणें त्यांनीं सवलत देण्याचा निश्चय केला, व ओकोनेल्प्रभृति मंडळींना त्यानीं असें कळविलें कीं, तुह्माला येथें जेणेंकरून सुख होईल अशी सर्व व्यवस्था करण्यांत येईल. मात्र त्या सवलतींचा दुरुपयोग करून कैदेंतून पळून न जाण्याबद्दल तुह्मी सर्वांनीं हमी दिली पाहिजे. त्याप्रमाणें त्या सर्वांनीं हमी दिल्यावर तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांनीं, सरकारी हुकुमावरून, आपलीं खासगी घरें त्यांना भाड्यानें राहण्या करितां दिलीं; शिवाय तुरुंगाजवळ असणाऱ्या बागेंत वाटेल तिकडे हिंडण्या फिरण्याचीही परवानगी दिली. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था बाहेरचेच लोक करीत असत. तुरुंगांतील अन्न खाण्याचा त्यांना केव्हांही प्रसंग आला नाहीं. त्यांचीं पत्रें त्यांच्याकडे येत होती. फार तर काय, अगदीं आपल्या घरांत असल्याप्रमाणें, पाहुणे मंडळीसुद्धां भेटण्या करितां त्यांचेकडे येत होती. ओकोनेल्ला आपल्या धर्मांतील चार शब्द रोज ऐकविण्याकरितां ह्मणून प्रत्येक दिवशीं एक एक धर्माधिकारी त्याजकडे जाऊन उपासना करीत असे. ही कामगिरी बजाविण्याचे कामीं धर्माधिकारी मंडळींत अगदीं चढाओढ लागून राहिली होती. त्याला तुरुंगांत भेटण्याकरितां ह्मणून जे लोक जात असत, त्यांच्या केव्हां केव्हां असें नजरेस पडे कीं, तो बागेंत चैनीनें फिरत आहे, व त्याचीं नातवंडें त्याच्या भोंवतीं बागेंतल्या

---

१. हीं रजिष्टरें अजूनदेखील पाहण्यास सांपडतात व तीं पाहण्याची लोकांची उत्सुकताही बरीच असते.

फुलांच्या ताटव्यापाशीं खेळत आहेत. ही त्याची स्वतःची गोष्ट झाली. इतर जे त्याचे सोबती होते ते नानाप्रकारचे गमतीचे खेळ खेळून आपल्या मनाला करमणूक करून घेत होते. तुरुंगांतल्या तुरुंगांत 'प्रिझन गझेट' ( Prison Gazette. ) नांवाचें एक वर्तमानपत्र त्यांनीं सुरू केलें व त्या वर्तमान पत्रांत तुरुंगांत वेळोवेळ ज्या सभा भरत असत, त्यांची कच्ची हकीगत येत असे. हें वर्तमानपत्र ज्यांनीं ज्यांनीं वाचलें असेल त्यांना त्यांना असें दिसून येईल कीं, त्यांत तुरुंगांतीलच तेवढी हकीगत येत होती असें नाहीं तर, जे लोक तुरुंगाबाहेर होते व असोसिएशनचें काम चालवीत होते, त्यांना उत्तेजन देण्याच्या हेतूनें लिहिलेले लेखही त्यांत येत होते.

सन १८४४ च्या मे महिन्याच्या २४ व्या तारखेला खटल्याचा निकाल झाला, व त्यानंतर झालेल्या शिक्षेवर लॉर्ड्सच्या सभेकडे अपीलही दाखल करण्यांत आलें, वगैरे मजकूर पूर्वीं सांगितला आहेच. अपीलाचा आपल्याला अनुकूल निकाल होईल अशी ओकोनेलला प्रथमपासून मुळींच आशा नव्हती. ह्मणून तो त्यासंबंधानें फारसा विचार करीत नव्हता. स्मिथ ओब्रायन् नांवाच्या गृहस्थाच्या देखरेखीखालीं असोसिएशनचें काम कसें काय चाललें आहे, सर्व लोक जसा उद्योग करावा तसा करीत आहेत किंवा नाहीं, या गोष्टींकडे त्याचा सर्व जीव लागून गेला होता. असोसिएशनचें काम ढिलें न पडतां पूर्वींप्रमाणें चालू आहे, असें जेव्हां त्याला समजलें तेव्हां तो ह्मणाला:—

लोकांनीं मोठ्या धैर्यानें उद्योग चालविला आहे. मला ही भीति होती कीं, मी इतकें सांगितलें होतें तरी, अशा या ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं माझी ही मंडळी जातील तर फारच पुढें जातील, किंवा आहे तेथेंच स्वस्थ बसतील—ह्मणजे करतील तर बंडच करितील नाहीं तर तुह्मीही स्वस्थ बसा आह्मीही स्वस्थ बसूं, असें ह्मणून तटस्थ वृत्ति स्वीकारतील. परंतु परमेश्वरा! तुझी धन्य आहे! माझ्या लोकांनीं मोठ्या धैर्यानें

उद्योग चालविला आहे. अशा लोकांचें नायकत्व स्वीकारणें किती तरी आल्हादकारक आहे? क्याथलिक असोसिएशनच्या वेळेस परस्परांत तंटे चालत असत, पण आतां तें कांहीं नाहीं, सर्व कसें सुरळीत चाललें आहे. कोणाचा कोणाविषयीं मत्सर नाहीं कांहीं नाहीं. प्रत्येकजण सार्वजनिक हिताकरितां कायावाचामनेंकरून झटत आहे.'

मागच्या प्यारिग्राफांत सांगितल्याप्रमाणें अपिलांत आपल्यासारखा निकाल होण्याची ओकोनेलला जरी आशा नव्हती तरी अपिलकोर्टांत त्यानें आपल्या तर्फेनें काम चालविण्याकरितां जे इंग्लंडांतील ब्यारिस्टर दिले होते, त्यांना मात्र आपण हें अपिल जिंकूं, अशी बळकट आशा होती. अपिलयादींत त्यांनीं सरासरी ३४ तकरारी घातल्या होत्या. त्या तकरारी येथें सांगून जागा आडविण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं ह्मणून त्या आह्मी येथें देत नाहीं. त्याचप्रमाणें लार्डस्च्या सभेपुढें अपील सुनावणीला निघाल्यावर पुढें काय हकीगत झाली तेवढी कळली ह्मणजे पुरे आहे; आणि ह्मणून तेवढीच हकीगत आह्मी आपल्या वाचकांकरितां या खालीं देतों.

सपटंबर महिन्याच्या ४ थ्या तारखेला अपील सुनावणीला निघालें. कायदा जाणणारे पांच लार्डस् तकरारी ऐकण्यास हजर होते. त्यांपैकीं दोघांचें मत असें पडलें कीं, खालच्या कोर्टाचा निकाल कायम करावा. बाकीच्या तिघांचा अभिप्राय याच्या उलट पडला. जूरीची यादी करण्याच्या कामांत जो प्रकार घडून आला होता, त्याच्यावर या तिघांपैकीं लार्ड डेन्मनें फारच कडक टीका केली. तो ह्मणाला 'अशा तऱ्हेनें जूरलोकांची याद करण्याची वहिवाट, तिचा कांहींएक प्रतिकार न करतां चालू ठेविली तर, जूरीच्या मदतीनें खटल्याची चवकशी करणें ह्मणजे, शुद्ध थट्टा, प्रतारणा आणि दगलबाजपणा केल्यासारखें होईल' त्याचे हे उद्गार पुढें इतके प्रसिद्धीस आले कीं, प्रसंग-

१. इंग्रजींतील मूळशब्द 'A Mockery, a delusion and a snare' हे आहेत.

विशेषीं आधारादाखल त्यांचा उपयोग करण्यांत येऊं लागला. अशा प्रकारानें पांचजणांमध्यें मतभेद झाल्यानंतर पुढचा प्रकार फारच मौजेचा झाला. लार्डसच्या सभेची हा वेळपर्यंत व यानंतरही बरेच दिवस अशी व्यवस्था होती कीं, अपिलांतील प्रश्नाचा विचार करते वेळेस फायदा जाणणारे लार्ड व इतर साधारण लार्ड [ Lay lords ] यांच्यामध्यें कांहीं भेद करावयाचा नाहीं. नियम हा असा होता खरा, परंतु नेहमींची वहिवाट अशी होती कीं, अपिलाचा निकाल देतेवेळेस कायदे न जाणणाऱ्या लार्डस्नीं मत द्यावयाचें नाहीं. परंतु मत देण्याचा त्यांना पूर्णपणें अधिकार होता, आणि तो अधिकार त्यांनीं वजावल्याचीं एक दोन उदाहरणेंही होतीं. आतां तो हक्क बजावण्याची यावेळेसही जर त्यांना हुक्की आली असती, तर मग ओकोनेलची कांहीं धडगत झाली नसती, याबद्दल कोणालाहि शंका नव्हती. कारण लार्डस्-सभेवर ओकोनेलचा फार मोठा कटाक्ष होता. या सभेंतील लोकांना आपलें खरें कर्तव्य काय आहे तें कळत नाहीं, गरीब लोकांच्या सुखाची यांना पर्वा नाहीं, संपत्तीच्या मदांत हे नेहमीं धुंद असतात, यामुळें आपल्यावरील जबाबदारी हे लोक ओळखीत नाहींत, अशा प्रकारची कडक टीका त्यांच्या संबंधानें तो नेहमीं करीत असे. यामुळें ते लोक त्याला अगदीं पाण्यांत पहात होते व त्याला रसातळाला नेऊन पोंचविण्याची संधि केव्हां येईल, याची अगदीं वाट पाहत होते. ओकोनेलचें अपिलाच्या कामांत त्याच्या उलट जर आपण मत दिलें, तर आपणावर यथेच्छ तोंड सुख घेणारा आपला कट्टा शत्रु तुरुंगांत वर्षभर कुजत पडेल, व याप्रमाणें आपण आपला सूड उगविल्या सारखें होईल, असें ह्मणून बरेच लार्ड्स पुढें सरसावले, व मत देण्याचा आपण आपला हक्क बजावणार असें ह्मणूं लागले. यावर लॉर्ड व्हार्नक्लिफ् नांवाच्या सरदारानें आपल्या स्नेही मंडळीची चांगली समजूत घातली, व त्यांना असें सांगितलें कीं, कायद्याचा प्रश्न आला असतां कायद्यामध्यें वाकबगार अशाच लोकांनीं आपलें मत देणें उचित आहे. ज्यांना कायद्याचा गंधही नाहीं अशांनीं या प्रश्नाचा निकाल आह्मीं लावणार असा हट्ट धरणें, अगदीं

अज्ञानमूलक आहे. शिवाय आजपर्यंतची वहिवाटही अशीच आहे. त्या वहिवाटीला मान देऊन आजपर्यंत चालत आलेला क्रम यावेळेसहि आपण चालू ठेवावा यांतच भूषण आहे. हें ह्मणणें सर्व लार्डांना पटलें त्यांच्यामध्यें असलेली न्यायबुद्धि पुनः जागृत झाली, व ओकोनेलचे अपिलाचा निकाल करण्याचें काम त्यांनीं वर सांगितलेल्या कायदा जाणणाऱ्या पांच लार्डांकडे सोंपविलें. त्या पांच जणांच्या मतांत कसा भेद पडला होता हें मागें सांगितलेंच आहे. कोणत्याहि गोष्टींत मतभेद झाला असतां ज्या बाजूला मतें जास्त त्या बाजूचा निकाल द्यावयाचा, असा जो नियम आहे, त्या नियमाला अनुसरून तिघांच्या मताप्रमाणें ओकोनेलला निरपराधी ह्मणून सोडून द्यावें असें ठरलें.

आपील कोर्टाचा निकाल बाहेर पडल्याबरोबर, फोर्ड नांवाचा ओकोनेल्चा सॉलिसिटर ही बातमी सांगण्याकरितां होलिहेड्कडे एकदम चालता झाला. डब्लिन येथें त्याला घेऊन जाण्याकरितां एक आगबोट वाट पहात उभी होतीच. केन्सिंग्टन येथील बंदरावर ती आगबोट पोंचण्याच्या वेळेस हजारों लोक निकाल काय झाला, हें ऐकण्याकरितां तेथें जमले. आगबोटीच्या एंजिनाला एक निशाण लावलें होतें, व 'ओकोनेल् सुटला' अशीं अक्षरें त्याच्यावर लिहिलीं होतीं, उद्देश हा कीं, आगबोट बंदराला लागण्याच्या अगोदरच अपिलाचा निकाल काय झाला, तो लोकांना कळावा. आगबोट बंदराला लागल्याबरोबर फोर्डनें जमिनीवर एकदम उडी टाकिली व ताड्कन रिचमंड्च्या वाटेला लागला. तेथें पोंचल्यावर ओकोनेल् ज्या खोलींत जेवीत बसला होता, त्या खोलीचें दार धाडदिशीं उघडून मोठ्या आवेशानें ओकोनेल्पुढें जाऊन उभा राहिला. आनंदाचें त्याला इतकें भरतें आलें होतें कीं, त्याचा कंठ अगदीं सद्गदित झाला, डोळे पाण्यानें भरून आले व एक शब्दही त्याच्या तोंडावाटें निघेना. अशा स्थितींत त्यानें तोंडावाटें कसेबसे चार शब्द काढले. तेवढ्यावरूनच ओकोनेल्नें आपल्याला अनुकूल निकाल झाल्याचें ताडलें. नंतर तो भक्तिपुरःसर अशा अंतःकरणानें जवळ

असलेल्या फिडझप्याट्रिक नांवाच्या आपल्या स्नेहाला बोलला. " फिट्झ-प्याट्रिक, ही गोष्ट घडवून आणण्याला मनुष्यप्राणी कारण आहे असें तूं समजूं नको. आयर्लंडांतील लोकांनीं मोठ्या श्रद्धेनें व मोठ्या निश्चयानें आजपर्यंत परमेश्वराची जी प्रार्थना चालविली होती, त्या प्रार्थनेनें तो प्रसन्न झाला आणि ह्मणून त्यानें आजचा हा प्रसंग आपल्याला दाखविला आहे. " त्या रात्रींच तुरुंगांतून निघून तो आपल्या घरीं आला. वाटेनें जात असतां सर्व लोक त्याच्याकडे अगदीं निरखून पाहूं लागले, जणूकाय तो प्रत्यक्ष यमाच्या दाढेंतूनच परत येत आहे असें त्यांना वाटलें. परंतु ओकोनेल्नें असें दीनवाणीं आपल्या घरीं जावें हें त्याच्या मित्र मंडळीला पसंत पडेना. अपिलाचा निकाल काय झाला याची चोहोंकडे आयर्लंडांतील लोक वाट पहात बसले होते. इतक्यांत निरनिराळ्या डोंगरावर जयसूचनार्थ केलेल्या दीपोत्सवानें त्यांना ही मंगलवार्ता नेऊन पोंचविली. दुसऱ्या दिवशीं समारंभानें आणण्याकरितां ह्मणून शिक्षा झालेल्या सर्व लोकांना तुरुंगाकडे पाठविलें. नंतर ओकोनेल्ला एका मोठ्या गाडींत बसविलें. त्याच्यापुढें देशाभिमानानें भरलेलीं आयरिश् गाणीं वाजविणारा एक जुन्या तऱ्हेचा पोषाख केलेला सारंग्या बसविला होता व गाडीच्या मागें व पुढें निरनिराळ्या धंद्यांतले सर्व लोक अगदीं सारखे ओळीनें चालले होते. ओकोनेल्च्या गाडीला घोडे वगैरे न लावतां जमलेल्या गर्दींतील माणसें पाळीपाळीनें ती ओढीत होती. याप्रमाणें मोठ्या समारंभानें व सन्मानपूर्वक त्या सर्वांना तुरुंगापासून घरीं आणून पोंचतें केलें.

लार्ड्सच्या सभेनें या कामांत केलेली वर्तणूक पाहून सर्वांना फार समाधान वाटलें, व पुढें त्याचे परिणामही फार चांगले झाले. ओकोनेलला झालेली शिक्षा जर कायम झाली असती, तर त्यापासून फार वाईट परिणाम झाले असते यांत शंका नाहीं. सर्व लोकांना प्रथमतः असें वाटलें असतें कीं, ज्या जूरींत एकही रोमन क्याथलिक नाहीं, अशा जूरीनें त्याला अपराधी ठरवून शिक्षा दिली. बरें शिक्षा झाली तर झाली,

अपिल कोर्टानें तरी या गोष्टीकडे लक्ष पुरवून शिक्षा रद्द करावयाची होती तर तेंही नाहीं, त्या कोर्टानें न्यायअन्याय चट्सारा एका बाजूला गुंडाळून ठेवून, केवळ राजकीय धोरणावर दृष्टि देऊन, शिक्षा कायम केली, हे व अशा तऱ्हेचे अनेक आक्षेप घेण्याला लोकांना जागा राहिली असती; परंतु इंग्लिश लोकांच्या मनांत स्वभावतःच असणारी न्यायबुद्धि आयत्या वेळेस प्रकट झाली व तिनें वर लिहिलेले आक्षेप घेण्यास जागा ठेविली नाहीं. यासंबंधानें प्रसिद्ध इतिहासकार वॉलपोल यानें काढलेले उद्गार वाचण्याजोगे आहेत. तो ह्मणतो:--' खालच्या कोर्टाचा ठराव कायम होईल अशीच बहुतेकांची मनोदेवता सांगत होती. यामुळें ओकोनेल सुटल्याची जेव्हां बातमी आली तेव्हां आयर्लंडांतील सर्व लोक अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले. ते असें ह्मणूं लागलें कीं, लॉर्डांचें या वेळेचें वर्तन लक्षांत घेतलें ह्मणजे इंग्लिश लोकांत स्वभावतः न्याय करण्याची बुद्धि किती जागृत आहे, हें चांगलें व्यक्त होतें. आपलें कर्तव्य ह्मणून ओकोनेलच्या अपिलाचा निकाल करण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां त्याच्या संबंधानें पूर्वीं मनाचा झालेला एकप्रकारचा ग्रह त्यांनीं अगदीं एका बाजूला ठेविला. आयरिश लोकांचेंच तेवढें हें ह्मणणें आहे असें नाहीं, तर खुद्द इंग्लिश लोकांचें मतही अशाच प्रकारचें आहे. ते अजून देखील असें समजतात कीं, या कामांत लॉर्ड्सनी जो निकाल दिला, त्यावरून अतिशय वरिष्ठ प्रतीचें जें अपील कोर्ट आहे, त्याला पक्षपातित्वाचा एवढासा देखील वारा लागत नाहीं, हें उत्तम रीतीनें व्यक्त होतें. वरवर पाहणाऱ्या लोकांना इंग्लंडांतील लोकांचें हें मत खरें आहे असें वाटेल; परंतु जो कोणी थोड्याशा शोधक बुद्धीनें पाहील त्याला असें दिसून येईल कीं, एका पक्षानें पुढें आणिलेल्या प्रश्नावर दुसऱ्या पक्षाचे लोक केवळ पक्षाभिमानाला पेटून जशीं मतें देतात, तशींच या कामांतही अपिलाचा निकाल करणाऱ्या लार्डांनीं दिलीं होतीं; आणि या गोष्टीवरून तो आणखी असेंही अनुमान काढील कीं, या

---

१. History of England Vol. V. p. 111.

कामांत ओकोनेलला जो न्याय मिळाला, तो इंग्लिश लोकांच्या न्याय करण्याच्या उपजत बुद्धीमुळें मिळाला असें नाहीं, तर अपिलाचा निकाल करण्याकरितां बसलेल्या पांच सरदारांपैकीं तीन सरदार दैवयोगानें लिबरल पक्षाचे होते, यामुळें मिळाला .... .... अर्थात् अशा उच्च प्रतीच्या अपील कोर्टाचा ठराव क्षणोक्षणीं पलटणाऱ्या दैवयोगावर अवलंबून होता, हें अगदीं उघड आहे. आणि ह्मणून इंग्लिश लोकांच्या उपजत न्यायबुद्धीविषयीं घमेंड मारणाऱ्या लोकांनीं ती फार सावधगिरीनें मारावी अशी त्यांस आमची सविनय प्रार्थना आहे. ”

इंग्लिश इतिहासकारांच्या मताप्रमाणें या निकालापासून जो एक चांगला परिणाम झाला तो हा कीं, यापुढें ऐक्य नाहींसें करण्याचा उद्योग अगदीं शिथिल पडला. इंग्रज सरकाराला सैन्याच्या मदतीनें जी चळवळ बंद पाडतां आली नसती, ती यापुढें अनायासानें अगदीं निःसत्त्व झाली व कांहीं काळानें बंददेखील पडली. इंग्लिश लोक कपटी आहेत, विश्वासघातकी आहेत, असा जो ओकोनेल्चा आजपर्यंत त्यांच्या संबंधानें आक्षेप होता, तो बऱ्याच अंशानें निराधार आहे, असें इंग्लिश लोकांनीं त्याला दोषमुक्त करून सोडून दिल्यापासून, लोकांना वाटूं लागलें. क्लॉनटार्फ येथें सभा भरूं न दिल्यामुळें, लोकांमध्यें ओकोनेल्चें वजन जें एकदां नाहींसें झालें तें पुनः परत आलें नाहीं. ही स्थिति प्राप्त होण्याला आतां सांगितलेलें हेंच एक कारण होतें असें नाहीं, तर अशाच प्रकारचीं अनेक कारणें होतीं. बऱ्याच ग्रंथकारांचा असा समज आहे कीं, ही स्थिति प्राप्त होण्याला ओकोनेल्वर खटला झाला हेंच सर्वांत मुख्य कारण होय. कारण त्या खटल्यांत निर्विवाद रीतीनें लोकांच्या असें निदर्शनास आलें कीं, इंग्रज सरकाराला जो कोणी मनुष्य वाजवीपेक्षां जास्त चिडवील त्याला शासन करण्याचें पूर्ण सामर्थ्य त्यांच्या अंगीं आहे. जॉनग्रीनसारख्या धूर्त इतिहास-

१. Erskine May's Constitutional History of England Vol. II p. 399.

काराचा देखील सामान्य प्रतीच्या ग्रंथकारांप्रमाणें समज व्हावा हें खरोखर मोठें आश्चर्य आहे. कायदा न जाणणाऱ्या लार्डांचीं मतें घेऊन ओकोनेल्ला दिलेली शिक्षा लार्ड्सच्या सभेनें जर कायम केली असती, तर शिक्षा संपल्यावर कारागृहांतून सुटल्या बरोबर पूर्वींपेक्षांही तो जास्त लोकप्रिय झाला असता, व त्याचें सामर्थ्यही पूर्वींपेक्षां जास्त वाढलें असतें. त्याच्या आंगचें सामर्थ्य पहिल्या प्रमाणेंच जर कायम राहिलें असतें, तर त्यानें आरंभिलेल्या चळवळीला फार विलक्षण जोर आला असता. क्लॉंटार्फ येथील सभेच्या प्रसंगीं नुस्त्या बडबडीपेक्षां जास्त कांहीं कर्तबगारी करून दाखविण्याचा ओकोनेल्चा हेतु नाहीं, असें जर त्याच्या अनुयायिवर्गास कळलें नसतें, तर खडतर कारागृह-वास संपतांक्षणींच क्याथलिक लोकांत त्याचें इतकें कांहीं वजन वाढलें असतें कीं, ' अनभिषिक्त राजा ' ही पदवी त्याच्या कांहीं स्नेह्यांनीं त्याला जी कौतुकानें दिली होती, तिची सार्थकता करून आयर्लंडचा त्याला खरोखरचा राजाच त्यांनीं केला असता यांत कांहीं संशय नाहीं. ओकोनेल्चा लौकिक व मानमान्यता नाहींशी होण्याला जर कोणी कारण झाला असेल तर त्याचा तोच झाला असें इंग्लिश इतिहासकारांचे विरुद्ध जस्टिन म्याकार्थीनें मत आहे. मोठमोठ्या सभा भरून, लष्करी थाटानें बरोबर ब्यांड व निशाणें घेऊन, हजारों लोकांना एके ठिकाणीं जमावयास सांगून, तोंडाच्या बडबडीपेक्षां पुढें मजल जाऊं द्यावयाची नाहीं, हा ओकोनेल्चा निश्चय ज्याक्षणीं लोकांना समजला त्याचक्षणीं त्यानें आरंभिलेल्या उद्योगांतील जोम नाहींसा झाला. कायदेशीर मार्गाचें अवलंबन करण्याविषयीं ओकोनेल्चा नेहमीं आपल्या लोकांस सल्ला होता. नवीन मंडळीचें ह्मणणें असें होतें कीं, साम, दान, दंड व भेद, यापैकीं आयरिश लोकांनीं दंडाचा उपयोग करावा. मनुष्य निराश झाला ह्मणजे दंडाचा प्रयोग करण्याचा विचार त्याच्या मनांत येऊं लागतो. या नियमाला अनुसरून, होतां होईल तों रक्तपात न करतां आपल्या हातून होईल तितका यत्न करावा, या तत्वावर ओकोनेल्नें आरंभ केलेला उद्योग जेव्हां निष्फळ झाला, तेव्हां आपल्याला या शिवाय

अन्य मार्गच उरला नाहीं, असें या नवीन लोकांना वाटूं लागलें. परंतु पुढें ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या त्यावरून त्यांचें हें वाटणें किती वेडेपणाचें होतें हें चांगलें व्यक्त झालें. ओकोनेल या लोकांपेक्षां किती तरी पटीनें धूर्त होता! इंग्लंड देशाचें सामर्थ्य किती आहे याची कल्पना नवीन लोकांना मुळींच नव्हतीं. ओकोनेल् तें पूर्णपणें ओळखून होता. परंतु या गोष्टीचें कोणच्याही प्रकारचें चीज झालें नाहीं. उलट ओकोनेल्नें आजपर्यंत मोठ्या नेटानें चालविलेल्या उद्योगाचा या नवीन मंडळीला अगदीं वीट आला होता. आतां हें खरें कीं, अशा तऱ्हेनें वीट आणण्याला तो आपला आपणच कारणीभूत झाला होता व त्यामुळें नवीन मंडळीला दोष देण्याला जागा राहू दिली नव्हती. ओकोनेल्ची बाजू कां घसरली, हें खालीं दिलेल्या हकीगतीवरून वाचकांचे लक्षांत येईल.

प्रचंड सभा भरविण्याकरितां जो एक मनाचा उत्साह लागतो तो उत्साह आयरिश लोकांत त्यानें उत्पन्न केला होता, आणि एकदां उत्पन्न केल्यानंतर सर्वदा तो तसाच कायम ठेवणें त्याला केव्हांही अशक्यच झालें असतें. या उत्साहरूपी उष्णतेचा पारा प्रथम वर चढावा तितका चढत नाहीं, व एकदां चढूं लागला ह्मणजे आपल्या इच्छेप्रमाणें त्याला जागच्या जागीं उभा करतां येत नाहीं. प्रतिक्रिया होणें हें अगदीं अपरिहार्यच होऊन जातें. आणि त्याचप्रमाणें आयरिश् लोकांची गति झाली. ओकोनेल् आतां ह्मातारा होत चालला होता. आतांपर्यंतचें त्याचे सर्व आयुष्य दगदगींत गेलें होतें. यामुळें त्यांचें शरीर, पहिल्यानें जरी अगदीं लोखंडासारखें बळकट होतें तरी, आतां बरेंच क्षीण झालें होतें. आपल्या पाठीशीं मनुष्यबळ पुष्कळ आहे, असें मोठ्या अभिमानानें तो नेहमीं ह्मणत असे. पण त्या मनुष्यबलाचा प्रसंग पडलाच तर उपयोग करणार किंवा नाहीं, यासंबंधानें त्यानें सर्वांनाच संशयांत ठेवलें होतें. त्या बलाचा उपयोग केल्याशिवाय हा कधींहीं राहणार नाहीं, अशी त्याच्याविषयीं सरकारच्या मनांत भीति होती, व त्याच्या अनुयायी मंड-

ळीच्या मनांत 'बळकट आशा होती. परंतु त्याच्या मनांतील विचार जेव्हां बाहेर पडला, तेव्हां सरकाराला वाटत असलेली भीति, व त्याच्या अनुयायी मंडळीच्या मनांत चिरकाल वास करीत असलेली आशा, एकदम विलयाला गेली. लॉर्ड लेफ्टनंट यानें प्रसिद्ध केलेला जाहिरनामा, किंवा सरकारानें त्याजवर केलेला खटला, या दोहोंपैकीं एकानेंही ओकोनेलचें वजन कमी झालें नाहीं. पण कायद्यापुढें मान वांकविणें जरूर आहे, अशा अर्थाचा आपल्या सहीनें त्यानें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला, त्याच जाहिरनाम्यानें त्याला उच्च सिंहासना-वरून खालीं ढकलून दिलें! तेव्हांपासून राज्यकारण करणाऱ्या या राजाला आपली गादी मिळविण्याकरितां बंडखोर लोकांबरोबर, ह्मणजे दंडाचा प्रयोग करूं सांगणाऱ्या नवीन मताच्या मंडळीबरोबर, मरेपर्यंत झगडावें लागलें पण शेवटीं ती गादी त्याच्या हातीं लागली नाहीं ती नाहींच! क्लॉंटार्फ येथील सभा ह्मणजे ओकोनेलच्या कारकीर्दीचा अगदीं कळस! लॉर्डसच्या सभेनें निकाल दिल्यानंतर तो व त्याची मित्रमंडळी ज्या वेळेस तुरुंगांतून सुटून आली, त्या वेळेस सर्वत्र उत्सव सुरू झाला. जागोजाग दीपोत्सव, मेजवान्या, आनंदप्रदर्शक सभा, लोकांचे मेळे, यांचा एकसारखा तडाखा उडून राहिला. आह्मीं आपल्या पुढाऱ्याला सोडून कधींही जाणार नाहीं, अनेक लोक बोलूं लागले; इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य यापुढें फार दिवस टिकणार नाहीं, असें ओकोनेलही पुनः प्रतिपादन करूं लागला. परंतु त्याच्या कारकीर्दीची आतां अगदीं अखेर झाली होती. ह्मणून या सर्व गोष्टींचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ओकोनेलच्या मरणाची हकीगत देऊन येथेंच हा भाग पुरा करण्याला वास्तविक ह्मटलें तर आतां कोणचीच हरकत राहिली नाहीं. पण आह्मीं तसें करीत नाहीं. आपल्या चरित्रनायकाच्या चरित्रांत कोणकोणच्या गोष्टी घडल्या त्यांचें यथास्थित विवेचन करणें हें प्रत्येक चरित्रलेखकाचें कर्तव्य आहे, आणि त्या कर्तव्यास जागून बाकी राहि-लेल्या तीन चार वर्षांत ओकोनेलच्या हातून काय काय गोष्टी झाल्या त्या सांगून नंतर मग हा भाग आह्मीं पुरा करूं

इंग्लंड बरोबर आयर्लंडचें झालेलें ऐक्य नाहींसें करण्यापासून आयर्लंडाचा फायदा होईल किंवा तोटा होईल, या संबंधाचा वाद चालू असतां आयर्लंडातील प्रॉटेस्टंट लोक व इंग्लंडांतील विग् पक्षांतील कांहीं लोक यानीं एक नवीनच कल्पना काढिली होती व तिला त्यांनीं फेडेरेशन स्कीम ( Federation scheme ) ह्मणजे 'संयुक्त संस्थेची युक्ति' असें नांव दिलें होतें. लॉर्ड जॉन रसेल सारख्या मोठमोठ्या लोकांनीं ही युक्ति आपल्याला पसंत आहे, असें मत दिलें होतें, यामुळें तिला फारच महत्व आलें होतें. या नवीन युक्तीप्रमाणें स्थानिक गोष्टींची व्यवस्था पाहण्याकरितां आयर्लंडाला एक स्वतंत्र पार्लमेंट द्यावें, व त्या शिवाय एकंदर राज्याचा संबंध ज्यांत आहे, अशा विषयांवर मत देण्याकरतां ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटांतही आयर्लंडतर्फे निवडलेले सभासद असावे, ही व्यवस्था विग् लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें त्याला मान्य होती. 'राष्ट्र' पत्राच्या चालकांना व त्यांच्या अनुयायी मंडळीला ओकोनेलचें हें मत मान्य नव्हतें. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांत आज इतकीं वर्षें उद्योग करून शेवटीं तें काम तसेंच मध्यें अर्धें सोडणें हें अगदीं कमीपणाचें द्योतक आहे. 'प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति' या न्यायानें मध्येंच हा उद्योग सोडून दिल्याबद्दल इतर राष्ट्रें आयरिश् लोकांना दूषणें दिल्याशिवाय कधींही राहणार नाहींत, आयर्लंडाला पूर्वीं ज्याप्रमाणें पूर्ण स्वतंत्रता होती, त्याप्रमाणेंच त्यांना आतांही पाहिजे, या मताचा अनुवाद करणारे अनेक लोक आयर्लंडांत होते. ओकोनेलच्या भोवतीं त्याच्या ह्मणण्याला होस हो ह्मणणारे जे लोक होते त्यांनीं वरील युक्ति आह्मांला मान्य आहे, असें तेव्हांच मत दिलें. अशा तोंडपुज्या लोकांच्या साहाय्यावाचून या कामांत आतां ओकोनेलला इतर लोकांचें मुळींच सहाय्य नव्हतें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. प्रॉटेस्टंट धर्माच्या लोकांचा त्याच्यावर असावा तितका विश्वास नव्हता. इंग्लंडांतील विग पक्षामधील कांहीं विवक्षित लोकांनाच ही नवीन युक्ति पसंत होती; बाकीची सर्व मंडळी ऐक्य कायम राखलेंच पाहिजे असें ह्मणणारी होती.

आयर्लंडातले लोक ऐक्य नाहींसें झाल्यावाचून कशानेंही शांत होण्याजोगे नव्हते. अशा स्थितींत ओकोनेल्‌ला असें वाटूं लागलें होतें कीं, लगामाच्या दोऱ्या आपल्या हातून आतां निसटून जात आहेत. आपल्या एन भरभराटीच्या दिवसांत आपल्या विरुद्ध लोकांची ब्र देखील काढण्याची छाती नव्हती, हें त्याला आतां चांगलें स्मरूं लागलें. पण अशा तऱ्हेनें लोकांवरची आपली छाप नाहींशी होऊं देणें बरोबर नाहीं असें समजून त्यानें जो एक नवीनच मार्ग शोधून काढला, तो मात्र जरा चमत्कारिक होता. विग् पक्षाच्या लोकांनीं काढलेल्या संयुक्त संस्थेला अनुकूल असें मत त्यानें आजपर्यंत अनेक वेळां प्रसिद्ध केलें होत. परंतु तें सर्व एकीकडे ठेवून लोकांवर पुनः आपली छाप बसविण्याकरितां एका प्रसंगीं त्यानें असें बोलून दाखविलें कीं, 'विग् लोकांना पूर्णपणें आपल्या पक्षाकडे आणण्याकरितां मी आजपर्यंत अशा प्रकारची बतावणी करीत होतों. पण वास्तविक रीतीनें पाहिलें असतां, ऐक्य नाहींसें केल्यावांचून आयर्लंडाला गत्यंतर नाहीं, असें माझें पूर्वीपासून जें ह्मणणें आहे, ते आज मित्तीला देखील कायम आहे'

ओकोनेल्‌नें जरी वर सांगितल्याप्रमाणें आपलीं पूर्वीचींच मतें कायम आहेत, असें लोकांना आश्वासन दिलें तरी, त्यापासून ह्मणण्याजोगा कांहीं परिणाम झाला नाहीं. कारण ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांत त्याच्या अनुयायी मंडळींपैकीं जे लोक दुराग्रहाला पेटून फारच पुढें गेले होते, त्यांच्यामध्यें व ओकोनेल्‌मध्यें, खरें ह्मटलें असतां पहिल्यापासून बराच मतभेद होता. ओकोनेल्‌चा पूर्णपणें असा ग्रह होता कीं, रक्तपात करून राजकीय फायदे करून घेण्याइतकी कांहीं त्यांची योग्यता नाहीं. नवीन मंडळीचें याच्या उलट असें मत होतें कीं, आयरिश लोकांनीं आपल्या हातानें कांहीं इंग्रज लोक ठार केल्याशिवाय मिळविलेली स्वतंत्रता केवळ नांवाची होय! याप्रमाणें एकाचें तोंड पूर्वेकडे, तर दुसऱ्याचें पश्चिमेकडे, अशी स्थिति असल्यावर उभय पक्षांनें एक मत होणें, अगदीं अशक्यच होतें. ओकोनेल् हा व्यवहारचतुर

मनुष्य होता. त्यामुळें अगदींच कांहीं नाहीं त्यापेक्षां इंग्लिश लोकांकडून जो कांहीं थोडा प्रसाद मिळत आहे, तो आपण ग्रहण केला तर त्यांतच आपलें कल्याण आहे, असें त्याला वाटूं लागलें होतें. तो हें पुरतेपणीं जाणून होता, कीं रिपील असोसिएशनसारख्या निरुपद्रवी सभेनें आरंभिलेल्या उद्योगाला जर यश आलें नाहीं, तर तोच तो उद्योग पुनः तसाच चालू ठेवणें अगदीं हास्यास्पद आहे. एकदां भरलेला बार वायां गेला ह्मणजे पुनः पहिल्यासारखा जम बसत नाहीं. याकरितां पूर्वींचा मार्ग सोडून देऊन दुसरा एक नवीनच मार्ग शोधून काढला तर बरें, असें त्याला वाटूं लागलें होतें. आणि शिवाय तो नवीन मार्ग असा असावा कीं, त्यापासून कांहीं तरी लभ्यांश प्राप्त व्हावा; नाहीं तर पूर्वींप्रमाणेंच थप्पड खाण्याचा प्रसंग पुनः यावयाचा. नवीन मंडळी आपल्या देशबंधूंना जितकी ओळखीत होती, त्याच्यापेक्षां ओकोनेल जांस्त ओळखीत होता. जे लोक दरसाल असोसिएशनच्या नांवानें वर्गणी भरतात, दूरदूर अंतरावर सभेच्या निमंत्रणावरून मोठ्या थाटमाटानें जातात, इतकें जें ते करितात, तें तें त्यांत कांहीं परमार्थ आहे ह्मणून करीत नाहींत, तर त्यापासून कांहीं तरी लौकिकदृष्ट्या फायदा व्हावा ह्मणून करतात, हें तो जाणून होता. लौकिकदृष्टचा हा फायदा कोणचा तर आपल्या देशाचे फायदे आपल्यालाच करितां यावेत व तेणेंकरून आपली सांपत्तिक स्थिति अंशतःतरी सुधारावी हा. आणि हा फायदा जर करून घ्यावयाचा असला तर तो इंग्लिश लोकांपासूनच पण सामोपचारानें करून घेतला पाहिजे, असा त्याचा अगदीं कायमचा सिद्धांत झाला होता. याप्रमाणें ऐक्य नाहींसें करण्याच्या हेतूनें अस्तित्वांत आलेल्या मंडळींत फाटाफूट होण्याचा समय जवळ येऊन ठेपला होता. *Divide et imper* ‘ प्रजेंत फाटाफूट पाडून राज्य करा ’ या कुटिल राजनीतींतल्या तत्वावर नजर देऊन पीलनें संधीचा चांगला उपयोग करून घेण्याचें ठरविलें. अशा वेळेस आयरिश लोकांच्या कल्याणाची आपण एखादी गोष्ट केली ह्मणजे ही फाटाफूट लवकरच होईल व तेणेंकरून इंग्लिशांविरुद्ध खटपट कर-

णारा पक्ष अगदीं सामर्थ्यहीन होईल, अशी या दूरदर्शी मुत्सद्यानें अटकळ बांधिली व त्याप्रमाणें आयरिश लोकांना जेणेंकरून शिक्षणाचा फायदा जास्त मिळेल असा एखादा कायदा पास करून घेण्याचा त्यानें विचार योजिला. त्याप्रमाणें क्याथलिक धर्माच्या पुरोहित लोकांना शिक्षण देण्याकरितां ह्मणून मेनूथ या गांवीं जी शाळा होती, त्या शाळेला सरकारांतून आजपर्यंत कांहीं देणगी मिळत असे, ती यापुढें तिप्पटीनें जास्त देण्यांत यावी, त्याचप्रमाणें पुरोहितेतर सामान्य लोकांकरितां क्वीन्स-कॉलेजीस् (Queen's Colleges) ह्मणजे राणीच्या पाठशाळा नांवाच्या पाठशाला १००,०० पौंड खर्चकरून स्थापन कराव्या व दर पाठशाळेला दरवर्षी ७००० पौंडांची देणगी द्यावी, अशा अर्थाचें पार्लमेंटपुढें त्यानें एक बिल आणिलें. धर्मसंबंधीं शिक्षण देण्याकरितां मेनूथ येथें स्वतंत्र शाळा होतीच, यामुळें या नवीन पाठशाळांमधून इतर पाठशाळाप्रमाणें शिक्षण देण्यांत यावें, असाही त्या बिलांत आणखी निर्बंध केला होता.

कॉमन्स सभेंत मे महिन्याच्या नवव्या तारखेला वर सांगितलेलें बिल पीलनें सादर केलें व तें सर्व सभासदांना पसंत पडलेंसें दिसलें. खुद्द आयर्लंडांत नवीन मंडळींना व प्रॉटेस्टंट लोकांना हें बिल पसंत होतें. ओकोनेलला मात्र तें पसंत नव्हतें. या नवीन बिलासंबंधानें असोसिएशनच्या एका सभेंत विचार करावा असें त्यानें ठरविलें. सभा भरविण्याचा त्याचा विचार चालू असतां पुष्कळ सभासदांनीं बिलाला अनुकूल असें आपलें मत दिलें. त्यावेळेस डेव्हिस नांवाच्या त्याच्या एका स्नेह्यानें त्याला असें सुचविलें कीं, या बिलाचा प्रसिद्धपणानें सभेंत विचार करावा. आपल्यामधील भेद लोकांच्या नजरेस यावा, हें कांहीं बरें नाहीं, सबब हा मार्गच सोडून द्यावा हें बरें. ओकोनेलला डेव्हिसचा हा उपदेश रुचला नाहीं. जनरल मीटिंगपुढें त्यानें तो प्रश्न मांडलाच. त्यासरशीं बिलाला जेवढी जेवढी मंडळी अनुकूल होती, त्या सर्वांनीं त्याची भीड न धरितां तशीं मतें दिलीं. त्याबरोबर तो फार संतापला व रागाच्या आवेशांत नवीन मंडळीसंबंधानें वाटेल तें बडबडूं लागला.

सर्वांत त्यानें डेव्हिसवरच विशेष हल्ला केला. त्यावरून डेव्हिस फार संतापला. शेवटीं चौघे पांचजण मध्यस्थीला पडले व सभेचें काम संपण्याच्या अगोदर त्यांनीं त्या दोघांचा तंटा कसें तरी करून तोडला. सभेंत उत्पन्न झालेला हा तंटा तुटला खरा; पण तेव्हांपासून नव्या व जुन्या लोकांमध्यें परस्परांविषयीं जें वैमनस्य अगोदरच उत्पन्न झालें होतें, तें दिवसानुदिवस वाढतच गेलें. तें इतकें कीं, सरकाराविरुद्ध 'नेशन' पत्रांत एक लेख लिहिल्याबद्दल त्या पत्राच्या चालकांपैकीं डफीवर जेव्हां सरकारानें खटला सुरूं केला, तेव्हां त्याच्या तर्फे कोर्टांत काम चालविण्याचें देखील ओकोनेलनें नाकारलें. याचवेळेस लोकांत अशी एक बातमी पसरली होती कीं, ऐक्य नाहींसें करण्याबद्दलचा उद्योग सोडून देण्याबद्दल ओकोनेल व विग् पक्षाची मंडळी यांच्यामध्यें कांहीं बोलणें सुरूं झालें आहे. ही बातमी अगदीं निराधार होती असें नाहीं; तिच्यांत बरेंच तथ्य होतें व ती लोकांत बरीचशी प्रसिद्ध झाल्यानंतर, ओकोनेलनें स्वीकारलेला हा मार्ग श्रेयस्कर नाहीं, असें नवीन मंडळी प्रतिपादन करूं लागली. त्याबरोबर ओकोनेल फारच चिडला व 'राष्ट्र' पत्राचे चालक व त्यांचे अनुयायी यांच्यासंबंधानें फार कडक टीका करूं लागला. प्रसंग पडल्यास राजकीय हक्क संपादन करण्याकरितां लढाई करण्याचा जरी प्रसंग आला तरी मागें पुढें पाहतां कामा नये, असें मत वरचेवर ते जें प्रतिपादन करीत होते त्याचा तो निषेध करूं लागला. शेवटीं असोसिएशनच्या एका सभेंत त्यानें अशी सूचना आणिली कीं, हें तत्व यापुढें आह्मी कधींही प्रतिपादन करणार नाहीं, अशी या नवीन लोकांकडून शपथ घ्यावी. आह्मींही शपथ घेण्यास तयार नाहीं, असा नवीन लोकांनीं आग्रह धरला. त्यावर उभय पक्षांत मोठा कडाक्याचा वाद सुरू झाला. तो वाद दोन दिवस सारखा चालला होता. शेवटीं त्याचा निकाल असा झाला कीं, सर्व नवीन मंडळी यापुढें आह्मांला असोसिएशनशीं कांहींएक कर्तव्य नाहीं, असें ह्मणून सभेचा दिवाणखाना सोडून चालती झाली.

अशा प्रकारें परस्परांत भांडणें होत असतां, आयर्लंडावर फार मोठा भयंकर प्रसंग येऊन गुदरला. आयर्लंडाची लोकसंख्या फार वाढली होती. देशांतील जमिनीवर इतक्या सर्व लोकांची उपजीविका होण्याजोगा तिच्यांत त्राण राहिला नव्हता. या जमिनीचें मुख्य पीक ह्मटलें ह्मणजे बटाट्याचें होतें. बटाटे पेरण्याचे श्रम फारसे नाहींत, पीक आलें ह्मणजे फार चांगलें येतें, व इतर पुष्कळ जिनसांहून खाण्याला बटाटा बराच पुष्टिकारक आहे. परंतु त्या पिकाला रोग पडावयाची फार भीति असते, हें एक त्यांत फार वाईट आहे. एकदां रोग पडावयाला सुरुवात झाली ह्मणजे तो कशानेंही हटत नाहीं. सारीं शेतेंच्या शेतें उध्वस्त होतात. सन १८४५ सालीं दुर्दैवानें हा रोग उद्भवला, व तो चोंहोकडे हळूंहळूं पसरला. हजारों आयरिश लोक खाण्यावांचून पटापट् मरूं लागले. इंग्लंडांतील लोकांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें आयरिश लोकांना मदत करण्याकरितां मोठा फंड उभारला. पुढच्या वर्षीं तरी बटाट्याचें पीक चांगलें येईल असा अदमास होता. पण तो अदमासही अगदीं चुकीचा ठरला. १८४६ सालीं तर एक आणा देखील पीक हातीं आलें नाहीं. जुलै महिन्यांत जिकडे पहावें तिकडें हिरवींचार शेतें लागून गेलीं होतीं, पीक भरपूर व मोठ्या जोराचें येईल असें प्रत्येकास वाटत होतें. पण त्याच्याच पुढच्या आठवड्यांत पाहिलें तों स्थिति अगदींच पालटली. सर्व पीक कुजून जाऊन त्याची दुर्गंधि इतकी कांहीं सुटली होती कीं, तेथें उभें राहणेंदेखील फार कठीण झालें होतें. गेल्यासालीं जेथें हजारों लोक मरत होते तेथें आतां तर लाखों मरूं लागले. दुष्काळाच्या मदतीला त्यांतल्या-त्यांत ताप व सांथीचे रोग येऊन मिळाले. त्यानें लोकांची जी त्रेधा उडाली ती सांगतांच येत नाहीं. हीं दोन संकटें घालविण्याकरितां इंग्लिश अधिकाऱ्यांनीं व आयरिश लोकांनीं नाना तऱ्हेचे उपाय योजिले; पण त्यांपैकीं एकालाही यश आलें नाहीं. ईश्वरनिर्मित संकटांचा प्रतिकार करण्याकरितां मनुष्यानें आरंभिलेले उद्योग किती असमर्थ असतात हें या प्रसंगीं फार चांगल्या रीतीनें व्यक्त झालें. असोसि-

एशनमधल्या सभासदांत आपआपसांत जी लाथाळी सुरू झाली होती, तीमुळें ओकोनेल फारच कष्टी झाला होता. नवी मंडळी जे घोर व राक्षसी उपाय योजण्याच्या बेतांत होते ते त्याला पसंत नव्हते. १८४३ सालीं आरंभाला आपण कोणची आशा मनांत धरून उद्योग करूं लागलों, व शेवटीं त्याचा परिणाम किती वाईट रीतीनें झाला, हा विचार वरचेवर त्याच्या मनांत येई व तेणेंकरून तो फार खिन्न होत असे. परंतु दुष्काळामुळें गरीब लोकांना जी विपत्ति भोगावी लागत आहे तिच्यापुढें आपली ही दुःखद स्थिति कांहींच नाहीं असें त्याला वाटे. पावसाळ्याच्या दिवसांत जेव्हां तो डरिनेनला गेला तेव्हां तो ज्या प्रदेशांतून गेला, तो प्रदेश फारच उध्वस्त झालेला त्याला दिसला. एखादी गोष्ट करावयाची अशी मसलत करण्याचा अवकाश, कीं तेथील लोक त्याला मदत करण्याच्या हेतूनें मोठ्या प्रेमानें व उत्साहानें त्याच्या भोंवतीं जमत असत, तेथीलच लोक या खेपेला खाण्याला कांहीं मिळेल किंवा नाहीं हें पाहण्याकरितां त्याच्या भोंवतीं जमले. त्यांचीं तीं वीतभर खोल गेलेलीं पोटें व त्यांचे ते भयप्रद चेहरे पाहून ओकोनेलच्या पोटांत भडभडून आलें, व इतकी खटपट करून हाच कां आपण आपल्या देशबंधूंचा फायदा करून दिला, असा प्रश्न त्याच्या मनांत येऊन उभा राहिला. आज पन्नास वर्षें आपण एकसारखा उद्योग केला, त्यांपैकीं तीस वर्षें इच्छेस येईल त्याप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणिल्या. परंतु इहलोक सोडून जाण्याचे दिवस जसजसे जवळ येत चालले तसतसे जिकडे तिकडे त्याला अंधारमय दिसूं लागलें. त्याचा मरणसमय आतां जवळ येत चालला होता, व 'कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली। पुरःसरगदा सवें झगडतां तनू भागली॥' या केकेंत पंतांनीं वर्णन केल्याप्रमाणें त्याची दशा झाली होती. आपल्याभोंवतीं आपल्या देशबांधवांची झालेली कष्टमय स्थिति पाहून तेवढ्यानेंच त्याचें अंतःकरण दडपून जात होतें असें नाहीं. तर त्याशिवाय घरगुतीं काळजीनेंही त्याच्या मनांत बरेंच काहूर करून सोडलें होतें. त्याची ती शरीराची मोठी व भव्य इमारत आतां अगदीं खचत

चाललेली स्पष्टपणें दिसत होती. शिक्षा होण्याचे वेळेस त्याचें वय जवळ जवळ साठ वर्षांचें होतें. इतक्या उतारवयांतदेखील 'तन्वी-श्यामा शिखरिदशना स्तोकनम्रा स्तनाभ्याम्' अशा स्थितीस नुकत्याच येऊन पोंचलेल्या एका तरुणीवर त्याचें प्रेम जडलें. 'मी तुमच्याशीं लग्न लावूं इच्छित नाहीं' असें तिनें या जरठोद्वाहास तयार झालेल्या गृहस्थास अनेकवेळां निक्षून सांगितलें तरी, तिजविषयींचें त्याच्या मनांतील प्रेम यत्किंचित् देखील ढळलें नाहीं किंवा त्याच्या मनांतील अंतस्तापही अणुभर कमी झाला नाहीं. आषक वेडा असतो असें जें ह्मणतात त्याच्या सत्यतेबद्दल याहून दुसरें उदाहरण कोणचें पाहिजे? असो. शेवटीं शेवटीं धर्माकडे त्याचें लक्ष विशेष लागलें. तें इतकें कीं, हा सन्यासदीक्षा घेतो कीं काय अशी त्याच्या कुटुंबांतील मंडळीला भीति उत्पन्न झाली. रिपील असोसिएशनचे हिशेब वगैरे आपण ठेवणार असा जो त्याचा नेहमीं आग्रह होता तो लोकांना पसंत नव्हता. त्यांतल्या त्यांत सभेचे हिशेब तो कधींही प्रसिद्ध करीत नव्हता. यामुळें सर्व सभासद त्याच्यावर फार कडक टीका करीत असत. अशा तऱ्हेची टीका करणें अप्रशस्त आहे, सभेच्या पैशापैकीं एका पैचा देखील मी दुरुपयोग केलेला नाहीं, असें तो वारंवार ह्मणे. परंतु यासंबंधांत प्रत्यक्ष आपले मित्रदेखील आपल्याशीं बरेच नाखूष आहेत, हें तो जाणून होता व त्यामुळें त्याच्या हृदयाला सारखी टोंचणी लागली होती. दुष्काळाच्या ऐनप्रसंगीं 'टाइम्स' पत्रानें डरीनेन येथील त्याच्या जमिनीची स्थिति कशी काय आहे हें पहाण्याकरितां आपला एक बातमीदार मुद्दाम तेथें पाठविला होता. जमीनदार या नात्यानें ओकोनेलची वर्तणूक किती अश्लाघ्य होती याचीं अनेक उदाहरणें त्यानें छापून प्रसिद्ध केलीं. त्या सर्वांनां उलट उत्तरें लिहिणें व शत्रूंनीं केलेल्या हल्ल्याचें निवारण करणें, या गोष्टी त्याला आतां अशक्ततेमुळें शक्तिबाह्य अशा वाटूं लागल्या. त्याची शक्ति आतां अगदीं नाहींशी झाली. सन १८४६ च्या सप्टेंबर महिन्यांत तो डरिनेन येथें जो गेला तें त्याचें तेथें शेवटचेंच जाणें होतें. त्याच्या शरीराची भली थोरली

इमारत आतां अगदीं खचून गेली होती. तो फार जलद चालत असे. त्याच्या इतका जलद चालणारा माणूस फार विरळा. पण आतां त्याची काय स्थिति झाली होती ती पहा. चालतांना एक एक पाऊल मोठ्या कष्टानें तो टाकितो आहे असें पहाणाराला दिसे. त्याची नेहमींची आनंदवृत्ति अगदीं मावळून गेली होती. त्याच्या चेहऱ्यावरून तो नेहमीं उदास व कष्टी असा दिसूं लागला होता. तारीख ८ फेब्रुवारी १८४७ रोजीं तो पार्लमेंट सभेला कसाबसा गेला. आयर्लंड हल्लीं कोणच्या विपन्नावस्थेंत आहे व तेथील लोकांवर हल्लीं कोणचीं संकटें आलीं आहेत, याची सरकार बारकाईनें चवकशी करीत नाहीं, ही फार वाईट गोष्ट आहे, असें त्यानें त्यावेळेस सर्व सभासदांना मोठ्या कळवळ्यानें सांगितलें. कॉमन्स सभेनें या गोष्टीकडे जर डोळेझाक केली व आयरिश लोकांना मदत करण्याकरितां सर्व राष्ट्रांचा असा एखादा फंड जर उभारला नाहीं, तर आयर्लंडांतील सुमारें एकचतुर्थांश लोक अन्नावांचून उपाशी मेल्याशिवाय राहणार नाहींत असेंही त्यानें त्यावेळेस सभेंत बोलून दाखविलें. पार्लमेंटमधलें ओकोनेलचें हें शेवटचेंच भाषण होतें. लॉर्ड बिकन्सफील्ड यानें लिहिलेल्या लॉर्ड जॉर्ज बेंटिंगच्या चरित्रांत या शेवटच्या प्रसंगाचें त्यानें फार हृदयद्रावक असें वर्णन केलें आहे. तो ह्मणतो 'त्याच्या मुद्रेवरून तो आतां अगदीं खंगलेला दिसत होता व त्याच्या आवाजांतल्या पूर्वीच्या लकेऱ्या अगदीं नाहींशा झाल्या होत्या. जी मंडळी त्याच्या जवळपास बसली होती त्यांनाच तेवढे त्याचे शब्द ऐकूं जात होते. अध्यक्षासमोरच्या मेजापलीकडल्या बाजूला बसलेली प्रधान मंडळी, त्याचें तें भाषण मोठ्या उत्सुकतेनें व त्या प्रसंगाला शोभेल अशा आदरानें व सावधान चित्तानें ऐकत होती. त्याचें भाषण सरासरी दोन तास चालू होतें. सर्व सभाजनांना हालवून सोडणारा, त्यांच्या मनांत दहशत उत्पन्न करणारा, व आपल्याकडे त्यांचें मन आकर्षण करून घेणारा असा त्याचा तो स्पष्ट आणि खणखणीत आवाज ज्यांनीं ऐकिला होता व ज्यांनीं त्याचें तें भव्य आणि बळकट शरीर पाहिलें होतें त्यांना

या वेळेचा हा देखावा पाहून फार वाईट वाटलें, व त्यांचें हृदय अगदीं भडभडून आलें. एका क्षीण झालेल्या वृद्ध मनुष्यानें तोंडांतल्या तोंडांत बोलावयाचें ह्मणजे कॉमन्स सभेंतील साधारण सर्व सभासदांच्या दृष्टीनें बाहुल्याच्या खेळांतलाच एक प्रकार होता. परंतु त्या वृद्ध मनुष्यानें पार्लमेंट सभेंत आपलें नांव गाजवून सोडलें होतें व त्यामुळें सर्व सभासदांच्या मनांत त्याच्याविषयीं जी आदरबुद्धि होती तीमुळें त्याचें असें भाषण चालूं असतां कोणीही गडबड केली नाहीं, सर्वांनीं तें निमुटपणें ऐकून घेतलें; जणूंकाय त्याच्या त्या भाषणावर कॉमन्स सभेंतील दोन पक्षांमध्यें उपस्थित झालेल्या वादाचा निकाल व्हावयाचा होता. त्या भाषणांतला एक शब्ददेखील ग्यालरीमध्यें बसलेल्या लोकांना जरी ऐकूं गेला नाहीं तरी दुसऱ्या दिवशीं सकाळींच तें भाषण छापून काढण्याची व्यवस्था केली ह्मणून लवकरच सगळ्यांना तें वाचावयाला सांपडलें. सर्व राष्ट्रांच्या अंतःकरणांत ज्यानें आज अनेक वर्षें वास करून तीं अगदीं उचंबळावयास लावलीं होतीं अशा पुरुषाचें शेवटलें व अत्यंत महत्वाचें भाषण ज्यांनीं ज्यांनीं वाचलें त्यांना त्यांना त्या पुरुषाविषयीं कौतुक वाटल्यावांचून राहिलें नसेल. असो.

प्रकृतीला कांहीं तरी आराम पडावा ह्मणून तो प्रथम हेस्टिंग्स येथें आणि नंतर फोकस्टोन येथें गेला. परंतु आपण आतां या स्थितींतून पार पडत नाहीं, असें त्याचें त्याला कळून आलें होतें. रोमन क्याथलिक धर्मसंस्थेची मुख्य गादी जी रोमशहर, तेथें जाऊन नंतर मग आपलें देहावसान व्हावें अशी त्याची फार इच्छा होती. ती इच्छा सफल करण्याकरितां तो रोमच्या प्रवासाला निघाला. सन १८४७ च्या मार्च महिन्याच्या २२ व्या तारखेला प्रथम तो बलोन येथें आला. नंतर तेथून थोडथोडा प्रवास करून तो प्यारिस शहरीं आला. तेथून त्यानें रोमचा रस्ता धरिला. वाटेंत जिनोवा शहरांत पोंचतांक्षणींच त्याची प्रकृति जास्त बिघडली. त्याला दोन तीन वर्षांपासून मेंदूचा आजार झाला होता. तो आतां अगदीं असाध्य आहे अशी त्याच्या डाक्टर लोकांची खात्री झाली. त्याच्या प्रकृतीला आराम पडावा,

ह्मणून तेथील लोकांनींदेखील देवळांतून उपासना सुरू केल्या. शेवटची त्याची भेट घेण्याकरितां हजारों लोक त्याच्या घराकडे धांवले. परंतु त्यांच्याकडे डोळे उघडून बघण्याचीदेखील शक्ति त्याच्या अंगांत उरली नव्हती. रक्तमोचनानें प्रकृतीला कांहीं बरें वाटेल ह्मणून डाक्टरांनीं त्याला जळवा लावल्या, पण त्यापासूनही कांहीं उपयोग झाला नाहीं. थोड्याच वेळानें तो बेशुद्ध झाला. कांहीं दिवसपर्यंत तो अशा बेशुद्ध अवस्थेंतच होता. शेवटीं तारीख १९ मे १८४७ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां त्याचें देहावसान झालें.

मरणापूर्वीं त्यानें एक मृत्युपत्र करून ठेविलें होतें. आपण मेल्यावर आपलें काळीज रोम येथें नेऊन पुरावें, असें त्यांत त्यानें लिहिलें होतें. त्याप्रमाणें तें काळीज एका भांड्यांत घालून रोम शहरीं पाठवून दिलें, व तेथें विधिपूर्वक सेंट आगाथा नांवाच्या ख्रिस्ती देवळांत तें पुरून ठेविलें. पुरून ठेविल्याजागीं त्याच्या नांवचा जो कीर्तिस्तंभ उभारला आहे, त्याच्यावर ओकोनेलचें चित्र कोरलेलें आहे व त्यांत असें दाखविलें आहे कीं, ओकोनेल हा कॉमन्ससभेंत अध्यक्षाच्या टेबलाजवळ उभा आहे, व पूर्वीची शपथ घेण्यास तो नाकारीत आहे. आगष्ट महिन्यांत त्याचें शव आयर्लंडांत डब्लीन येथें परत आणिलें. राजाच्या शवाला लोक जसा मान देतात, तसा डब्लीनच्या लोकांनीं त्याच्या शवाला दिला. पुढें १८६९ सालीं त्याच्या स्मरणार्थ एक १६९ फूट उंचीचा मनोरा बांधला. मनोरा बांधण्याचें काम पुरें झाल्यानंतर ज्या ठिकाणीं प्रथम त्याचें प्रेत पुरलें होतें, त्या ठिकाणाहून तें काढून त्या मनोऱ्याखालीं तयार केलेल्या एका तळघरांत पुरून ठेविलें.

# ड्यानियल ओकोनेलचें

## चरित्र.

---

## भाग १०.

### गृहस्थिति, खासगी वर्तन, स्वभाव वगैरे.

ओकोनेल् हा तीस वर्षांच्या वयाचा झाल्यापासून, तों शेवटीं मरेपर्यंत एकसारखा लोकांच्या नजरेसमोर होता. कोर्ट, सार्वजनिक सभा व कामन्स लोकांची सभा, यांत त्याचा सर्व वेळ जात होता. घरांतील मंडळीशीं व मुलांबाळांशीं तो फार प्रेमानें वागत असे. पण त्यांच्या जवळ बसून त्यांच्याशीं सुखदुःखाच्या चार गोष्टी सांगत बसण्याला त्याला केव्हांही फारसा वेळ मिळाला नाहीं. सन १८०२ सालांतील जून महिन्याच्या दुसऱ्या तारखेस, मेरी नांवाच्या अगदीं गरीब स्थितींतल्या परंतु त्याच्यावर अनुरक्त असणाऱ्या एका मुलीबरोबर त्याचें लग्न झालें. मेरीबरोबर त्यानें लग्न लावावें, हें त्याचा चुलता मॉरिस याला पसंत नव्हतें, ह्मणून त्याला नकळत तें लग्न मुलीच्या मेव्हण्याच्या घरीं झालें. ओकोनेल्चें अशा रीतीनें झालेलें लग्न मॉरिसला पसंत पडलें नाहीं व ह्मणून तो त्याच्यावर फार रागावला. पण पुढें जसे जसे जास्त दिवस लोटत गेले, तसा तसा त्याचा राग कमी झाला. मेरीपासून ओकोनेल्ला बरींच, ह्मणजे चार मुलगे आणि तीन मुली, अशीं एकंदर सात मुलें झालीं. कोर्टांतलें काम व इतर सभांचीं कामें हीं संपल्यावर त्याला जो कांहीं थोडा वेळ मिळे, तो तो आपली बायको व मुलें यांजबरोबर मोठ्या मौजेनें घालवी. तो फार जबर मेहनत करणारा माणूस होता, व त्याच्या कामाचा व्यवस्थितपणा

व नियमितपणा फारच वर्णनीय होता. मिसेस् निकोल नांवाच्या एका बाईला एका दिवसाची त्यानें आपली दिनचर्या लिहून पाठविली होती, ती वाचण्यासारखी आहे ह्मणून आमच्या वाचकांकरितां या खालीं देतों.

"'मी सकाळीं चार वाजतां उठतों. व पांच वाजतां कामाला सुरवात करतों. साडेआठ वाजतां मुलींपैकीं कोणीतरी एक, आपआपल्या पाळीप्रमाणें, जेवण तयार आहे असें सांगण्यास येतें. जेवणांत सरासरी एक तास जातो. साडे दहा वाजतां कोर्टांत जाण्याकरितां निघतों. माझ्या घरापासून कोर्ट दोन मैल लांब आहे. ते दोन मैल जाण्याला पंचवीस मिनिटें लागतात. याप्रमाणें न्यायाधीश येण्याच्या अगोदर पांच मिनिटें मीं कोर्टांत अगदीं ठेवल्यासारखा हजर असतों. अकरापासून तों साडेतीन वाजेपर्यंत एका क्षणाचीही फुरसत न घेतां सारखें काम करीत असतों. साडे तीन वाजतां घरीं परत येतों. येतां येतां वाटेंत क्याथलिक् असोसिएशनच्या ऑफिसांत डोकावतों. तेथें जाण्याला एक दिवसदेखील चुकत नाहीं. तेथें गेल्यावर पत्रें वगैरे काय आलीं असतील तीं वाचतों, त्यांचीं उत्तरें काय लिहावयाचीं त्यांचा इत्यर्थ एक दोन ओळींत माझ्या सेक्रेटरीला सांगतों. नंतर तो माझ्या सांगण्याप्रमाणें सबंध पत्र लिहावयाचें तें लिहितो. घरीं आल्यावर चार वाजतां जेवतों. साडे सहा वाजे पर्यंत घरांतल्या मंडळीबरोबर गप्पा वगैरे मारीत बसतों. नंतर मग अभ्यासाच्या खोलींत जातों. पावणेदहा वाजतां निजावयाला जातों. दहा वाजावयाला उशीवर डोकें ठेऊन स्वस्थ घोरत पडलेला मीं तुह्मांला दिसेन'

पार्लमेंटमध्यें जेव्हां त्याचा प्रवेश झाला, तेव्हां ब्यारिस्टरीचा धंदा सोडून देणें त्याला भाग पडलें व तेव्हांपासून तो जरा ढिलाईनें वागूं लागला. सकाळचें जेवण जें साडेआठ वाजतां होत होतें, तें जरा पुढें सरकलें व दहा वाजतां होऊं लागलें. डरीनेन येथील सृष्टीचा देखावा 'सर्व जगांत अति उत्तम व अति उज्ज्वल' असें तो नेहमीं ह्मणत असे. आयुष्याचें खरें सुख जर त्याला कोठें मिळत होतें, तर तें डरीनेन येथें

मिळत होतें. त्यानें आपले बाळपणचे दिवस तेथें जसे आनंदांत घाल-विले, तसेच पुढें कालवशात् ' वृद्धो याति गृहीत्वा दंडम् ' अशी अवस्था प्राप्त झाल्यावर वृद्धापकाळचे दिवसही त्यानें तेथेंच आनंदांत घालविले. प्रत्येक आयरिश् गृहस्थाचा स्वभाव जर आपण पाहिला, तर त्यांत उदा-सीनतेची थोडीबहुत झांक आपल्या दृष्टीस पडावयाचीच असा साधारण नियम आहे. त्या नियमास अनुसरून ओकोनेल्च्या स्वभावांतदेखील हा उदासीनपणा दिसून येत होता. तो नाहींसा करण्याकरितां आटलां-टिक महासागराच्या किनाऱ्यावर फिरणें व केरीच्या पर्वतावर हवा खाण्याकरितां जाणें हीं दोन उत्तम औषधें होतीं व ओकोनेल् नेहमीं त्यांचा उपयोग करून घेत होता. त्यापासून त्याच्या मनाला बरीचशी हुषारी वाटून त्याच्या कल्पनाशक्तीलाही बराच व्यायाम मिळे. कोर्टा-तील दगदगीचीं कामें करण्यांत त्याला आपला बराच वेळ घालवावा लागत होता. यामुळें या त्रासांतून मोकळा होऊन सृष्टिसौंदर्य पाहण्या-पासून होणाऱ्या आनंदाचा आस्वाद आपण केव्हां घेऊं असें त्याला नेहमीं वाटत होतें. केरीच्या रानांत जाऊन सशाची शिकार करण्याचा त्याला फारच नाद होता. सशाची शिकार करण्याच्या कामांत ओकोनेल् व त्याच्या बरोबरीचे दुसरे शिकारी यांची सर्व आयर्लंडांत फार प्रसिद्धि होती. हा त्याचा शिकार करण्याचा नाद म्हातारपणींसुद्धां सुटला नाहीं.

डरीनेन येथें ज्यावेळेस तो विश्रांति घेण्याकरितां जात होता, त्यावेळेस त्याच्या घरीं पाहुण्याची अतिशय गर्दी होत होती. आपल्या येथें चार मंडळी यावींत, त्यांचें आपण योग्य रीतीनें आदरातिथ्य करावें, अशी त्याला मनापासून फार हौस होती. त्याच्या त्या मोकळ्या आणि उदात्त स्वभावाचा खरा विकास डरीनेन येथें मोठ्या आनंदानें अतिथींचा आदर करण्यांत झालेला दिसून येत होता, असें मि० ग्लॅडस्टन यांचें

---

१ Nineteenth Century, 1889 P. 165. या भागांत मि- ग्लडस्टन यांच्या लेखांतील जे जे उतारे दिले आहेत ते ते वरील मासिक पुस्तकां-तूनच दिलेले आहेत. या करतां दर खेपेला या मासिक पुस्तकाच्या नांवाचा उल्लेख न करतां फक्त पानांचाच निर्देश केला आहे.

ह्मणणें आहे. त्याच्या घरच्या मंडळीचीच संख्या अगोदर जास्त होती. चुलते व चुलत्या मिळून एकंदर एकवीस माणसें, त्याशिवाय लग्न झालेल्या सात बहिणी, अशीं तीस चाळीस माणसें त्याच्या घरचींच होतीं. घरचाच विस्तार जरी इतका मोठा होता, तरी त्यानें पाहुण्यांची बरदास्त राखण्यांत केव्हांही कसूर केली नाहीं. या त्याच्या गुणाची चोंहोकडे बरीच प्रसिद्धि असल्यामुळें ‘ बा तुझा चालता काळ, खायाला मिळती सकळ ’ या न्यायानें नाहीं नाहीं तेथील मंडळी, कांहीं तरी निमित्त काढून, त्याच्याकडे येत होती. डब्लिन येथें सरासरी चाळीस वर्षें त्याचें राहणें पडलें. तेथें असतांना त्याच्या राहण्याची पद्धति त्याच्या लौकिकाला साजेल अशीच होती. ब्यारिस्टरच्या धंद्यांत प्रवेश केल्यानंतर त्यानें आपल्याकरितां एक चांगली गाडी ठेविली. त्याची ती हिरवी गाडी व हिरवाच पोषाख केलेले कोचमन् वगैरे गाडीवर असणारे नोकर लोक, रस्त्यांतून जाऊं लागले ह्मणजे लोकांना मोठी गम्मत वाटत होती. त्याची प्राप्ति ज्या मानानें जास्त होती, त्याच मानानें त्याचा खर्चही जास्त होता. डब्लिन येथें त्याचें राहण्याचें एक घर असून, शिवाय पार्लमेंटमध्यें वरचेवर जावें लागे यामुळें लंडन येथेंही त्यानें एक घर घेतलें होतें. विलायतेंत दोन घरें घेणें आपल्या इकडच्याप्रमाणें सोपें नाहीं. तेथें घरांना किती किंमती पडतात याची आपल्या इकडील साधारण लोकांना कल्पना करतां येणेंदेखील फार कठीण आहे. घरें विकत घेण्याचा हा खर्च, शिवाय निरनिराळ्या सभा, पार्लमेंटांमधील निवडणुकी, मुलांचें शिक्षण, व पार्लमेंटमध्यें त्याचा शिरकाव, या कामांत त्याचा अतोनात पैसा खर्च होत होता. शिवाय खर्च करण्याच्या कामांत जितका व्यवस्थितपणा राखावा, तितका तो राखीत नसे, यामुळें त्याची नेहमीं ओढाताण होत होती. ब्यारिस्टरीच्या धंद्यापासून त्याला जें उत्पन्न झालें, त्यांत त्याच्या बापाकडून आलेल्या पैशाची आणखी जास्त भर पडली होती. त्याचा चुलता मॉरिस १८२५ त मरण पावला. त्याला बायको किंवा मूलबाळ वगैरे कोणी नव्हतें. यामुळें डरीनेन येथें असलेली त्याची सर्व मिळकत ओकोनेलला मिळाली. दुसऱ्या एका

चुलत्याची मिळकतही त्याला अशीच मिळाली; परंतु इतकी जरी संपत्ति त्याच्यापाशीं होती, तरी मरावयाच्या वेळेस त्याच्याजवळ फारशी माया उरली नाहीं. त्याच्या पश्चात् त्याच्या कुटुंबाचा जेमतेम निर्वाह चालेल, इतकीच काय ती पुंजी त्याच्यापाशीं शिल्लक होती. पैशाच्या कामांत त्यानें जें वर्तन होतें, त्याबद्दल लोक त्याच्यावर कडक टीका करीत असत. नुस्ती टीका करूनच ते राहत होते असें नाहीं, तर त्याच्यावर त्यांचा आणखी असाही आक्षेप होता कीं, 'क्याथलिक असोसिएशन' व 'रिपील असोसिएशन' या दोन संस्थांकरितां, लोकांकडून जी वर्गणी त्याजकडे येत होती, तिचा त्यानें नीट हिशेब ठेविला नाहीं व खर्चही फार उधळेपणानें केला. जमा झालेल्या रकमांपैकीं कांहीं रकमांचा त्यानें अपहार केला असावा, असादेखील घाणेरडा आरोप कित्येकांनीं त्याच्यावर आणिला; परंतु हे सर्व आरोप अगदीं निराधार व खोटसाळपणाचे होते. थोडासा विचार केला असतां आपल्याला असें दिसून येईल कीं, अनेक वर्षं त्याचें सरकारांत इतकें वजन होतें कीं, त्यांच्यापाशीं त्यानें नुसता एक शब्द जर खर्च केला असतां, तर वाटेल तेवढ्या मोठ्या व मानाच्या नोकऱ्या सरकारानें त्याच्या मुलांना किंवा भावांना किंवा त्याच्या आप्तांपैकीं दुसऱ्या कोणालाही, मोठ्या आनंदानें दिल्या असत्या. पण त्यानें त्याबद्दल सरकाराजवळ एक चकारशब्द देखील काढला नाहीं. त्याच्या एका मुलाला व जावयाला सरकारी जागा मिळाल्या होत्या, पण त्यादेखील त्याच्या सांगण्यावरून मिळाल्या नव्हत्याच. या गोष्टी येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं; जो मनुष्य अधिकार व संपत्ति मिळविण्याच्या कामांत इतका निरिच्छ होता, तो सार्वजनिक पैशासंबंधानें कांहीं घोंटाळा करील अशी नुस्ती शंका काढणेंदेखील विशेष धाडसाचें व अविचाराचें होईल. लोकांनीं त्याच्यावर आणिलेला आरोप जर खरा असता, तर ग्लॅडस्टनसारख्या चवकस मुत्सद्यानें त्याच्यासंबंधानें पुढील उद्गार काढले नसते हें अगदीं अगदीं खचित आहे. मि० ग्लॅडस्टन[1] ह्मणतात 'पैशाला तुच्छ

1. Nineteenth Century 1889, Page 165.

मानणारा याच्यासारखा दुसरा मनुष्यच झाला नाहीं. पैसा त्याचा गुलाम होता. तो पैशाचा नव्हता.

प्रथम फ्रान्समधून जेव्हां तो परत आला, तेव्हां नास्तिकपणाचें थोडेंसें वारें त्याच्या आंगांत शिरलें होतें, पण तें फार वेळ टिकलें नाहीं. आपल्या धर्मावर पुनः त्याची श्रद्धा बसली, व मरेपर्यंत ती तशीच कायम होती. लंडन किंवा डब्लिन येथें असतांना त्याची नेहमींची अशी वहिवाट होती कीं, कामाचा लकडा मागें कितीही असो, निजावयाला उशीर कितीही होवो, सकाळीं लवकर उठून, शेजारीं असणाऱ्या जवळच्याच एखाद्या देवळांत जाऊन उपासना करावयाची. डरीनेन येथें तो असला ह्मणजे त्याच्या घरच्या उपाध्यायानें बरोबर नऊ वाजतां रोज प्रार्थना करावयाची असा त्याचा संप्रदाय होता. त्याच्या वयाला चौसष्ठ वर्षें लोटल्यानंतर पूर्वींचा उत्साह जरी त्याच्या अंगांत कायम होता, तरी एखाद्या दूर ठिकाणीं जाऊन बाकी राहिलेले आयुष्याचे दिवस ईश्वरभजनांत घालवावे असा त्याचा विचार होता. मनांत योजलेले बेत सिद्धीस न गेल्यामुळें, झालेल्या मनाच्या निराशेपासून सदरहू विचार त्याच्या मनांत कदाचित् उद्भवला असेल असें कित्येकांना वाटेल, परंतु त्याचें मुख्य कारण त्याचे त्यानेंच पुढील वाक्यांत दिलें आहे. तो ह्मणतोः— "दुसऱ्या कशाकरतांही नाहीं तर केवळ परमेश्वराच्या अनंत स्वरूपाचा विचार करण्याकरितां मला एकान्त पाहिजे आहे"

त्याच्या एकंदर शरीराची ठेवण हृदयंगम अशी होती. सहा फुटाला अर्धा इंच कमी इतकी त्याची उंची होती. परंतु खांद्याजवळचा त्याचा शरीराचा भाग वाटोळा होता, ह्मणून त्याची ती उंची पाहणाराच्या लक्षांत एकदम येत नव्हती. त्याचें शरीर रुंद असून बळकट होतें. त्याचें चालणें जलद होतें, रेंगाळत रेंगाळत असें त्याचें पाऊल कधींच पडत नव्हतें. तो ठरीव हिरवा कोट अंगात चढवून, डोक्याला ती आयरिश तऱ्हेची टोपी घालून, स्वारी एकदां घराच्या

बाहेर पडली म्हणजे मागेंपुढें न बघतां तडाक्यानें झपाझप चालूं लागावयाची. आणि तो तसा रस्त्यानें चालूं लागला म्हणजे रस्त्यावरील सर्व लोकांचे डोळे एकसारखे त्याच्याकडे लागावयाचे. त्याच्या तोंडाचा खालचा भाग फारच सुंदर होता. पण त्याचें नाक जरा आंखूड होतें, यामुळें त्याच्या चेहऱ्याचा वरचा भाग बराच बेडौल दिसत होता. ऐन तारुण्याच्या भरांत असतांना त्याचें शरीर गाजरासारखें लाल होतें व डोळे निळे असून पाणीदार होते. तो शांत असतांना आतां सांगितल्याप्रमाणें त्याचा चेहरा दिसत होता. पण एकदां कां तो रागावला किंवा क्षुब्ध झाला म्हणजे त्याच्याकडे कोणाचीही पाहण्याची छाति नव्हती. विनोद, करुणा, तिरस्कार, क्रोध, आशा, निराशा वगैरे मनोविकार हुबेहुब चेहऱ्यावर उठवून दाखविणें हें काम त्याचें अगदीं हातचें होतें. आपली तसबीर काढून घेणें त्याला मनापासून आवडत नव्हतें. असें जरी होतें तरी त्याच्या बऱ्याच तसबिरी हल्लीं उपलब्ध आहेत. व त्यांपैकीं एकीच्या आधारानेंच आह्मी पुस्तकाच्या आरंभीं त्याचें चित्र जोडलें आहे. ओकोनेल्सारख्या आनंदी व उल्हास वृत्तीच्या मनुष्याच्या अंगांत एक प्रकारची विषयासक्तता नेहमीं दृग्गोचर होते. या नियमाला अनुसरून आमच्या चरित्रनायकाच्या हातूनदेखील विषयवासनेच्या पाशांत गुंतून पापाचरण झाल्याचें एक उदाहरण आहे. लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो एका तरुण स्त्रीच्या प्रेमपाशांत सांपडला. तिच्यापासून त्याला १८२० सालीं एक मुलगा झाला. मूल झाल्यानंतर त्या हतभागी स्त्रीवरचें त्याचें मन उडालें. पुढें त्यानें तिच्याकडे, किंवा तिच्या त्या अनाथ अर्भकाकडे, ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. त्याची वर्तणूक फार सुशील, गोड व फार मर्यादेची अशी होती. लहान मुलांची त्याला फार हौस होती व तो त्यांच्याशीं इतरांपेक्षा विशेष ममतेनें वागत होता. सार्वजनिक कामांत त्याची उलट बाजू घेऊन जे भांडावयाला उठत, त्यांच्यावर तो लागेल तितके तीक्ष्ण वाग्प्रहार करीत होता. परंतु खासगी कामांत ज्यांच्याशीं त्याचा

वांकुडपणा आला असेल, त्यांच्याशीं तो कठोरपणानें कधींही वागला नाहीं, किंवा त्यांचें नुकसान करण्याकरितांही तो केव्हांच प्रवृत्त झाला नाहीं. उलट त्यांचें कल्याण करावयाची संधि आली असतां, ती मात्र तो कधींही वाया जाऊं देत नव्हता.

ओकोनेल् मोठा झाल्यापासून तों अगदीं म्हातारा होईपर्यंत कामांत नेहमीं चूर होता; यामुळें वाचनाकडे वगैरे लक्ष द्यावयाला त्याला मुळींच फावत नव्हतें. विद्वत्ता अशी त्याच्या अंगांत फार थोडी होती, व कायद्यांचें ज्ञानदेखील धंद्याला जेवढें अवश्य लागणारें तेवढेंच होतें. परंतु आपल्याला जेवढें कांहीं येत आहे, तेवढ्याचा उत्तम उपयोग कसा करावा हें तो फार चांगलें जाणत होता, म्हणून ही त्याची उणीव फारशी कोठें दिसून येत नव्हती. सर्व ग्रंथकारांत डिकन्सवर[१] त्याची फार भक्ति होती, म्हणून त्यानें लिहिलेल्या कादंबऱ्या तो मोठ्या उत्सुकतेनें वाचीत असे. डिकन्सच्या पुस्तकांशिवाय दुसऱ्या पुस्तकांना फार करून तो शिवलाच नाहीं. त्याच्या भाषणांत उदाहरणें किंवा इतर ग्रंथकारांचे आधार फारच क्वचित् असत. इतका कमी विद्येचा व्यासंग असणाऱ्या मनुष्याच्या हातून ग्रंथ वगैरे लिहिणें कितीसें होणार हें दिसतेंच आहे! सार्वजनिक विषयांवर निरनिराळ्या वेळीं आपल्या मित्रांना लिहिलेलीं पत्रें एवढेच कायते त्याच्या हातचे लेख हल्लीं उपलब्ध आहेत. त्या सर्व पत्रांत अर्ल ऑफ् श्रूस्बरीला १८४२ सालीं लिहिलेलें पत्र फार प्रसिद्ध आहे. सन १८३६ सालीं डा० वाइझमनबरोबर 'डब्लिन रिव्ह्यु' नामक पत्राचा तो सहप्रकाशक झाला होता; पण त्या पत्रांत त्यानें कांहीं लेख लिहिले किंवा नाहीं याची शंकाच आहे. फ्रेंच वाङ्मयाचें त्याचें ज्ञान बेताचेंच होतें;

---

१. डिकन्स चार्ल्स (१८१२–१८७०) व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींत जे प्रसिद्ध कादंबरीकार झाले, त्यांत हा एक श्रेष्ठ प्रतीचा कादंबरीकार होता. यानें लिहिलेले 'Pick wick papers,' 'David Copperfield' 'Vanity Fair' -वगैरे ग्रंथ प्रसिद्ध असून लोकमान्य झालेले आहेत.

पण ती भाषा मात्र तो जलद बोलत होता. असा जरी प्रकार होता, तरी इंग्लिश भाषा त्याच्यापुढें जशी अगदीं हात जोडून तयार होती, तशी फ्रेंच भाषा नव्हती हें कबूल केलें पाहिजे.

विद्वत्तेचा हा प्रकार झाला, पण बोलण्याच्या कामांत त्याचा हात धरणारे फारच थोडे लोक सांपडतील. तो एकदां बोलावयाला लागला ह्मणजे त्याच्या भाषणाचा प्रवाह अप्रतिहत रीतीनें चालत असे. खटल्याचें काम चालवीत असतां, केवळ लोकांना आपली वक्तृत्वशक्ति दाखविण्याकरितां ह्मणून तो आपली जीभ वाटेल तशी केव्हांही मोकळी सोडीत नव्हता. शेक्सपीयरचें नाटक कालेजांत शिकवीत असतांना डेक्कन कालेजचे माजी प्रिन्सिपल ऑक्सनह्याम जसा अभिनय करून दाखवीत असत, तसा ओकोनेल् खटला चालवीत असतांना क्षणोक्षणीं नटाप्रमाणें अभिनय करून दाखवीत होता. आपल्या मनांतील काळजी छपविण्याकरितां निष्काळजीपणाचा बहाणा करण्याची, गळ्यांत येण्याजोगी जेथें बाजू असेल तेथें राग आणण्याची, जेथें साक्षिदाराला खड्यांत पाडावयाचें असेल तेथें वेड्याचें सोंग घेण्याची, जुरींतील लोकांच्या मनांत कळवळा उत्पन्न करण्याच्या वेळेस दुःखाचा आवेग आणण्याची, त्याला फार चांगली युक्ति साधली होती. आपल्यां आशिलाचें तिकडे कांहींही होवो, त्याच्याकडे लक्ष न देतां प्रेक्षकजनांना खूष करण्याच्या[1] हेतूनेंच चटकदार भाषण करण्याची बऱ्याच ब्यारिस्टरांना व वकिलांना संवय असते. पण ओकोनेल्ला असें करण्याचा अगदीं मनापासून कंटाळा होता. तो नेहमीं असें ह्मणत असे कीं, "अहो! उत्कृष्ट भाषण करणें हें चांगलें खरें, पण जूरीचा अभिप्राय जर उलट पडला तर त्याचा काय उपयोग! जूरीच्या अभिप्रायांत काय तें खरें महत्व आहे. नुस्तें चटकदार भाषण करण्यांत नाहीं." वक्तृत्त्वाचें खरें रहस्य त्याला ठाऊक

1. C. F. Sir Charles Rusell ( Said an interviewer ) is of opinion that mere eloquence is of less importance than is commonly supposed. There are cases in which eloquent advocacy has its

होतें, यामुळें कोणचाही विषय असो, सभेमध्यें शिकलेले लोक असोत किंवा अडाणी असोत, त्यांच्या मनावर त्यानें आपली छाप बसविली नाहीं असें कधींच झालें नाहीं. अव्वलकोर्टांत, अपील कोर्टांत, मोठ्या लोकसमुदायापुढें एखाद्या सभेंत, किंवा कॉमन्स सभेंत, स्थलाला व कालाला अनुरूप असें आपलें कर्तव्य बजावण्याच्या कामीं तो फार दक्ष होता. ज्या ज्या वेळीं आयर्लंडांतील मोठमोठ्या ब्यारिस्टरांना एखाद्या खटल्यांत हात टेकण्याचा प्रसंग येई, त्या त्या वेळीं ओकोनेल हा कांहीं तरी एक नवीनच कायद्याचा मुद्दा काढून मोठें मुद्देसूद असें भाषण करी. प्राकृत जनसमूहापुढें प्राकृत लोकांच्या पुढाऱ्याप्रमाणेंच त्याची वर्तणूक फार धाडसाची, थोडी थट्टेची व विकारप्रेरित अशी होती; कॉमन्स सभेंत गेल्यावर प्राकृतजननायकाचें हें सोंग उतरून ठेवून, तो मोठ्या गंभीर आणि शांतपणानें भाषण करीत होता; मात्र आपल्या शत्रूवर तीक्ष्ण असा वाक्प्रहार करण्याच्या प्रसंग आला म्हणजे मग हा गंभीरपणा व शांतपणा एखादे वेळेस बाजूला रहात होता. क्याथलिक अथवा रिपील असोसिएशन ह्या सभांचें काम फार किचकट व जिकिरीचें होतें. पण ओकोनेल् त्याचा तेव्हांच फडशा पाडून टाकीत होता. त्याची काम करण्याची पद्धति अगदीं सरळ होती. ठरीव विषयावरच तेवढी ओकोनेल्चीं भाषणें चांगलीं होत होतीं असें नाहीं. तर जेवण झाल्यावर त्या देशांतील संप्रदायाप्रमाणें एखाद्या विषयावर जें लहानसें भाषण करावयाचें असतें, त्या भाषणांतदेखील तो

---

मागील पृष्ठावरून.

value, but he is inclined to think the importance and the power of it are very much over-rated. It is a mistake, in his judgment, to suppose that juries are very easily dazzled by oratorial fire-works . ... ... They don't want oratorial flourishing; they want facts put before them in a clear telling forcible way; and the power of thus putting facts, Sir Charles believes, is of much greater importance than the ability to make a fine speech—Review of Reviews. Sept. 15, 1900 Page 230.

फार रंग भरवून देत होता.[1] तो आपलीं भाषणें प्रथम घरीं कधींही तयार करीत नव्हता. यामुळें त्याच्या भाषेंत असंस्कृतपणाचा भाग फार येत होता. परंतु हाच असंस्कृतपणा श्रोत्यांच्या मनावर ठसा उमटविण्याचें कामीं किंवा भाषणाला जरा तिखटपणा आणण्याचें कामीं फार उपयोगी पडत होता. घरीं तयार केलेल्या भाषणांत भाषेचें सौष्ठव वगैरे गुण येऊं शकतील. परंतु सभेंतल्या सभेंत लोकांच्या मनोवृत्ती लक्षांत घेऊन त्याप्रमाणें आपल्या भाषेला वळण देऊन केलेलें भाषण श्रोत्यांच्या मनावर जसें ठसतें, तसें अगोदर तयार केलेलें ठसत नाहीं, असा मोठमोठ्या वक्त्यांचा अनुभव आहे. एक ग्रंथकार ओकोनेलच्या भाषणासंबंधानें असें ह्मणतो:—' तो नेहमीं तयारी केल्याशिवाय बोलत असे. यामुळें अशा रीतीनें केलेल्या भाषणांत जो दोष नेहमीं दिसून येतो, तो याच्याही भाषणांत दिसून येत होता. पुनरुक्ति व निष्काळजीपणाची वाक्यरचना या दोहोंची उदाहरणें त्याच्या भाषणांत पुष्कळ भरलेली आहेत; केव्हां केव्हां तो बोलतांना इतका वहावत होता कीं, अतिशयोक्ति आणि दर्पोक्ति यांची अगदीं रेलचेल करून सोडित होता. परंतु पूर्व तयारी केल्याशिवाय भाषण

---

1. C. F. 'A politician must often talk and act before he has thought and read. He may be very ill-informed respecting a question: all his notions about it may be vague and inaccurate: but speak he must; and if he is a man of ability, of tact, and of intrepidity, he soon finds that, even under such circumstances, it is possible to speak successfully. He finds that there is a great difference between the effect of written words, which are perused and reperused in the sickness of the closet, and the effect of spoken words which set off by the graces of utterance and gesture, vibrate for a single moment on the ear. He finds that he may blunder without much chance of being detected, that he may reason sophistically, and escape unrefuted. He finds that, even on knotty questions of trade and legislation, he can, without reading ten pages or thinking ten minutes, draw forth loud plaudits and sit down with the credit of having made an excellent speech'.

Lord Macaulay on 'Gladstone on Church and State'.

करणाऱ्या वक्त्याला सभेंत जसें नेहमीं हाटकून यश येतें, तसें त्यालाही येत होतें. त्याचें भाषण ह्मणजे श्रोत्यांच्या अंतःकरणाला भिनणारें असें होत होतें. मोठ्या लोकसमुदायांत त्याचें भाषण होवो, किंवा पार्लमेंटमध्यें होवो, त्यानें बोलावें आणि सभासदांनीं पेंगावें, असा प्रकार कधींही झाला नाहीं. सभासदांचे कान त्याच्या तोंडचे शब्द झेलावयास अगदीं कसे तयार असत." ओकोनेल्च्या भाषणांत पुनरुक्तीचा दोष फार होता, व तो दोष घालविण्याबद्दल त्यानें फारशी कधीं काळजीही केली नाहीं. वास्तविक पाहिलें तर त्याची नेहमींचीच ही एक युक्ति होती कीं, एखादें वाक्य असें निवडून काढावयाचें कीं, तें ऐकून लोकांच्या मनावर कांहींना कांहीं परिणाम झालाच पाहिजे. आपण निवडून काढलेल्या वाक्यानें अडाणी लोकांच्या मनावर त्यापासून परिणाम होतो आहे, व तें वाक्य वरचेवर ऐकण्यांतच त्यांना विशेष प्रकारची मौज वाटते आहे असें एकदां त्याच्या लक्षांत आलें ह्मणजे तेंच तें वाक्य वेगवेगळ्या तऱ्हांनीं, व वेगवेगळ्या प्रसंगीं उपयोगांत आणावयाचें. असें करण्याचा उद्देश हा कीं, त्या वाक्यांत ग्रथित केलेला विचार लोकांच्या मनांत पुरता भिनावा. या पुनरुक्तीच्या संवयीनें त्याच्या भाषणाला केव्हां केव्हां फार विचित्र स्वरूप येत होतें. आपली आई, बायको, मुलें आणि नातवंडें यांचा आपल्या भाषणांत झटक्या-सरसा उल्लेख करण्याची त्याला फार आवड होती. सन १८३६ सालीं त्याची बायको मरण पावल्यानंतर एका सभेंत तिच्या संबंधानें आपल्या नेहमींच्या ठरावाप्रमाणें त्यानें उल्लेख केला. बायको मेल्या-नंतर त्याला अतिशय वाईट वाटलें असेल, वरचेवर तिची त्याला आठ-वण होत असेल, अशा स्थितींत भाषण करते वेळेस तिच्यासंबंधाचा मजकूर तोंडांतून निघून जाणें अगदीं संभवनीय आहे. पण हें कितीदां? फार झालें तर एकदां किंवा दोनदां. त्याच्या पलीकडे जातां कामा नये. परंतु ओकोनेल् याच गोष्टींचा उल्लेख अनेक वेळां करीत होता, आणि दर वेळेला त्याचीं तीं ठरीव वाक्यें येत होती. याप्रमाणें आपलें मन उघडें करणें, व त्यापासून आपल्याला फार दुःख होतें असें दाख-

विणें, ह्मणजे तें पहाणाराला व ऐकणाराला फारच चमत्कारिक वाटत होतें, परंतु तसें केल्यापासून आपलें इच्छित कार्य घडून येतें, असा अनुभवांतीं त्याचा सिद्धांत ठरलेला होता. आणि एकदां एक सिद्धांत ठरला ह्मणजे त्याच्या उलट ह्मणून केव्हांही जावयाचें नाहीं, असा त्याचा अगदीं निश्चय होता, व त्या निश्चयाला अनुसरून तो वर सांगितल्याप्रमाणें वागत होता. असो.

केवढीही मोठी सभा भरलेली असो, सर्व सभासद आपल्या अगदीं ताब्यांत ठेवण्याची त्याची जी शिताफी होती, ती फार आश्चर्यकारक होती. सन १८४३ सालीं ऐक्य नाहींसें करण्याचा उद्योग ज्यावेळेस सुरू होता, त्यावेळेस आपल्या अनुयायी मंडळीनीं सरकाराविरुद्ध कडक भाषा वापरूं नये, ह्मणून तो फार खबरदारी घेत होता; पण ही खबरदारी घेतांना लोकांचें मन दुखेल असेंही धोरण त्याला नेहमीं राखावें लागत होतें. एकदां अशी गोष्ट झाली कीं, सभेचें काम चालू असतां एकजण रागाच्या आवेशांत एकदम उभा राहिला, आणि मोठ्यानें ओरडून ह्मणाला. “ माझी अशी इच्छा आहे कीं, एखाद्या कावळ्यानें पीलचे डोळे टोंचटोंचून बाहेर काढावे. ” त्यावर ओकोनेल्‌नें लागलीच त्याला उत्तर दिलें—“ माझी अशी इच्छा आहे कीं, एखाद्या कावळ्यानें येऊन तुझें तें तोंड बटाट्यांनीं गच्च भरून काढावें. ” दुसऱ्या एका प्रसंगीं असें झालें कीं, भली मोठी एक सभा भरली होती, आणि तेथें जवळच एक घोडा बांधला होता. तो घोडा सुटला आणि मंडळींच्या गर्दीत शिरला, त्याबरोबर जिकडे तिकडे घोंटाळा उडून गेला. कित्येकांना असें वाटलें कीं, सभा मोडून टाकण्याकरितां सरकारी घोडेस्वार येऊन आपल्यावर हल्ला करीत आहेत. याप्रमाणें सर्वत्र घोंटाळा होऊन सर्व सभासद पळून जाण्याच्या बेतांत होते. इतक्यांत, इतका घोंटाळा होण्याचें खरें कारण काय होतें तें लक्षांत घेऊन ‘ सबूर ’ ह्मणून ओकोनेल् खूप मोठ्यानें ओरडला. त्यासरसे सर्व लोक जागच्या जागीं स्तब्ध बसले व सभेचें काम पूर्वीप्रमाणें सुरळीत रीतीनें सुरू झालें.

याप्रमाणें त्याची सभासदांवर किती छाप होती हें दाखविणारीं अनेक उदाहरणें आहेत. पण येथें त्यांपैकीं फक्त दोन दिलीं आहेत तेवढींच पुरेत. आणखी तीं जास्त देऊन ग्रंथविस्तार करण्यांत अर्थ नाहीं.

अलंकारशास्त्राचें पुस्तक घेऊन, त्यांतील नियमानुसार त्याच्या भाषणांचें परीक्षण करूं इच्छिणाऱ्या टीकाकाऱ्यांच्या मतानें तीं कितीही दोषास्पद ठरोत, किंवा पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेलीं त्याचीं तीं भाषणें वाचणाराला आतां कितीही अपुरीं व कंटाळवाणीं वाटोत, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं, त्यानें तीं भाषणें ज्यावेळेस केलीं त्यावेळेस श्रोत्यांच्या मनावर त्यांचा फारच उत्तम परिणाम होत होता. परमेश्वर-कृपेनें त्याचा आवाज फारच चांगला होता. फिम्याकार्थी आपल्या इतिहासांत असें लिहितात कीं, अलोट बुद्धि आणि अलौकिक वक्तृत्व या दोहोंच्या योगानें जें काम करतां आलें असतें तें ओकॉनेल् आपल्या आवाजाच्या जोरावर करून घेत होता. केवढाही मोठा समाज भरलेला असो, एका शब्दासरशीं तो सर्व सभा हालवून सोडीत होता. आपल्या सभासदांवर छाप बसवून सोडण्याची जादू त्याला फारच चांगली साधली होती. आपल्या लोकांचा स्वभाव तो पूर्णपणें ओळखीत होता, यामुळें त्यांच्या समोर उभें राहून व्याख्यान देणें, त्याच्या अगदीं आंगवळणीं पडलें होतें. तो त्यांना हंसावयाला लावून एकच दंगा करावयाला लावी, रड रडवून त्यांचे डोळे लाल करी, व रागानें त्यांच्या आंगाची लाही करून सोडी. सन १८३३ सालीं 'कोअरशन बिला'चें प्रथम वाचन झालें त्यावेळेस त्यानें कॉमन्स सभेंत जें भाषण केलें, तें त्याच्या अति उत्तम भाषणांपैकीं एक आहे; व त्यावरून यत्किंचित्‌ही अगोदर तयारी न करितां सर्व सभाजनांना हालवून सोडणारें भाषण करण्याच्या कामांत तो किती निपुण होता, हें चांगलें दिसून येतें. तें भाषण येणेंप्रमाणें:—

"सभासदांना मी आतां बराच कंटाळा आणला आहे. या विषयाचें जसें यथास्थित विवेचन व्हावें तसें माझ्या हातन झालेलें नाहीं. किंवा

या विषयाच्या संबंधानें माझ्या मनांत जी कळकळ आहे तीही मी यथास्थित रीतीनें आपल्याला व्यक्त करून दाखविली नाहीं. (आयर्लंडांतील) राजकीय चळवळी बंद केल्या पाहिजेत असें दाखविणारा पुरावा पुढें आला आहे असें मला वाटत नाहीं. जमिनीसंबंधानें होणाऱ्या बंडाळीलाही राजकीय चळवळ कारण आहे, असें सिद्ध करण्याकरितां एक तरी मनुष्य तयार आहे काय? मात्र त्यानें विकारवश न होतां, आपल्या मनोदेवतेला स्मरून, काय पुरावा द्यावयाचा तो दिला पाहिजे. याविषयाचा जर तुह्मीं लक्षपूर्वक विचार कराल तर याच्या अगदीं उलट गोष्टी धडधडीत तुमच्या नजरेस येणार नाहींत काय? आयर्लंड संकटावस्थेंत नाहीं काय? त्यांतील लोकांच्या अडचणी दूर न झाल्यामुळें ते दरिद्रावस्थेंत आपले दिवस कंठीत नाहींत काय? आयरिश लोकांची स्थिति सुधारण्याचे उपाय योजिले पाहिजेत, असें आरमाघ तर्फेचे उदार सरदार मोठ्यानें ओरडून सांगत आहेत, व तुह्मीही तसें करण्याबद्दल वचन देत आहां (व त्याप्रमाणें हें सभेपुढें सादर करतां आहां) आणि खरेंच हें बिल जर तुह्मी पास केलें तर धर्मसंस्थेची स्थिति सुधारण्याचा उपाय तुह्मीं योजून काढलात खराच! पण आमची धर्मसंस्था सुधारण्याच्या हेतूनें तुह्मीं जो उपाय शोधून काढला आहे तो दुसऱ्या सभेंत मान्य होईल अशी तुह्मांस खात्री आहे काय? चर्चेसेस (धर्मसंस्थेकरितां बसविलेला कर) बंद करण्यापलीकडे त्या बिलापासून दुसरा तादृश फायदा होणें शक्य नाहीं. पण तोच फायदा करून घेण्याकरितां माझ्या सन्माननीय मित्रांनीं सुचविलेल्या दुसऱ्या शहाणपणाच्या युक्तीकडे आपण कां लक्ष देत नाहीं? घटकाभर हें बिल बाजूला ठेऊन दुसरें बिल (कॅथॉलिक रिलीफ बिल) अगोदर हातांत कां घेत नाहीं? मी असें ह्मणतों यावरून तडजोडीचें कांहीं बोलणें मी लावतो आहें, असें कोणी समजूं नये. आयर्लंडची स्थिति सुधारणें अगदीं जरूर आहे असें मी ह्मणतों आणि ती स्थिति आपण सुधारणार कशी हें मी आपल्याला विचारतों. धर्मसंस्थेच्या भक्कम उत्पन्नापैकीं एक छदाम ही आपण गरीब लोकांच्या उपयोगाकरितां लावणार नाहीं! मग त्या इतक्या पैशाचें होणार काय?

आपल्या हातून त्यांना कांहीं प्राप्ति होणार नाहीं हें खास. आपली जर ही स्थिति तर माझ्या सारख्याच्या हातून त्यांना मदत ती काय होणार? मीं तें त्यांना काय देणार? मीं त्यांना देणार काय तो धीर. आणि तो धीर कशाचा? तर आपल्या देशाला आपलें स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचा. अशा तऱ्हेचा धीर देणें ह्मणजे वेडेपणाचें लक्षण आहे, असें आपल्यास वाटत असेल. पण आपल्याला तें तसें कां वाटतें हें आपण कसें दाखविणार? मी पुढें काय बोलणार आहें याचें अगोदरच धोरण बांधून आपण असें दाखविणार आहां काय कीं आह्मींच—ह्मणजे इंग्लंडांतील पार्लमेंट—आयर्लंडाचें करावें त्या रीतीनें रक्षण करीत आहों. आयरिश लोकांना मोठ्या ममतेनें व पोटच्या गोळ्याप्रमाणें वागवीत आहों. परंतु हाय हाय! वस्तुस्थिति तशी कोठें आहे? नुसत्या कृपादृष्टीनेंदेखील तुह्मीं त्यांच्याकडे पहात नाहीं! त्यांचें कल्याण करण्याची गोष्ट तर एकीकडेच राहो, पण त्यांना अगदीं पिळून काढणारीं संकटें त्यांच्यावर प्राप्त झालीं तरी तीं नुस्तीं टाळण्याचें देखील श्रेय तुह्माला घेववत नाहीं याला काय ह्मणावें? रयतेपासून चोपून जबर सारा घेणारे जमिनदार, आपल्या रयतेच्या सुखाची पर्वा न करितां आपलीं गांवें सोडून चैनीकरितां मोठमोठ्या शहरीं जाऊन राहतात, इकडें तुमचें लक्ष कधींही जात नाहीं. त्यांची विपत्ति तुह्मीं हरण करीत नाहीं, किंवा त्यांच्या अडचणीकडे ढुंकून पहात नाहीं. भाकरीच्या ऐवजीं तुह्मीं त्यांच्यापुढें धोंडा फेंकता व तुमच्या हातीं असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून नेहमीं त्यांच्यावर जुलूम करता! व विंचवाच्या नांग्या त्यांच्या अंगाला लावता! आणि हें सर्व कशाकरितां तर ह्मणे "आमच्यावर त्यांचें प्रेम जडण्याच्या अगोदर आमच्याविषयीं त्यांच्या मनांत दहशत उत्पन्न झाली पाहिजे." अध्यक्ष महाराज ती गोष्ट मला मुळींच कबूल नाहीं! पुराव्यानिशीं ती गोष्ट शाबीत झाली आहे हें मला कबूल नाहीं. राजकीय चळवळीमुळें जमिनीसंबंधाचे तंटे सुरू झाले आहेत हें ह्मणणें मला कबूल नाहीं. आयरिश लोकांना जखडून टाकणारा हा कायदा पास करण्याचा आह्माला हक्क

आहे, असें जें तुमचें ह्मणणें आहे तें मला कबूल नाहीं. चारचौघां समक्ष उघड रीतीनें, निदान अलीकडे ह्मणजे राजकीय चळवळी सुरू झाल्यापासून, साक्षिदार लोकांना आयरिश लोकांनीं मारहाण केल्याचें मला कबूल नाहीं. त्यांना प्रसंगविशेषीं जरी मारहाण झाली असली, तरी हल्लींच्या राजकीय चळवळीशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. ही चळवळ सुरू होण्याच्या पूर्वीं चाळीस वर्षांपासून हे जमिनीचे तंटे एकसारखे सुरू आहेत. याप्रमाणें हल्लींचा हा योजिलेला उपाय मुळींच अवश्य नाहीं, असें सिद्ध करून दाखविल्यानंतर, त्यांत सांगितल्याप्रमाणें ज्या मुत्सद्यांच्या हातांत मुळींच सत्ता नसावी असें मला वाटतें त्या मुत्सद्यांच्या हातांत जुलूम करण्याकरितां जास्त सत्ता द्यावी असें मी ह्मणेन तरी कसा? व त्या सत्तेचा ते दुरुपयोग करणार नाहींत, असा विश्वास तरी मला येईल कसा? त्यांतून हे मुत्सद्दी पडले फारच भयंकर! कारण आपला अधिकार बजावित असतां त्यांत व्यक्तिविषयक गोष्टी मध्येंच घुसडून देण्याची त्यांना फार संवय आहे. आयर्लंड देशाला तुमची ओळख कशामुळें झाली आहे ह्मणाल, तर पीडा, नाश आणि अपहार या साधनांनीं. आयर्लंडांत तुमच्या स्वाऱ्या कधींकाळीं गेल्याच तर त्या रागानें जळफळत जावयाच्या. आयर्लंड देश बेचिराख करण्याकरितां क्रॉमवेल्नें ऐंशी हजार हत्यारबंद लोक तिकडे पाठविले ते सर्व तेथेंच चचले. पण त्याचाच कित्ता आतां गिरवून सर्व देश तरवारीच्या धारेवर धरल्यामुळें तुह्मीं त्याला अगदीं भयाण करून सोडला आहेत; तह व करारनामे पार एकीकडे झुगारून देऊन विश्वासघातकीपणा पदरीं बांधून, निरनिराळ्या जुलमी कायद्याखालीं तुह्मीं त्या देशांतील लोकांना अगदीं चुरडून टाकलें आहे. वेळोवेळ तुह्मी त्यांना जीं वचनें देत गेला, तीं वचनें पुरी करण्याच्या कामीं तुह्मीं अगदीं बेफिकीर आहां. या सर्व गोष्टी नीट स्मरणांत आणा आणि मग आयर्लंडाला संतुष्ट राखून इंग्लंडबरोबर त्याचा झालेला संबंध तसाच कायम राखण्याच्या कामांत तुह्मांला कितपत यश येईल, याचा तुह्मीं आपल्या मनाशींच विचार करा. क्याथलिक लोकांना तुह्मीं बंधना-

पासून मुक्त केलें आहे, हें खरें; पण तें केव्हां तर. आह्मीं मुक्त करूं, असें तुह्मीं त्यांना वचन दिल्यानंतर, तिसाला एक कमी इतक्या वर्षांनीं, आयर्लंडचे पार्लमेंट जर अस्तित्वांत असतें, तर तुह्मीं आमची मुक्तता केली त्याच्या अगोदर पंचवीस वर्षें आह्मीं ती हटकून करून घेतली असती. अजूनदेखील हाल आणि विपत्ति यांच्या व्यतिरिक्त तुमची आमची ओळख नाहीं, आणि त्यांतून आतां मोठ्या मायेनें आह्माला या आक्टाचा प्रसाद देत आहां. तो आक्ट कसा आहे ह्मणाल, तर जूरीच्या मदतीनें न्याय करण्याची पद्धत मोडून टाकून, व जिकडे तिकडे लष्करी कोर्टें स्थापन करून, व्यक्तिस्वातंत्र्याचा मागमूस पार नाहींसा करणारा असा आहे. असा कायदा पास झाला ह्मणजे आपण निरपराधी आहों हें सिद्ध करून दाखविण्याचा बोजा आरोपीवर पडत नाहीं काय? यापेक्षां व्यक्तिस्वातंत्र्यावर आणखी दुसरी गदा ती कोणती पाहिजे? हा कायदा पास झाल्यानें ऐक्य नाहींसें करण्याची जी चळवळ सुरू आहे ती बंद पडेल असें तुह्मीं आह्मांला सांगाल. पण त्याला उलट मी असें सांगतों कीं, तुह्मीं आमच्याशीं न्यायाचें वर्तन ठेवल्याशिवाय ती खटपट बंद पाडण्याचा तुमचा हेतु कधीं ही सिद्धीस जाणार नाहीं. हल्लींच्या पिढींतील माणसें मरून जातील. फ्रेंच मुत्सद्दी राब्सपियर[१] याच्या थाटावर सुरू केलेल्या या तुमच्या घोर उपायांनीं हल्लींचीं माणसें मृत्यु-मुखीं पडतील. हें सर्व होईल. परंतु रागानें खवळून गेलेला आयर्लंडाचा आत्मा अविनाशी आहे तो कधींही मरणार नाहीं. अशी एक वेळ पूर्वीं आली होती कीं, त्या वेळेस आयर्लंड देशावर आशेचे किरण पडूं लागले होते. ती कोणची तर हल्लींचें हें पार्लमेंट पहिल्या-नेंच ज्या वेळेस भरलें ती. ही सभा सुधारणेच्या तत्वावर भरलेली आह्मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिली होती. येथें जमलेल्या सभासदां

---

१ रॉब्सपियर. हा फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळीं लोकनायक होता. त्यावेळीं अनेक राजकीय फळ्या झाल्या. जेव्हां जी सत्ताधीश होई ती इतरांचा छळ करी.

पैकीं प्रत्येक सभासदाला ,आपण जें करूं ते आपल्या मतदार लोकांना रुजू झालें पाहिजे अशी काळजी असते हें आह्माला माहित होतें; तुह्मीं जे जे ठराव पास कराल त्यावर लोकमताचें वजन पडल्याशिवाय राहणार नाहीं; फार काय, त्या कामांत लोकांची आज्ञा तुह्मी शिरसा मान्य कराल हे आह्माला माहित होतें. तुह्मी आमच्या अडचणी दूर कराल अशी आशा आह्मी धरून होतों; पण तें सर्व व्यर्थ झालें. तुह्मी आतां पीडा देणारा असा कायदा आमच्या करतां निवडून काढला आहे '

अशाच प्रकारचें सभासदानां अगदीं हालवून सोडणारें असें एक त्याचें भाषण ' धर्मसंस्थेकरितां घेणाऱ्या दशम विभागा ' संबंधानें वाद चालू असतां एकदां झालें होतें. दशम भाग घेण्याच्या कामांत होणारा जुलूम सहन न झाल्यामुळें जे अतोनात दंगे झाले, त्यापैकीं एका दंग्यांत घडून आलेल्या हृदयद्रावक हकीकतीसंबंधानें त्यावेळेस तो बोलत होता. ती हकीगत अशी होती कीं, एक ह्मातारा आंधळा मनुष्य आपल्या लहान मुलीला बरोबर घेऊन दंग्याच्या जागेवर आला होता. इतक्यांत दंगा थांबविण्याकरितां आलेल्या पोलिस शिपायांपैकीं एकाची गोळी दंगा चालला होता त्या जागेच्या बरीच पलीकडे गेली व त्या मुलीला लागली. त्यासरशीं ती बिचारी मुलगी मरून खालीं पडली. तिच्या शरीरांतील रक्त जेव्हां त्या ह्माताऱ्याच्या अंगावर उडालें, तेव्हां आपल्या मुलीची काय अवस्था झाली हें त्या दुर्दैवी ह्माताऱ्याला कळून आलें. ओकोनेल् ज्या वेळेस ही हकीगत आपल्या भाषणांत सांगत होता, त्यावेळेस बातमीदारांकरितां राखून ठेविलेल्या ग्यालरीमध्यें चार्लस डिकन्स बसला होता, व ओकोनेल्चें भाषण टिपून घेत होता. वक्त्यांचीं भाषणें चालू असतां तीं टिपून घेण्याच्या कामांत डिकन्स फारच पटाईत होता. परंतु ओकोनेल्च्या तोंडचें हें वर्णन ऐकून त्याच्या मनाल इतका कांहीं द्रव आला कीं, त्यानें आपल्या हातांतील पेन्सिल एकीकडे फेकून दिली आणि स्वस्थ बसला. लिहिण्याचें काम त्याच्या हातून

होईनासें झालें. प्रसिद्ध ग्रंथकार लॉर्ड लिटन[२] यानें 'सेंट स्टिफन्स' नांवाच्या कवितेंत ओकोनेल्च्या वक्तृत्वशक्तीचें फार मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे, सबब तें आमच्या वाचकांनीं वाचावें अशी आह्मीं त्यास शिफारस करितों.

एकोणिसाव्या शतकांतील प्रसिद्ध वक्ते मि० ग्लॅडस्टन यांनीं देखील ओकोनेल्च्या अलौकिक वक्तृत्वशक्तीसंबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें उद्गार काढले आहेत:— "न्यायसभा, प्राकृत जनसभा, व मंत्रिसभा या तिन्ही ठिकाणीं लागणारें निरनिराळ्या प्रकारचें वक्तृत्व ओकोनेल्ला फारच उत्तम साधलें होतें. तें इतकें कीं, या कामांत सरासरीच्या मानानें पाहूं गेलें तरी, त्याच्या इतकें प्रावीण्य संपादन लेलेला दुसरा एखादा मनुष्य शोधून काढणें फारच कठीण आहे. पार्लमेंटामधील वक्ता या नात्यानें त्याचा विचार करते वेळेस, कॉमन्स सभेमधील त्याच्या समकालीन वक्त्यांबरोबर त्याची जो तुलना करील, तो त्याला दुसऱ्या वर्गांत तर खचित ओढणार नाहीं; परंतु पहिल्या वर्गांतच त्याचें नेमकें स्थान कोणचें हें ठरविणें त्याला कठिण जाण्याचा संभव आहे. पूर्वी कांहीं एक विचार न करितां उसळीसरसें समयाला अनुरूप असें भाषण करते वेळेस त्याच्या आंगचें खरें सामर्थ्य आपल्याला दिसून येतें. तेंच त्याचें सामर्थ्य ज्यांत विशेष घोंटाळा आहे अशा एखाद्या विषयाचें लांबलचक असें तो प्रतिपादन करूं लागला ह्मणजे, अगदीं लोपून जात होतें. ब्यारिस्टरच्या कामांत त्याच्याहून श्रेष्ठ असा एकतरी मनुष्य या साऱ्या शतकांत उत्पन्न झाला आहे काय? असा जर मीं प्रश्न केला, तर त्यांत कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं असें मीं ह्मणतों. पार्लमेंटांत भाषण करण्याच्या कामांत व साधारणपणें वक्त्याचे सर्व गुण अंगीं असण्यांत लार्ड ब्रूगह्यामचा नंबर ओकोनेल्च्या

---

1. McCarthy's Epoch of Reform p. 97.

२. लॉर्ड लिटन. चालू शतकांतील प्रसिद्ध कादंबरीकार. यांचे चिरंजीव आमचे इकडे गव्हर्नर जनरल होऊन गेले.

बराच वर लागेल, परंतु ब्यॅरिस्टरच्या धंद्यांत तो त्याच्या कितीतरी खालीं आहे? प्राकृतजनसभेंत भाषण करण्याच्या कामांत सर्व जगाबरोबर टक्कर देण्याकरितां दंड थोपटून उभें रहावें इतकी ओकोनेलची योग्यता!" लोकांना शिक्षण देऊन त्यांना आपल्या ताब्यांत ठेवणें, त्यांची चित्तवृत्ति क्षुब्ध करणें व ती पुनः ताळ्यावर आणणें, या गोष्टी त्याला जशा साधल्या तशा कोणाला तरी साधल्या आहेत काय?"

भाषण करावयाला तो उभा राहिला ह्मणजे केव्हां केव्हां आपल्या भाषणांत स्तुति अथवा निंदा यांचा अगदीं तो अतिरेक करून सोडीत होता. प्रसंगविशेषीं तो आपल्या श्रोते मंडळीची इतकी कांहीं अवास्तव स्तुति करित होता कीं, ती ऐकून कोणालाही त्याचें हांसूं आल्यावाचून राहणार नाहीं. अशा तऱ्हेचें स्तुतिपर भाषण जर त्यानें इंग्लिश सभासदांपुढें केलें असतें, तर त्याची फजिती झाल्याशिवाय कधींही राहिली नसती. परंतु आयरिश शेतकऱ्यांपुढें तो सर्व प्रकार खपत होता. हे लोक दुसऱ्यांचीं व्यंगें काढण्याच्या कामांत फार कुशल, पण यांच्या अंगांत, दुसऱ्यांनीं अवास्तव स्तुति केली असतां फुगून जाण्याचें जें व्यंग आहे, तें कांहीं केल्या त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ओकोनेलला हें व्यंग माहित नव्हतें असें नाहीं. पण आपण आरंभिलेल्या उद्योगाला चांगलें यश यावें, या हेतूनें त्याचा तो चांगला उपयोग करून घेत होता. सर्व शेतकरी लोक त्याच्या जे अगदीं अध्यां वचनांत होते, त्याचें रहस्य तरी हेंच होतें. असो. याच्या उलट ह्मणजे आपल्या प्रतिस्पर्ध्यासंबंधानें बोलतांना तो त्यांच्यावर शिव्यांचा इतका कांहीं वर्षाव करीत असे कीं, सांगावयाची सोय नाहीं. या कामांत त्याच्यातर्फेनें बोलण्याला यत्किंचित्‌देखील जागा नाहीं. शिव्या देण्याचा हा क्रम त्यानें जाणूनबुजून सुरू केला होता व त्यांत त्याला एक प्रकारचा आनंदही वाटत होता. आयरिश लोक परकीयांच्या अमलाखालीं अगदीं चिरडून गेले आहेत, आपले हक्क काय आहेत हें त्यांचें त्यांनाच कळत नाहीं, सबब तें त्यांना चांगलें कळूं लागावें व त्यांच्या अंगांत थोडेंसें

पाणी यावें, ह्मणून मी हें मुद्दाम असें करतों, याप्रमाणें तो आपल्या कृतीचें मंडन करीत होता. तो आपल्या मित्रांपाशीं असें सांगत असे कीं, " क्याथलिक् लोकांची मुक्तता करण्याच्या कामांत मी जेव्हां गुंतलों होतों, तेव्हां पार्लमेंटचे सभासद व माझे स्नेही माझ्याकडे येऊन मला असें सांगत होते कीं, 'ओकोनेल्, तूं जोंपर्यंत आपल्या जिभेला आपल्या स्वाधीन ठेवणार नाहींस, तोंपर्यंत तुला कांहीं प्राप्ति होणार नाहीं.' पण हें ऐकून मी काय केलें ? मी आपली जीभ जास्तच सैल सोडिली, आणि त्यामुळें मला शेवटीं यश आलें." ओकोनेल्नें आपल्या कृतीचें केलेलें हें मंडन आमच्या वाचकांना कितपत रुचेल तें रुचो, आह्मांला तर तें मुळींच रुचत नाहीं. परपक्षासंबंधानें बोलतांना त्यांच्यावर कुशब्दांचा वर्षाव करणें हा अगदीं असभ्यपणाचा मार्ग आहे असें आह्मीं समजतों. ड्यूक ऑफ् वेलिंग्टनसारख्या शूर शिपायाला 'खुज्जें शिपुर्डें' किंवा 'टाइम्स' सारख्या वजनदार पत्राला 'भिकारडें पुरजें' अशीं नांवें ठेवून आपल्या अनुयायी मंडळीच्या मनांत ओकोनेल्नें कशी वीरश्री उत्पन्न केली असेल, किंवा आपला पक्ष बळकट आहे हें त्यानें कसें सिद्ध करून दाखविलें असेल हें त्याचें त्यासच माहीत! असभ्य मार्गाचें अवलंबन केल्याशिवाय उलट बाजू खोडून काढून आपली बाजू बळकट आहे, असें दाखविणें शक्य नाहीं असें आह्मांला वाटत नाहीं. सर्व हिंदुस्थानाला ललामभूत अशा एका गृहस्थाच्या कृतींचा 'सुधारक' या नात्यानें विचार करतांना आमच्या इकडील वक्ते व लेखक नाहीं नाहीं त्या शब्दांचा उपयोग करतात; परंतु त्या सर्वांच्या आक्षेपाला उत्तर देतांना त्या महापुरुषाच्या तोंडून आपल्या टीकाकारासंबंधानें वाईट शब्द चुकून तरी निघालेला कोणी ऐकला आहे काय? तात्पर्य, ओकोनेल्नें स्वीकारलेला हा मार्ग आह्मांला अगदीं अप्रशस्त दिसतो. परंतु ओकोनेल्चीं भाषणें ऐकण्याकरितां जे अज्ञान लोक येत होते, त्यांची त्या शिव्या ऐकून हांसून हांसून पोटें दुखून येत होतीं, व त्यामुळें त्यांच्या मनावर जो परिणाम व्हावा असें ओकोनेल्ला वाटत होतें, तो परिणाम हटकून होत होता हें मात्र खरें! या योगानें वर सांगितल्याप्र-

माणें आपल्या कृतीचें मंडन ' करण्याला त्याला थोडीशी तरी जागा होती, असें कांहीं लोक ह्मणतील यांत शंका नाहीं. तरी पण त्यांना ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे कीं, या त्याच्या शिष्टाचाराला सोडून होत असलेल्या वर्तनामुळें इंग्लंडांतील पुष्कळ लोकांना तो अगदीं अप्रिय झाला होता व त्याच्या वरचा त्यांचा विश्वास उडाला होता. तो तसा अप्रिय होण्याला इंग्लिश लोकांच्या दृष्टीनें बरींच कारणें होतीं. परंतु तिकडे दुर्लक्ष करून, व त्याच्या अंगीं जे अनेक गुण होते त्यांच्याकडे लक्ष देऊन, त्यांनीं त्याच्याशीं जर उदारपणाचें वर्तन केलें असतें; तर ते सर्व प्रकारें स्तुतीस पात्र झाले असते. परंतु आह्मांला मोठ्या कष्टानें असें ह्मणावें लागतें कीं, इंग्लिशांनीं त्याच्याशीं उदारपणाचें वर्तन केलें नाहीं. मरेतोंपर्यंत ओकोनेलवर आयर्लंडांतील व इंग्लंडांतील त्याच्या प्रतिपक्षीयांकडून त्याच्यावर मोठ्या निष्ठुर व निर्दयपणानें हल्ले होत होते. अब्रू खराब होण्याचे, व प्रत्यक्ष प्राणाचादेखील नाश होण्याचे, प्रसंग त्याच्यावर पावलोंपावलीं येत होते. प्रतिपक्षाबरोबर द्वंद्व युद्ध खेळण्याचें नाकारल्याबद्दल त्यावेळचे लोक त्याला कांहींही ह्मणोत; आह्मांला तर असें वाटतें कीं, त्यामुळेंच तो इतकें दिवस जगला. नाहींतर द्वंद्व युद्ध करण्याची त्याची जर तयारी असती तर त्याच्या शत्रूंनीं युद्धाचे प्रसंग त्याच्यावर जाणूनबुजून आणिले असते व त्यांतच, पन्नास वर्षें होण्याच्या आंत, त्याची इतिश्री झाली असती. त्याचा जीव धोक्यांत घालण्याकरितां नामर्दपणाचे उपाय योजण्यांतदेखील लोकांनीं कसूर केली नाहीं. गाडींतून जातांना त्याला कांहींतरी अपघात व्हावा या हेतूनें गाडीचा कणा, कोणी कोणास ठाऊक, निम्मा अधिक कापून ठेविला होता; दुसऱ्या एका प्रसंगीं ' डाउन ' नांवाच्या परगण्यांतून तो प्रवास करीत असतां कांहीं लोकांनीं त्याच्या गाडीवर हल्ला केला. त्या हल्ल्यांत तो मरावयाचाच. पण त्यावेळेस त्याच्या एका नोकरानें त्याचा प्राण मोठ्या धूर्तपणानें वांचविला. ग्रेटननें त्याच्यासंबंधानें एकदां इतकी कडक भाषा वापरली होती कीं, तिच्या तोडीची उलट कडक भाषा बोलणें

ओकोनेल्लादेखील साधलें नाहीं. आयर्लंडांतील जे लोक त्याच्या वांकड्यावर होते, त्यांचें त्याच्याशीं कसें वर्तन होतें याचें वर्णन झालें. इंग्लिश लोकांचें वर्तन आयर्लंडांतील लोकांइतकें क्षुद्र नव्हतें. पण त्यांनींदेखील ओकोनेल्ला छळण्याच्या किंवा त्याला त्रास देण्याच्या कामांत आपल्याकडून कांहीं कसूर केली नाहीं. कॉमन्ससभेंतील रिपोर्टर ह्मणजे बातमीदार, त्याच्या भाषणाचा भलताच रिपोर्ट प्रसिद्ध करीत असत. ही गोष्ट जेव्हां त्यानें एका प्रसंगीं लोकांच्या नजरेस आणिली, तेव्हां त्यांनीं त्याचीं भाषणें प्रसिद्ध करण्याचें सोडून दिलें. इंग्लिशसमाजानें तर त्याच्यावर एक प्रकारचा बहिष्कारच घातला होता. थिओडोर ग्रेनव्हिलनें आपल्या मित्राच्या घरीं जाणें बंद केलें, भीति ही कीं ओकोनेल्ची तेथें गांठ पडेल. विग् पक्षाकडील मंडळी व ओकोनेल् या उभयतांमध्यें जेव्हां स्नेहभाव होता, तेव्हांदेखील त्यांच्या क्लबांत वगैरे जाण्याची त्याला परवानगी नव्हती. परधर्मांतील व परदेशांतील लोकांशीं निष्काळजीपणानें इंग्लिश लोकांचें जें नेहमीं वर्तन असतें, त्यांतलाच हा एक मासला आहे. नाहीं असें कोण ह्मणेल ?

याप्रमाणें त्याला सर्व जन्मभर शत्रूंबरोबर कडाक्याचा वाद करावा लागत होता; ज्या लोकांनीं वास्तविक रीतीनें पाहिलें तर त्याच्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागावयास पाहिजे होतें, तेच लोक त्याचा अतिशय तिरस्कार करीत होते. या दोन गोष्टींचा विचार केला तर, तो आपल्या प्रतिस्पर्ध्यांविषयीं भाषण करीत असतां, इतका कां तुटून बोलत होता हें आपल्या चांगलें ध्यानांत येतें, व त्याचें हें करणें न्याय्य आहे अशी जरी आपली खात्री होत नाहीं, तरी तें क्षम्य आहे, असें आपल्याला वाटल्यावांचून रहात नाहीं. परंतु हा मार्ग त्यानें स्वीकारल्यामुळें त्याच्या देशाचें दैव उघडावें तसें उघडलें नाहीं, किंवा इंग्लिश लोकांत त्याची जितकी मानमान्यता वाढावयास पाहिजे होती, तितकीही वाढली नाहीं. राजकीय बाबतींत त्या वेळेच्या लोकांहून हल्लीं आपलीं मतें बरींच सुधारलीं आहेत ह्मणून ह्मणा, किंवा कोणच्याही

काय गोष्टीचा शांतपणानें विचार करण्याची आपल्याला संवय लागत चालली आहे ह्मणून ह्मणा, आपण नेहमीं अशी बाजू घेऊन चालतो कीं, सार्वजनिक कामांत पुढाकार घेणाऱ्या मनुष्याची प्रसंगविशेषीं अशीं कांहीं मतें असूं शकतील कीं, तीं आपल्यापैकीं पुष्कळांना पसंत पडणार नाहींत, पण तेवढ्यावरून तशीं मतें प्रतिपादन करण्यांत त्याचा कांहीं तरी वाईट हेतु असावा, असा कुतर्क काढून त्याची अवहेलना करणें हें कधींही योग्य होणार नाहीं. त्याचप्रमाणें हीही गोष्ट अलीकडल्या लोकांना मान्य आहे कीं, एखाद्या महत्वाच्या प्रश्नासंबंधानें आपल्यांत व दुसऱ्या एका मनुष्यांत मतभेद होणें संभवनीय आहे, पण तेवढ्यावरूनच त्याच्यावर मूर्खपणाचा किंवा लुच्चेगिरीचा आरोप करणें प्रशस्त नाहीं. परंतु ओकोनेल्नें आरंभिलेली चळवळ ज्याकाळांत चालू होती, त्या काळांत एखाद्या विषयाचा अशा दृष्टीनें विचार करणारे लोक फारच थोडे होते. राजकीय बाबतींत आपल्या उलट बाजूनें प्रतिपादन करणारा मनुष्य डोक्याचा एक दगड तरी असला पाहिजे, किंवा अतिशय अधम तरी असला पाहिजे, या तत्वावर ओकोनेल् व त्याचे प्रतिस्पर्धी या उभयतांमध्यें वाद चालू होता, व यामुळेंच इंग्लिश लोकांना त्याची परीक्षा झाली नाहीं. राजकीय कामांत रोमन क्याथलिक् मनुष्यानें पुढाकार घेतल्याचें हा काळपावेतों त्यांच्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत नव्हतें आणि ह्मणून ओकोनेल्नें राजकीय कामांत इतकें मन घालावें हीच गोष्ट मुळांत त्यांना पसंत नव्हती! याप्रमाणें आयरिश लोकांसंबंधाच्या त्यांच्या कल्पना पहिल्यापासून फारच कोत्या होत्या, त्या लोकांच्यासंबंधानें त्यांचा ग्रहही कांहीं एक चमत्कारिक प्रकारचा झाला होता. ओकोनेल् तर क्याथलिकांतला क्याथलिक् व आयरिशांतला आयरिश होता. साहस, क्षणोक्षणीं बदलणारी मनोवृत्ति, एखाद्या गोष्टीविषयीं अति प्रीति किंवा अति तिरस्कार, मनाची झालेली समजूत, व प्रत्यक्ष घडून आलेली गोष्ट या दोहोंत नेहमी घोंटाळा करून सोडण्याची मनाची प्रवृत्ति, हे जे केल्टिक लोकांच्या स्वभावाचे धर्म आहेत ते सर्व ओकोनेल्च्या स्वभावांत पूर्णपणें भरलेले

होते. तरी पण धैर्य आणि आत्मसंयमन हे जे दोन गुण केल्टिक लोकांत कधींही असावयाचे नाहींत, ते ओकोनेल्च्या अंगांत होते ह्मणून त्याला आपल्या उद्योगांत थोडेंसें तरी यश आलें. ज्या कांहीं गोष्टी आपल्याला साध्य करून घ्यावयाच्या आहेत, त्या सर्व इंग्लिश लोकांच्यां हातांत आहेत, याकरितां आपल्याकडे त्यांचें मन ओढेल, आपल्या देशाविषयीं त्यांच्या मनांत अनुकंपा उत्पन्न होईल, अशा तऱ्हेचें त्यांच्याशीं आपलें वर्तन ठेवणें अवश्य आहे, ही गोष्ट ओकोनेल्च्या लक्षांत आली नाहीं. ती गोष्ट लक्षांत आणून त्याप्रमाणें त्यानें आपलें वर्तन जर ठेविलें असतें तर फारच बहार झाली असती. इंग्लिश लोकांची कृपा संपादन करणें अगोदर कठीण आहे हें खरें; पण एकदां कां ती संपादन झाली, ह्मणजे ती चिरस्थायी झाल्याशिवाय रहात नाहीं, असा बऱ्याच लोकांना अनुभव आहे; मग आयरिश लोकांना काय असेल तो असो. इंग्लिश लोकांची मर्जी संपादन करण्याकरितां रूढमार्गाचें त्यानें अवलंबन केलें नाहीं, इतकेंच नाहीं, तर प्रसंग सांपडला कीं, त्यांच्यावर घसरल्याशिवाय किंवा त्यांना राग आणल्याशिवाय किंवा त्यांच्या मनांत एकप्रकारची भीति उत्पन्न केल्याशिवाय तो कधींही राहिला नाहीं. या सर्व कारणांमुळें ओकोनेल्विषयीं निःपक्षपात रीतीनें मत देणारा एकही मनुष्य इंग्लंडांत त्यावेळेस सांपडत नव्हता, याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. इंग्लंडांतील वर्तमानपत्रांनीं त्याला जितकी शिव्याची लाखोली मोजली, तितकी दुसऱ्या कोणालाही आजपर्यंत त्यांनीं मोजली नसेल! दाण्याच्या कायद्यांच्या उलट उद्योग सुरू असतां कॉब्डेन व ब्राइट यांजवर इंग्लिश वर्तमानपत्रकार जी टीका करीत होते, ती टीका, ओकोनेल्वर रोज होणाऱ्या टीकेबरोबर तुलना करून जर पाहिली तर, फारच शांत, सौम्य व बऱ्याच अंशानें स्तुतिपर अशी वाटेल यांत शंका नाहीं. ओकोनेल्च्या हातून इंग्लिश लोकांचा अपराध झाला होता, असें गृहित धरून चाललें, तरी एवढें अकांडतांडव करण्याजोगा तो अपराध खचित मोठा नव्हता, हें त्यांना स्वतःलादेखील कबूल करणें भाग आहे. बरें

एवढा अपराध अपराध जो ह्मणावयाचा तो तर हाः--त्यांच्या कांहीं पुढाऱ्यांवर त्यानें मोठ्या जोराचा हल्ला केला होता, इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य नाहींसें करून त्याबरोबरच इंग्लंडचें सार्वभौम नाहींसें करण्याचा त्यानें उद्योग आरंभिला होता, आयर्लंडांत राजाश्रित धर्म संस्था असूं नये असें मत तो प्रतिपादन करीत होता; आयर्लंडांतील जमिनदारांशीं ह्मणजे इंग्लिश लोकांच्या आश्रयानें मोठ्या पदवीला चढलेल्या मनुष्यांशीं, शत्रुत्वाच्या नात्यानें तो वागत होता. या सर्व गोष्टी ओकोनेलनें ज्या आरंभिलेल्या होत्या, त्या आपल्या देशाच्या कल्याणाकरितां आरंभिलेल्या होत्या, आणि ह्मणून तसें करण्यांत त्यानें इंग्लिश लोकांचा कांहीं अपराध केला असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं. आतां त्यांच्याच दृष्टीनें या विषयाचा जर विचार करावयास आह्मी लागलों, तर हे अपराध त्याच्या अंगीं लावण्याला व त्याबद्दल त्याच्यावर टीका करण्याला त्यांना या बाबतींत कांहीं तरी कारणें होतीं असें कबूल करणें आह्मांला भाग आहे. परंतु याशिवाय दुसरे अनेक घाणेरडे आरोप ते जे त्याच्यावर लादीत होते, त्यांचा पुरावा, इंग्लिश लोकांच्या कल्पनेव्यतिरिक्त कोठेंही सांपडावयाचा नाहीं. त्यांची अशी पूर्ण समजूत होऊन बसली होती कीं. गरीब व काबाडकष्ट करणाऱ्या लोकांकडून पैसे घेऊन, तो आपली स्वतःची तुंबडी भरतो. त्याचप्रमाणें त्यांना आणखी असेंही वाटत होतें कीं, राजकीय चळवळी सुरू करण्यांत, पट्टीच्या रूपानें लोकांपासून वसूल केलेले पैसे आपल्या घशांत टाकण्यापलीकडे त्याचा कोणताही हेतु नव्हता. हे आरोप करतांना उत्तम प्रकारानें चाललेल्या आपल्या धंद्यावर त्यानें पाणी सोडलें. 'यद्यस्मासु पराङ्मुखोऽसि वयमप्येकांततो निस्पृहा :' ह्या न्यायाचा अवलंब करून राजाश्रयाची त्यानें केव्हांच पर्वा केली नाहीं. शेवटीं त्याला मरण आलें तेंही दरिद्रावस्थेंतच. या सर्व गोष्टी या लोकांच्या ध्यानांत कशा येत नव्हत्या कोणास ठाऊक! दुसऱ्यांचें मन कसें आहे हें समजून घेण्याची, किंवा एखाद्या विषयाचा दुसरे ज्या बाजूनें विचार करीत असतील त्या बाजूनें

विचार करण्याची उत्सुकता इंग्लिश लोकांच्या मनांत असल्याबद्दल त्यांची मूळापासूनच प्रसिद्धि नाहीं. त्यांतून ओकोनेलच्या कामांत ते पूर्णपणें विकारवश झाले होते. अशा स्थितींत त्यांचें डोकें जाग्यावर न राहतां, त्याच्यासंबंधानें त्यांनीं वाटतील ते कुतर्क काढले यांत आश्चर्य कसचें ?

याप्रमाणें कांहीं अंशीं सकारण व कांहीं अकारण असा इंग्लिश लोकांचा ओकोनेलनें जो द्वेष संपादन केला, तो त्याच्या स्वतःच्या व त्याच्या देशाच्या कल्याणाला विघातक झाला व त्यामुळें एकंदरींत त्याची कारकीर्द आयर्लंडाला हितकारक झाली किंवा अहितकारक झाली, हें सांगणें फार कठिण आहे. सन १८२९ सालांत त्याच्या कारकीर्दीचे परस्परापासून अगदीं स्वतंत्र असे दोन भाग पडतात. अशा तऱ्हेचा हा चमत्कार मोठमोठ्या लोकांच्या चरित्रांत प्रायः आढळून येत नाहीं, आणि ह्मणून ओकोनेलच्या चरित्रांत एक विशेष प्रकारची मौज आहे. १८२९ सालीं विरुद्ध पक्ष एवढा मोठा प्रबल असतां, केवळ आपल्या एकट्याच्या जिवावर क्याथलिक लोकांना मुक्त करण्याचें त्यानें श्रेय घेतलें. या कामांत परपक्षाबरोबर त्यानें जें युद्ध आरंभिलें होतें, त्यांत न्यायदेवता त्याच्या बाजूला होती. त्या युद्धांत त्याला यश येऊन आयरिश लोकांना कीर्ति संपादन करण्याचा मार्ग त्यानें दाखविला व त्याबद्दल आयर्लंडांतील सर्व लोकांनीं त्याचे उपकार स्मरणें अगदीं जरूर आहे. आतां हें अगदीं खरें आहे कीं, एकंदर सुधारणेच्या प्रगतीबरोबरच क्याथलिक् लोकांचीही ही सुधारणा झाल्याशिवाय राहिली नसती. त्या वेळेचे सर्व विद्वान् लोक या सुधारणेला अनुकूल अशा मताचे होते, मोठमोठ्या वक्त्यांचें वक्तृत्व, तत्ववेत्त्यांची विशाल बुद्धि, राजकार्यधुरंधर मुत्सद्यांची दूरदृष्टि, हीं सर्व या सुधारणेच्या वतीनें भांडत होतीं व त्यामुळें त्यांनीं तिचा मार्ग सुगम करून ठेविला होता. ओकोनेल् जरी मुळीं जन्मालाच आला नसता, तरीदेखील थोड्याच वेळानें ही सुधारणा अमलांत आल्याशिवाय राहिली नसती, याविषयीं कोणालाही शंका नाहीं. परंतु त्याच वेळेस ती सुधारणा जी अमलांत आली ती, ओकोनेल्नें धैर्यानें सुरू केलेली चळवळ व

यादवी युद्ध सुरू न करण्याविषयीं टोरी पक्षाच्या प्रधानमंडळीनें केलेला दृढनिश्चय, या दोहोंमुळें आली, हें निर्विवाद आहे. टोरी पक्षाच्या लोकांनीं जर वेळेवर साहाय्य केलें नसतें, तर इष्ट हेतु साध्य करून घेणें ओकोनेलला बरेंच जड गेलें असतें. आयत्या वेळेस जुळून आलेलीं कारणें कांहींही असोत, ज्या बंधनांनीं आयरिश लोकांना अनेक वर्षें अगदीं जखडून टाकलें होतें, तीं बंधनें दूर करून नवीन हक्क संपादन करण्याचा बंद असलेला मार्ग त्यानें खुला केला, याबद्दल त्याची स्तुति करावी तितकी थोडी आहे. क्याथलिक लोकांची मुक्तता केल्याबरोबर तेथेंच जर ओकोनेलचें आयुष्य पुरें झालें असतें, तर त्याची कीर्ति हल्लीं आहे, यापेक्षांही जास्त झाली असती यांत संशय नाहीं. १८२९ च्या आक्टोबर महिन्यांत तो आपल्या भावाबरोबर टपालच्या टांग्यांतून एकदां प्रवास करीत होता. प्रवास करतां करतां प्राणावर येऊन बेतण्याजोगा अपघात होण्याचा समय आला होता; परंतु दैवयोगानें तो टळला. तो तसा टळला नसता व त्यांतच जर ओकोनेलचा अंत झाला असता, तर त्याची कारकीर्द अशी झाली असती कीं, सर्वांनीं त्याचा स्तुतिपाठच गावा, त्याला नांवें ठेवण्याला कोठेंच जागा राहिली नसती. १८२९ सालीं लोकनायकाची पदवी जमिनदार लोकांपासून त्यानें हिरावून घेतली व त्यामुळें आयरिश समाजांत फार मोठमोठे फरक झाले. जमिनदार लोकांना जी ही अवनति प्राप्त झाली, तिच्याबद्दल वाईट वाटणें जितकें कठीण आहे, तितकेंच त्यांची हिरावून घेतलेली पदवी त्यांच्या पश्चात् ज्यांना प्राप्त झाली, त्यांचें अभिनंदन करणेंही कठीण आहे. दुर्दैवानें आयर्लंड देशाची सांपत्तिक स्थिति अशी आहे कीं, त्या देशांत इंग्लंडाप्रमाणें मध्यम प्रतीच्या लोकांचा भरणा मुळींच नाहीं. जमिनदार लोकांची एकदां हांकलपट्टी झाल्यावर राजकीय कामांतील पुढारीपणा पुरोहित मंडळीच्या किंवा बऱ्याच अंशानें धाडसी व अविचारी लोकांच्या हातांत गेला. ओकोनेल जोंपर्यंत जिवंत होता, तोंपर्यंत तो दोघांनाही आपल्या ताब्यांत ठेवून सुमार्गाला लावीत होता. परंतु तो मरण पावल्यानंतर लागलीच या उभयतांच्या हातांत सर्व वर्चस्व आल्यामुळें, त्याचा परिणाम

किती वाईट झाला, हें लवकरच लोकांच्या निदर्शनास आलें. स्वतः ओकोनेल्च्या अंगांत जरी सहिष्णुता होती, तरी स्वपक्षाच्या अभिमानाला पेटल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या असहिष्णुतेची ज्वाला त्यानेंच उत्पन्न केली, व ती थोड्याच वेळांत लांबवर पसरविली. तो स्वतः फारच तीव्र बुद्धीचा मनुष्य होता; परंतु त्याच्या पक्षाची ह्मणून जी मंडळी त्याच्या भोंवतीं होती ती कमी योग्यतेची असून त्यांच्या अंगीं अक्कलही कमीच होती. पुरोहित वर्गांतील लोकांत चांगले गुण पुष्कळ होते; परंतु ते लोक राजकीय गोष्टींत न पडते, तर फार बरें झालें असतें. कारण त्या कामाला लागणारी मनाची उदात्तता व ज्ञान या दोहोंची त्यांच्यांत बरीच उणीव होती. पुरोहितवर्गांतील मंडळीनें आयर्लंडाचें कांहीं तरी हित केलें असेल; पण पातळ रक्ताचे दुसरे जे पुढारी लोक होते, त्यांचा तर देशाला कांहींच उपयोग झाला नाहीं. असो, १८२९ सालापासून ऐक्य नाहींसें करण्याचा उद्योग त्यानें सुरू केला; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. त्याचें कारण तरी हेंच कीं, जो वाद त्यानें उपस्थित केला, त्या वादांत सर्व आयर्लंडांतील लोक जरी एकदिलानें पडले, तरी आपल्या व आपल्या अनुयायांच्या परिश्रमानेंच त्या वादाचा निकाल आयर्लंडाला अनुकूल असा व्हावयाचा नाहीं, हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांत त्याला इंग्लंडांत कोणाचें पाठबळ नव्हतें. कांहीं काळपावेतों बऱ्याच मोठ्या प्रमाणावर स्थानिक स्वराज्य आयर्लंडाला देण्याची कल्पना विग् लोकांना पसंत होती; परंतु इंग्लंडांतील सर्व पक्षाची मंडळी ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला एकमतानें प्रतिकूल होती आणि यामुळें त्या उद्योगांत ओकोनेल्ला यश येणें दुरापास्त होतें. त्या वेळेला इंग्लंडांतील लोकमत या गोष्टीला इतकें प्रतिकूल होतें हें स्वाभाविकच आहे; परंतु हल्लींदेखील शांतपणानें या विषयाचा विचार करणारे लोक इंग्लंडांत फारच थोडे आहेत, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. वास्तविक पाहिलें असतां अशा प्रकारचा कांहीं उद्योग सुरू करण्याला इंग्रजी मुत्सद्यांनींच ओकोनेल्ला उत्तेजन दिलें, असें पोक्त विचारांतीं दिसून येईल. मागच्या एका भागांत सांगितल्याप्रमाणें टोरी

प्रधानमंडळीनें क्याथलिक लोकांची मुक्तता जी केली, ती तसें करणें न्याय्य आहे, ह्मणून केली नाहीं, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. " ती त्यांनीं तशी केली असती, तर ऐक्य नाहींसे करण्याच्या उद्योगाचें फारसें नांव ऐकूं आलें नसतें. परंतु आयरिश लोकांच्या व त्याचप्रमाणें इतर सर्व जगाच्या लक्षांत हें तेव्हांच आलें कीं, आपआपसांत यादवी युद्ध सुरू होण्याची जर भीति नसती, तर सरकारानें, निदान त्याच वेळेला तरी, क्याथलिक् लोकांची मुक्तता केली नसती. जी गोष्ट केव्हांना केव्हां तरी केलीच पाहिजे असें सर्व लोकांस वाटत असतें, ती गोष्ट पुढें दंगाधोपा होईल तो न व्हावा या हेतूनें आजच करूं देणें, ( उदाहरणार्थ क्याथलिक लोकांची मुक्तता करणें ) व जी गोष्ट करणें केव्हांही सयुक्तिक अथवा सुरक्षित होणार नाहीं असें बहुजनसमाजाला वाटत असतें, ती गोष्ट करूं देणें, ( उदाहरणार्थ इंग्लंडबरोबर झालेलें ऐक्य नाहींसें करणें ) या दोहोंत भेद किती आहे, हें आज इतक्या वर्षांनंतर डोकें थंड करून सिंहावलोकन करणाऱ्या इंग्रजी गृहस्थांच्या तेव्हांच लक्षांत येतें; परंतु आयर्लंडांतील शेतकरी लोकांच्या लक्षांत हा भेद त्यावेळेस आला नाहीं, याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्याला एवढें माहीत होतें कीं, क्याथलिक् लोकांचीं बंधनें दूर करा असें ओकोनेल्नें मागणें केलें, आणि हें मागणें मान्य केलें जाणार नाहीं, असें प्रथम सरकारानें त्याला सांगितलें. त्यावर तो ह्मणाला कीं, माझें हें मागणें सरकाराला मान्य करावयाला लावीनच आणि असें त्यानें ह्मट-ल्यावर सरकारानें त्याचें मागणें मान्य केलें. यामुळें ओकोनेल् जेव्हां असें ह्मणूं लागला कीं, इंग्लंडबरोबर आयर्लंडचें झालेलें ऐक्य मी सर-काराकडूनच नाहींसें करून घेईन, तेव्हां तो आपलें ह्मणणें खरें करून घेतल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, असा आयरिश शेतकऱ्यांच्या मनांत त्याच्यासंबंधानें भरंवसा उत्पन्न झाला हें साहजिकच आहे. "

" आपल्या मनांत आणलेला हेतु साध्य होणें शक्य आहे, असें स्वतः ओकोनेल्ला देखील वाटत होतें, यांत कांहीं शंका नाहीं. इंग्लंड

आणि आयर्लंड या दोन देशांचें ऐक्य झाल्याला आज बरेच दिवस झाले आहेत, यामुळें एखादी गोष्ट घडून आल्याला बरेच दिवस लोटले असतां तिच्यासंबंधानें आपल्या मनांत जसा एक प्रकारचा पूज्य भाव उत्पन्न होतो, तसा पूज्यभाव या ऐक्यासंबंधानें आपल्या मनांत उत्पन्न होण्याचा, व त्यामुळें आतां आहे हीच स्थिति तशी कायम ठेवावी असें वाटण्याचा संभव आहे. ओकोनेल्‌चा पार्लमेंटमध्यें जेव्हां प्रवेश झाला तेव्हां तें ऐक्य होऊन पुरीं तीस वर्षेंदेखील झालीं नव्हतीं. अनेक इंग्लिश लोकांनीं अनेक आयरिश लोकांना धाक दाखवून व लांच देऊन त्यांच्या इच्छेविरुद्ध तें ऐक्य जुळवून आणिलें होतें, याच्यापलीकडे जास्त त्यासंबंधानें सांगण्याजोगें कांहीं नव्हतें. "युरोपांतील नीतीचा इतिहास" या पुस्तकाचा कर्ता मि० लेकी यानें निःपक्षपात रीतीनें या विषयावर दिलेलें मत आधारादाखल येथें आह्मीं नमूद करतों. मि० लेकी ह्मणतो, "कोणच्याही काय, राष्ट्रांतील राज्यकारभार त्या राष्ट्रांतील लोकांच्या इच्छेप्रमाणें चालला पाहिजे, हा जो सर्वमान्य नियम आहे, तो नियम अमलांत आणण्याकडे युरोपांतील सर्व उद्योगांची प्रवृत्ति होत चालली आहे, हें ओकोनेल्‌च्या स्पष्टपणें लक्षांत आलें होतें. इंग्लंडबरोबर ऐक्य करण्याचें ओझें एका पिढींतील लोकांवर, निव्वळ निंद्य उपायांनीं, व तेंही त्यांच्या इच्छेविरुद्ध, लादलें होतें, ही गोष्ट प्रत्येक शहाण्या व समजूतदार मनुष्याला कबूल होती. अशा रीतीनें झालेलें ऐक्य दुसऱ्या पिढींतील लोकांच्या संमतिशिवाय कायम राखिलें जात आहे, असें बहुतेक सर्व लोकांकडून निश्चयपूर्वक वदवून, त्यांच्याच तोंडानें त्यांची खात्री करून देण्याला ओकोनेल् अगदीं तयार होता. त्याला असा पक्का विश्वास होता कीं, व्यवस्थित राज्यसत्तेखालीं एखाद्या राष्ट्रांतील चार-पंचमांश लोकांनीं [१] आपली इच्छा काय आहे, हें शांततेचा भंग न होई

---

१. हा उतारा 'Leaders of public opinion in Ireland' या पुस्तकांतून घेतला आहे. ऐक्य नाहींसें करण्याची चळवळ स्वतः मि० लेकी यांना पसंत नव्हती, व यामुळें त्यांचे हे विचार विशेष महत्वाचे आहेत, हें वाचक जाणतीलच.

अशा मार्गानें दीर्घ उद्योगानें व नेटानें सरकाराला कळविण्याचा जर निश्चय केला, तर ती इच्छा शेवटीं सफल झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. सदरहू चळवळ चालू असतां जर लढाई सुरू झाली असती--ओकॉनेल् जर आणखी दहा वर्षे जगला असता—त्याच्या पश्चात् त्याच्या खांद्यावरील जूं जर दुसऱ्या एखाद्या योग्य मनुष्याच्या खांद्यावर पडलें असतें—भयंकर दुष्काळ पडून त्याच्यायोगानें आयरिश लोकांच्या अंगचा उत्साह जर नाहींसा झाला नसता – तर ती चळवळ यशस्वी झाली नसती असें कोण ह्मणेल? आपल्या मताप्रमाणें जी गोष्ट घडून येणें चांगलें नाहीं, ती गोष्ट तशी घडवून आणतांच यावयाची नाहीं, अशा समजुतीचे कांहीं लोक असतात, त्यांना मात्र ती चळवळ यशस्वी झाली नसती असें वाटलें असेल, असा आमचा तर्क आहे. एतावता तीस वर्षांच्या अंतरावरून गत गोष्टींचें निरीक्षण करणाऱ्या व तात्विकदृष्ट्या राजकीय गोष्टींचा विचार करणाऱ्या एका इंग्रजी ग्रंथकाराला हें ऐक्य नाहींसें करण्याच्या उद्योगाला यश येणें जर शक्य वाटत होतें, तर तें ओकोनेल्लाही तसें वाटलें यांत आश्चर्य कसचें? व त्या उद्देशानें त्यानें चळवळ सुरू केली यांत तरी आश्चर्य कसचें? ओकोनेल्संबंधाचें आमचें हें विधान कित्येकांना पसंत पडणार नाहीं, हें आह्मीं जाणून आहों; पण त्यांनींदेखील हें कबूल केलेंच पाहिजे कीं, आयर्लंडांतील शेतकरी लोकांना मात्र या उद्योगांत वेडेपणाचा भाग कांहींच दिसला नाहीं. राजकीय पक्षांतील लोकांच्या सल्ल्यानें चालणारी आमच्या देशाची राज्यव्यवस्था सर्वतोपरी उत्कृष्ट आहे असें नाहीं. एकंदरीच्या मानानें पाहिलें तर, ही व्यवस्था बरीच चांगली आहे. राज्यकार्याची सुव्यवस्था ठेवणाऱ्या मनुष्यानें आपली अक्कल खर्च करून ज्या ज्या युक्त्या काढल्या आहेत, त्या सर्वांत हीच युक्ति प्रायः विशेष समाधानकारक आहे. तिच्यांतदेखील कांहीं दोष व तोटे आहेत असें सांगितलें असतां तत्पक्षपाती माणसांना राग येणार नाहीं अशी आह्मांला उमेद आहे. त्या दोषांपैकीं हा एक दोष आहे कीं, ही राज्यव्यवस्था ज्या राज्यांत चालू असते, त्या राज्यांत होणाऱ्या बहुतेक

सर्व सुधारणा, त्या होणें न्याय्य असतें ह्मणून होतात असें नाहीं, तर त्या सुधारणा हव्या असें ह्मणणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी असते ती पाहून व तिला भिऊन होतात. हल्लींच्या काळांतील एका मोठ्या मुत्सद्यानें पूर्वीं एका प्रसंगीं असें सांगितलें आहे कीं, ' पार्लमेंटनें आजपर्यंत न्यायाच्या अशा अनेक गोष्टी केल्या आहेत; पण केवळ न्यायाकडेच नजर पुरवून त्यापैकीं फार थोड्या केल्या आहेत. न्याय फारसा मनांत न आणतां केवळ लोकनिवहाकडे पाहूनच क्याथलिक लोकांची बंधनापासून मुक्तता झाली, हें ओकोनेल्नें व व इतर सर्व लोकांनीं धडधडीत आपल्या डोळ्यांनीं पाहिलें. अशा स्थितींत ऐक्य नाहींसें करण्याच्या कामांतही लोकनिवहाच्या साहाय्यानें आपल्याला यश येईल, असें जर ओकोनेल्ला वाटलें असेल, तर त्यांत आश्चर्य कसचें?" जस्टिस म्याकार्थीच्या इतिहासामधील हा दिलेला उतारा वाचून, ऐक्य नाहींसें करण्याचा उद्योग सुरू केल्याबद्दल कांहीं इंग्लिश ग्रंथकार ओकोनेल्ला जें दूषण देत असतात, तें किती निरर्थक आहे हें वाचकांच्या सहजच ध्यानांत येईल.

ओकोनेल्ला आयर्लंडांत जी पदवी मिळाली व ती जितके दिवस टिकली, ती पदवी त्याच्या पश्चात् दुसऱ्या कोणालाही मिळाली नाहीं व ती तितके दिवस टिकलीही नाहीं तीसपस्तीस वर्षेपर्यंत आयरिश लोकांत सर्वांत उच्च असें स्थान त्यानें आपल्याला मिळविलें होतें, व त्याचा परिणाम असा झाला होता कीं, सर्व जगाच्या दृष्टीला ओको-नेल् ह्मणजेच आयर्लंड असें वाटूं लागलें होतें. यासंबंधानें मि. ग्लॅडस्टन ह्मणतात " ओकोनेल् हा, आयर्लंडांत आजपर्यंत जेवढे ह्मणून मोठे लोक उत्पन्न झाले, त्या सर्वांत अति श्रेष्ठ होता असें अनेक लोकांच्या दृष्टीनें ठरतें यांत शंका नाहीं. तुलना करण्या करितां तराजूच्या एका पारड्यांत त्याला बसविलें असतां, त्याच्या बरोबरील स्विफ्ट किंवा ग्रेटन ( त्यांच्या त्यांच्या मानानें या दोघांपैकीं प्रत्येक जणाची केवढी तरी मोठी योग्यता! ) यांपैकीं एकालाही दुसऱ्या पारड्यांत

बसवितां येणार नाहीं. आयर्लंडच्या इतिहासांत पूर्वी ज्यानीं आपलें नांव गाजवून सोडलें, अशा थोर पुरुषांबरोबर ओकोनेल्‌ची यदाकदाचित् चढाओढ सुरू झाली, तर बर्क आणि ड्यूक ऑफ वेलिंगटन हेच दोन वीर सर्वांहून अतिशय भारी असल्यामुळें त्यांच्याशीं टक्कर देण्यास उभे राहतील. परंतु खरोखर ह्मटलें तर तो महाप्रतापी ड्यूक, गणितशास्त्रांतील भाषा वापरावयाची तर, ओकोनेल्‌शीं अगदीं 'अननुरूप' आहे असें ह्मणावें लागतें. नागरिक कृत्यांना लागणारी बुद्धिमत्ता, आणि समरभूमीवर लागणारी शक्ति, या दोहोंत अधिक योग्यता कोणाची याचा योग्य रीतीनें ताळा घालून द्यावा ह्मटलें, तर तसें करण्याला योग्य असे शब्दच मला माहींत नाहींत. नागरिक कृत्यांना लागणाऱ्या बुद्धिमत्तेचाच जर आपण विचार केला, तर ओकोनेल् हाच अधिक श्रेष्ठ ठरतो, याविषयीं कोणीही शंका घेणार नाहीं. समरांगणांत ड्यूकनें दाखविलेला पराक्रम लक्षांत आणला तर, त्याच्या बाजूला कांटा झुकेल किंवा नाहीं व झुकला तर त्यामुळें त्याची योग्यता किती जास्त ठरेल, या प्रश्नाचा मी नुसता उल्लेखदेखील करीत नाहीं, कारण तो प्रश्न स्वभावतःच सोडविण्याला मोठा कठीण आहे. बर्कबरोबर जर त्याची तुलना केली, तर विचारसृष्टींत बर्क जास्त श्रेष्ठ ठरतो, असें ह्मणणें निर्धास्तपणाचें दिसतें." एवढ्या मोठ्या पदवीला चढण्याला अलौकिक वक्तृत्वाशिवाय त्याच्या अंगांत पुष्कळ सद्‌गुण होते. मोठमोठ्या परिश्रमाचीं कामें करणें व त्यांतील क्षुल्लक बाबतींत सुद्धां लक्ष पुरविणें, हे दोन गुण त्याच्या अंगांत उत्तम रीतीनें वास करीत होते. आपल्या भोंवतीं बसलेल्या मंडळीबरोबर एकीकडे गप्पा मारावयाच्या, आणि एकीकडे काम चालू ठेवावयाचें अशी मोठ्या मौजेनें काम करण्याची त्याची पद्धति होती. त्याच्या आंगचा धिमेपणा, व हातीं घेतलेल्या प्रश्नासंबंधानें खडान्‌खडा माहिती करून घेण्याची त्याची शक्ति, हे दोन गुण मोठे वर्णनीय होते. त्यांची स्मरणशक्ति फार चांगली होती. एखादी गोष्ट एकदां वाचली किंवा ऐकली ह्मणजे पुरे, ती त्याच्या लक्षांतून केव्हांही जात नव्हती. निरनिराळ्या मताचे

लोक एके ठिकाणीं जमवून त्यांच्यामधील मतभेद काढून टाकावयाचा व आपण आरंभिलेल्या उद्योगांत सर्वांनीं एकदिलानें वागावें असा हुरूप त्यांच्या मनांत उत्पन्न करावयाचा, ही कला त्याला फारच चांगली साधली होती. निरनिराळ्या मताचे लोक ओकोनेल्ला साहाय्य करीत आहेत, असें पाहून त्यानें आरंभिलेला उद्योग सर्व आयरिश लोकांच्या कल्याणाचा आहे, अशी जगांतील सर्व लोकांची खात्री झाली होती. आतां सांगितलेला त्याच्या आंगचा हा गुण लक्षांत आणिला ह्मणजे, त्याचें तें वाक्चातुर्य-देखील याच्यापुढें फिकें पडतें. पील जर पार्लमेंटाचा सभासद या नात्यानें फार प्रसिद्ध होता, तर ओकोनेल् देखील आपल्या आंगच्या कार्यकुशलतेनें मोठ्या योग्यतेस चढला होता. या गुणांच्या अनुषं-गानें असणारे दोष—ह्मणजे आवेगशीलता, कलहप्रियता, व अधिकार-प्रियता हेही त्याच्या अंगीं होते. परंतु हे दोष जरी त्याच्या अंगांत होते, तरी इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या तीनही देशांस ज्याचा अभि-मान वाटावा, अशा योग्यतेचा तो मनुष्य होता. वक्तृत्व आणि राज-कार्यनिपुणता या दोन गोष्टींत त्याची योग्यता फारच मोठी होती. उदात्त अशा तत्वांचें योग्य रीतीनें आकलन करणें व तीं एकदां आक-लन केलीं ह्मणजे शेवटपर्यंत त्यांनाच घट्ट धरून राहणें हें एक, आणि साधनें व साध्य यां दोहोंत भेद कोणता हें समजण्याचें अंगांत सामर्थ्य असणें व सध्याच्या मानानें साधनें हीं केवळ त्याचीं अनुषंगिक होत, असें समजून त्यांची योजना करणें हें दुसरें, अशीं दोन मुत्सद्दीपणाचीं मुख्य लक्षणें आहेत, व हीं दोन्हीं लक्षणें ओकोनेल्च्या अंगांत पूर्णपणें वसत होतीं, असें त्याची कारकीर्द पाहिल्यावर प्रत्येकाच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. अमुक एक गोष्ट साध्य करून घ्यावयाची असा एकदां त्याच्या मनाचा निश्चय झाला, ह्मणजे ती गोष्ट साध्य करून घेण्याकारितां, वेळेला अनुरूप अशा निरनिराळ्या साधनांची योजना करण्याच्या कामांत तो केव्हांहीं मागेंपुढें पहात नव्हता. निर्जीव झालेल्या आपल्या देशाला सजीव करावयाचें, ही कल्पना अगदीं लहान-पणापासून त्याच्या मनांत बाणली होती. यामुळें आपला देश व त्याचें

कल्याण या दोहोंशिवाय मनावर घेण्याजोगा असा अन्य विषयच त्याला दिसत नव्हता. फार तर काय, कोणच्याही राजाला किंवा कोणच्याही मंत्र्याला आपल्या राज्यासंबंधींची इतकी काळजी नसेल, इतकी ओकोनेल्ला आयर्लंड देशाची व देशासंबंधीं कामाची होती. आपल्या देशाचें कल्याण कशानें होईल, त्यांतील कामें उत्तमप्रकारानें कशीं चालतील, हाच विचार त्याच्या मनांत रात्रंदिवस घोळत होता. त्याच्या मनाची अशी अगदीं पक्की खात्री झाली होती कीं, इंग्लंड देशाबरोबर ऐक्य झाल्यापासून आयर्लंड देश निर्बल झाला आहे इतकेंच नाहीं, तर अगदीं निस्सत्व व निश्चेष्ट झाला आहे. राजकीय कामांत मन घालूं लागल्यापासून तो जें जें बोलला, त्यानें जें जें कांहीं काम केलें, तें सर्व ही स्थिति नाहींशी करण्याच्या हेतूनेंचत्याचें. सर्व लक्ष याच कामाकडे लागलें होतें. त्यानें आपलें सर्व मन, सर्व चित्त, सर्व हृदय, मोठ्या मेहनतीनें मिळविलेलें सर्व द्रव्य, आपल्या देशाला अर्पण केलें होतें. श्रमविभागाच्या तत्त्वावर त्याला हातभार लावणार असा एकही इसम त्याला मिळाला नाहीं. यामुळें त्याला आपला जन्म दगदगींत व यातायातींत घालवावा लागला. जें काम करण्याला, नेहमींच्या अनुभवावरून जर पाहिलें तर, अनेक लोकांची मदत घ्यावयाला पाहिजे होती, तें काम त्याला एकट्याला करावें लागत होतें. यावरून त्याला शारीरिक व मानसिक त्रास किती सोसावा लागला असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. असो.

येथपर्यंत आह्मी आपल्या चरित्रनायकाचें गुणदोषवर्णन निःपक्षपात रीतीनें केलें आहे, हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. त्याच्या चरित्राचा व त्याच्या व्यवसायांचा बहुविधपणा पाहून तो लोकोत्तर मनुष्य होता अशी आमच्याप्रमाणेंच आमच्या वाचकांचीही खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. सरळ मार्ग सोडून देऊन साहसाच्या मार्गांत शिरलेला तो केव्हां केव्हां आपल्या दृष्टीस पडतो, परंतु त्याचें करणें त्या त्या प्रसंगा पुरतेंच होतें, अशी आपली खात्री झाल्याशिवाय राहत नाहीं. तेवढा तो प्रसंग निघून गेला कीं,

त्याची नेहमींची शांत, आनंदी वृत्ति पहिल्याप्रमाणें कायम! आपला धर्म, व त्या धर्मानें तशीच प्रेरणा केल्यामुळें, आपला देश याशिवाय इतर गोष्टी त्याला तुच्छ वाटत होत्या. त्याच्या त्या उदार आणि सदय अंतःकरणांत एकंदर मनुष्यजातीचें हित करण्याची खरी इच्छा पूर्णपणें वास करीत होती. परंतु एखाद्या मोठ्या ग्रहाभोंवतीं ज्याप्रमाणें दुसरे अनेक उपग्रह फिरत असतात त्याप्रमाणें त्याच्या स्वदेश प्रीति भोंवतीं वर सांगितलेली इच्छा नेहमीं फिरत होती. ओकोनेल् हा एक मोठा व चांगला पुरुष होऊन गेला, असें जर आह्मीं ह्मटलें तर त्याला आमचे वाचक मोठ्या आनंदानें अनुमोदन देतील, असा आह्मांला पक्का भरंवसा आहे. पुष्कळ लोकांची अशी समजूत होती कीं, ओकोनेल् हा एक अधमांतला व आपल्या देशबांधवांबरोबर दगलबाजपणाचें वर्तन करणारा मनुष्य आहे. अशा लोकांसंबंधानें मौनवृत्ति धारण करून त्यांच्याविषयींचा आपल्या मनांतील तिरस्कार दाखविण्यापलीकडे विशेष कांहीं लिहावयाला पाहिजे असें आह्माला वाटत नाहीं. ओकोनेल् विषयीं जें कांहीं वाईट वाटतें तें हें कीं, तो जरी इतका चांगला व इतका श्रेष्ठ होता, तरी शेवटीं त्याला निराश होऊनच मरावें लागलें. त्याच्या दृष्टीला जें कांहीं परब्रह्म वाटत होतें व ज्याच्याकडे तो अगदीं मोठ्या उत्सुकतेनें पहात होता, तें कांहीं शेवटीं त्याच्या हाताला लागलें नाहीं. परंतु आगामी कालाचा भविष्य सांगणारा ज्योतिषी या नात्यानें त्यानें आपली कामगिरी उत्तम रीतीनें बजाविली यांत शंका नाहीं. जे लोक जगापुढें आले आहेत, त्यांच्यापेक्षां ओकोनेल्च्या हातून पुष्कळच थोड्या चुका झाल्या आहेत. जगांत प्रसिद्धीस आलेल्या लोकांनीं कोंणकोणचे भलते हेतु आपल्या मनांत धरले होते व ते साध्य करून घेण्याकरितां वेळेचा दुरुपयोग कसा केला, याची जर दर माणसागणिक एक निराळी याद केली, तर त्या सर्वांत ओकोनेल्च्या नांवाची याद बरीच लहान होईल, आणि त्यानें जें कांहीं केलें तेंच पुष्कळ केलें व त्याच्यापेक्षां त्याला जास्त करतांच आलें नसतें, असें ह्मटलें असतां, कोणालाही अन्यथा वाटणार नाहीं.

---